# काय होईल जर
## येशू जे बोलला
## त्याचा तोच अर्थ होता ?




# काय होईल जर

## येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता ?

लेखक : नाटे ब्रॅमसेन

अनुवादक : सॅमसन लंकेश्वर

**काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?**

नाटे ब्रॅमसेन प्रस्तुत
अनुवादक : सॅमसन लंकेश्वर

सर्व हक्क राखीव.

*प्रथम आवृत्ती*

ISBN-978-1-62041-044-8
लेकरांसाठी मदत, संधी आणि काळजी * www.rockintl.org

Marathi edition of **WHAT IF JESUS MEANT WHAT HE SAID?**
Copyright © 2017, 2026 ROCK International

• ***R**elief, **O**pportunity & **C**are for **K**ids*
• ***R**esources **O**f **C**rucial **K**nowledge*
P.O. Box 4766, Greenville, SC 29608 USA
www.rockintl.org • resources@rockintl.org

पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ जे ह्या पुस्तकात वापरले आहेत ते
भारतीय बायबल सोसायटीची पुनः संपादित आवृत्ती २०२१
आहे. परवानगीने वापरा. सर्व हक्क राखीव.

क्याला क्राहनने पृष्ठ डिजाईन केले आहे.

जे. हॉडगीन्स यांनी पुस्तकातील रचना आणि मांडणी केली आहे.

*भारतात मुद्रण*

**Printed In India**

**शिष्यत्वाच्या ह्या प्रवासात माझ्यासोबत
विश्वभर प्रवास करणाऱ्या तरुण लोकांनो,**

**हे पुस्तक तुमच्यासाठी आहे.**

**माझी प्रार्थना सदैव हीच राहील की**

**तुम्ही येशू ख्रिस्ताचे नि:शर्त शिष्य व्हावे,**

**त्याचे वचन पाळणारे शिष्य व्हावे.**

**हे पुस्तक तुमच्यासाठी माझे हृदय आहे.**

**पुढे जात राहा "ख्रिस्त येशूच्या ठायी
देवाचे जे वरील पाचारण**

**त्यासंबंधीचे बक्षीस मिळवण्यासाठी
मर्यादेवरील खुणेकडे धावत राहा."**

(फिलिप्पै. ३:१४)

# अनुक्रमणिका


परिचय ८

**भाग १ "माझ्या मागे येण्याची कोणाची इच्छा असेल ...." १०**
१ उलथापालथ सुरू होते १२
२ काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता? १८
३ सार्वकालिकतेचे आमंत्रण २६
४ शरणागतीत विजय शोधणे ३५

**भाग २ "...तर त्याने स्वतःस नाकारावे ..." ४०**
५ स्वतःचा त्याग किंवा स्वतःचा नकार ४२
६ जेव्हा स्वातंत्र्य मागासलेले वाटते ४९
७ जीवनासाठी पाया ५५
८ घराची रचना करणे ६१
९ देवाच्या वचनाने आपली कारकीर्द घडवणे ६३
१० देवाच्या वचनाने शिष्यत्व घडवणे ७०
११ देवाच्या वचनाने आपल्या गुंतवणुकीची तयारी करणे ८४
१२ देवाच्या वचनाने आपले नातेसंबंध घडवणे ९६
१३ देवाच्या वचनाने आपल्या शब्दांची रचना करणे १०७
१४ देवाच्या वचनाने क्षमा घडवणे ११८
१५ देवाच्या वचनाने आपली सुरक्षितता तयार करणे १२९
१६ देवाच्या वचनाने घडवलेल्या जीवनाचे शत्रू १३५
१७ पवित्र आत्म्याशी लयबद्ध होणे १४१

**भाग ३ "...व आपला वधस्तंभ उचलून घेऊन ..." १४८**
१८ येशूने तुम्हाला वधस्तंभापासून वाचवलेले नाही १५०
१९ वधस्तंभ समजणे १५५
२० देवाचे नाव व्यर्थ घेणे १६४
२१ वधस्तंभाचे आशीर्वाद १७२
२२ दुःख व छळातील दहा आशीर्वाद १७८

**भाग ४ " ...मला अनुसरावे." २०२**
२३ जेव्हा ख्रिस्तच घर होतो २०४
२४ अनुसरण करण्यास शिकावे २०९
२५ काय करावे हे प्रभूला सांगणे? २२१
२६ ज्याची आवश्यकता आहे हे तुमच्याजवळ नाही २२७
२७ पश्चातापावाचून जीवन २३२
अंतिम टिपा २४२
विशेष वैशिष्ट्ये : पवित्र शास्त्रात रमणे २५३
गहन अभ्यास करणे : पुस्तके आणि मिडिया संसाधने २६१

# परिचय

जगाला आणखी एका पुस्तकाची गरज नाही. तर येशू ख्रिस्ताला नि:शर्त शरण जाणाऱ्या जीवनांची गरज आहे.

काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता? काय होईल जर येशूला तुमच्या जीवनाचा केवळ एकच भाग नको असेल? तर त्याला तुमचे संपूर्ण जीवनच हवे असेल तर काय होईल?

आपण त्याच्या बोलण्याकडे  जीवन बदलणारे शब्द म्हणून स्वीकारण्याऐवजी त्यांना सांस्कृतिकदृष्ट्या-स्वीकारयोग्य होईल इतपतच कमी लेखतो का? काय होईल जर प्रभूचा हेतू आपण त्याचे शब्द स्पष्ट करावे असा नव्हता?

काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

माझ्या पिढीबरोबर जगभर काम करीत असताना, अनेक जण त्यांच्या विश्वासाच्या प्रवासात गोंधळलेले आहेत असे मला दिसते, मी त्यांना असे विचारताना ऐकतो : *"ख्रिस्तावरील विश्वासापासून ते ख्रिस्तासोबत चालण्यापर्यंतचा हा प्रवास नेमका काय आहे?" "तो कसा असला पाहिजे?" "येशूचा आपला तारणारा म्हणून स्वीकारण्यापासून ते त्याला आपला प्रभू म्हणून शरण जाण्यापर्यंतची आपली वाटचाल अशीच असली पाहिजे का?"*

ख्रिस्ताच्या सर्वव्यापी आव्हानाला एकसारखी, कायद्याच्या भाषेतील किंवा सोपी उत्तरे सुचविण्याऐवजी, ख्रिस्ताची वचने आहेत तशीच स्वीकारण्यासाठी या पुस्तकाच्या पानोपानी आपल्याला स्वतःला विचारायला लावणारे परखड प्रश्न आहेत. जर येशू जे बोलला तोच त्याचा म्हणण्याचा नेमका अर्थ आहे, तर मग त्याच्या वचनांचा आपल्या नातेसंबंधांवर, गुंतवणूकीवर, बोलण्यावर, इतरांकडे पाहण्याचा दृष्टीकोनावर, आध्यात्मिक शिस्तीवर, शिष्यत्वावर आणि अखेरीस आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमधून आपण कसे जगतो यावर कसा परिणाम होऊ शकतो?

आपल्या जीवनात आपल्या सोयीनुसार देवाचे वचन घेण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, देवाच्या वचनानुसार आपण आपली जीवने कशी काय घडवू शकतो? काय होईल जर येशू आम्हांला वधस्तंभापासून वाचविण्यासाठी नाही, तर प्याल्यापासून वाचविण्यासाठी मरण पावला? *"मला तर जगणे हे ख्रिस्त, आणि मरणे हा लाभ आहे"* (फिलिप्पै. १:२१) हे येशूच्या एका अनुयायाच्या सारांशीत विधानानुसार आपण जगलो तर काय होईल?

जगणे हा ख्रिस्त-आणि मरणे हा सर्वात मोठा लाभ हे कसे काय होऊ शकते?

हे अधिक प्रयत्न करण्याविषयी नाही. हे त्याला अत्यंत घनिष्ठपणे जाणण्याविषयी आहे. हे स्वयं प्रभू परमेश्वराने रचलेल्या दिव्य आणि सार्वकालिक प्रीतीच्या कथेमध्ये सहभागी होण्यासाठीचे आमंत्रण आहे.

आपण ह्या आत्मपरीक्षणाच्या प्रवासासाठी तयार आहोत का? आपण कठीण प्रश्न विचारण्यास आणि कठीण उत्तरांची अपेक्षा करण्यास तयार आहोत का? ह्या प्रश्नाच्या तात्पुरत्या आणि सार्वकालिक लागुकरणातून विचार करण्यास आपण तयार आहोत का ....

काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

नाटे ब्रॅमसेन, २०१७

भाग १

# “ माझ्या येण्याची इच्छा

मागे
कोणाची
असेल ...”

# १

# उलथापालथ सुरू होते

हो, मला ठाऊक आहे. पुरेशी तयारी केल्यावाचून मॅरेथॉन शर्यतीत धावू नका असे इशारा देणारे अनेक लेख मी वाचले होते. परंतु जोपर्यंत तुम्ही *"तयारी"* म्हणून दोन-तीन आठवड्याआधी एक-दोन वेळा एक-चार मैल धावला नाही, तोपर्यंत तुम्ही काहीही तयारी केलेली नाही-माझा नेहमीचा व्यायाम आणि अधूनमधून पोहणे तर सोडाच. स्टॉकहोम मॅरेथॉनकडून ताकीद देणारा ईमेल माझ्या मनात कोरला गेला होता : *"४२,१९५ मीटर्स धावणे ही एक सहनशक्तीची कसोटीच आहे. पूर्णपणे निरोगी असल्याशिवाय सुरुवात करू नका."*

शर्यतीच्या त्या महत्वाच्या काही दिवसांपूर्वी, मला आठवते मी कॉलोराडो रनिंग कंपनी मध्ये गेलो होतो आणि तेथील सहकाऱ्याने मला विचारले, *"तुम्ही कोणती शर्यत धावण्याची योजना आखली आहे?"* मी स्टॉकहोम मॅरेथॉनमध्ये धावणार असल्याचे सांगताच, *"मला न्याहाळत त्याने उत्तर दिले,* "तुझा प्रशिक्षण कार्यक्रम काय होता?" *वस्तुस्थिती अशी की तयारीसाठी मी अद्याप एक मैल देखील धावलो नव्हतो* (तयारी म्हणून माझे चार मैलाचे धावणे ही गोष्ट तर अद्याप घडणे बाकी होते), *मी उत्तर दिले, हे थोडेसे अपारंपरिक होते, पण चांगले चालले आहे."* धन्यवाद असो, माझ्या उत्तराने त्याचे समाधान झाले, आणि त्याने लगेच दुसरा प्रश्न विचारला, *"रोकड किंवा उधार?"*

मी कोणत्याही प्रकारे वैद्यकीय किंवा व्यवसायिक सल्ल्याकडे (किंवा सामान्य ज्ञानाकडे) दुर्लक्ष करण्याचे समर्थन करत नाही, परंतु माझ्या *"अपरंपरागत"* तयारी नंतरही मॅरेथॉन धावण्याच्या माझ्या योजनेविषयी विचार करताना, मला एक महत्वाची बाब शिकायला मिळाली. आपण कित्येकदा जीवनाच्या अत्यंत महत्वाच्या स्पर्धा-शर्यतींपासून स्वतःला दूर ठेवतो याचे कारण आपल्याला वाटते की आपण त्यासाठी तयार नाही.

(आणि हो, तुम्हाला आश्चर्य वाटत असेल तर सांगतो, स्वीडनमध्ये त्या पावसाळी शनिवारी, एकच उद्देश मनात ठेऊन-मॅरेथॉन पूर्ण करायची आहे-मी जवळजवळ १७,००० इतर धावणाऱ्यांसोबत रांगेत उभा होतो, आणि माझ्या पावलांनी कसे तरी मला अंतिम रेषेपर्यंत पोहचवलं!)

## कोणती गोष्ट तुम्हाला रोखत आहे?

बायबल अशा अनेक लोकांच्या कथांनी भरलेले आहे ज्यांना वाटले की देवाने त्यांना ज्या कामासाठी बोलावले होते त्यासाठी ते पात्र नाहीत. जेव्हा देवाने मोशेला इस्राएल लोकांना मिसर देशामधून बाहेर नेण्यासाठी आज्ञा दिली तेव्हा त्याने वक्तृत्वाचा अभाव असल्याचे निमित्त सांगितले. जेव्हा देवाने गिदोनाला बलाढ्य मिद्यानी लोकांविरुद्ध सेनेचे नेतृत्व करण्यासाठी निवडले तेव्हा त्याने त्याच्या कौटुंबिक पार्श्वभूमीला अडथळा मानले. एलीया संदेष्ट्याने सिदोन येथील विधवेला सांगितले की ती त्याच्यासाठी देवाच्या तरतुदीचा एक माध्यम असेल तेव्हा तिच्याकडे काही अन्नधान्य नसल्याने तिला फार वाईट वाटले. जेव्हा देवाने यिर्मयाला त्याचा प्रवक्त होण्यासाठी बोलावले तेव्हा त्याने असे सुचविले की त्याचे वय ही एक समस्या होती. पेत्राने त्याच्या भूतकाळाचा विचार करत मागे वळण्याचा प्रयत्न केला...

*"देव सुसज्ज असणाऱ्यांना पाचारण करत नाही; तर पाचारण केलेल्यांना सुसज्ज करतो,"* ह्या म्हणीमध्ये प्रतिबिंबित केल्याप्रमाणे, देवाने त्यांच्यासमोर ठेवलेल्या शर्यतीत धावण्यासाठी या सर्व लोकांना अपुरी तयारी वाटत होती. परंतु त्यांच्यात एक समान गोष्ट होती, ती अशी की देव त्यांच्यासोबत होता. तो पुरेसा होता.

**ख्रिस्ताचे अनुयायी होणे हे आपल्याला किती तयार वाटते यावर अवलंबून नाही.**

ख्रिस्ताचे अनुयायी होणे हे आपल्याला किती तयार वाटते यावर अवलंबून नाही. तर ते आमंत्रणाविषयी आहे. *"माझ्या मागे या"* (मत्तय. ४:१९) हा अंतिम प्रस्ताव असून गालील समुद्राच्या किनाऱ्यावर काही कोळयातील काही जणांशी येशू बोलला त्यातून हा संदेश प्रतिध्वनित होतो.

एक आमंत्रण. एक पाचारण. एक निवड. सार्वकालिकतेचा शोध घेण्यासाठी जीवनाच्या सुरक्षित आणि आरामदायक स्थितीतून बाहेर पाऊल टाकण्याची तयारी. देव सामान्य लोकांना असामान्य जीवन जगण्यासाठी बोलावतो. जेव्हा ख्रिस्त त्यांना भेटला, पेत्र व अंद्रिया पाण्यात जाळे टाकत होते-हातात असलेल्या कामावर लक्ष ठेवून होते. याकोब आणि योहान त्यांचे जाळे दुरुस्त करीत होते-त्यांच्या भविष्याची तरतूद करीत होते. मत्तय

जकातनाक्यावार बसून कर वसूल करीत त्याची कारकीर्द घडवत होता. परंतु ख्रिस्ताने हस्तक्षेप केला आणि एका नवीन उद्देशासाठी तसेच एका वेगळ्या भविष्याच्या स्वप्नाचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांना आमंत्रित केले.

कदाचित तुम्ही ह्या शिष्यांसारखे असाल. सदरचे पुस्तक वाचत असताना पुढील काही तासांमध्ये तुमच्या जीवनात आमुलाग्र बदल व्हावा अशी तुमची अपेक्षा नसेल. तरीही येथे मग तुमच्यासाठी एक प्रश्न आहे : येशूच्या आमंत्रणामुळे तुमच्या व्यवसायात आणि भविष्यात बदल करण्याची तुमची तयारी आहे का? ख्रिस्त तुम्हांला राष्ट्रांवर प्रभाव टाकण्यासाठी बोलावत असताना तुम्ही अजूनही तुमच्या जाळ्यांमध्येच गुंतलेले आहात का? तुम्ही स्वतःसाठी आखलेल्या भावी योजनेपासून मागे फिरून येशूने तुमच्यासाठी योजलेल्या भविष्याकडे जाण्यास तयार आहात काय?

ह्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या आयुष्यातूनच मिळतील. कोणीही योगायोगाने ख्रिस्ताचे अनुसरण करीत नाही.

ख्रिस्ताने केलेल्या पाचारणाला प्रतिसाद म्हणून कोणत्या बाबी सोडण्याची तुमची तयार नाही?

- सुरक्षितता?
- नौकरी?
- पद?
- घर?
- स्वप्ने?
- सार्वजनिक मान्यता?
- लोकांचा दृष्टीकोन?
- सुविधा?
- कुटुंब?
- नातेसंबंध?
- प्रत्यक्ष जीवन?

हे प्रश्न अयोग्य आहेत का? पूर्वी उल्लेख केलेल्या लोकांनी असा विचार केला नाही. पुढे येणाऱ्या पानांमध्ये, ह्या सर्व विषयांवर येशूच्या शब्दाच्या प्रकाशात विचार करण्यात येईल.

लक्षात घ्या पवित्र शास्त्रात एकही स्त्री किंवा पुरुष असा नाही की ज्याला त्याच्या किंवा तिच्या स्थितीची उलथापालथ न करता येशूच्या मागे येण्यासाठी पाचारण केले जाते. तुम्ही या नियमाचा अपवाद आहात का? मरीयेने ख्रिस्ताची सांसारिक आई म्हणून असलेली भूमिका नम्रतेने स्वीकारली; पण ती स्वीकृती तिच्या प्रतिष्ठेसाठी धोकादायक ठरली, तरीही तिने त्यासाठी आपले जीवन अर्पण केले, आणि तात्पुरते स्वतःच्या जीवनावर असलेली प्रीती सोडून दिली. तिने देवाला देवाची दासी म्हणून पूर्णपणे आज्ञाधारक व शरण केले.  योसेफाची प्रतिष्ठा आणि सम्मान तेव्हा धुळीस मिळाले जेव्हा त्याने मरीयेला आपली पत्नी म्हणून स्वीकारण्यासाठी देवदूताचा संदेश मान्य केला, आणि मरीयेच्या गरोदरपणाशी संबंधित कथित घोटाळ्यात स्वतःला गुंतवून घेतले. ख्रिस्ताचा कोणत्याही जीवनात प्रवेश गैरसमज, व्यत्यय आणि सामाजिक पातळीवर बदल घडवून आणतो.

आपणही त्याच प्रश्नांना सामोरे जातो ज्यास मरीया आणि योसेफ सामोरे गेले.

ख्रिस्ताने तुमच्या जीवनावर पूर्ण ताबा घ्यावा यासाठी तुम्ही तयार आहात का? तुम्ही त्याचे अनुसरण करणे आणि त्याला घनिष्ठतेपणे ओळखणे सोडून तुमच्या सामाजिक प्रतिष्ठा जपण्यात गुंतलेले आहात का? तुम्हाला जे जीवन परिचित आहे ते सोडण्यास तुम्ही तयार आहात का, जेणेकरून ज्या उद्देशासाठी तुम्हाला घडवले आहे ते पूर्ण होऊ शकेल?

आपल्या निर्माणकर्त्याने स्वतः जे दिले त्यापेक्षा अधिक आपल्याकडून काहीही मागणी करत नाही. वैभवाची भव्यता सोडून एका असहाय्य नवजात देहात निवास करणे,  एक बेकायदेशीर बालक म्हणून पाहिले जाणे, आणि त्याच्या बालकाच्या वस्त्रांप्रमाणे गुंडाळलेल्या पट्ट्यांमध्ये स्वतःचा पहिला बिछाना गोठ्यात असणे- हे सर्व त्याने स्वीकारले. एका व्यापित क्षेत्रात तो एक नागरिक म्हणून जन्मला,  त्याच्या जन्मानंतर थोड्याच अवधीत तो शरणार्थी झाला, आणि तीन वर्षे बेघर जीवन जगले. ख्रिस्ताने या जगात दरिद्री अवस्थेत आणि सामाजिक अस्विकृतीत येण्याची निवड केली, ज्यामुळे पुढील वचनाला गहन अर्थ प्राप्त होतो : *"आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हांला माहित आहे; तो धनवान असता तुमच्याकरता दरिद्री झाला, अशा हेतूने की, त्याच्या दारिद्र्याने तुम्ही धनवान व्हावे"* (२ करिंथ. ८:९).

**आपल्या निर्माणकर्त्याने स्वतः जे दिले त्यापेक्षा अधिक आपल्याकडून काहीही मागणी करत नाही.**

त्याचे अनुसरण करण्याचे हे एक आमंत्रण आहे. त्याच्या पावलांवर पाऊल ठेवण्याचे. जेथे तो आधीच गेला आहे. जेथे तो जात आहे.

पदवीपूर्व विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून, विद्यार्थ्यांच्या दीक्षांत समारंभात बोलणाऱ्या एका धर्मगुरूचे भाषण मला आजही आठवते. त्यांच्या बोलण्याचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. ख्रिस्ताच्या काही कठीण शब्दासंबंधात बोलताना ते म्हणाले, *"ह्या वचनांत येशूचा प्रत्यक्षात तो अर्थ नव्हता, जो तो बोलला."* मला आश्चर्य वाटले. *"मी खरेच बरोबर ऐकले का?"* त्या दिवसापासून मी स्वतःला हा प्रश्न विचारत आहे, *"काय होईल जर येशूला केवळ माझ्या जीवनाचा एकच भाग पाहिजे असेल? काय होईल जर त्याला माझे संपूर्ण जीवनच हवे असेल? काय होईल जर इसहाक वाट्स यांनी लिहिलेले शब्द खरे असतील,* "प्रेम किती अद्भुत, किती दैवी, माझा प्राण, माझे जीवन माझ्या सर्वस्वाची मागणी करते"?[१]

विल्यम मॅकडोनाल्ड, बिलीवर्स बायबल कॉमेंटरीचे लेखक, म्हणाले : "हुशार ईश्वरविज्ञानी तुम्हांला ते काय म्हणते तो त्याचा अर्थ नाही या संबंधात हजारो कारणे देऊ शकतात, पण साधे शिष्य त्यास उत्सुकतेने आत्मसात करतात, हे गृहीत धरून की प्रभू येशूला माहित होते तो हे का बोलत होता?"[२] सोरेन किर्केगार्ड, एक डैनिश तत्वज्ञानी, लिहितात, "बायबल हे समजण्यास फारच सोपे आहे. परंतु आपण ख्रिस्ती लोक फसवणूक करणाऱ्यांचा समूह आहोत. आपण समजण्यास असमर्थ आहोत असा ढोंग करतो, कारण आपल्याला चांगले माहित आहे की ज्या क्षणी आपण समजतो, त्याक्षणीच आपण त्यानुसार वागण्यास बांधील होतो."[३]

ह्या पुरुषांनी योग्य ते केले.

येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, ***"माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे"*** (मत्तय १६:२४).[४] आणि जर आपण हे मत्तयच्या शुभवर्तमानात वाचण्यात चुकलो, तर मार्क आणि लूक या दोन्हींमध्ये येशूच्या तोंडी तेच वाक्य होते याचा समावेश आहे.

हे पुस्तक त्या अर्थाचा शोध घेण्याविषयी आहे.

येशू जे बोलला त्याचा नेमका अर्थ तोच होता या आधारावर आपण विचार करणार आहोत. हे लक्षात ठेवून, अस्वस्थ होण्याची अपेक्षा ठेवा.

## धोका

हे पुस्तक वाचण्यात येथे स्पष्ट धोका आहे.

जर तुम्ही हा विश्वास ठेवण्याची निवड केली की येशू जे बोलला तोच त्याचा खरा अर्थ होता तर ते केवळ तुम्हांला अस्वस्थच करणार नाही, परंतु तुमचे जीवन कायमचे बदलून जाईल. वाचताना तुम्हांला हे जाणवेल की येशू प्रामुख्याने त्या कठीण कुटुंबातील सदस्यांशी, तुमच्या ऑफिसमधील शेजारच्या केबिनमध्ये बसलेल्या व्यक्तीशी, किंवा रविवारी सकाळी चर्च मध्ये तुमच्या बाकडांच्या रांगेत विरुद्ध बाजूला बसलेल्या व्यक्तीशी बोलत नाही. तो तुमच्याशी बोलत आहे. तुमच्या जीवनाविषयी. तुमच्या हृदयाविषयी. पृथ्वीवरील तुमच्या क्षणभंगुर अस्तित्वाविषयी.

जेव्हा यशया संदेष्ट्याने ईश्वरत्व बोललेले ऐकले, *“मी कोणाला पाठवू? आमच्यासाठी कोण जाईल?”*, तेव्हा त्याने इतरांची भरती करण्यासाठी स्वेच्छेने प्रतिसाद दिला नाही. त्याऐवजी, तो म्हणाला, *“हा मी आहे! मला पाठव”* (यशया ६:८). बदलाची सुरुवात स्वतःपासून झाली.

येशूच्या मागे चालण्याची तुमची निवड ही एखाद्याच्या आज्ञा पाळण्यावर अवलंबून नसते. ही तुमच्या स्वतःवर अवलंबून असते. जेव्हा तुम्ही प्रभू येशू ख्रिस्तासमोर उभे राहता, तेव्हा इतर कोणालाही दोष देऊन त्याच्या सार्वकालिक शब्दाची अवज्ञा करण्यासाठी तुम्हांला कोणताही बहाणा करता येणार नाही.

हे असुविधाजनक, अस्वस्थ, निराशाजनक किंवा पूर्णपणे मूर्खपणाचे दिसत असतानाही तुम्ही ख्रिस्ताच्या मागे चालण्यास तयार असाल का?

हे सर्व एका आमंत्रणाने सुरू होते.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. भूतकाळात ख्रिस्ताच्या वचनांचे पूर्णपणे पालन टाळण्यासाठी तुम्ही कोणते बहाणे वापरले? त्यामागे काही विशेष कारण होते का?

२. ख्रिस्ताच्या पाचारणासाठी तुम्ही सध्या कोणती गोष्ट सोडण्यास तयार नाही?

३. ख्रिस्ताने पृथ्वीवर मानव रूप धारण करण्यासाठी कोणत्या गोष्टी सोडल्या?

४. जर तुम्ही त्याचे अनुसरण करण्याच्या त्याच्या आमंत्रणाला पूर्णपणे शरण गेलात तर तुमचे जीवन कशा प्रकारे बदलू शकते?

# २

# काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

मला आजही आठवते-जणू काही हे कालच घडले होते. थरथर कापणाऱ्या पायांनी, मी ब्लौक्रान्स ब्रिजच्या कमानीवरून धडपडत चालत होतो. हा उघड्या ग्रील्सने बांधलेला मार्ग होता ज्यातून माझ्या पायांखाली आणि दक्षिण आफ्रिकेची मोकळी हवा संचार करीत असलेले स्पष्ट जाणवत होते, आणि खाली तब्बल ७०९ फुट खोल दरी दिसत होती. सकाळ खुसखुशीत होती. ढग निघून गेले होते आणि उत्तरेला त्सित्सिकाम्मा पर्वत रांगांवर सूर्यप्रकाश उजळून निघाला होता, तर दक्षिणेला हिंद महासागर चमकत होता. मिशन : जगातील सर्वात उंच व्यवसायिक ब्रिजवरून बंजी उडी मारण्याचा अनुभव.[५]

लवचिक कॉर्डला जोडलेल्या ॲल्युमिनियम कॅरॅबिनर्ससह मला पूर्ण शरीर हार्नेसमध्ये बांधण्यात आले, सर्व कर्मचाऱ्यांनी मला शुभेच्छा दिल्या. मी कॉंक्रीटच्या फलाटाच्या किनाऱ्यावर उभा राहिलो. वरती एक सूचना फलक होता, जो सावधगिरीचा इशारा देत होता, *"भय हे तात्पुरते असते, खेद कायमचा असतो."* मोठ्या आवाजात हाका येत होत्या, *"मागे ये! मागे ये! मी त्याकडे दुर्लक्ष केले, मनात विचार करत राहिलो, आणि शेवटच्या क्षणी कर्मचाऱ्यांकडे सल्ल्यासाठी पाहिले. त्यांचे उत्तर थोडक्यात होते : संकोच करू नकोस."* टेक्नो संगीत वाजत होते, ॲड्रेनालाईन संचारत होते, आणि हृदय जोरजोरात धडधडत होते, तेवढ्यात मी भयावह उलटी गणना ऐकली, *"५-४-३-२-१-उडी मार!!!"* आज्ञा पूर्ण होण्याआधीच, मी पुलावरून खाली उडी मारली होती.

आणखी एक गोष्ट माझ्या सूचित तपासली गेली होती.

वेडेपणा? कदाचित. आंधळा विश्वास? तसे काही नाही. सिद्ध तंत्रज्ञानासह सिद्ध सुरक्षा रेकॉर्डच्या अनेक दशकांनी, ब्लौक्रान्स ब्रिज वरील दोरीच्या विश्वसनीयतेची हमी दिली. प्रश्न हा नव्हता, *"हे सुरक्षित आहे का?"* किंवा, *"दोरी मला धरून ठेवेल का?"* खरा प्रश्न होता, *"मी उडी मारेन का?"*

त्याचप्रमाणे, पवित्र शास्त्रात देवाने जे प्रकट केले आहे त्याविषयी प्रश्न उभा राहतो, आपण त्याच्यावर कितपत विश्वास ठेवतो? आपण आपल्या जीवनासाठी त्याच्यावर पूर्णपणे विश्वास ठेवतो का? अनेक लोक देवावर विश्वास असल्याचा दावा करतात, तरीही ते आपल्या विश्वासानुसार जगण्यात अपयशी ठरतात.

एक आजारी व्यक्तीचा विचार करा –ती औषधात बरे करण्याचे गुणधर्म आहेत हे मान्य करते, तरीही ते औषध गिळण्यास नकार देते. किंवा एखादा मनुष्य एखाद्या लेखकाच्या महानतेविषयी बोलतो, पण त्याचे पुस्तक कधीही वाचत नाही. त्याचप्रमाणे, आपण येशू ख्रिस्ताला प्रभू म्हणून संबोधतो, तरीही आपण ज्याप्रकारे जीवन जगतो त्याद्वारे त्याच्या प्रभुत्वाला नकार देतो?

ख्रिस्तावर विश्वास ठेवणे म्हणजे फक्त विश्वास व्यक्त करण्याबद्दल नाही. हे त्याच्यात विश्वास ठेवून जीवन जगण्याबद्दल आहे. ख्रिस्ताचे अनुयायी होणे म्हणजे कठीण प्रयत्न करण्याबद्दलही नाही. हे त्याला-त्याचे हृदय, त्याचा आवेश, त्याची इच्छा ओळखण्याबद्दल आहे. ख्रिस्ताला ओळखणे हे धार्मिक अनुभव घेण्याबद्दल नाही. हे मूलगामी भेटीबद्दल आहे. तुमची त्याच्याशी भेट झाली आहे का? किंवा तुम्ही तुमच्या वैयक्तिक सोयी-निवडींनुसार ख्रिस्ताचे पाचारण स्वीकारू शकता असे आधुनिक ख्रिस्ती धर्माने तुम्हांला पटवून दिले आहे का ? तुमच्या पूर्व स्थितीतल्या जीवनशैलीनुसार जगणे येशूला आवडते का?

**ख्रिस्ताचे अनुयायी होणे म्हणजे कठीण प्रयत्न करण्याविषयी नाही. हे त्याला ओळखण्याविषयी आहे.**

काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

## प्रवास कुठे सुरू होतो

*“कारण मला जे सांगण्यात आले ते मी तुम्हांला सांगून टाकले, त्यापैकी मुख्य हे की, शास्त्राप्रमाणे ख्रिस्त तुमच्याआमच्या पापांबद्धल मरण पावला; तो पुरला गेला; शास्त्राप्रमाणे तिसऱ्या दिवशी त्याला पुन्हा उठवण्यात आले”* (१ करिंथ. १५:३-४).

जीवन ज्यासाठी आपल्याला निर्माण केले आहे ते त्याक्षणी सुरू होते जेव्हा आपण आपल्या स्वतःवरून आणि आपल्या स्वतःच्या प्रयत्नांवर अवलंबून न राहता प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवतो –त्यावर विश्वास ठेवतो की त्याचा मृत्यू, गाडले जाणे आणि पुनरुत्थान आपल्यासाठी काय प्राप्त करून गेले आहे. ख्रिस्ताचे अनुयायी होण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे येशूने सार्वकालिक जीवनाच्या मार्गाबद्दल जे म्हटले आहे त्याचा तोच अर्थ आत्मसात करून त्यावर विश्वास ठेवणे आहे.

*“पुनरुत्थान व जीवन **मीच** आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल; आणि जिवंत असलेला प्रत्येक जण जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही, हे तू खरे मानतेस काय?”* (योहान. ११:२५-२६).

आपली कामे देवासमोर आपल्याला स्वीकृती मिळवून देत नाहीत. तर ख्रिस्त देतो.

*“कारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे तुमचे तारण झालेले आहे आणि हे **तुमच्या हातून झाले असे नाही**, तर हे देवाचे दान आहे; कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही. **आपण सत्कृत्ये करावीत** म्हणून ख्रिस्त येशूच्या ठायी निर्माण केलेले असे आपण त्याची हस्तकृती आहोत; ती सत्कृत्ये आचरत आपण आपला आयुष्यक्रम चालवावा म्हणून देवाने ती पूर्वी योजून ठेवली”* (इफिस. २:८-१०).

बायबल आपल्याला शिकवते की देवाने जगाला मानवासाठी निर्माण केले आणि मानवाला स्वतःसाठी निर्माण केले. त्याने पहिला पुरुष व स्त्री *“त्याच्या प्रतिरुपात आणि त्याच्याशी सदृश अशी निर्माण केली”* (उत्पत्ती १:२६), म्हणजे त्याने त्यांना त्यास ओळखण्याची आणि प्रीती करण्याची क्षमता दिली. त्यांनी त्याच्यासोबत सार्वकालिकतेमध्ये जगावे अशी त्याची इच्छा होती.

परंतु मग आदाम, पहिला पुरुष, ह्याने देवाची अवज्ञा करण्याची निवड केली. आणि जसे देवाने ताकीद दिली होती, पापाने मृत्यू आणला. बायबलमध्ये, मृत्यू म्हणजे केवळ नाश नाही, पण वेगळे होणे. जीवनाच्या उगमापासून वेगळे होणे. पापाने देव आणि मनुष्यामधील जवळचे संबंध नष्ट केले. मानवजातीचा पिता म्हणून, आदामाच्या पापाने सर्वांना दूषित

केले, परंतु आपण केलेल्या निवडीसाठी आपण त्याला दोषी ठरवू शकत नाही. *"एका माणसाच्या द्वारे पाप जगात शिरले आणि पापाच्या द्वारे मरण शिरले; आणि सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व माणसांमध्ये अशा प्रकारे मरण पसरले"* (रोम. ५:१२).

आपल्याला गंभीर समस्या आहे. देव परिपूर्ण आणि पवित्र आहे. कोणताही आत्मा जो पापाने दूषित झालेला आहे त्याच्यासोबत सार्वकालिकतेमध्ये जगू शकत नाही. परंतु तो फक्त पवित्रच नाही. पहिले योहान ४:८ आपल्याला सांगते, *"देव प्रीती आहे"*. लक्षात घ्या, ते हे सांगत नाही की देव केवळ प्रीती करतो; तो प्रीती आहे (ग्रीक भाषेत अगापे). त्याची प्रीती असीम गहन, बिनशर्त, त्यागमय प्रीती जी दुसऱ्यांचे कल्याण शोधते, मग ते कितीही अपात्र असोत. देवाची प्रीती भावनांवर आधारित नाही, परंतु निवडीवर आहे (योहान ३:१६ पाहा). आपल्याभोवती दिसणाऱ्या स्वार्थीपणा, कामुक उत्कटतेशी देवाच्या प्रीतीचा गोंधळ घालू नये. आपल्या जगात, जेव्हा शारीरिक वासना कोणाच्या इच्छेच्या विरोधात लादली जाते, तेव्हा त्यास आपण गैरवर्तन म्हणतो, प्रीती नाही. अशी *"प्रीती"* घेते. देवाची प्रीती अशी आहे की ती देते. परंतु देव त्याची असीमित, शुद्ध, उत्कट प्रीती स्वीकारावी म्हणून दबाव आणत नाही. तो निवड करण्यासाठी आपल्याला स्वतंत्रता देतो. प्रीतीचे संबंध निवडीवर आधारित असतात, दबावाने नाही. जर तुम्हांला पवित्र शास्त्र माहित असेल, तर तुम्हांला माहित असेल की देवाने आपल्या महान प्रीती आणि पवित्रतेतून, अत्युच्च प्रीतीची कथा घडवली आहे.[६]

**देव केवळ प्रीती करत नाही; तर तो स्वतः प्रीती आहे.**

हजारो वर्षांपासून, देवाने शेकडो अचूक भविष्यवाण्या आणि सामर्थ्यशाली प्रतिमा वापरून मसीहाच्या आगमनाचा मार्ग मोकळा केला. देवाच्या पवित्र नियमासाठी प्रत्येक पाप्याच्या मृत्यूची आवश्यकता होती. परंतु, त्याचा न्याय आणि दयेमध्ये, देवाने एका निश्चित निष्पाप प्राण्याचा, जसे एक कोकरा बदली मृत्यू म्हणून स्वीकारला, म्हणजे तो दोषी पाप्याच्या ठिकाणी मरावा. अशा प्रकारे देवाने पापाच्या विरोधात न्याय केला, त्याचवेळेस पाप्यांना दया दाखवली. अशा अर्पणाच्या रक्ताने पापासाठी आवरण प्रदान केले, जोपर्यंत देव पाप्यांसाठी प्रतिज्ञा दिलेला तारणारा पाठवेल जो जगाच्या पापाचे ऋण भरून टाकेल. त्या तारणाऱ्याचे नाव येशू होते.

*"परंतु काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता. ह्यात उद्देश हा होता की, जे नियमशास्त्राधीन होते त्यांना त्याने खंडणी भरून सोडवावे, आणि आपल्याला पुत्राचा हक्क मिळवा."* (गलती. ४:४-५).

सृष्टीचा निर्माता आपले अंतिम तारणाचे मिशन पूर्ण करण्यासाठी आपल्या सृष्टीत सामील झाला. प्रतिज्ञा केलेला तारणारा हा अदृश्य देवाचा अचूक प्रतिनिधी होता, एका कुमारीच्या गर्भाद्वारे, त्याने पतित मानवाच्या जगात प्रवेश केला. तो निष्पाप असा जन्मला, जरी आपल्याप्रमाणे शरीर धारण केले होते, तरी तो पवित्र होता. तो प्रीती होता. त्याने आपल्या व्यक्तीमत्वात - निष्पाप आणि बलिदानात्मक जीवनाद्वारे अदृश्य देवाच्या स्वभावाचे दर्शन घडवले. जसे योहान म्हणतो, *“जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा!”* (योहान. १:२९). त्याने पाप्यांच्या ठिकाणी स्वेच्छेने दु:ख सहन केले आणि मरण पत्करले, आणि जगाच्या पापाचे ऋण भरले गेले. वधस्तंभावर, त्याने घोषित केले, *“पूर्ण झाले आहे!”* (योहान. १९:३०). पापाचा भयंकर दंड पूर्णपणे भरला गेला जेणेकरून त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना क्षमा मिळेल.

परंतु हा कथेचा शेवट नाही. त्याच्या मृत्यू नंतर तिसऱ्या दिवशी, येशू पुनरुत्थित झाला! त्याने मृत्यू आणि कबरेवर विजय मिळवला, तो पुनः कधीही मरणार नाही. पवित्र शास्त्र म्हणते, *“कारण पापाचे वेतन मरण आहे; पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे”* (रोम. ६:२३). मृत्यूला त्या प्रभूवर हक्क नव्हता ज्याने कधीही पाप केले नाही. ते सर्व जे प्रभू येशूवर आणि त्याने वधस्तंभ आणि रिकामी कबरेद्वारे जे काही प्राप्त केले त्यावर विश्वास ठेवतात, त्यांना येशू प्रतिज्ञा देतो, *“मी तुम्हाला खचित खचित सांगतो, जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठवले त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही, तो मरणातून जीवनात पार गेला आहे”* (योहान. ५:२४).

हे असे शब्द ऐकल्यानंतर, काही लोकांनी प्रतिसाद दिला, *“माझा न्याय करू नको!”* त्यांना जे समजले नाही ते हे की देवाचे मानक हे आपल्यापेक्षा वेगळे आहे. पापी लोक आणि त्यांनी स्वतः-बनवलेले धर्म *“चांगले आणि वाईट”* या दृष्टीकोनातून विचार करतात आणि जर माझ्या चांगल्या कृत्यांनी माझ्या वाईट कृत्यांवर मात केली, तर अपेक्षेने देव माझा स्वीकार करील.” परंतु सत्य आणि जिवंत देव लोकांना एकतर धार्मिक किंवा अधार्मिक असे पाहतो.

तुम्ही फुटबॉल खेळाचे उत्सुक चाहते असायला पाहिजे असे नाही (जो प्रकार पायांनी खेळला जातो-त्यास सॉकर देखील म्हणतात) की किती गोल मारले यावर आधारित एक खेळ जिंकला किंवा हारला हे ओळखावे. खेळाच्या शेवटी, हे किती कॉर्नर किक, गोल साठी शॉर्ट किंवा ताब्यात घेण्याची वेळ महत्वाची नाही. तर कोणत्या संघाने किती गोल मारले हे महत्वाचे आहे. जर कोणी कमी पिवळे कार्ड त्यांना मिळाले म्हणून त्यांच्या संघाला विजयी गणले

जावे असा आग्रह धरण्याचा प्रयत्न केला तर ते अज्ञानीपणाचे उदाहरण ठरेल. तरीही जेव्हा सार्वकालिकतेचा विषय येतो, तेव्हा क्षमा, देवाबरोबर संबंध आणि स्वर्गात प्रवेश करण्याच्या अधिकारासमान- मनुष्य अशा नियमांचा आग्रह धरतो जे देवाच्या नीतिमत्तेच्या परिपूर्ण दर्जाकडे दुर्लक्ष करतात.

कारण आपल्याला आदामाच्या पापी स्वभावाचा वारसा मिळाला आहे, आपण सर्व जण अधार्मिकच असे जन्मलो आहोत, त्यामुळेच आपण देवाच्या नियमशास्त्राचे उल्लंघन करतो. आपण दोषी ठरण्यास पात्र आहोत. परंतु येशू आपल्याला दोषी ठरवण्यास आला नाही. तो आला की, *"देवाने आपल्या पुत्राला जगाचा न्यायनिवाडा करण्यासाठी नव्हे, तर त्याच्या द्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठवले. जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याच्यावर न्याय-निवाड्याचा प्रसंग येत नाही. जो विश्वास ठेवत नाही त्याचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे; कारण त्याने देवाच्या एकुलत्या एक पुत्राच्या नावावर विश्वास ठेवला नाही"* (योहान. ३:१७-१८). देवाच्या नीतिमत्तेच्या परिपूर्ण दर्जानुसार ज्या न्यायाची आवश्यकता होती ती पूर्ण करण्यासाठी येशू आला. तो आपल्याला पापाचा दंड आणि बंधनातून मुक्त करण्यासाठी, आणि आपल्याला त्याच्या धार्मिकतेचे वस्त्र परिधान करण्यासाठी आला.

*"ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्याआमच्याकरता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्व असे व्हावे"* (२ करिंथ. ५:२१).

## मुद्दा चुकवू नका

येथे जीवन बदलणारे सत्य आहे. येशू आपल्याला एखाद्या संकटापासून केवळ वाचवण्यासाठी आला नाही. कोणासाठी तरी आपले तारण करण्यास आला.

शुभवर्तमान हे नरकापासून अग्नीच्या बिम्यापेक्षा खूप अधिक आहे. हे देवाच्या शाश्वत राज्यातील सार्वकालिक जीवनाविषयी आहे. एक जीवन जे आताच सुरू होते. पहिले करिंथ १:८ आपल्याला सांगते की *"आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या दिवशी निर्दोष ठरावे म्हणून तोच शेवटपर्यंत तुम्हांला दृढ राखील."*

परंतु 'निर्दोष' शब्दा मध्ये गहन अर्थ आहे.

मध्यपूर्वेत निवास करत असताना माझ्या आयुष्यात, मी एका प्रमुख व्यक्तीला भेटलो ज्याला माझ्या कामाबद्दल तीव्र तिरस्कार होता. अनेक प्रसंगी त्याने माझ्यावर बेकायदेशीर कार्य करत असल्याचे आरोप केले. जेव्हा एक आरोप खोटा ठरायचा, तेव्हा तो लगेच

दुसरा आरोप तयार करायचा. एका प्रसंगी, मला कामाच्या ठिकाणी पोलिसांकडून नोटीस मिळाली ज्यामध्ये अधिकाऱ्यांना भेटण्याचे आदेश होते. माझा एक मित्र (जो एक आंतरराष्ट्रीय वकील देखील होता) त्याने मला सावध राहण्यास सांगितले की जर तिसरी नोटीस मिळाली तर माझ्याविरुद्ध अटक वारंट जारी केले जाऊ शकते.

दुसरी नोटीस मिळताच, मी पोलीस स्टेशनला गेलो. स्थानिक प्रमुख अधिकाऱ्याला या दोषारोपामागील कारण माहित नव्हते, परंतु मी कोणत्याही कायदेशीर अडचणीत आहे का ते पाहण्यासाठी तो सिस्टीम तपासणार असल्याचे त्याने मला सांगितले. अजिबात न घाबरता, मी सिस्टम तपासणी पूर्ण होईपर्यंत वाट पाहिली. सुमारे वीस मिनिटानंतर (त्या दरम्यान प्रमुख पोलीस अधिकाऱ्याने मला पिण्यास चहा दिला), एक सहयोगी एक टिपण घेऊन आला. ते टिपण घेतल्यावर, प्रमुख अधिकाऱ्याने माझ्याकडे पाहिले आणि म्हणाला, *“तू केवळ कोणत्याही चुकांबद्दल दोषीच नाही तर तुझे खाते पूर्णपणे स्वच्छ आहे.”*

**येशू आपल्याला कशापासून तरी केवळ वाचवण्यासाठी आला नाही. कोणासाठी तरी आपले तारण करण्यास आला.**

आता यावर विचार करा.

येशू कोण आहे याबद्दल देव जे काही म्हणतो आणि त्याने त्याच्या वाहिलेल्या रक्ताने आणि विजयी पुनरुत्थाने तुमच्यासाठी जे केले आहे त्यावर विश्वास ठेवता, तर मग तुम्ही देवासमोर केवळ क्षमा प्राप्त केलेले असे उभे राहत नाहीत, तर निर्दोष आणि कायमचे स्वीकारलेले म्हणून उभे राहता! तुमचे खाते पूर्णपणे स्वच्छ आहे! ही गौरवी आशा तुमच्यासाठी आहे- ते ही विश्वासाने.

हे चुकवू नका. जेव्हा पापाच्या दोषापासून वाचविले जाण्याचा विषय येतो, तेव्हा तुम्हांला किती विश्वास आहे हे महत्वाचे नाही. तर तुमच्या विश्वासाचा उद्देश महत्वाचा आहे. एखाद्या व्यक्तीला एका पातळ बर्फावर विश्वास असू शकतो, पण तो विश्वास त्याला बर्फ तुटून थंडगार पाण्यात पडण्यापासून वाचवू शकत नाही. विश्वासाचे प्रमाण तारण देते असे नाही, तर प्रभू ज्यावर विश्वास आहे तो तारण देतो.

पृथ्वीवरील त्याच्या सेवाकार्याच्या शेवटी, पौलाने त्याच्या विश्वासाचे अशा प्रकारे वर्णन केले आहे : *“ह्या कारणाने ही दु:खे मी सोसत आहे, तरी मी लाज धरत नाही, कारण मी ज्याच्यावर विश्वास ठेवला आहे, त्याला मी जाणतो आणि तो माझी ठेव त्या दिवसासाठी राखण्यास शक्तिमान आहे असा माझा भरवसा आहे”* (२ तीमथ्य. १:१२).

लवकरच होणाऱ्या मृत्यूमध्ये देखील पौलाचा आत्मविश्वास हा त्याच्या अद्भुत कर्तुत्वामुळे नव्हता, किंवा त्याच्या गहन ज्ञानामुळे नव्हता, किंवा त्याच्या महान विश्वासामुळेही नव्हता. हे सर्व काही त्या प्रभू विषयी होते ज्याच्यावर त्याने त्याचा विश्वास ठेवला होता.

जेव्हा ब्लौक्रान्स पुलावरून उडी मारण्याचा माझी वेळ आली, तेव्हा उडीचे यश हा मला मोठा विश्वास होता किंवा दोरी मध्ये मला थोडा कमी विश्वास होता यावर अवलंबून नव्हते. तेव्हा केवळ दोनच प्रश्न महत्वाचे होते.

मी उडी मारेन का? (मी उडी मारली)

दोरी मला धरून ठेवेल का? (तिने मला धरून ठेवले)

जेव्हा तुम्ही तुमच्या पुढे येणाऱ्या सार्वकालिकतेच्या उडीबद्दल विचार करता, तेव्हा तुमचा विश्वास तुम्ही कशावर आणि कोणावर ठेवला आहे?

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. येशू कोण आहे, आणि तो या पृथ्वीवर का आला?

२. तुमच्या स्वतःच्या शब्दात, “येशू ख्रिस्तावर आणि वधस्तंभावर त्याच्या कार्यावर विश्वास ठेवणे” म्हणजे काय?

३. खालील पैकी कोणते पर्याय येशूला दिलेल्या तुमच्या प्रतिसादाचे उत्तम वर्णन करते? स्पष्ट करा.

(अ) “मी माझ्या पूर्व-अस्तित्वातील जीवनशैलीमध्ये त्याला योग्य असे करण्याचा प्रयत्न करत आहे.”

(ब) “येशूसोबत माझी जीवन बदलणारी मूलगामी भेट झाली आहे.”

# ३

# सार्वकालिकतेचे आमंत्रण

जेव्हा आपण आपल्या क्षितिजाच्या पलीकडील, आपल्या आवाक्याबाहेरील जगाविषयी ऐकतो, तेव्हा आपल्या अंतःकरणात काहीतरी जागृत होते. माहिती पत्रकांवरील विलक्षण गंतव्यस्थाने आपल्या भावनांना स्पर्श करतात किंवा खूप दूर अंतरावर असलेल्या आकाशगंगेचे अक्षरशः वर्णन आपल्याला थक्क करते –तेव्हा आपण जे पाहतो त्यापेक्षा काहीतरी अधिक असावे अशी अपेक्षा मनात निर्माण होते. जशी आपली उत्सुकता वाढत जाते, तशीच अधिक आपण काहीतरी अधिक अनुभवण्याची ओढ आपल्या मनात बळावते.

लहानपणी, पीटर पैन्स नेवरलैंड ऐकल्यावर माझ्या मनात अशा देशात जाण्याची माझ्या मनात इच्छा जागृत झाली जेथे मी कधीही वृद्ध होणार नाही. त्यानंतर ब्युटी एंड द बीस्टची रहस्यमय कथा होती ज्यामध्ये पशूसारख्या अप्रिय व्यक्तीवर बेले सारख्या प्रेमळ व्यक्तीकडून निःशर्त प्रीती केली जाऊ शकते आणी त्याला स्वीकारले जाऊ शकते. तसेच दारिद्र्याच्या कचाट्यातून मुक्त होऊन राजवाड्याच्या वैभवाकडे नेल्याच्या सिंड्रेलाच्या जादुई रात्रीचे आश्चर्य होते. टोलकिन्सच्या मध्य पृथ्वीच्या जगाने आणि तेथील वनदेवता, केसाळ पायांचे लहान प्राणी, भूत आणि बुटक्या व्यक्तींनी माझ्या मनात साहस आणि अमरत्वासाठी ओढ निर्माण केली.

जर आपल्याला केवळ या भौतिक जगासाठी निर्माण केले असते, तर मग आपल्या इच्छा जास्त प्रमाणात सेवन करून किंवा आपल्या नवीनतम व्यसनाच्या आणखी वाढीव आवृत्तीद्वारे पूर्ण झाल्या असत्या. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. सी. एस. लेविस यांनी लिहिले आहे :

> एका बाळाला भूक लागते : योग्य आहे, त्यासाठी अन्न उपलब्ध आहे. एक बदकाच्या पिल्लाला पोहण्याची इच्छा असते : योग्य आहे, त्यासाठी पाणी उपलब्ध आहे. मनुष्याला

> लैंगिक इच्छा वाटते : योग्य आहे, त्यासाठी लैंगिक सुखाची साधने आहेत. परंतु जर मी माझ्या मनात अशी एक इच्छा पाहतो जिला या जगातील कोणताही अनुभव समाधानी करू शकत नाही, तर संभाव्य स्पष्टीकरण हे असेल की मला दुसऱ्या जगासाठी निर्माण केलेले आहे.[७]

आणि आपण ह्या दुसऱ्या जगाविषयी कसे शिकावे ज्यासाठी आपल्याला निर्माण केलेले आहे? आपल्याला फक्त एवढेच समजून घ्यावे लागेल की *"नियम शास्त्रात"* (ज्यास पवित्र शास्त्र म्हणतात) आपल्याला प्रभूने प्रदान केले आहे ज्याने पहिल्या दोन मनुष्यांना *"त्याच्या प्रतीरुपात आणि सदृश"* (उत्पत्ती १:२६-२७) बनवले. देवाने लोकांना त्यांच्या निर्माणकर्त्याबरोबर घनिष्ठ संगतीत राहण्यासाठी आणि त्याच्या गौरवाकरता जगण्यासाठी निर्माण केले आहे. परंतु ते जवळचे, वाढते संबंध जे मूलतः देव आणि मानव यांच्यामध्ये अस्तित्वात होते पापाने तुटले गेले. तरीही देवाजवळ तारणाची योजना होती. पाप समस्येवर उपाय करणारी एक योजना. एक योजना जिला पतित मानवांनी कठीण प्रयत्न किंवा चांगले करत राहणे आवश्यक नाही. हे केवळ देव आपल्यापैकी एक समान व्हावे-शरीर धारण करावे जेणेकरून त्याने स्वतःला व्यक्तीमध्ये प्रकट करावे, पाप आणि मृत्यूवर विजय मिळवावा, आणि पाप्यांसाठी त्याच्याजवळ येण्याचा मार्ग उघडावा. आणि आता त्याने केवळ तेच केले आहे, तो आपल्याला घनिष्ठ, सार्वकालिक त्याच्या स्वतःसह संबंधात आमंत्रित करीत आहे- एक संबंध जे आता सुरू होते. हेच जे शुभवर्तमान देते. येथेच आपल्या सर्व अंतिम तळमळी पूर्ण होतात.

## स्थिती तयार करणे

आपण बदलत्या ट्रेंड, लहरी, शैलींनी व्यापलेल्या धर्मनिरपेक्ष जगात राहतो. वस्त्रांपासून ते कार पर्यंत, ऐप्स पासून ते कलाकारांपर्यंत, जे क्षणभर लोकप्रिय असते, ते लगेच आपल्यावर प्रभाव टाकते. उदाहरणार्थ संगीताचा विचार करा. ९०च्या सुरुवातीला, शाळेच्या हॉलमध्ये नवीन बैंड चर्चेचा विषय असायचा, पण काही वर्षांमध्ये त्याच्या जागी त्वरित नसिंक, चटकदार मुलींनी आणि मागील रस्त्यावरील मुलांनी बदलून गेले. जरी त्यांची गीते आजही वाजवली जातात, तरी त्याचे श्रेष्ठस्थानी असणे हे जोनास ब्रदर्स द्वारे बदलले गेले किंवा शाळेचे संगीताचे वेड ज्याने वालमार्ट आवार येथे नवीन वस्त्रे, चित्रे, जेवणाचे डब्बे, आणि काहीही ज्यावर गैब्रिएला किंवा ट्रॉयचा चेहरा छापलेला असावा याने वर्चस्व केले होते. आठवण करा, जेव्हा हन्ना मोन्टानाचा हसतमुख चेहरा पाहिल्यावाचून जाणे अशक्य होते? (किंवा ती मैली सायरस असेल? मी अजूनही गोंधळात आहे). तुमच्या पैकी काही व्यक्तींसाठी, हा प्राचीन इतिहास असेल; तुम्हाला थोडी किंवा काहीही माहिती नसेल की मी कशाबद्दल

बोलत आहे. आपण असे बोलत राहू शकतो, वर्तमान वेडसरपणावर चर्चा करत जाऊ शकतो, परंतु मुद्दा हा स्पष्ट झाला आहे. आपण अशा जगात राहत आहोत जेथे जे प्रचलित आहे त्यासाठी तळमळ आहे आणि जेव्हा एखादा ट्रेंड येतो, तेव्हा बाजार व्यवसायी त्या क्षणाचा फायदा घेण्यास तितकेच तयार असतात.

हे येथेच आपण स्वतःला मत्तय १६ मध्ये पाहतो. येशू त्याच्या प्रसिद्धीच्या शिखरावर होता. त्याने आंधळ्यांना दृष्टी दिली, लंगड्यांना बरे केले, कुष्ठरोग्यांना शुद्ध केले, मृतांतून उठवले, आणि कधीही न ऐकलेले सामर्थ्यशाली वचन बोलले. असंख्य लोक त्याच्याकडे धावत होते, जमावातून त्याला स्पर्श करण्यासाठी चेंगरत होते आणि त्याचे अनुसरण करण्यासाठी त्यांच्या आरामदायक क्षेत्राला आणि जीवनशैलीला सोडत होते.

हा त्याचा क्षण होता!

परंतु प्रसिद्धीच्या ज्वाला पेटवण्याऐवजी, येशूने जमावाला थोडे जवळ बोलावले, जणू काही त्यांनी त्या क्षणाला चुकवू नये, हेच तो दर्शवत होता. आणि मग त्याने स्पष्ट केले. आमंत्रण.

## सर्वोच्च आमंत्रण

सर्व काही योग्य असे सुरू झाले. येशूने आपली अट एका उपवाक्याने केली,
*“माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर...”* (मत्तय. १६:२४).

समावेशकता.

ख्रिस्त सर्वांना बोलावतो. पुरुष. स्त्री. वरिष्ठ नागरिक. लेकरे. कोलंबियन, चीनी, कैनडीयन, झेक. कॉन्लेस. येथे काहीही भेद नाही. ख्रिस्ताच्या बोलावण्यातून कोणतीही व्यक्ती वगळली जात नाही, फक्त तेच वगळले जातात, जे येण्यास नकार देतात. ख्रिस्ताचे आमंत्रण हे त्याच्या मागे चालण्याची परवानगी देण्याविषयी नाही. हे त्याच्या मागे चालण्याच्या मार्गाविषयी आहे.

**ख्रिस्ताचे आमंत्रण हे त्याच्या मागे चालण्याची परवानगी देण्याविषयी नाही. हे त्याच्या मागे चालण्याच्या मार्गाविषयी आहे.**

येशूच्या या सुरुवातीच्या वाक्यात दोन शब्द आहेत जे एक महत्वाची गोष्ट स्पष्ट करतात : *तर* आणि *इच्छा*.

*तर. हा शब्द दर्शवतो की काहीतरी आता दिले जाणार आहे. आपल्याला आपल्या सांसारिक यात्रेसाठी प्रभूच्या गौरवात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केलेले आहे. कोणाची इच्छा असेल तर.*

दुसऱ्या शब्दाकडे लक्ष द्या. इच्छा. डिक्शनरी ह्या शब्दाची व्याख्या *"एक प्रबळ भावना किंवा भूक"* म्हणून करते."[८] प्रत्येक माणसाला प्रबळ इच्छा असतात जे त्याला किंवा तिला कार्य करण्यास प्रेरित करतात. काही प्रीती केली जावी ही इच्छा बाळगतात तर इतरांना ओळखले जावे म्हणून इच्छा असते. काही प्रसिद्धी पाहतात तर काही संपत्ती प्राप्त करण्यासाठी परिश्रम करतात. काही उत्साहासाठी शोध घेतात तर काही सहज समाधानी असतात.

## तुमच्या हृदयाचा शोध घेणे

१७०० शतकाच्या शेवटी, थॉमस चाल्मर्स नावाच्या एका सेवकांनी विचारांना प्रेरित करणारा संदेश दिला, त्या संदेशाचे शीर्षक होते, *"नवीन जिव्हाळ्याची निष्कासित शक्ती"* (The Expulsive Power of a New Affection). त्यांचा मुख्य विचार असा होता की आपल्या जीवनातील जुन्या प्रीती आणि आसक्ती दूर करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे एक महान आणि अंतिम प्रीती शोधणे. त्यांनी पुढे सांगितले, *"हृदयाला काहीतरी हवे असते, ज्याच्याशी ते बिलगून राहू शकेल."*[९] संत ऑगस्टिन यांनी कन्फेशन्स (Confessions) लेखामध्ये म्हटले आहे : *"तू आम्हांला तुझ्यासाठी निर्माण केले आहे. हे देवा, आणि आमची हृदये जो पर्यंत तुझ्यामध्ये विश्राम करीत नाही तोपर्यंत ती अस्वस्थच राहतील."*[१०] प्रभू येशू ख्रिस्ताच्या सौंदर्याकडे आणि त्यांच्या अस्तित्वाच्या खऱ्या उद्देशाकडे मानवाचे डोळे उघडे पर्यंत मानवजात कायमची अपूर्णच राहील.

ह्या प्रश्नांवर मनन करण्याचे वाचन करण्यापासून थोडीशी विश्रांती घ्या :

- तुमच्या मनाला काय आकर्षित करते?
- तुमचा सर्वात मोठा उत्साह किंवा आवड काय आहे?
- तुमच्या जीवनात काळजी किंवा चिंता कशामुळे निर्माण होतात?
- तुमचा पैसा, वेळ आणि शक्ती तुम्ही कोठे गुंतवणूक करता?
- तुमचे मित्र तुमच्यासाठी सर्वात महत्वाचे काय आहे याबद्दल काय बोलतात?

- तुम्ही तुमचा वेळ दिवास्वप्नात कशासाठी घालवता?
- तुम्ही जे करता ते करण्यासाठी आणि तुम्ही जे बोलता ते बोलण्यासाठी तुम्हाला काय प्रेरणा देते?
- तुम्हाला आता जगण्याची इच्छा नाही असे वाटण्यासाठी काय घडले पाहिजे?

ह्या प्रश्नांनी तुमच्या हृदयाला उघडे करू द्या. प्रभू येशू कोणताही मुखवटा घालत नाही. जो कोणी त्याच्या मागे चालण्याची निवड करतो त्यानेच येशू ख्रिस्ताला अंतिम खजिना म्हणून शोधले आहे.

जर आपण ख्रिस्ताच्या मागे चालण्याला खजिन्या ऐवजी एक उद्दिष्ट म्हणून विचार करतो, तर आपण सुवार्तेचा आनंद आणि परिपूर्णता गमावत आहोत. आपल्याला अस्तित्वात असणे आणि नष्ट होऊन जाण्यापेक्षा मोठ्या गोष्टीसाठी निर्माण केलेले आहे. आपल्याला एका उच्च शक्तीने अविष्कार केलेल्या नवीन खेळाला जिंकण्यासाठी निर्माण केलेले नाही जेथे विजेते स्वर्गात जातात आणि पराजित नरकात. आपल्याला एका पवित्र आणि असीम सुंदर देवासोबत एका घनिष्ट आणि सार्वकालिक संबंधात असण्यासाठी बोलावले आहे ज्याने आपल्याला स्वतः त्याच्या पुत्राच्या व्यक्तीमध्ये प्रकट केले आहे. बायबल हे उत्तम जीवन जगण्यासाठीचे केवळ एक नियमपुस्तक नाही. ते प्रीती जाणण्याचे, आणि आजवर घडलेल्या सर्वात महान प्रीतीच्या कथेत सहभागी होण्याचे आमंत्रण आहे.

त्यामुळेच येशू म्हणाला, *“माझ्यामागे येण्याची कोणाची* **इच्छा** *असेल तर...”*

आपले पृथ्वीवरील संक्षिप्त जीवन हे ख्रिस्ताला आपल्या कथेत सामावून घेण्याबद्दल नाही, तर त्याने आपल्याला त्याच्या कथेत सामावून घेण्याबद्दल आहे. *“कारण तुम्ही मृत झाला आहात आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे”* (कलस्सै. ३:३). त्याच्या मागे चालण्याचा आपल्या नकाराच्या मुळाशी येशू साठी आपल्या प्रीतीचा अभाव नाही, तर आपल्यासाठी त्याची प्रीती ओळखण्यात आपण अपयशी ठरतो हे आहे.

## जेव्हा देवासाठी आपली प्रीती हा मुद्दा नसतो

बऱ्याच वर्षांपूर्वी, मी उत्तरी आयर्लंड येथे एका सभेत भाषण देत होतो जेव्हा एक तरुण अभिनेत्रीने तिचे काही वैयक्तिक संघर्ष मला सांगितले. ती म्हणाली की ती येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवते पण तिला दोन समस्या आहेत : (१) ती येशू ख्रिस्ताला पुरेसे प्रेम वाटत नाही, आणि (२) तिला तिच्या पापाबद्दल इतके भयंकर वाटत नाही.

माझी त्वरित प्रतिक्रिया ही तिच्या आंतरिक दु:खाचीच होती-जो पर्यंत तो दोष सिद्ध होत नाही. जवळजवळ मोठ्या आवाजात, पवित्र आत्म्याने माझ्या मनात दोन प्रश्न टाकले : *“नाथान, तू येशू ख्रिस्ताला जसे प्रेम केले पाहिजे तसे करतोस का?”* तत्क्षणी, मी उत्तर दिले, *“नाही, मी जसे केले पाहिजे तसे करत नाही.”* मग दुसरा प्रश्न आला. *“तू तुझ्या पापाचा जसा द्वेष केला पाहिजे तसा करतोस का? पुन्हा, माझे उत्तर* “नाही” *असेच होते. कारण मी जर तसे करत असतो, तर मी पापाच्या प्रत्यक्ष स्वरूपापासून* दूर *पळालो असतो. तत्क्षणी, हे विचार माझ्या मनात आले :* “अचूकपणे. ख्रिस्तासाठी असलेली तुमची प्रीती तुम्हांला परिभाषित करीत नाही; तर तुमच्यासाठी असलेली ख्रिस्ताची प्रीती करते. पापासाठी तुमचा द्वेष जो तुम्हांला तारण देत नाही. तर ख्रिस्ताने पापाचा किती अधिक द्वेष केला आणि त्याने त्याबाबत काय केले आहे, हेच तुम्हांला तारण देते.”

जेव्हा आपण त्या पित्याच्या बिनशर्त, पूर्ण प्रीतीचा अनुभव घेतो, ज्याने आपल्या एकुलत्या एका पुत्रालाही राखून ठेवले नाही, तेव्हा तीच प्रीती आपल्याला त्याच्याबरोबरच्या नात्याचा आनंद घेण्यास प्रवृत्त करते.  हे अधिक प्रयत्न करण्याविषयी नाही, परंतु त्याऐवजी प्रभूला शरण जाण्याविषयी आहे जो आपणावर आपण स्वतःवर  करणाऱ्या प्रीतीपेक्षा अधिक करतो. जर तुम्ही कधी तुमच्यासाठी ख्रिस्ताच्या प्रीतीवर शंका घेतली असेल, तर कालवरीच्या वधस्तंभाकडे पाहा. देवाच्या क्रोधाच्या रिकामी प्याल्याकडे पाहा. जे त्याच्यावर भरवसा ठेवतात त्यांच्यासाठी ठेवलेल्या सार्वकालिक आश्वासनांकडे पाहा (तो कोणाला आपली वधू म्हणतो- त्यांच्यासाठी).

**हे अधिक प्रयत्न करण्याविषयी नाही, परंतु त्याऐवजी प्रभूला शरण जाण्याविषयी आहे जो आपणावर आपण स्वतःवर  करणाऱ्या प्रीतीपेक्षा अधिक करतो.**

प्रारंभीच्या मंडळीतील एका भाष्यकारने लिहिले, *“तीनशे वर्षे, एक ख्रिस्ती व्यक्ती होऊन राहणे हे तुमचे जीवन, संपत्ती आणि घराण्यासाठी अत्यंत धोक्याचे कृत्य होते. तुम्ही कशावर अधिक प्रीती करता त्याची ही परीक्षा होती. आणि परीक्षेचा शेवट हुतात्मा होणे होते.”*[११] मग ते नाट्यमय हुतात्मा होणे किंवा दररोज देहाच्या इच्छांसाठी मरणे असेल, ख्रिस्ती म्हणून जीवन आपण कशावर प्रीती करतो त्या मुद्दापर्यंत येते. आणि ती प्रीती ही आपण केवळ आपल्या ओठांनी जाहीर करत नाही, तर आपल्या जीवनातून ती प्रत्यक्ष दाखवून देतो.

## जेव्हा तुमचा भूतकाळ हा मुद्दा नसतो

शिष्यांचा प्रवास येशू त्यांना अशा सूचना देत सुरू झाला नाही, *“माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे”* (मत्तय १६:२४). आणि शिष्यांनी मोठी क्षमता दाखवत, जसे त्याच्या मागे चालण्यास त्याला विचारून, सार्वजनिक मौखिक वचनबद्धता दाखवून आणि सूचना व अटींच्या काही गोष्टींसाठी सहमत होऊन सुरू झाला नाही.

हे प्रभूच्या मुखातून निघालेल्या दोन शब्दांनी सुरू झाले.

*“माझ्या मागे या.”*

जेव्हा येशू पेत्र आणि अंद्रीयाला गालील समुद्राच्या किनाऱ्यावर भेटला, तेव्हा त्याने त्यांना बोट सोडण्यास सांगितले नाही. त्याने याकोब व योहानाच्या जाळीबद्दल काही बोलले नाही. त्याने मत्तयाला कर वसूल करण्याच्या चौकीबद्दल कधीही उल्लेख केला नाही. जेव्हा ख्रिस्ताने शिष्यांना त्याच्या मागे येण्यास बोलावले, तेथे एक नवीन नाते निर्माण झाले, आणि नात्यामुळे भूतकाळातील परिचयापासून वेगळे होणे घडून आले.

ह्या वचनातील क्रम लक्षात घ्या. येशूने अंद्रीया व पेत्राला म्हटले, *“**माझ्यामागे या** म्हणजे **मी तुम्हांला** माणसे धरणारे **करीन**”* (मत्तय ४:१९). ख्रिस्ताने त्याच्या शिष्यांना त्याच्या मागे येण्यास सांगितले, त्यांना आश्वासन दिले की तो त्यांना माणसे धरणारे करील. त्यांना बदलण्याची जबाबदारी येशूची होती. ख्रिस्ताचा संदेश, *“तुमचे जीवन बदला आणि माझ्या मागे या”* हा नव्हता. तर *“माझ्या मागे या आणि मी तुमचे जीवन बदलेन.”*

*“तुमच्या जीवनातील बदल”* स्वयं-मदत संदेश हा पोकळ आणि शक्तिहीन आहे. जोपर्यंत ख्रिस्त त्याच्या जीवनाने आपली जीवने भरीत नाही, तोपर्यंत आपण खरे आणि टिकाऊ परिवर्तनासाठी सक्षम होत नाही. ख्रिस्ताला आपल्या ओठांआधी आपली जीवने हवी आहेत. आपल्या हातांआधी आपली हृदये. आपल्या पायांआधी आपली प्रीती.

येशू ज्या निर्देशा करता आपल्याला बोलावतो त्याकडे बारकाईने पाहा, *“माझ्या मागे या.”* ख्रिस्ताच्या मागे चालावे हे अक्षरशः कोठूनतरी आणि कोणाकडूनतरी येणे आहे. एका प्रियकराचा त्याच्या प्रेयसीला बोलावण्यात तो स्पष्ट दिसून येतो, गीतरत्न २:१० मध्ये, *“माझे प्रिये, माझे सुंदरी, **उठ, चल**.”*

तो आपल्याला स्वतःकडे बोलावतो. इतरांपासून आणि इतर गोष्टींपासून दूर.

आपल्या भूतकाळापासून.
आपल्या अपयशापासून.
आपल्या सांसारिक ओळख आणि नेहमीच्या कामाकडून.
आपल्या प्रशंसा आणि प्राप्तींपासून.
जे सर्व तात्पुरते आहे त्याशी आपल्या संबंधांपासून.
देहाच्या सवयींपासून जे आपल्याला हिंसक भंवरमध्ये अडकवून ठेवतात.

तुमच्या जीवनात काय आहे, जे तुम्ही तुमचा प्रवास ख्रिस्तावर सोपविल्यावर मागे पडेल? तो आपल्याला त्या गोष्टींपासून दूर त्याच्याकडे बोलावतो. तो आपल्याला पुनर्वसन कार्यक्रम, नवीन नियमांचा संच किंवा शैक्षणिकतेत घडविण्यापेक्षा अधिक कशाकडे तरी बोलावतो.

येशूच्या स्वतःकडे.

येशू प्रथम त्याचे अनुसरण करण्यासाठी बोलावतो, त्याच्यासाठी लढण्यासाठी नाही. तर यावे, विजय मिळविण्यासाठी नाही. (त्याने आधीच युद्ध केले आहे आणि जिंकले आहे. आपल्या सुटकेसाठी युद्ध हे आधीच रोमन वधस्तंभावर आणि रिकाम्या कबरेजवळ  सुरक्षित केले गेले आहे.)

लक्षात घ्या की येशूने *"जा!"* या शब्दाने सुरुवात केली नाही.

तो म्हणाला, *"या."*

आपण शेवटी जसेच्या तसे जीवन परत मिळवण्याच्या कल्पनेने ध्येयाकडे धावत नाही आहोत. आपण जीवनासाठी उपाय शोधत नाही. आपण जीवनाच्या उगमाकडे येत आहोत. *"जा!"* हे अनेक गंतव्यस्थान दर्शवू शकते, परंतु *"माझ्या मागे या"* हा एक केंद्रित शोध आहे. नंतर, येशू आपल्या शिष्यांना आज्ञा देतो, *"तेव्हा तुम्ही **जाऊन** सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा"* (मत्तय. २८:१९). परंतु ते मिशन काही काळासाठी राखीव आहे.

येशूचे म्हणणे "या" हे आमंत्रण मात्र सार्वकालिकतेसाठी आहे.

## हा एक सलाड बार नाही

येशू ख्रिस्ताचे आमंत्रण हे तुम्ही सलाड बारमध्ये जसे हवे तसे निवड करून खाण्याच्या पद्धातीसारखे नाही. अशा खाद्यपानगृहात, जैतून, कांदे आणि  कणसाचे दाणे हे नेहमीच माझ्या सलाड मध्ये असतात; पण टमाटे, मुळा आणि काकडी ह्यांना काहीच स्थान नसते. आपल्याला जे आवडते त्याची आपण निवड करतो आणि जे आपले प्राधान्य नाही त्याला

आपण नाकारतो. परंतु आपण असे पवित्र शास्त्राबाबत करू नये. ख्रिस्ताची शिकवण जेथे स्पष्ट आहे, तेथे केवळ स्वीकारार्ह वाटते तेच घेण्याचा आणि जे आपल्याला अस्वस्थ करते किंवा आपल्या सध्याच्या जीवनशैलीला धोका निर्माण करते म्हणून नाकारण्याचा अधिकार आपल्याला आहे का? जे विनाशाकडे नेते त्याचा त्याग न करता, केवळ सोयीचे वाटते तेवढेच स्वीकारणे योग्य ठरेल का?

तुम्ही देवाच्या इच्छेनुसार येण्यास आणि त्याने काय म्हटले आहे त्यावर विश्वास ठेवण्यास तयार आहात का? तो तुमच्या प्राधान्यनुसार उचित ठरतील असे त्याचे शब्द आणि बोलावणे बदलणार नाही. यूजीन पीटरसन यांचा संदेश, वचनाचा सारांश, स्तोत्रसंहिता ९०:२ ला असा प्रस्तुत करतो : *"अनादिकालापासून अनंतकालापर्यंत तू देव आहेस."* आपल्याला अंतिम साहस, प्राचीन प्रीतीची कथा आणि सार्वकालिक पुरस्कारासाठी जगण्यास आणि शोध घेण्यास आमंत्रित केलेले आहे.

त्याच्या मागे येणे हा एकतर्फी शोध आहे. *"या"* हे बोलावणे स्वतःचा नकार आणि वधस्तंभ घेऊन सुरू होते आणि त्याच्याबरोबर सदैव जगण्यात त्याचा शेवट होतो. ह्या पुस्तकाच्या पानांमध्ये, आपण त्याला अधिक घनिष्ठपणे ओळखण्याचा शोध घेणार आहोत; त्याजवर अधिक उत्कटतेने प्रीती करणार आहोत, आणि त्याचा अधिक पूर्णपणे आनंद घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. हे सर्व काही आपल्याला पुन्हा त्या प्रश्नाकडे घेऊन येते.

काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

आणि जर त्याचा तसाच अर्थ होता, तर आपण त्यास शरण जाण्यास तयार आहोत का?

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. तुमच्या जीवनात *"सार्वकालिक जीवनासाठी"* असलेली तळमळ तुम्हाला कशी अनुभवास येते, याचे स्पष्टीकरण करा.

२. या धड्यातील प्रश्नांना तुमच्या इच्छांबद्दल उत्तरे देताना तुम्ही स्वतःबद्दल काय शिकलात? त्यापैकी काही गोष्टींनी तुम्हाला आश्चर्य वाटले का?

३. येशू तुम्हाला कशापासून बोलावत आहे असे तुम्हाला वाटते? तुम्ही त्यास शरण जाण्यास तयार आहात का?

# ४

# शरणागतीत विजय शोधणे

गंभीरपणे विचार करा. आयट्यूनसवरील तीन मिनिटांच्या गाण्याची खरेदी करताना दिलेल्या सूचना आणि अटींची सर्व नऊ पाने कोण वाचतात? तुम्हाला कधी हे माहित  तरी असते का अशा सूचना आणि अटी अस्तित्वात आहेत? मी स्वीकारतो की मला जे पाहिजे असते ते मिळाल्यावर, मग लगेचच कराराच्या तळाशी जातो, आणि आवश्यक गोष्टींची सोपी तपासणी करतो. ते झाल्यावर, माझ्या नशिबात जे काही असेल त्याशी मी सहमत असतो. एक्स्पेडीयावर हॉटेल बुक करण्यापासून ते अमेझॉनवर पुस्तक खरेदी करण्यापर्यंत, आपली वृत्ती केवळ वस्तूवर केंद्रित असते, प्रक्रियेवर नाही. आपल्याला नेहमी त्वरित परिणाम देणारी आणि अतिशय सोपी प्रक्रिया हवी असते.

आपण येशू ख्रिस्ताच्या पाचारणाशी अशाच प्रकारे व्यवहार केला आहे का?

प्रार्थना बोलणे, एखाद्या धार्मिक मार्गावर चालणे किंवा एक वचनबद्धता कार्डवर स्वाक्षरी करण्याच्या बाह्य अनुभवावर -तारणाऱ्याला कधीही न ओळखता आपण आपल्या तारणाचा आधार करतो का? देवाला केवळ बौद्धिक संमती पुरेशी आहे असे गृहीत धरून आपण *"तारणाचा पेटी"* तपासतो आणि पुन्हा जुन्या जीवनशैलीत परततो का ? तर तारण हे स्पष्टपणे केवळ ख्रिस्तामध्ये विश्वासाद्वारे आणि त्याच्या पूर्ण केलेल्या कामाद्वारे कृपेने आहे, अशी कृपा जीवनास अपरिवर्तनीयपणे बदलते. येशू ख्रिस्ताच्या प्रेमाचा खरा स्वाद घेतलेला मनुष्य दुहेरी जीवनशैलीत समाधान मानू शकत नाही.

कालवरीच्या प्रीतीला एकच योग्य प्रतिसाद हा येशू ख्रिस्ताच्या व्यक्तिमत्वाला पूर्ण शरण जाणे आहे. हे शिष्यत्वाचे जीवन हे वैयक्तिक परिपूर्णतेविषयी नाही, परंतु त्याला ओळखणे आणि त्याच्यासारखे होण्याच्या उत्कट प्रयत्नाविषयी आहे. ख्रिस्ताच्या मागे चालण्याचा

निर्णय ही एक निवड आहे की आपल्या दुहेरी जीवनाला बाजूला ठेवावे आणि एकच ध्येय-खुद्द ख्रिस्ताचा शोध घेणे आहे. जर हे अवास्तव वाटत असेल, तर वाचत राहा.

शेवटी, येथे अस्वीकार अटळ आहे. कोणीतरी किंवा काहीतरी नाकारले जाईल. *“नकार”* ह्या शब्दाची व्याख्या अशी आहे की *“जी काही विनंती किंवा इच्छा केली आहे ती देण्यास किंवा मान्य करण्यास नकार देणे.”*[१२] म्हणून प्रश्न नकार देऊ किंवा नाही असा नाही तर कोणाला नकार देऊ असा आहे. एकतर आपल्या स्वार्थाचा नकार आणि खंडन केले जाईल किंवा ख्रिस्ताचा नकार आणि खंडन केले जाईल. येशू ख्रिस्ताने हे अत्यंत स्पष्ट शब्दात सांगितले आहे, *“कोणीही दोन धन्यांची चाकरी करू शकत नाही”* (मत्तय. ६:२४).

**एकतर आपल्या स्वार्थाचा नकार आणि खंडन केले जाईल, किंवा येशू ख्रिस्ताचा नकार आणि खंडन केले जाईल.**

ह्या शोधाची सुरुवात तुमच्यापासून होत नाही. ही त्याच्यापासून सुरू होते. तो बोलावतो. तो बोलतो. तो आमंत्रित करतो. आपली जबाबदारी ही केवळ उत्तर देणे आहे. तुमचा भूतकाळ तुमची क्षमता परिभाषित करत नाही. मग तुमचा भूतकाळ हा प्रतिष्ठेचा किंवा निंदनीय असो- ख्रिस्तामध्ये तुम्ही एक नवीन सृष्टी आहात.

जेव्हा आपण स्वतःबद्दल किंवा इतरांबद्दल असे ठरवतो की ख्रिस्ताचे अनुसरण करता येईल की नाही यासाठी भूतकाळ हा निकष ठरू शकतो, तेव्हा आपण अप्रत्यक्षपणे असे सुचवीत असतो की आपली रूपरेखा कसेही करून देवाला त्याचे मिशन पूर्ण करण्यासाठी आवश्यक आहे. पण सत्य यापेक्षा वेगळे काहीच असू शकत नाही. कोण बोलावण्यास उत्तर देत आहे याची पर्वा न करता, शिष्यत्वाचे पहिले पाऊल हे शरण जाणे आहे.

शैक्षणिक शोधात, तुम्ही पुढील वर्गात जाण्याआधी, तुम्हांला खालील-पातळीला-प्राथमिक वर्ग ज्यास पूर्व अटी म्हणतात ते उतीर्ण करावे लागते. एकदा की तुम्ही हे वर्ग पूर्ण केले, मग तुम्हांला अधिक जटील पाठ्यक्रमात प्रवेश दिला जातो. ही विद्यापीठाकडून शिक्षा असते का? नाही. या अटींचा हेतू विद्यार्थांना अपयशासाठी नाही, तर यशासाठी तयार करणे हा असतो. असे प्राथमिक ज्ञान महत्वाचे आहे. याच प्रकारे जमावाला उपदेश देताना, येशूने त्याच्या मागे चालण्याच्या अटी घोषित केल्या. *“माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे”* (मत्तय १६:२४). ख्रिस्ताचे पाचारण हे वैयक्तिक प्रतिबंध आणि स्व-नकारासाठी निर्देशाच्या केवळ यादीपेक्षा अत्यंत अत्युच्च आणि क्रांतिकारक असे होते.

नवीन किंग जेम्स संस्करणात, मत्तय. १६:२४ असे भाषांतरीत केले आहे, *"जर कोणी माझ्या मागे येण्याची इच्छा करतो, तर त्याने स्वतःचा नकार करावा, आणि आपला वधस्तंभ उचलावा, आणि माझ्या मागे यावे."* ख्रिस्ताचे अनुसरण करण्यासाठी स्व: चा नकार करण्याचा निर्णय हा स्पष्टपणे *"तर"* ह्या शब्दाने ओळख करून दिला जातो.

असे होऊ द्या.

चला म्हणजे *"प्रतिबंध किंवा मनाई करू नये"*[१३] असा अर्थ होतो.  जर मी एखादी वस्तू जमिनीवर पडू देतो, तर त्याचा अर्थ असा की ती रोखण्यासाठी मी एखादे कृत्य करू शकलो असतो. तसेच आध्यात्मिक बाबतीतही खरे आहे. परिवर्तन घडवून आणणारी शक्ती ही आचरणात सुधारणा करण्यामध्ये नसते, परंतु ख्रिस्ताच्या परिपूर्णतेत असते.

फिलिप्पै. २ मध्ये, आपण वाचतो, *"अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो....मनुष्यप्रकृतीचे असे प्रकट होऊन त्याने मरण, आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले; येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वतःला लीन केले"* (फिलिप्पै. २:५, ८).

असे होऊ द्या.

हे त्याला आपल्यामध्ये कार्य करू देण्याविषयी आहे, अधिक प्रयत्न करण्याविषयी नाही. आपल्या स्वतःच्या शक्तीमध्ये अधिक प्रयत्न करणे हे त्याला कार्य करू देण्यास अडथळा करते. हे शेवटी शरण जाण्याविषयी आहे. हे एक उत्तम रणनीती शोधण्याविषयी नाही.

हे मग पुढील धड्यात स्पष्ट होईल की हा मुद्दा केवळ स्व-नकाराविषयीही नाही.

जेव्हा आपले लक्ष्य हे स्व-नकारावर केंद्रित होते, तेव्हा आपले ध्यान सहजपणे  स्वतःवर आणि प्रभूला प्रसन्न करण्यासाठी आपण काय साध्य केले पाहिजे यावर जाऊ लागते. "ख्रिस्ताचे अनुसरण' करण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया ही त्याच्याबरोबर अधिकृत संबंधासाठी जागा घेऊ लागते. नाममात्र ख्रिस्ती धर्माने ख्रिस्ताबरोबरच्या गौरवशाली  शाश्वत नातेसंबंधाच्या संधीचा संदेश कमी लेखला आहे का? आणि तो संदेश एका निरुपयोगी लौकिक धार्मिक बंधनात रूपांतरीत केला आहे का?

ख्रिस्ताचे अनुसरण करणे हे टाळण्याची मानसिकता स्वीकारण्याबद्दल नाही. मद्य पिऊ नका, नशा करू नका, पार्टी करू नका, शाप देऊ नका, खोटे बोलू नका, विवाहाआधी लैंगिक सुख घेऊ नका, अश्लील चित्रे पाहू नका, फसवू नका, आणि यादी तर आणखी वाढतच जाते. मला चुकीचे समजू नका. देवाचे वचन आपल्याला देहाच्या नाशकारक वासनांपासून

दूर पळण्यास सांगते. परंतु अशा गोष्टींपासून दूर पळणे हे ध्येय नाही. हा शोधही नाही. यात काही आश्चर्य नाही की आजचे तरुण जगात (आणि चर्च मध्ये) अस्वस्थ आहेत! आपल्या पिढीला (आणि प्रत्येक पिढीला) एक पवित्र कारणासाठी निर्माण केले होते जे आपले होऊ शकते! आपल्याला अशा उत्कटतेची गरज आहे, ज्यासाठी आपण जगू शकतो, आणि अशा उद्देशाची गरज आहे, ज्यासाठी आवश्यक असल्यास आपण मरायलाही तयार राहू!

ख्रिस्त हेच आपल्याला देण्यासाठी आला.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. तुम्ही ख्रिस्ताच्या संदेशाकडे एक धार्मिक कर्तव्य किंवा एक नातेसंबंधाची संधी म्हणून पाहत आहात का? स्पष्टीकरण द्या.

२. तुमच्या भूतकाळातील असे काही आहे का ज्याला तुम्ही आजही तुमची व्याख्या करू देत आहात? स्पष्टीकरण द्या.

३. देवाच्या अधिकाराला शरण जाण्याऐवजी तुमच्या जीवनात तुम्ही *“अधिक प्रयत्न”* कोणत्या क्षेत्रात करीत आहात? देवाला तुमच्या जीवनाच्या त्या क्षेत्रावर नियंत्रण करू द्यावे हे कसे वाटेल?

# भाग २

# “...तर

# स्वतःस

त्याने

नाकारावे...”

# ५

# स्वतःचा त्याग किंवा स्वतःचा नकार

येशूने हे कधीही म्हटले नाही, "जर कोणी माझ्या मागे येऊ इच्छितो, तर त्याने स्वतःचा त्याग केला पाहिजे. प्रत्यक्षात, असा संदेश हा त्याने प्रत्यक्षात काय म्हटले त्याच्या विरोधात होईल. स्वतःचा त्याग आणि स्वतःचा नकार यामध्ये काय फरक आहे? स्वतःचा नकार करणे याचा खरा अर्थ काय आहे? मला आनंद आहे की तुम्ही हे प्रश्न विचारले आहेत! फरक हा जीवन-बदलणारा आहे.

सेनेगल मध्ये उघड्या पाण्यात पोहणारा म्हणून आणि मध्य पूर्वेत बरेच वर्षे पोहणे शिकविणारा म्हणून, स्वतःचा त्याग हा खेळासाठी नियम आहे हे मी पटकन शिकलो.

सकाळच्या तयारीसाठी भल्या पहाटे ३:४५ वाजता वाजणारा अप्रिय आवाज हा मी निवडलेल्या जीवनशैलीची दिवसाची पहिली आठवण करून देणारा असायचा. माझ्या आहारात देखील बदल झाला होता. काही निश्चित अन्न घेण्याचा प्रश्नच नव्हता. सोडा, आईसक्रिम, वेफर्स आणि तळलेल्या अन्नाला कायमचे सोडले होते. आणि मग येथे एक वचनबद्द पोहणारा म्हणून माझ्या जीवनावर काही सामाजिक परिणाम होते-थकवा, मित्रांसोबत व्यतीत करण्याची संध्याकाळची मर्यादित वेळ, रात्री लवकर झोपी जाणे आणि वगैरे.

येथे चुकू नये असे महत्वाचे धडे आहेत. माझी मनस्थिती ही *"हे योग्य आहे का?"* अशी नव्हती. त्याऐवजी, माझा प्रश्न नेहमी, *"मी कसे अधिक वेगाने पोहू शकतो?"* हाच असायचा. मला कधीही असे वाटले नाही की मला शिक्षा होत आहे, पण, उलट, मी माझ्या अवतीभवती असणाऱ्यांपेक्षा वेगळ्या ध्येयाचा शोध घेत होतो. एक नवीन ध्येयाने माझ्या

कृतीला चालना दिली होती. पोहणारे हे एक पद, एक विजय, एक पुरस्कार मिळवण्याचा प्रयत्न करतात. एक पोहणारा आणि एक प्रशिक्षक या दोन्ही भूमिकांमध्ये, माझी पहिली आणि सर्वात महत्वाची प्राथमिकता ही  नेहमीच ध्येय निश्चित करणे आणि इच्छित ध्येय प्राप्त करण्यासाठी एक स्पष्ट मार्ग ठरवणे ही होती. मी माझ्या पोहणाऱ्यांना हा प्रश्न विचारला नाही की ते त्यासाठी किती अधिक प्रयत्न करायला तयार आहेत. त्याऐवजी, मी त्यांना विचारले की ते नेमके काय प्राप्त करू इच्छित आहेत. ठरवलेल्या पाठपुराव्याला जे काही अडथळा ठरते ते त्या ध्येयाच्या दृष्टीने अडथळा मानले जाते.

परंतु येथे सावध राहणे आवश्यक आहे.  तो स्वतःचा त्याग आहे-म्हणजे मोठ्या उद्देशाच्या पाठपुराव्याला अडथळा ठरणाऱ्या गोष्टींना स्वतःला नकार देण्याचे आचरण. तुम्ही हे समजले आहे. आपण आहारात, आर्थिक-व्यवहारात, खेळातील प्रयत्न इत्यादी मध्ये स्वतःचा त्याग करण्याचे आचरण ठेवतो. परंतु इथेच प्रभू आपल्यासाठी जो मार्ग निश्चित करतो, त्याची सुरुवात स्वतःच्या त्यागापासून होत नाही. त्याऐवजी, तो आपल्याला स्वतःचा नकार करण्यासाठी बोलावतो. स्वतःचा नकार करणे त्या गोष्टींच्या विश्लेषणाने सुरू होत नाही ज्यांना तुमच्या जीवनात बदलण्याची गरज असते. मी असे बोलत नाही की तुमच्या जीवनातून हानिकारक गोष्टींना काढून टाकणे ही एक वाईट कल्पना आहे, परंतु स्वतःचा नकार करण्यासाठी एका वेगळ्या सुरुवातीच्या मुद्याची मागणी करते.

हट्टी आणि निष्क्रिय मंडळीसाठी उपाय हा अधिक प्रयत्न करणे नाही, परंतु ख्रिस्ताच्या पूर्ण केलेल्या कामाची सुंदरता ओळखणे आहे.

आपण दावीद व गल्ल्याथाची गोष्ट वाचतो आणि आपल्या लेकरांना दाविदाची प्रशंसा करायला शिकवतो ज्याने एका महाकाय व्यक्तीला गोफण व दगडाने मारून टाकले. परंतु मी सुचवू इच्छितो की आपण त्या कथेमध्ये दाविदासारखे नाही? आपण इस्राएली सेनेतील मागे राहणारे भित्रे सैनिक आहोत जे युद्धात जाण्यास घाबरलेले आहेत जेव्हा आपला *“दावीद”* पुढे जातो-गोफण घेऊन नाही, तर वधस्तंभ घेऊन. एका विलक्षण कृत्यासह, त्याने पाप आणि मृत्यू, सैतान आणि नरकाचे सामर्थ्य कायमचे नष्ट केले. येशू  अधिक दृढनिश्चयासाठी बोलावत नाही. तो आपल्याला आपल्या वतीने त्याच्या विजयावर भरवसा ठेवण्यासाठी विचारत आहे. तो आपल्याला स्वतःच्या मृत्यूसाठी बोलावत आहे, आणि तो आपल्याला आपण स्वतःवर अवलंबून राहण्याऐवजी त्याच्या विजयांच्या सामर्थ्यात जगण्यासाठी संधी देत आहे.

## जेव्हा बास्केटबॉलने माझ्या हृदयावर राज्य केले होते

माझ्या तारुण्याच्या काळात, मला व्यवसायिक बास्केटबॉल खेळाडू होण्याची इच्छा होती. माझे दिवस, शक्ती आणि विचार हे सर्व खेळात मग्न होते. इच्छा वाढत गेली, बास्केटबॉल माझी मूर्ती, माझा देव झाला होता. खात्रीने, ख्रिस्ताने मला नरकापासून अग्नीचा बिमा पुरवला होता, परंतु मी त्याच्या मागे जात नव्हतो. त्याऐवजी, मी त्यालाच माझ्या मागे येण्यास विचारत होतो- पण एक दिवस असा आला, जेव्हा तो स्वतः माझ्याजवळ आला—जणू गालील समुद्राच्या माझ्या किनाऱ्यावर उभा राहिला.

जेव्हा मी १५ वर्षांचा होतो, माझे आई-वडील अमेरिका येथे आले, ज्यामुळे मला तेथील शाळेत शेवटची दोन वर्षे पूर्ण करता आली, ज्यामुळे मला स्काऊटची ओळख झाली आणि समुद्राच्या पलीकडील किनाऱ्यावर खेळाच्या वेगाशी आणि शैलीशी जुळवून घेण्याची संधी मिळाली. सर्व काही उत्तम प्रकारे चालले होते. सेनेगल, संत लुईस येथून जाऊन, दक्षिण कॅरोलीना येथे प्रवाशांची विश्रांतीस्थळी पोहचलो, आणि तेथेच मी स्वतःला एसीसी बास्केटबॉल देशाच्या केंद्रस्थानी पाहिले. मी त्वरित खेळण्यासाठी एक संघ शोधला आणि माझ्या ज्युनियर सत्राचे प्रशिक्षण सुरू केले. वर्सिटी संघात सुरुवातीचे स्थान मिळाल्यानंतर आणि एका माजी एनबीए प्रशिक्षकासोबत सराव करण्याची संधी मिळाल्यावर, मला खात्री वाटू लागली की सर्व काही ध्येयाच्या दृष्टीने योग्य असे होत आहे. माझे ध्येय.

मग हे घडले-देव माझ्याशी बोलला.

आम्ही कॅलिफोर्नियाला माझ्या आजीला आणि नातेवाईकांना भेटण्यास गेलो होतो. तेथे असताना, मी इब्री लोकांस पत्र वाचत होतो आणि माझी नजर एका परिचित उताऱ्यावर जाऊन स्थिरावली. *“तर मग आपण एवढ्या मोठ्या साक्षीरुपी मेघाने वेढलेले आहोत म्हणून आपणही **सर्व भार** व सहज गुंतवणारे पाप टाकून, आपल्याला नेमून दिलेल्या धावेवरून धीराने धावावे; आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू ह्याच्याकडे पाहत असावे”* (इब्री. १२:१-२अ).

**सर्व. भार. टाकून. ह्या शब्दांनी माझ्या हृदयाला खोलवर भेदले.**

मी हा भाग असंख्य वेळा वाचला असेन, परंतु त्या दिवशी जसे काही ते तीन शब्द फारच ठळक असे कोरले गेले : **सर्व. भार. टाकून**. हे शब्द थेट माझ्या हृदयाला भिडले. बास्केटबॉल हे पाप नव्हते, परंतु माझ्या जीवनात तो एक भार होता जो मला स्वार्थी अस्तित्वासाठी आकर्षित करत होता जो स्वयं-समाधान

आणि स्वतःला उंच करणारी यशप्राप्ती आणि स्वप्नांनी भारावून गेलेला होता. खात्रीने, मी देवाला माझ्या योजनेत समाविष्ट करून घेतले असते. नाहीतरी, मी परदेशात व्यवसायिक बास्केटबॉल खेळण्यास तयार होतो (जसे काही येथे अशा जीवनशैलीसाठी स्वर्गात काही सन्मानाचा पुरस्कार असतो). परंतु मी माझ्या जीवनाला त्याच्या योजनांमध्ये जोडले नव्हते. मी त्याच्या सार्वकालिक मूल्याच्या आणि आशीर्वादाच्या त्याच्या बोलावण्याला स्वीकारण्याऐवजी माझ्या जीवनावर त्याच्या आशीर्वादासाठी प्रार्थना करत होतो. ह्या विश्वासाने माझ्या हृदयाला खोलवर भेदले.

अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी, मी माझ्या आई-वडिलांकडे गेलो आणि त्यांना माझा अनपेक्षित निर्णय सांगितला- खेळापासून त्वरित निवृत्ती घेण्याचा. (मी याचा उल्लेख केला का की येथे माझ्या जीवनात काही मधील मार्ग नव्हता?) मी पूर्णपणे किंवा सर्वस्वाने बाहेर झालो होतो) जसे आपण चर्चा केली की काय झाले होते, आणि देवाच्या वचनाने कसे माझ्याशी संभाषण केले, प्रशिक्षकास फोन करण्याआधी आणि ती गोष्ट अधिकृत करण्याआधी माझ्या आई-वडिलांनी मला प्रार्थना करण्यास प्रोत्साहन दिले. मला आठवते मी त्यांना उत्तर दिले होते की जरी आपण प्रार्थना केली, तरी काही चांगले होणार नाही, कारण देवाने आधीच गोष्टी स्पष्ट केल्या आहेत.

बास्केटबॉल आता माझ्या मनातून पूर्णपणे निघून गेला होता.

हा मुद्दा चुकवू नका. बास्केटबॉल पाप नव्हते. देव अनेक व्यक्तींना खेळाच्या क्षेत्रातून वापरतो. प्रभू आपल्या हृदयाकडे पाहतो. म्हणूनच, आपल्या जीवनात नकळत शिरकाव केलेल्या मूर्ती ओळखण्यास मदत करणारे काही आत्मपरीक्षणाचे प्रश्न येथे दिले आहेत.

- माझ्या हृदयाच्या सिंहासनावर काय बसलेले आहे?
- जे निर्णय मी करतो त्यास कोण निर्देश देतो?
- सुवार्तेसाठी उत्कटतेच्या माझ्या पातळीस कोण किंवा काय निश्चित करते?
- देवाच्या कामात माझ्या सहभागी होण्यास भौगोलिक स्थान निर्देश देते का?
- जीवनातील माझ्या मिशनला माझ्या कारकीर्दीचा पाठपुरावा निश्चित करतो का किंवा माझ्या कारकीर्दीच्या पाठपुराव्यास देवाचे मिशन निश्चित करते?

- देवाचे कोणत्याही क्षणी किंवा कोणत्याही मार्गाने अवज्ञा करण्यास मला काही प्रेरित करते का?
- येशू ख्रिस्ताबरोबर माझ्या संबंधापेक्षा मला इतर काहीही मोठा आनंद देते का?
- भविष्याच्या बाबतीत प्रभू आणि त्याच्या योजनेपेक्षा इतर दुसरे काहीही मला अधिक उत्साहित करते का?
- मी बहुतेकवेळा कशाबद्दल दिवास्वप्न पाहतो?
- मला सर्वात जास्त कशाबद्दल बोलण्यात आनंद वाटतो?
- मला सर्वात जास्त काय गमावण्याची भीती वाटते?
- माझे पैसे सर्वात जास्त मला कशावर खर्च करण्यास आवडते?
- मला माझा वेळ सर्वात जास्त कुठे घालवण्यास आवडते?
- जर गोष्टी माझ्या इच्छेप्रमाणे घडल्या नाही तर मला कशामुळे तक्रार करावीशी वाटते?
- मीठामपणे कशाचे संरक्षण आणि समर्थन करण्याचा प्रयत्न करतो

चला हे सरळ आणि सोपे करू या. स्वतःचा त्याग करणे हे तुमच्या जीवनातून काही निश्चित गोष्टी काढून टाकणे आहे-सहसा तात्पुरत्या गोष्टी- की अधिक महत्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे. स्वतःचा नकार हे तुमच्या जीवनाच्या सिंहासनावरून खाली येणे आणि ख्रिस्ताला तुमची स्वप्ने, उत्कटता आणि पाठपुरावा करण्यावर राज्य करू देणे.

## जेव्हा व्यर्थता उपासनेत बदलते

तुमची स्वप्ने किती महान किंवा महत्वाकांक्षी कशीही असो याची पर्वा नाही, किंवा यशाचा पाठपुरावा करण्यात तुम्ही कितीही गुंतलेले असाल, जर ख्रिस्त बोलावतो तेव्हा तुम्ही तुमची जाळी बाजूला ठेवण्यास तयार नसाल, तेव्हा तुम्ही निडरपणे जाहीर करता की तुम्ही आणि तुमच्या योजना ह्या तुमच्या जीवनाचे मालक आहेत, तो नाही. परंतु सुवार्ता हीच आहे : जर तुम्ही अजून श्वास घेत आहात, तर तुमच्या कथेचा शेवट अजून लिहिलेला नाही.

मला आठवते मी दक्षिण कॅरोलिनातील, उत्तरी ऑगस्टा येथे २००४ च्या शरद ऋतूत प्रचार करत होतो. सभेनंतर, एक वृद्ध पुरुष पायऱ्यांवरून वर येताना अडखळला आणि रडत

होता. *"मी माझे जीवन वाया घालवले! मी माझे जीवन वाया घालवले! मी माझे जीवन वाया घालवले!"* ते अश्रू वीस वर्ष वयाच्या माझ्या खांद्यावर शक्तिशाली असे पेरले गेले. अनेक वर्षे, मी त्या घटनेकडे माझ्या जीवनासाठी एक इशारा म्हणून पाहत होतो. तथापि, नंतर मला जाणवले की जे काही त्याने म्हटले होते ते पूर्णपणे अचूक नव्हते. एखादे जीवन संपेपर्यंत नष्ट होत नाही. येशू ख्रिस्त केवळ आपल्या भूतकाळाला क्षमा करीत नाही-जर आपण त्याला आपले भग्न जीवन अर्पण केले तर तो ते आपल्या गौरवासाठी उद्धारतो. जे काही आपण गमावलेले आहे ते तो घेऊ इच्छितो आणि त्याच्या कृपे आणि दयेसाठी उपासनेच्या जीवनात रूपांतर करतो.

आपण स्वतःवर खर्च केलेल्या वर्षांची देव पूर्तता करतो हा विचार जेव्हा माझ्या मनात येतो, तेव्हा मी मध्य पूर्व देशातील त्या वृद्ध माणसाची आठवण काढतो, ज्या देशात मी अनेक वर्षे वास्तव्य केले होते. तो नेहमी आमच्या रस्त्यावर त्याची चरचर आवाज करणारी जुनी सायकल जिच्या समोर एक बॉक्स लावलेला असे ती घेऊन जात असे. तो सायकल चालवत असताना ओरडत असे, *"बेकीया!"* ज्याचा साधा अर्थ *"मोडलेल्या वस्तू"* असा होता.जर कोणाकडे काही मोडलेल्या वस्तू किंवा अनुपयोगी वस्तू असतील, तर तो त्या वस्तू थोडेसे पैसे देऊन विकत घेत असे आणि त्यांना दुरुस्त किंवा नवीन करून त्यांना उपयोगी वस्तू बनवीत असे. अगदी हेच ख्रिस्त आमच्या जीवनाबरोबर करतो.

**स्वतःचा नकार हे तुमच्या जीवनाच्या सिंहासनावरून खाली येणे आणि ख्रिस्ताला तुमची स्वप्ने, उत्कंठा आणि पाठपुरावा करण्यावर राज्य करू देणे.**

तो आपल्याला स्वतःच्या त्याग करण्याने आपली जीवने व्यवस्थित करण्यास सांगत नाही. त्याऐवजी, तो आपली भग्नता त्याला सोपवून द्यावी हे सांगत आहे (स्वतःचा नकार करून), म्हणजे तो आपले जीवन सुंदर बनवू शकेल.

अनेक लोकांना येशूची कल्पना आवडते, आणि तो कोण आहे या सत्यावर बौद्धिकपणे विश्वास ठेवतात. त्यांनी कदाचित *"त्यांच्या हृदयात येशूने यावे"* म्हणून प्रार्थना देखील केली असेल. परंतु ख्रिस्त केवळ समर्थक गोळा करण्यासाठी आला नाही. तो आपल्या पत्नीसाठी आला. त्याची वधू. तो तात्पुरत्या ओळखीसाठी आला नाही. तो आपल्याबरोबर उत्साहपूर्ण सार्वकालिक नाते स्थापन करण्यासाठी आला.

तुमच्या जीवनात, प्रभू ज्याने तुमच्यावर सार्वकालिक प्रीतीने प्रीती केली आहे त्याच्याकडे तुम्ही स्वतःला सोपविले आणि त्याला तुमच्या जीवनावर नियंत्रण करू दिले आहे का?

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. स्वतःचा त्याग आणि स्वतःचा नकार यांच्यामध्ये काय फरक आहे?

२. ह्या धड्यातील प्रश्नांची उत्तरे देताना तुम्ही तुमची स्वप्ने, उत्कटता आणि पाठपुराव्याबाबत तुम्ही काय शिकला आहात?

३. तुम्ही कधी येशूला तुमच्या जीवनाचे नियंत्रण करू दिले आहे का? जर नाही, तर तुम्हाला कोणत्या गोष्टी मागे रोखून धरत आहेत?

# ६

# जेव्हा स्वातंत्र्य मागासलेले वाटते

चेतावणी : हा धडा संस्कृती जे तुम्हाला सांगत आहे त्याच्या विरोधात जातो. तरीही प्रश्न तोच राहतो. *"काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?"*

तुमच्याकडे आता अधिकार नाहीत.
तुम्ही यापुढे नियंत्रण ठेवून नाहीत.
तुमचे जीवन तुमच्या मालकीचे नाही.
तुम्ही स्वेच्छेने त्याला सर्वकाही देत आहात. समाप्त.

हे कदाचित वाईट बातमी-सारखे वाटेल, परंतु धीर धरा. हे स्वातंत्र्य आहे.

ही सत्यता स्पष्ट करण्यासाठी, एक कागदाचे पान घ्या. तो कोणत्या आकाराचा किंवा रंगाचा आहे किंवा त्याच्यावर रेषा आहेत किंवा कोरा आहे याला काहीही महत्व नाही. आता, त्या कोऱ्या कागदाच्या तळाशी स्वाक्षरी करा. हेच जे तुम्ही देवाला अर्पण करता. स्वतःचा नकार करण्याची हीच सत्यता आहे. तुम्ही देवाला एक कोरा करार देता की त्याने तुमच्या जीवनाबरोबर, तुमच्या स्वप्नांबरोबर, तुमच्या संबंधांबरोबर, तुमच्या मृत्यूबरोबर जे त्याला वाटते ते करावे. लक्षात ठेवा, त्याची तुमच्यासाठी काळजी अतुलनीय आहे. त्याची शक्ती असीमित आहे, त्याची प्रीती सार्वकालिक आहे, आणि त्याचे ज्ञान अकल्पनीय आहे. तुम्ही त्याजवर भरवसा ठेवू शकता! तो तुमच्या जीवनाच्या कैनवासवर जी कथा रंगवू इच्छितो ती तुम्ही कधी कल्पना करू शकाल त्यापेक्षा कितीतरी मोठी आहे. आणि ती सार्वकालिक दृष्टीने महत्वाची असेल. लक्षात ठेवा, तुमच्या जवळ जे सर्वकाही आहे ते सर्वप्रथम त्याच्याकडून आलेले आहे. तो तुमचे अस्तित्व नष्ट करायला आलेला नाही. जे जीवन जगण्यासाठी तुम्हाला निर्माण केले ते जीवन देण्यासाठी तो आला आहे.

## स्वातंत्र्याचा पाठपुरावा करणे

डिस्ने दुकानात पूर्वीचा एक सदस्य म्हणून (डिस्ने कर्मचाऱ्यांसाठी वापरला जाणारा शब्द), मी काय सांगू शकतो? मी एक चाहता आहे. तुमच्या पुढील कराओके रात्रीसाठी मला आमंत्रित करा आणि शक्यता आहे मी त्यात सहभागी असेन. पण तरीही वाढत्या विकृत मार्गाने अनेक डिस्ने चित्रपट *"स्वातंत्र्याची"* व्याख्या करतात याकडे लक्ष दिल्यावाचून मी राहू शकत नाही.

उदाहरणार्थ, लायन किंगचा विचार करा. प्रतीबंधांपासून स्वातंत्र्य मिळविण्याच्या सिम्बाच्या पाठपुराव्यामुळे तो एक गाणे गातो : *"कोणीही बोलत नाही, 'हे कर!' कोणीही बोलत नाही, 'तेथे राहा!' कोणीही बोलत नाही, 'ते करू नको!"* कोणीही बोलत नाही, 'तेथे पाहा!' संपूर्ण दिवसभर सर्वत्र धावण्यास स्वतंत्र, माझ्या इच्छेने करण्यास स्वतंत्र!" *फ्रोझनमध्ये एल्साही हाच दृष्टीकोन जाहीर करते.* "आता पाहण्याची वेळ आली आहे की मी काय करू शकते, मर्यादा ओलांडून नवीन शक्यतांची चाचणी घ्यावी....बरोबर नाही, चूक नाही, माझ्यासाठी कोणतेही नियम नाही, मी स्वतंत्र आहे. ते जाऊ द्या!*" हीच कल्पना अलादिन आणि जास्मिन्स यांच्या द्वंदगीतामध्येही रुजलेली आहे,* "एक संपूर्ण नवीन जग"- *जे माझ्या आवडत्या डिस्ने गाण्यांपैकी एक आहे. ते परस्परांना जाहीर करतात,* "एक संपूर्ण नवीन जग, एक नवीन दृष्टिकोनाचा विलक्षण बिंदू, कोणीही आम्हाला 'नाही' असे सांगत नाही, कुठे जायचे ते ठरवत नाही, किंवा आम्ही केवळ स्वप्ने पाहत आहोत असे म्हणत नाही."

**काय होईल जर खरे स्वातंत्र्य हे अधिकाराची अनुपस्थिती नसून अंतिम प्रीतीची उपस्थिती असेल?**

ह्या गीतांमधील स्वातंत्र्याच्या प्रत्येक आवृत्तीत तुम्हाला एक समान धागा दिसतो का? कोणताही प्रतिबंध नाही आणि स्वतःच्या बाहेर कोणताही अधिकार नाही. जर हे खरे आहे, तर येशू बंदिवास आणण्यासाठी आला. परंतु काय होईल जर खरे स्वातंत्र्य हे अधिकाराची अनुपस्थिती नसून अंतिम प्रीतीची उपस्थिती असेल? काय होईल जर देव प्रत्यक्षात तुम्ही तुमच्यावर प्रीती करता त्यापेक्षा अधिक प्रीती तुम्हांवर करत असेल? काय होईल, जर तुमच्या कल्पनेपेक्षा कितीतरी मोठी योजना देवाने तुमच्यासाठी ठेवलेली असेल? आणि काय होईल, जर खरे स्वातंत्र्य केवळ पूर्ण शरणागतीमध्येच अनुभवता येत असेल?

जो प्रभू आपल्यावर प्रीती करतो त्याच्या विरोधात बंडखोरी केल्याने आपल्याला स्वातंत्र्य मिळत नाही; उलट ते स्वातंत्र्य विकृत होते. परंतु बंडखोरी हाच स्वातंत्र्यास विकृत करण्याचा एकमेव मार्ग नाही. येथे दुसरे मार्ग देखील आहेत.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, लाखो यहूदी (आणि त्यांना सहानुभूती दाखवणारे इतर लोक) यांना उत्तरी युरोपच्या पलीकडे यातना देणाऱ्या छावणीकडे नेण्यात आले जेथे पुष्कळ जणांनी त्यांना नष्ट करण्यासाठी तयार केलेल्या कुख्यात गैस चेंबरमध्ये आपले प्राण गमावले. मी ह्यापैकी काही शिविरांना भेटी दिल्या, जसे दकाऊ आणि औशवित्झ, आणि तेथे पाहुण्यांचे स्वागत करणारी चिन्हे अत्यंत भयावह होती. शिविराच्या लोखंडी दरवाजाच्या वरती मोठ्या अक्षरात कोरलेले होते : आर्बाइट माख्ट फ्राय" (म्हणजे, "काम तुम्हांला स्वतंत्र करते.") त्या तीन जर्मन शब्दांनी काही कैद्यांच्या हृदयात कदाचित क्षणिक आशा निर्माण केली असेल-परंतु जास्त वेळेसाठी नाही. त्या दरवाजाच्या आत गेल्यावर त्यांना कठोर सत्य कळणार होते. त्यांना फसवले गेले होते.

दु:खाची गोष्ट म्हणजे, *"काम आपल्याला स्वातंत्र्य देते"* हे खोटे आजही अनेकांच्या हृदयात जिवंत आहे—विशेषतः चर्च मध्ये. पुष्कळ जण त्यांच्या ख्रिस्ती जीवनात स्वातंत्र्याला त्यांचे गंतव्यस्थान समजतात. ते विचार करतात की स्वातंत्र्य हे देवाला प्रसन्न करून प्राप्त केले जाते, आणि जर आपण त्याच्या इच्छेप्रमाणे वागलो, तर आपण शेवटी स्वतंत्र होऊ. आपण एका साध्या समीकरणाने अशा वृत्तीचे निदान करू शकतो, *"जर मी ............ हे केले. तर मग देव हे............. करेल.?"*

हे समजून घ्या मी येथे देवाच्या क्रोधापासून मिळणाऱ्या स्वतंत्रतेबद्दल बोलत नाही. आपण आपल्या वतीने येशू ख्रिस्ताने पूर्ण केलेल्या आणि उद्धाराच्या कामावर भरवसा करतो तेव्हा आपल्याला पूर्ण क्षमा आणि स्वीकृती प्राप्त होते. त्या स्वातंत्र्याला तारण म्हणतात आणि ख्रिस्तामध्ये म्हणून देवासमोर नीतिमान म्हणून आपल्या स्थितीची खात्री देते.

मी जे सांगत आहे ते स्वतःचा नकार करण्याचे पाचारण आहे- जे आपल्याला त्याच्या प्रीतीचा अधिकाधिक आनंद घेण्याचे स्वातंत्र्य देते. लक्षात घ्या, मी असे म्हणत नाही की, *" देवाकडून अधिक प्रीती केले जावे म्हणून स्वातंत्र्य."* देवाने आधीच जी प्रीती केली आहे त्यापेक्षा अधिक तो तुम्हाला प्रीती करत नाही. देवाचे वचन म्हणते, *"आपल्या मित्राकरता आपला प्राण द्यावा यापेक्षा कोणाची प्रीती मोठी नाही"* (योहान १५:१३). हीच ती प्रीती आहे जी त्याने आपल्यावर केली आहे. येशू ख्रिस्त आपले जीवन अर्पण करून तुमच्या आत्म्याचा उद्धार करण्यासाठी आधीच या शापित जगात आला आहे. परंतु तुमच्यासाठी त्याच्या प्रीतीचा तुम्ही किती आनंद घ्यावा आणि तो देत असलेल्या घनिष्ठतेमध्ये प्रवेश करण्याची तुम्ही निवड करता. त्याला पूर्णपणे शरण जाण्याने तुम्ही त्याच्या प्रीतीत राहू शकता अन्यथा तुम्ही पापाच्या अवज्ञेमध्ये आणि बंधनात जीवन व्यतीत करू शकता.

## यादी तपासणीपेक्षा बरेच अधिक

खेळ जिंकण्यासारखे देवाचा पाठपुरावा करण्याऐवजी, हे समजून घ्या की ज्याला तुमची कळकळ आहे असा देव म्हणून ओळखले जावे अशी त्याची इच्छा आहे. त्याचे वचन, बायबल, हे एक प्रेम पत्र आहे ज्यामध्ये प्रत्येक गोष्ट, पान, आणि शब्द आपल्या निर्माणकर्त्याचे हृदय प्रकट करते.

कोणत्याही प्रेमसंबंधात, जेव्हा पत्रांची देवाणघेवाण होते, तेव्हा प्रत्येक तपशील महत्वाचा असतो. तिने *"माझ्या सर्व प्रीतीने"* अशी स्वाक्षरी केली का किंवा तिने *"प्रामाणिकपणे"* असेच केवळ म्हटले आहे?" तिने तिचे एखादे टोपण नाव वापरले का? पत्र घाईघाईने आणि भावनाविना बंद केले आहे का? तिच्या आवडत्या सुगंधित द्रव्याने पत्राला सुवासित केले का? तिने तिचे 'मी' हे सामान्यपणे केले का किंवा तिने त्यावर डिस्ने फिरणारे वर्तुळ केले का? होय, आपण ह्या गोष्टींना पाहतो कारण ते लिहिणाऱ्याचे हृदय प्रकट करते.

स्वतःचा नकार करण्याचे पाचारण हे एखाद्या यादी-तपासणीपेक्षा अधिक आहे, आणि ते नियमांच्या संचापेक्षा अत्यंत टोकाचे आहे. ख्रिस्ताचे अनुसरण करणे हा एक जाणीवपूर्वक प्रयत्न आहे. स्वतःचा नकार करणे हे त्याला अधिक घनिष्ठपणे जाणण्यासाठी दैनंदिन अट आहे. येशू आपल्या जीवनाच्या सिंहासनासाठी संघर्ष करीत नाही. ते त्याला समर्पित केले पाहिजे. ख्रिस्ताचा शोध घेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्याला आपल्या जीवनावर प्रभुत्व करू द्यावे हा आहे. तो प्रभू आहे; तो केवळ एक चांगली कल्पना नाही.

याचा असा विचार करा : आपण आता स्वतःसाठी जगत नाहीत, परंतु ख्रिस्त आपल्यात जगतो. आपली जीवने स्वयं प्रीतीने नव्हे, तर त्याच्या प्रीतीने ताब्यात घेतली गेली आहेत. आपल्याला आपल्या स्वतः साठी मृत होण्यास बोलावले आहे, म्हणजे खरे जीवन राज्य करेल. स्वतःला मरणे हा आपला प्रवास त्याला ओळखण्याने, त्याच्याविषयी शिकण्याने, त्याच्याबद्दल बोलण्याने, त्याची वाणी ऐकण्याने, आणि त्याच्या वचनाने आपल्या जीवनाची रचना करण्याने सुरू होतो. याविषयी आपण पुढील पानांमध्ये चर्चा करणार आहोत.

## "नकार" या संकल्पनेवर सखोल विचार करणे

येशू वापरत असलेला शब्द *"नकार"* याकडे बारकाईने पाहा. ग्रीक मध्ये हा शब्द अपरनिओमाई आहे. तो दोन शब्दांपासून बनतो; अपो, म्हणजे *"वेगळे होणे,"* आणि अर्नेओमाई चा अर्थ *"कोणाचा नकार करणे, अस्वीकार करणे, किंवा जे काही दिले आहे*

*त्याचा अस्वीकार करणे."* सोप्या भाषेत सांगायचे तर, आपण असे म्हणू शकतो की या शब्दाचा अर्थ, एखाद्याची कोणाशी ओळख किंवा संबंध नाही हे मान्य करणे. असे म्हणण्याचा दुसरा मार्ग म्हणजे, स्वतःला विसरावे आणि आपल्या स्वतःचे आणि स्वतःच्या आवडीकडे दुर्लक्ष करणे. हे केवळ प्राधान्यांची पुनर्रचना करणे नाही किंवा स्वतःचे नवीनीकरणही नाही.

मृत्यू घडत आहे. जीवन सुरू होत आहे.

स्वतःचा त्याग आणि स्वतःचा नकार यांच्यामधील फरकाची आठवण करण्याचा सोपा मार्ग हा आहे : स्वतःच्या नकारात स्वतः हे प्रथम येते. स्वतःच्या त्यागात आपले लक्ष्य हे करण्यावर असते, पाठ्पुराव्यावर नाही. याच्या उलट, स्वतःचा नकार म्हणजे काही करणे नव्हे, तर ज्याने आपल्याला त्याच्या रक्ताने उद्धार दिला आहे त्या प्रभूला शरण जाणे आहे. *"तुम्ही स्वतःचे मालक नाही. कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहात"* (१ करिंथ. ६:१९-२०). *"कोणीही दोन धन्यांची सेवा करू शकत नाही"* (मत्तय. ६:२४).

ख्रिस्ताकडे तुमच्या जीवनाच्या सिंहासनावर बसवण्यासाठी, तुम्हांला तुमचा अधिकार सोडावा लागेल. स्वतःचा नकार करा. तो तुमच्या जीवनाच्या सिंहासनावर जबरदस्तीने येणार नाही. *"मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो, आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वतःला माझ्याकरता दिले"* (गलती. २:२०).

जे काही तो बोलतो ते पूर्ण होते. जेथे तो म्हणतो, तेथे आपण जावे.

'का' ह्याविषयीची आपली समज ही आज्ञा पाळण्यास अट नाही जेव्हा आपल्याला 'कोण' हे माहित असते. हे स्वतःच्या नकार करण्याच्या केंद्रस्थानी आहे. तो आपल्याकडून काय विचारत आहे हे जेव्हा आपण समजतो तेव्हाच केवळ जर आपण ख्रिस्ताचे वचन पाळतो तर, आपण त्याला केवळ आपला गुरु म्हणून मानतो. आणि 'का' हे आपल्याला माहित नसले तरी जेव्हा आपण ख्रिस्ताचे वचन पाळतो तेव्हा आपण त्याला आपला प्रभू म्हणून सम्मान देतो. आपल्याला जसे जगायचे आहे त्यामध्ये आपण देवाला सामावून घेण्याचा प्रयत्न करतो का किंवा आपण जशा प्रकारे जगतो त्यास देवाला परिवर्तित करू देतो? आपल्या विचारांमध्ये आणि जीवनशैलीमध्ये देवाच्या वचनाचा अर्थ लागत

**'का' हे आपल्याला माहित नसले तरी जेव्हा आपण ख्रिस्ताचे वचन पाळतो तेव्हा आपण त्याला आपला प्रभू म्हणून सम्मान देतो.**

नसताना आपण आज्ञा पाळण्यास उशीर करतो का? एक परिवर्तित जीवन प्रत्येक गोष्टीची परीक्षा देवाच्या गौरवाच्या निकषावर करते—समज किंवा सोयीच्या निकषावर नाही.

तर मग हे व्यवहारिकरित्या कसे घडते?

वाचत राहा.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. *"स्वातंत्र्य"* तुम्ही कसे समजता? स्वातंत्र्याची तुमची समज देवाच्या वचनाशी जुळते का?

२. *"स्वतःचा त्याग"* आणि *"स्वतःचा नकार"* यांच्यामधील फरक तुमच्या जीवनातील खरे उदाहरण देऊन स्पष्ट करा.

३. 'का' हे आपल्याला समजत नसतानाही ख्रिस्ताची आज्ञा पाळण्यात अर्थ वाटतो का? असे केल्याने देवाचा सम्मान कसा होतो?

# ७

# जीवनासाठी पाया

स्वतःचा नकार करणे हे काहीसे अमूर्त वाटू शकते, त्यामुळे असे प्रश्न निर्माण होतात : *"कोणते व्यवहारिक कृत्य आपण करावे?" "जर माझे मत आणि माझी इच्छा ह्या येथून पुढे चालना देणाऱ्या नसल्या तर, काय असले पाहिजे?"* "देव माझ्याशी बोलणार आहे का आणि ही प्रक्रिया स्पष्ट करणार आहे का?

त्याने ते आधीच केले आहे.

ख्रिस्ताबरोबर प्रभू म्हणून आपल्या नवीन जीवनाचा विचार करत असताना, आपण घर बांधत आहोत अशी  कल्पना करा. प्रथम, पायाभरणी केली जाते. त्यानंतर घराची रचना उभी केली जाते. आपणही येथेच सुरुवात करतो. एक घर रचनेपासून सुरू होत नाही, खालील बांधकाम भक्कम नसेल तर ते कोसळून जाईल. म्हणून आपण पायापासून सुरुवात करतो, आणि त्यानंतर रचना तयार करतो.

## आपल्या घरासाठी पाया

योहान १:१४ मध्ये, आपल्याला सांगितले आहे की शब्द देह झाला आणि त्याने आम्हांमध्ये वस्ती केली. हे महत्वाचे आहे. येशू आणि शब्द हे समान आहेत. अक्षरशः, देवाच्या शब्दाने देह धारण केला. हाच तो शब्द आहे ज्याने जगाला अस्तित्वात येण्यास आज्ञा दिली आणि आजही सर्वकाही सांभाळून आहे- आपल्या विश्वासाच्या आकाशगंगांपासून ते आपल्या शरीरातील पेशींपर्यंत *"त्याच्या सामर्थ्याच्या शब्दाने"* (इब्री. १:३). हा शब्द केवळ आपल्यामध्ये राहण्यास आला नाही; तर त्याने त्याचे हृदय आपल्याला कळवले. त्यामुळे देव काय विचार करतो याबद्दल आपल्याला आश्चर्य करण्याचे कारण उरत नाही.

ज्याप्रमाणे एखाद्या घराला उभारण्यासाठी मजबूत पाया आवश्यक असतो, त्याचप्रमाणे आपली जीवने उभारण्यासाठीही आपल्याला एक पाया हवा आहे. तो पाया देवाचे वचन आहे. लक्षात ठेवा. शब्द हा केवळ संकल्पना नाही, तर तो कोणीतरी आहे. पहिले करिंथ. ३:११ आपल्याला सांगते, *"येशू ख्रिस्त हा जो घातलेला पाया, त्याच्यावाचून दुसरा पाया कोणाला घालता येत नाही."* जर देवाच्या वचनातून जे आपल्याला आवडते तेच जर आपण स्वीकारतो, आणि जे सांस्कृतिकदृष्ट्या अप्रासंगिक किंवा अस्वस्थ करणारे असे वाटते त्या भागाचा अस्वीकार करतो, तर आपला पाया हा त्याच्या वचना ऐवजी आपले मन आहे. तेव्हा आपण त्याच्या वचनाला आनंदाने शरण जाण्याऐवजी आणि आपले संपूर्ण जीवन त्यावर उभारण्याऐवजी केवळ त्याच्या वचनाचे पालन करत असतो.

आपल्यापैकी पुष्कळ जण लेकरांची आकर्षित करणारी गाणी गात मोठे झालो आहोत : बुद्धिमान माणसाने त्याचे घर खडकावर बांधले!.....मूर्ख माणसाने त्याचे घर वाळूवर बांधले!"[१४] *मत्तय ७:२४-२७ मधील येशूचा प्रसिद्ध दाखला असा नाही की, एखाद्याने आपले घर वादळ-मुक्त वातावरणात बांधले. प्रत्यक्षात दोन्हीही घरांना वादळाचा तडाखा लागला. आपली पृथ्वीवरील घरे बाह्यरित्या किती सुंदर किंवा आकर्षक आहेत हे महत्वाचे नाही-आपली जीवने-तशी आहेत का हे कदाचित महत्वाचे आहे. बऱ्याच प्रसंगी, बायबल आपल्या शरीराला एक तंबू म्हणून संबोधते-एक तात्पुरता निवास. जर आपले घर त्या टिकाऊ पायावर बनविलेले नसेल, तर शेवटी पूर्ण नुकसान होईल. देवाचे वचन आपल्याला शिकवते,* "कारण सर्व मानवजाती गवतासारखी आहे; आणि तिचा सर्व गौरव गवताच्या फुलासारखा आहे. गवत वाळते व त्याचे फुल गळते; परंतु प्रभूचे वचन सर्वकाळ टिकते" (१ पेत्र. १:२४-२५).

.आपण असा पाया कसा बनवावा?

आपण करू शकत नाही.

तो आधीच केलेला आहे. आपण केवळ त्यावर बांधकाम करतो. म्हणून, ते कशा सारखे दिसते?

इब्री लोकांस पत्राचा लेखक आपल्याला सांगतो की, *"आणि विश्वासावाचून त्याला संतोषवणे अशक्य आहे; कारण देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास ठेवला पाहिजे की, तो आहे, आणि त्याचा शोध झटून करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे"* (इब्री. ११:६). आपण आज्ञा पाळण्याद्वारे त्याच्या वचनाच्या पायावर बनवतो. हे आपल्याला किती विश्वास

आहे याविषयी नाही. तर त्याच्यावर भरवसा ठेवणाऱ्या आणि त्याचे वचन पाळणाऱ्यांना पुरस्कार देणाऱ्या देवावर आपला विश्वास ठेवण्याविषयी आहे.

लूक १७:६ मध्ये येशू आणि शिष्यांच्या मध्ये सर्वकाही स्पष्ट होणाऱ्या भेटीची नोंद केलेली आहे जेथे ते त्यांच्या विश्वास वाढविण्याबद्दल विचारत आहेत-त्याला येशूने प्रामुख्याने उत्तर दिले, *"नाही."* त्याचे अचूक शब्द असे आहेत, *"तुमच्यामध्ये मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असेल, तर ह्या तुतीला, तू मुळासकट उपटून समुद्रात लावली जा, असे तुम्ही सांगताच ती तुमचे ऐकेल."* त्याच्या स्पष्टीकरणाने त्यांना जास्त प्रमाणात विश्वास असावा हे सांगितले नाही, परंतु त्यांच्याकडे असलेल्या विश्वासाचे योग्य स्थान काय आहे हे दाखवले, मग ते कितीही लहान असो.

आज्ञा पाळण्यासाठी आपल्याला मोठ्या विश्वासाची गरज नाही. परंतु जो काही विश्वास आपल्याजवळ आहे तो जो प्रभू त्याच्या सामर्थ्याच्या शब्दाने सर्व गोष्टींना सांभाळून आहे त्याच्यावर ठेवायचा आहे. आपल्याला का, कोठे, केव्हा किंवा कसे हे समजण्याची गरज नाही. परंतु आपल्याला हे अवश्य समजले पाहिजे तो कोण आहे आणि त्याच्यावर भरवसा ठेवावा. तेच तर स्वतःचा नकार करण्याच्या केंद्रस्थानी आहे.

द हायडिंग प्लेस मधील स्पष्ट विभाग, १९७५ चा चित्रपट त्या पुस्तकावर आधारित ज्याचे शीर्षक हे कॉरी टेन बूम यांनी लिहिलेल्या शीर्षकासमान आहे, त्या सत्याला स्पष्ट करते. कॉरी आपल्या पुस्तकात लपणाऱ्या यहूदी लोकांचा प्रवास, पकडले जाणे, आणि रावेनब्रक, नाझी यातना देणारे एक शिवीरात सहन केलेल्या छळाला मांडते. एका दृश्यात, कॉरीची बहिण, बेट्सी टेन बूम, शिविराच्या एका तंबू मध्ये बायबल वाचत आहे तेव्हा तिला दुसऱ्या एका कैदीने अडवले आणि उपहास केला, *"जे अज्ञानी आहेत त्यांना हे शब्द समाधान देणारे वाटतात. या ठिकाणी, हे निंदेसारखे आहे."* त्यानंतर देव दु:खद किंवा प्रीती करणारा, शक्तिहीन किंवा सर्वशक्तिमान आहे की नाही यावर पुढे चर्चा झाल्यानंतर, ती स्त्री तिचे फाटके हातमोजे काढते आणि तिचा कुचललेला हाथ दाखवते. वारशौं सिम्फनी ऑर्केस्ट्रा मधील वायोलिन वाजविणारी ती पहिली महिला होती हे सांगते. दुसरी स्त्री बेट्सीला विचारते, *"तुझ्या देवाची हीच इच्छा होती का?"* कॉरी आणि बेट्सी दोघेही हे स्वीकारल्यावर की तिला देव यातना का होऊ देत आहे या मागील कारणे त्यांना माहित नाहीत, तरीही ते त्यांच्या वतीने

**आपल्याला का, कोठे, केव्हा किंवा कसे हे समजण्याची गरज नाही. परंतु आपल्याला हे अवश्य समजले पाहिजे तो कोण आहे आणि त्याच्यावर भरवसा ठेवावा.**

ख्रिस्ताच्या दु:ख सहनाविषयी बोलत राहिले. दोषारोपकरणाऱ्या स्वरात, स्त्रीने पुन्हा विचारले, *"तुमच्या प्रीतीच्या देवाने तुम्हाला येथे का पाठवले असे तुम्हाला वाटते?"* बेट्सीने उत्तर दिले, *"त्याची आज्ञा पाळण्यासाठी. जर तुम्ही त्याला ओळखता, तर का हे जाणण्याची तुम्हांला आवश्यकता राहत नाही."*[१५]

बायबल अशा अनेक लोकांबद्दल सांगते ज्यांनी देवाच्या वचनावर गांभीर्याने विचार केला आणि त्याचे अनुसरण केले—जरी पुढे नेमके काय घडणार आहे हे त्यांना माहीत नव्हते. नोहाला पृथ्वीवर प्रलय कसा येईल याचा तपशील नव्हता, परंतु ज्याने त्याला जहाज बनविण्यास सांगितले होते त्या प्रभूवर त्याचा विश्वास होता. मोशेला देव इस्राएली लोकांना मिसर देशातून कसे बाहेर आणेल त्या विशेष गोष्टी जाणण्याची गरज नव्हती. त्याला केवळ हे जाणण्याची गरज होती की जो प्रभू त्याला पाठवत होता तो त्याच्यासोबत होता.

यहोशवाला यरीहोच्या भिंती कशा पडतील याचा तपशील दिला गेला नाही, तरीही ज्याने त्यांना यरीहोच्या भिंतीभोवती अनेक वेळा फेऱ्या मारण्याची सूचना दिली होती तो प्रभू विश्वासू आहे हे त्याला ठाऊक होते. सेनापती नामानालाही यार्देन नदीमध्ये सात वेळा डुबकी मारल्यानंतर त्याच्या शरीरावरून कुष्ठरोग कसा निघून जाईल याच्या तपशिलाबाबत स्पष्टीकरण मिळाले नव्हते. सुरुवातीला या सुचनेने संतप्त झाला असला तरी, नामानाने शेवटी देवाच्या सेवकाची आज्ञा पाळली आणि जशी सूचना दिली होती तसे पाण्यात डुबक्या मारल्या. शद्रख, मेशख, अबेदनगो यांना ज्वालामय भट्टीतून सुटकेचे आश्वासन दिलेले नव्हते. परंतु मूर्तीपुढे वंदन करू नये अशी त्यांना आज्ञा कोणी दिली होती हे त्यांना ठाऊक होते. यादी ही न संपणारी आहे.

## गोंगाटाच्या जगात देवाची वाणी ओळखणे

म्हणून, जर आज्ञा पाळणे हे देवाच्या वचनावर टिकून असेल, तर ह्या गोंगाटाच्या जगात त्याची वाणी ऐकणे आणि ओळखणे का आवश्यक आहे?

आपण कोणाचाही आवाज मुख्यतः दोन मार्गांनी ओळखू शकतो. पहिला मार्ग हा त्या व्यक्तीसोबत वेळ घालवणे- ज्याचा आवाज आपण ओळखू इच्छितो. जेव्हा आपण देवाच्या वचनावर मनन आणि सखोल चिंतन करतो, तेव्हा आपण ओळखतो की देवाचा आवाज कशा प्रकारे आहे-कारण त्याचे वचन हे *देव स्वतः बोलत आहे*. जेव्हा आपण असे काहीतरी ऐकतो जे देवाच्या वचनाच्या विरोधात असते, तेव्हा आपण ओळखू शकतो की हा आवाज

देवाकडून नाही. जेव्हा आपण गोष्टी ऐकतो ज्या देवाच्या गौरवाशी तडजोड किंवा संघर्ष करतात, तेव्हा आपण हे ओळखू शकतो की तो आवाज हा त्याच्याकडून आलेला नाही.

तुम्ही कधी कोणाबद्दल काही अफवा ऐकल्या आहेत का, एक अफवा इतकी मूर्खपणाची, की तुम्ही गोंधळून म्हणता, *"तो व्यक्ती अशी गोष्टी कधीही बोलणार नाही!"*? तुम्हाला माहित आहे की ही त्याची किंवा तिचे व्यक्तिमत्व किंवा चारित्र्य नाही की असे शब्द बोलावे. त्याचप्रमाणे, जेव्हा तुम्ही पूलपीट किंवा सार्वजनिकरित्या काही शब्द ऐकता जे देवाचे नाव आणि चरित्राला चुकीने गुणधर्मित केलेले असतात, तेव्हा तुम्ही हे ओळखू शकता की हा त्याचा आवाज नाही. कारण त्याची स्वाक्षरी ही त्याच्या वचनात आहे.

आमच्या किशोरवयात, माझा मित्र जॉन आणि मी बायबलचे अध्ययन करण्याचा निर्णय केला जेणेकरून, आम्ही सवयीने करीत असलेल्या गोष्टींपेक्षा आम्ही जो विश्वास ठेवतो तो का ठेवतो ते समजून घेता येईल. देवाने विविध विषयांवर काय म्हटले आहे हे आम्हांला स्वतःच शोधून काढायचे होते आणि या आधारावर अधिक शिकायचे होते. आमच्या वडिलधाऱ्या लोकांनी चर्च इमारतीची किल्ली आम्हांला दिली आणि बुधवार रात्रीच्या प्रार्थनेनंतर, आम्ही अध्ययन करण्यास सुरुवात केली ज्यामध्ये पवित्र जीवन व्यतीत करण्यापासून ते शरणार्थी लोकांवर प्रीती करणे आणि पवित्र आत्म्याची दाने अशा विविध विषयांवर अभ्यास केला. जरी आम्ही आठवडया दरम्यान शोध करत होतो आणि इतरांकडून विचार घेत होतो, तरी बुधवार रात्रीचा आमचा नियम सरळ होता. केवळ एकच पुस्तक उघडले जात होते : बायबल.

आजच्या दिवसापर्यंत, मला त्या बुधवार रात्रींची आठवण येते जो एक माहिती देणारा आणि पाया रचणारा वेळ होता. त्या वेळेत मला एका गोष्टीची ठाम खात्री पटली : जर येशूने जे काही बोलले त्याचा तोच अर्थ होता, तर मग केवळ संतुलित ख्रिस्ती जीवन हे याच्याशी वचनबद्ध जीवन आहे.

पूर्ण वचनबद्धता.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. येशूच्या खऱ्या अनुयायीच्या जीवनासाठी कोणता पाया आहे?

२. तुम्ही त्या समयाचे उदाहरण देऊ शकता का, जेव्हा विश्वासाने तुम्ही देवाची आज्ञा पाळली जरी जेव्हा तुम्हाला हे ठाऊक नव्हते की सर्वकाही हे कसे घडेल?

३. तुमच्या जीवनात कोणत्या काही गोष्टी आहेत ज्या तुम्हाला देवाचा आवाज ऐकणे व ओळखण्यापासून अडथळा करू शकतात?

# ८

# घराची रचना करणे

चेतावणी : जर तुम्हाला तुमचे जीवन जसे आहे तसे स्थिरच राहावे असे वाटत असेल, तर यापुढील काही धडे वगळणेच योग्य ठरेल.

जरी इमारती प्रकल्प ही माझी विशेष आवड म्हणून कधीही नव्हते, तरी मला इमारत बांधकामाविषयी बरेच काही ठाऊक आहे हे समजण्यासाठी की इमारत ही योग्यपणे रचली गेली पाहिजे आणि त्याची रचना त्याचा अंतिम आकार दर्शवते. बांधकामाच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यातही, इमारतीची रचना अंतिम बांधकामाची झलक देते. थोड्याशा कल्पनेने घर कसे दिसेल हे आपण पाहू शकतो. जेव्हा शटर्सचा रंग, जमिनीवर कोणत्या फरशा लावाव्या, रंगाची निवड, आणि स्वयंपाकघराची सजावट हे तपशील त्या वेळी अजून स्पष्ट नसले, तरी घर पूर्ण झाल्यावर ते एकंदर कसे दिसेल याची आपल्याला एक सामान्य कल्पना नक्कीच असते.

चला,  देवाला आपले घर-, आपल्या जीवनाला घडवू देताना ही प्रतिमा आपल्या मनात ठेवू या. मग प्रश्न उरतो, तो हे कसे करतो?

इब्री लोकांस पत्राच्या अकराव्या अध्यायातील ह्या वचनांचा विचार करा. *“विश्वासाने आपल्याला कळते की, देवाच्या शब्दाने विश्वाची रचना झाली, अशी की, जे दिसते ते दृश्य वस्तूंपासून झाले नाही”* (इब्री. ११:३).

हे योग्यपणे समजून घ्या!

जग देवाच्या वचनाने रचले गेले आहे; त्या अदृश्य गोष्टींद्वारे. इब्री लोकांस पत्राचा ११ वा पूर्ण अध्याय अशा पुरुष व स्त्रियांबद्दल बोलतो ज्यांची जीवने विश्वासाने रचली गेली होती. हलका, अदृश्य विश्वास ज्याने त्यांना देवाचे वचन पाळण्यास प्रेरणा दिली. हाबेलाने केवळ

योगायोगाने उत्तम अर्पण वाहिले नव्हते; देवाचे वचन म्हणाले होते की रक्ताची आवश्यकता होती आणि हाबेलाने आज्ञा पाळली. नोहाने केवळ मजेसाठी जहाज बनविले नाही; देवाने त्याला तसे करण्यास सांगितले होते आणि नोहाने आज्ञा पाळली. अब्राहाम केवळ एक यात्री म्हणून रानाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यातून जतन करणाऱ्या वस्तू गोळा करीत भटकत राहिला नाही. देवाने त्याला जाण्यास सांगितले होते, *“मी दाखवीन त्या देशात जा”* (उत्पत्ती १२:१) आणि अब्राहामाने आज्ञा पाळली. मोशेही मिसर देशाला (जेथे त्याला खुनाच्या गुन्ह्यात अटक करायची होती) काही लाखो इस्राएली लोकांना सोडविण्यासाठी परत गेला नाही (चाळीस वर्षे मेंढपाळ म्हणून काम केल्यानंतर) कारण ते पदोन्नती सारखे वाटत होते असे नव्हे. तो गेला कारण देव जळत्या झुडुपातून त्याशी बोलला आणि त्याला जाण्यास सांगितले. मोशेने आज्ञा पाळली. इब्री. लोकांस पत्राचा ११वा अध्याय एका कारणासाठी विश्वासाचे पुरुष व स्त्रिया म्हणून त्यांची आठवण करतो : त्यांनी देवाच्या वचनावर विश्वास ठेवला आणि त्याविश्वासानुसार कार्य केले.

हे येथेच गोष्टी व्यवहारिक आणि विशेष होतात जेव्हा तुम्ही त्यांना बनवण्यास तयार असतात.

स्वतःच्या नकाराचा प्रवास हा तुमच्या जीवनाच्या प्रत्येक भागाला देवाच्या वचनाने रचना करू देणे आहे. देवाच्या वचनाला तुमची कारकीर्द, तुमची गुंतवणूक, तुमचे खर्च करणे, तुमचे संबंध, तुमचे प्राधान्य, तुमचे राजकीय दृष्टीकोन, तुमची सेवा, तुमचे मिशन, तुमचा आरामदायकपणा, तुमचे आचरण, तुमच्या खाण्याच्या सवयी, तुमचे शब्द, तुमच्या विचारांना बनवू द्या....

होय, हे अस्वस्थ आणि शिरकाव करण्याविषयी आहे. पण तुम्ही तयार आहात का?

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. देवाच्या वचनाला तुमचे निर्णय घेऊ देण्यासाठी तुमच्या जीवनाच्या कोणत्या क्षेत्रात हे फारच अवघड होते? का?

# १

# देवाच्या वचनाने आपली कारकीर्द घडवणे

जसे आपण जगतो त्याला देवाचे वचन कसे परिवर्तित करते याचा जेव्हा आपण विचार करतो, तेव्हा चला आपण ते आपल्या कारकीर्दीशी कसे संबंधित असते ते पाहण्यास सुरू करू. तुम्ही कदाचित विचाराल : 'थांबा, देवाचे वचन वास्तवात माझ्या कारकीर्दीवर विचार करते का?" पूर्णपणे.

मालकाची नियमपुस्तिका (बायबल), आपल्याला आपल्या निर्माणकर्ता-मालक-उद्धारकाने प्रदान केले आहे, ते तुमच्यासारख्या आणि माझ्यासारख्या सामान्य लोकांच्या कथनाने भरलेले आहे-धर्मनिरपेक्ष व्यवसाय असलेल्या पुरुष व स्त्रियांच्या गोष्टींनी : मेंढपाळ, कोळी, कुंभार, कुशल कारागीर, शेतकरी, सरकारी अधिकारी, सैनिक, तुरुंग सुरक्षाधिकारी, लेखक, धोबी, सावकार, तंबू बनविणारे, घरांचे मालक, व्यवसायिक मालक, कर वसूल करणारे, लेखापाल, आणि बरेच काही. परंतु त्यांची कारकीर्द हे लक्ष्य नव्हते किंवा त्यांच्या कथेला ओळखणारे वैशिष्ट्ये नव्हते. त्यांनी काय केले हे महत्त्वाचे होते; पण ते कोण होते हे त्याहून अधिक महत्त्वाचे होते. आपण येशूला लोकांनी त्यांचे व्यवसाय बदलावे हे सांगताना पाहत नाही. जरी काही वेळा त्याने अवश्य वैयक्तिक लोकांना त्यांच्या व्यवसायापासून बोलावले होते की शिष्यत्वाच्या अतूट प्रकारात यावे, तरीही त्याने त्यांना दुसऱ्या सांसारिक व्यवसायासाठी कधीही बोलावले नाही.

लोक अनेकदा आपल्या पाचारणाऐवजी आपल्या व्यवसायावर जास्त लक्ष केंद्रित करून स्वतःचे नुकसान करून घेतात.

जेव्हा कोणीतरी शाळेत वरिष्ठ वर्गात आहे, तेव्हा तेथे दोन अवश्य प्रश्न विचारले जातील : *"तुम्ही कोणत्या विद्यापीठात जाणार आहात?"* आणि *"तुम्ही काय अभ्यास करणार आहात?"* विद्यापीठात प्रवेश मिळाल्यानंतर हेच प्रश्न पुढे असे बदलतात, *"तुम्ही तुमच्या पदवीचे काय करणार आहात? मग एखादा व्यक्ती मेंदूचा चिकित्सक होण्याची योजना करीत असेल, किंवा शाळेचा मुख्याध्यापक, पाण्याखालील हॉकी खेळाडू किंवा एक अधिकृत व्यवसायिक लेखापाल काहीही असो हा प्रत्यक्षात मुख्य मुद्दा नाही. त्याऐवजी, ख्रिस्ताच्या अनुयायाला आपण एक उत्तम प्रश्न विचारू शकतो :* "प्रभूला तुमच्या कारकीर्दीवर नियंत्रण आहे का?"

जेव्हा आपण या जगातील आपल्या तात्पुरत्या कारकिर्दीलाच आपल्या ओळखीचे प्राथमिक वैशिष्ट्य बनवतो, तेव्हा आपण ख्रिस्ताला जाणणे आणि त्याची ओळख करून देणाऱ्या आपल्या सार्वकालिक मौल्यवान मिशनला आपल्या सांसारिक अस्तित्वात कमी लेखणे सोपे होते. कल्पना करा, जर ख्रिस्ताच्या पुढील पिढ्यातील अनुयायांनी *"तुम्ही काय करता?"* या प्रश्नाला असे उत्तर दिले तर, *"मी येशू ख्रिस्ताला प्रतिनिधित करतो आणि त्याचवेळेस मी मेंदूची शस्त्रक्रियाही करतो"*? काहीतरी अशा समान उत्तर दिले.

याबद्दल विचार करा. तुम्हांला कशा करता बोलावले आहे?

## आपले पाचारण काय आहे?

येशू आपल्याला आपल्या पाचारणाबद्दल बोलण्यात अस्पष्ट राहिलेला नाही. देवाने जे आधीच प्रकट केले आहे त्याबद्दल तुम्हाला प्रार्थना करण्याची गरज नसते.

*"तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा; त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा द्या; जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे."* (मत्तय. २८:१९-२०)

*"परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल."* (प्रेषित. १:८)

*"पण तुम्ही तर निवडलेला वंश, राजकीय, याजकगण, पवित्र राष्ट्र, देवाचे स्वतःचे लोक असे आहात; ह्यासाठी की, ज्याने तुम्हांला अंधकारातून काढून आपल्या अद्भुत प्रकाशात पाचारण केले त्याचे गुण तुम्ही प्रसिद्ध करावेत."* (१ पेत्र. २:९)

देव तुमच्यासह किंवा तुम्हांला सहभागी न करता लोकांना प्रत्येक राष्ट्र, वंश आणि भाषा यामधून बोलावत आहे. तो त्याचा पुत्र येशू ख्रिस्तासाठी एक पवित्र वधू आणत आहे. तुम्हाला या मिशनमध्ये आमंत्रित केले आहे. त्याचे मिशन. देवाकडे दुसरी योजना आहे कारण पहिली योजना वेळापत्रकानुसार सुरू आहे आणि तिला थांबवले जाणार नाही. त्याच वेळेस, त्याच्या सार्वभौमत्व आणि प्रीतीमध्ये, त्याने तुम्हांला सहभागी होण्याची संधी दिली आहे, जी तुम्ही नाकारू शकता. ज्याप्रमाणे मर्दखय एस्तेरला तिचा सेवक हथाक द्वारे बोलला, *"तू ह्या प्रसंगी गप्प राहिलीस तरी दुसऱ्या कोठूनही यहूद्यांची सुटका व उद्धार होईलच. पण मग तुझा व तुझ्या बापाच्या घराण्याचा नाश होईल. तुला ह्या असल्याच प्रसंगासाठी राजपद प्राप्त झाले नसेल कशावरून?"* (एस्तेर ४:१४). जर तुम्ही मिशनचा स्वीकार केला नाही, तर तो इतर कोणाचा उपयोग करील, परंतु मत्तय १६:२४ च्या पुढील वचनांमध्ये  ख्रिस्ताचा उपदेश विसरू नका. *"कारण जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो तो आपल्या जिवाला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरता आपल्या जिवाला मुकेल त्याला तो मिळेल. मनुष्याने सर्व जग मिळवले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ? अथवा मनुष्य आपल्या जीवाबद्दल काय मोबदला देणार?"* (मत्तय १६:२५-२६)

## सावधानतेचा गजर वाजवणे

डेल्टा एयरलाईन्सचा डायमंड पुरस्कार प्राप्त प्रामाणिक सदस्य म्हणून, मी प्रति वर्षी ७५ किंवा त्यापेक्षा अधिक दिवस विमानात किंवा विमानतळावर घालवत असे. जरी सामान्यपणे मी विमानतळाला माझे कार्यालय म्हणून वापरत असे, तरी कधीकधी मला बाहेर जाणे आवश्यक होते आणि अतिरिक्त वेळेसाठी लक्ष द्यावे लागत असे. एका अशाच दिवशी, पॅरिसमध्ये प्रवासादरम्यान विमान बदलताना मला थोडा अतिरिक्त वेळ मिळाला, आणि त्या संधीचा उपयोग करून मी प्रसिद्ध लूव्ह्र संग्रहालयाला भेट दिली.

प्रदर्शनासाठी असलेल्या लांबलचक आवारात इटालियन कर्णिकाचा अभ्यास करत असताना, मी कदाचित जगातील सर्वात प्रसिद्ध अशा एका चित्राजवळ थांबलो, मोना लिसा. अचानकपणे, प्रत्येक दिशेकडून अलार्म वाजू लागले, आणि घृणास्पदपणे कर्कश सूचना फ्रेंच, इंग्रजी, चीनी आणि रशियन भाषेत ऐकू येऊ लागल्या. आपत्कालीन परिस्थितीमुळे सर्व अभ्यागतांनी परिसर त्वरित रिकामी करावा, असे त्यात सांगितले जात होते. मी लगेचच प्रतिसाद दिला, परंतु जेव्हा मी बाहेर जाण्याच्या मार्गावर जात होतो, मी पाहिले की त्या प्राचीन कलाकुसरीकडे पाहण्यापासून कोणीही हालले नव्हते (आणि जेव्हा मी म्हणतो

"कोणीही नाही", माझे अक्षरशः म्हणणे कोणताही व्यक्ती नाही). ते त्या कलेची प्रशंसा करीत राहिले आणि हॉलमधून फिरत राहिले. मी सर्व काही चुकीचे समजतोय काय याची खात्री करून घेतल्यानंतर (आणि तसे नव्हते), एक विचार माझ्या मनात आला. कदाचित काही लोकांनी अलार्म बद्दल सुरुवातीला विचार केला असेल, परंतु त्यांच्या अवतीभवतीच्या लोकांच्या उदासीन प्रतिक्रियांनी त्यांना हे गृहीत धरण्याकडे नेले असेल की खरोखर काही गंभीर घडत नाही. प्रत्येक जण जणू काही तो अलार्म आणि चेतावणी केवळ एखादी तांत्रिक बिघाड असल्यासारखी सरळ दुर्लक्ष करत होता.

थोड्या वेळेनंतर, एक अधिक चिंताजनक सत्यता समजली. लौव्रेच्या अभ्यागतांचे आचरण आणि कृत्य (अभाव) येशू ख्रिस्ताच्या चर्चच्या सध्याच्या स्थितीचे अचूक प्रतिबिंब होते.

अलार्म वाजला आहे. सार्वकालिकता ही जवळ आहे. ख्रिस्ताने काय पूर्ण केले आहे जे तारण देते आणि आपल्याला आज्ञा दिली आहे की आपल्या आजूबाजूला असलेल्या तुटलेल्या, हरवलेल्या, जखमी जगाला त्याची प्रीती आणि सत्य दाखवावे आणि सांगावे. म्हणून, येशू ख्रिस्ताची मंडळी कसे आणि काय करीत आहे?

**गजर वाजला आहे. सार्वकालिकता ही जवळ आहे.**

येशू पित्याकडून जाऊन जवळजवळ २००० वर्षे झाली आहेत, तरीही चर्च आजही काही निश्चित भौगोलिक स्थानांमध्येच प्रामुख्याने एकवटलेले आहे. अंदाजे आपल्या ग्रहाच्या ४० प्रतिशत भागात सुवार्ता अजून पोहचलेली नाही. चर्चकडे हे काम करण्यासाठी जवळजवळ ९,००० पट मनुष्यबळ उपलब्ध आहे आणि तरीही ते काम तसेच अपूर्ण आहे. वास्तवात, सुवार्ता न पोहचलेल्या लोकांच्या गटांच्या प्रत्येकासाठी येशू ख्रिस्तामधील तथाकथित नवीन-जन्म झालेले विश्वासू जवळजवळ ९५,००० आहेत.[१६]

काम अजून पूर्ण का केलेले नाही?

## खरी महान कामगिरी

कदाचित याचे कारण असे असावे की आपल्याला आपल्या प्रभूवर पुरेशी प्रीती नाही, ज्याने म्हटले आहे, *"तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा"* (मत्तय. २८:१९). मत्तय. २८ मधील त्या उताऱ्याला नेहमी *"महान आज्ञा"* म्हणून संबोधतात. *"सोपवलेली कामगिरी"* या शब्दाची डिक्शनरी व्याख्या अशी आहे : *"सूचना, आज्ञा, किंवा कर्तव्य जे एका व्यक्तीला किंवा लोकांच्या समूहाला दिले आहे."*[१७]

मी असे सुचवेन की प्रथम *"सोपवलेली कामगिरी"* ही मत्तय २८ मध्ये नव्हे तर मत्तय २२:३७-३९ मध्ये आढळते. *"येशू त्याला म्हणाला, 'तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर पूर्ण अंत:करणाने, पूर्ण जीवाने व पूर्ण मनाने प्रीती कर.' हीच मोठी व पहिली आज्ञा आहे. हिच्यासारखी दुसरी ही आहे की, 'तू आपल्या शेजाऱ्यावर स्वतःसारखी प्रीती कर.'"* प्रीती ही सकारात्मक भावनांपासून सुरू व्हावी अशी आमची इच्छा असते, परंतु देवाचे वचन ख्रिस्ताच्या आज्ञाधारक असलेल्या व्यक्तीकडून प्रीतीची मागणी करते. भावना आपण आज्ञेने निर्माण करू शकत नाही. येशूचा एखादा अनुयायी जो त्याच्यावर प्रेम करतो त्याची व्याख्या कशी करतो? हे वचन स्पष्ट करते : *"ज्याच्याजवळ माझ्या आज्ञा आहेत व जो त्या पाळतो तोच माझ्यावर प्रीती करणारा आहे; आणि जो माझ्यावर प्रीती करतो त्याच्यावर माझा पिता प्रीती करील; मीही त्याच्यावर प्रीती करीन व स्वतः त्याला प्रकट होईन"* (योहान १४:२१).

कदाचित आपण येशूची शेवटची सोपवलेली महान कामगिरी मानत नाही (जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा) कारण आपण त्याच्या पहिल्या आज्ञेकडे दुर्लक्ष केले आहे. कदाचित आपल्याला भटकलेल्या लोकांबद्दल आपल्या अंत:करणात प्रीती कमी असण्याचे कारण हेच आहे की म्हणजे आपल्याला स्वतः प्रभूवरच फारशी प्रीती असू शकत नाही?

आपले पहिले पाचारण हे *"सर्व राष्ट्रांत जाणे"* नाही तर आपल्या तारणाऱ्याला ओळखणे आणि त्याच्यावर प्रीती करणे आहे. हे त्या प्राथमिक प्रयत्नातच सोपवलेली दुसऱ्या कामगिरीचे पालन केले जाईल.

मत्तय. २८ अध्यायाच्या शेवटी आढळणाऱ्या सोपवलेल्या कामगिरीत कदाचित काही थोड्या आज्ञा सामावलेल्या दिसतात (जा, शिष्य करा, बाप्तिस्मा द्या आणि शिकवा), परंतु मूळ भाषेत, त्याला केवळ एकच अर्थ आहे-शिष्य बनवा. हीच आपली जबाबदारी आहे जेव्हा आपण जगात कार्य करतो. परंतु हे कार्य योगायोगाने घडून येणार नाही. ग्रीक भाषेत, मत्तय. २८:१९ मधील *"तेव्हा तुम्ही जाऊन.."* हा शब्दप्रयोग आज्ञा नसून, आधीपासून चालू असलेल्या कृतीचे कृदंत रूप आहे. त्यामुळे, त्याचा अधिक अक्षरशः असा अर्थ होतो, ते असे वाचले जाते, *"तुम्ही गेल्यानंतर...."* किंवा *"जेव्हा तुम्ही जात आहात...."* आपण कोठे जात आहोत? आत्म्याने तयार झालेल्या शेतात. आपण कसे जात आहोत? जाणीवपूर्वक. प्रार्थनापूर्वक. कर्तव्यभावनेने आणि प्रीतीपूर्वक.

आपले सांसारिक काम काहीही असो, आपल्या सर्वांना दिवसाचे समान २४ तास मिळतात. काही जण त्याचा बहुतेक भाग कार्यालयात घालवतात, इतर खेळाच्या मैदानावर किंवा

शेतात. काही जण वर्गात आणि काही घरात. मग तुमची जबाबदारी आणि विशेषाधिकार काय आहेत? तुम्ही जात असताना, तुम्ही गेल्यानंतर- तुम्हाला शिष्य बनवायचे आहेत. पुढील धडा शिष्य बनविण्याच्या मुख्य उद्देशासाठी समर्पित असेल.

**अलौकिकतेचा अनुभव जीवनात येणे अशी परिपूर्णता देते जी कोणतीही धर्मनिरपेक्ष नोकरी कधीही देऊ शकत नाही.**

योहान ४:३५ मध्ये, येशू त्याच्या शिष्यांना सांगतो, *"अजून चार महिन्यांचा अवकाश आहे, मग कापणी येईल असे तुम्ही म्हणता की नाही? पाहा; मी तुम्हाला म्हणतो, आपली नजर वर करून शेते पाहा; ती कापणीसाठी पांढरी होऊन चुकली आहेत."* कदाचित येशूने आपल्या गरजांवर जोर दिला आहे की आपली नजर जाणीवपूर्वक पिकलेल्या पिकांवर लावावी कारण इतर गोष्टींवर लक्ष्य केंद्रित करण्याची आपली वृत्ती असते. आज्ञेकडे लक्ष द्या : पाहा, तुमचे डोळे वर करा, पाहा. येशूला तुम्ही ते चुकावे अशी इच्छा नाही.

देव जे करत आहे त्यामध्ये तुम्ही कसे सहभागी व्हाल? हे ओळखा की तुमचे पहिले पाचारण हे त्याला ओळखणे व त्याची ओळख करून देणे आहे. मग तुम्ही एक बाळशिक्षक असाल किंवा शिवणकाम करणारे असाल, विमान ए३५०चे वैमानिक असाल किंवा सिमेंटच्या वनात एखाद्या कारखान्यात काम करणारे यांत्रिक अभियंता असाल -तुमच्या अवतीभवती आत्म्यांचा समुदाय आहे आणि तुमची जबाबदारी तीच राहते. काय दुर्दैव आहे जेव्हा एखाद्या ख्रिस्ती व्यक्तीचे प्रमुख कार्य हे त्याच्या किंवा तिच्या चर्चच्या वातावरणात पवित्र सभा आयोजित करण्यातच मर्यादित राहते, जेव्हा आपल्या जगाच्या अधिकतर भागाने अजूनही पहिल्यांदा देखील येशूची प्रीती आणि त्याची कथा आणि संदेश ऐकलेला नाही! कदाचित तो तुम्हाला एखाद्या समाजात किंवा देशात जाण्यास बोलावत आहे जेथे सुवार्तेचा फारच थोडा किंवा काहीही प्रभाव नाही.

जेव्हा तुम्ही देव जे करत आहे त्यात सहभागी होता, तेव्हा तुम्ही तुमच्या जीवनाच्या अवतीभवती देवाचे सामर्थ्य कार्य करीत आहे हे पाहू लागता. अलौकिकतेचा अनुभव जीवनात येणे अशी परिपूर्णता देते जी कोणतीही धर्मनिरपेक्ष नोकरी कधीही देऊ शकत नाही. जास्त पैसे मिळवत असा किंवा तुमच्या सांसारिक कारकिर्दीमध्ये प्रगती करीत राहा ही सर्व प्रभू पासून मिळणारे आशीर्वाद असू शकतात, परंतु जर ती त्याच्या राज्यासाठी आणि गौरवासाठी वापरली जात नसतील, तर त्याचे मुल्यमापन अशा दृष्टीने करणे शहाणपणाचे

ठरेल जे संत पौलाने ह्या शब्दात वर्णन केलेले आहे, *“तरी ज्या गोष्टी मला लाभाच्या होत्या त्या मी ख्रिस्तामुळे हानीच्या अशा समजलो आहे; इतकेच नाही, तर ख्रिस्त येशू माझा प्रभू, ह्याच्याविषयीच्या ज्ञानाच्या श्रेष्ठत्वामुळे मी सर्वकाही हानी असे समजतो; त्याच्यामुळे मी सर्व गोष्टींना मुकलो, आणि त्या केरकचरा अशा लेखतो; ह्यासाठी की, मला ख्रिस्त हा लाभ प्राप्त व्हावा”* (फिलिप्पै.३:७-८अ).

जेव्हा तुम्ही तुमची कारकीर्द देवाच्या वचनाने तयार करता, तेव्हा तुम्ही काय करता यापेक्षा अधिक महत्वाचे ठरते  की ख्रिस्तामध्ये-तुम्ही कोण आहात. तुमच्या कारकिर्दीचे निर्णय हे केवळ वेतन वाढीद्वारे आधारित नसतील, तर ते सर्वशक्तिमान देवाशी प्रार्थनापूर्वक झालेल्या भेटीतून आकार घेतील.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. जर तुम्ही येशूचे अनुयायी आहात, तर तुमचे पाचारण काय आहे?

२. येशूच्या शब्दांनी तुमच्या कारकीर्दीच्या निर्णयाला कशी दिशा दिली आहे?

३. तुम्ही तुमच्या सध्याच्या परिस्थितीत, *“तुम्ही जात असताना”* (मत्तय. २८:१९) शिष्य बनवण्यासाठी ख्रिस्ताची आज्ञा तुम्ही कशा प्रकारे पाळत आहात?

# १०

# देवाच्या वचनाने शिष्यत्व घडवणे

जीवनात अशी काही संभाषणे असतात जी कोणीही कधीच विसरत नाही. मी एकोणीस वर्षांचा होतो. घटना मध्य-पूर्वेतील एका राजधानी शहरातील युद्ध-ग्रस्त जुन्या शाळेत घडलेली आहे. मी बसलो होतो त्या बाकड्यांच्या पलीकडे काही स्थानिक तरुण बसलेले होते. ते जवळच्या देशातील शरणार्थी होते, सध्या स्थानिक विद्यापीठात विद्यार्थी होते. आम्ही संध्याकाळच्या भोजनात भाजलेले मटण, चिकन आणि उपलब्ध वस्तूंमधून बनवलेला साधा पण चविष्ट पदार्थ आणि ताज्या भाकऱ्यांचा आम्ही आस्वाद घेत होतो. मध्य पूर्व येथील सांस्कृतिक संगीत आणि नृत्य यावर चर्चा केल्यावर, आम्ही पुनः एकदा चहा पिण्यासाठी टेबलाजवळ एकत्र आलो होतो.

संभाषण सुरू करण्यासाठी, मी माझ्या एका नवीन मित्राला विचारले, *"जीवनासाठी तुझी स्वप्ने काय आहेत?"* थोडासा गडबडत, एक शरणार्थी म्हणून अवस्थेत ज्या गोष्टी तो पूर्ण करू शकला नव्हता त्या त्याने सांगितल्या -जसे डॉक्टर, शिक्षक किंवा वकील व्हावे. मग त्याने शेवटी म्हटले, "म्हणून, मी निर्णय केला आहे की मी एक आत्मघातील बॉम्ब टाकणारा होईल.

माझ्या हातातील चहाचा कप मी खाली ठेवला. मला लगेच जाणवले की हे संभाषण आता नियमित राहिले नव्हते.

आमच्या संभाषणात विविध आणि कठीण विषयांचा समावेश झाला असला, तरी सारांशमध्ये त्याने स्पष्ट केले की या जगात काहीतरी मोठे करण्याची त्याची इच्छा आहे. मग ते जीवनाने किंवा मृत्यूने करावे. त्याला आपल्या अस्तित्वापेक्षा काहीतरी मोठ्या उद्देशासाठी जगायचे होते. असे कार्य करणे हे त्याचा हेतू पूर्ण करण्याचे माध्यम होते. हे ऐकताना मला अर्थ, उद्देश

आणि सार्वकालिक महत्व याविषयी असलेल्या मानवी तळमळीची तीव्र जाणीव झाली— आणि ती तळमळ स्वतःमध्ये चुकीची नव्हती. ती जन्मजात आहे. देवाने आपल्याला एका सार्वकालिक उद्देशाने निर्माण केले आहे. परंतु आपण तो उद्देश कसा प्राप्त करू शकतो? याचे उत्तर शिष्यत्वामध्ये आढळते.

## जेव्हा एक शिष्य हा एक अनुयायी नाही

येशूचे अनुयायी होण्याच्या आमंत्रणाची नोंद त्याच्या कालातीत शब्दांमध्ये अशी सुरू होते : *"मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाला ...."* (मत्तय. १६:२४). ह्या वचनामध्ये येशू आपल्या शिष्यांना त्याच्या मागे येण्यास आमंत्रित करणार होता.

थांबा. काय? येशूचे शिष्य आधीच त्याचे शिष्य झाले नव्हते का? आवश्यक नाही.

शिष्य म्हणजे काय? *"शिष्य"* हा शब्द अगदी सोप्या अर्थाने सांगायचा झाला, तर तो म्हणजे, *"एका गुरूचा एक विद्यार्थी."* मार्शल आर्ट्स शिकवणाऱ्या शिक्षकांना शिष्य असतात. प्रशिक्षकांना शिष्य असतात. सुवार्ताप्रसारकांना शिष्य असतात. येशूचे देखील शिष्य होते आणि त्यातील बरेच काही-ज्यांमध्ये त्याचे काही जवळचे शिष्यही होते-त्यांनी शेवटी येशूला एकटे सोडले. ते आधीच त्याचे शिष्य होते, परंतु ते सर्व खरे अनुयायी नव्हते. याचा अशा प्रकारे विचार करा : सर्व चौकोन हे आयताकृती असतात, परंतु सर्व आयताकृती हे चौकोन नसतात. एखादी व्यक्ती येशूचा शिष्य असू शकते; परंतु येशू ख्रिस्ताचा खरा विश्वासू आणि अनुयायी असू शकत नाही जो एक शिष्य नाही.

येशूच्या शिष्यांचा प्रवास या शब्दांनी सुरू झाला, *"या आणि तुम्ही पाहाल"* (योहान १:३९) किंवा *"माझ्या मागे या"* (मत्तय. ४:१९). शिष्यांसाठी पहिली पायरी ही ख्रिस्तासाठी वचनबद्ध होण्याची नव्हती परंतु त्यांना त्याच्या वचनबद्धतेचा आधार समजायचा होता. हे आमच्यासाठी देखील तसेच आहे (योहान २:२३-२५).

परंतु येशू ख्रिस्ताच्या प्रत्येक अनुयायाची जबाबदारी काय आहे? येशू म्हणतो, *"तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा"* (मत्तय. २८:१९). आपल्याला शिष्य बनवण्यासाठी पाचारण केलेले आहे, परंतु कोणाचे शिष्य किंवा विद्यार्थी? आपल्या स्वतःचे? प्रत्यक्षात तसे नाही. पौलाच्या शब्दात सांगायचे झाले तर, *"जसा मी ख्रिस्ताचे अनुकरण करणारा आहे, तसे तुम्हीही माझे अनुकरण करणारे व्हा...कारण आम्ही आपली घोषणा करत नाही; तर ख्रिस्त येशू हा प्रभू आहे अशी आणि येशूप्रीत्यर्थ आम्ही तुमचे दास आहोत अशी*

*स्वतःची घोषणा करतो"* (१ करिंथ. ११:१; २ करिंथ. ४:५). ज्याप्रमाणे पहिला माणूस पवित्र देवाच्या स्वरूपानुसार निर्माण केला होता (उत्पत्ती १:२७) की त्याच्याबरोबर घनिष्ट संबंधाचा आनंद घ्यावा, त्याप्रमाणेच आपल्याला येशू ख्रिस्ताच्या संबंधात बोलावलेले आहे-त्याची प्रतिमा प्रतिबिंबित करण्यासाठी पुनः निर्माण केले आहे. हीच सर्व मानवजातीसाठी देवाची इच्छित रचना आहे.

येशू ख्रिस्ताला आपला तारणारा आणि प्रभू म्हणून स्वीकारणाऱ्या सर्वांबद्दल, देवाचे वचन असे म्हणते, *"परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला; त्यांचा जन्म रक्त, अथवा देहाची इच्छा, अथवा मनुष्याची इच्छा ह्यांपासून झाला नाही; तर देवापासून झाला"* (योहान १:१२-१३).

आणि ज्यांनी त्याला स्वीकारले त्यांच्यासाठी किती अद्भुत बातमी आहे? देवाचे वचन असे सांगते, *"कारण ज्यांच्याविषयीचे त्याला पूर्वज्ञान होते त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे म्हणून त्याने त्यांना आगाऊच नेमून ठेवले; ह्यात हेतू हा की, तो पुष्कळ बंधूजनांमधला ज्येष्ठ असा व्हावा"* (रोम. ८:२९).

येथे या भग्न जगात, आपण काय असले पाहिजे ते अजून झालेलो नाही. आपण अजूनही शरीर आणि त्याच्या इच्छेशी संघर्ष करतो. तरीसुद्धा, एका गोष्टीबद्दल आपण पूर्णपणे खात्री बाळगू शकतो. देवाचे वचन असे सांगते : *"प्रियजनहो, आपण आता देवाची मुले आहोत; आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रकट झालेले नाही; तरी तो प्रकट होईल तेव्हा आपण त्याच्यासारखे होऊ हे आपल्याला माहित आहे, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल. जो कोणी त्याच्यासंबंधाने ही आशा बाळगतो तो, जसा तो शुद्ध आहे, तसे आपणाला शुद्ध करतो"* (१ योहान ३:२-३).

## शिष्य, धर्मांतरित नाही

एक गोष्ट आपण ख्रिस्ताच्या जीवनातून शिकतो ती ही आहे की शिष्यत्व ही एक घटना नाही, तर एक जीवनशैली आहे.

येशूने त्याच्या शिष्यांना जगात आत्म्यांनी निर्णय घ्यावेत हे बोलण्यास पाठवले नाही. त्याने त्यांना जगात शिष्य बनवण्यास पाठवले (मत्तय. २८:१९). त्याने त्यांना साक्ष द्या म्हणून सांगितले नाही, जसे काही हे दिवसातील ८ ते ५ वेळेतील कार्य होते. त्याने त्यांना त्याचे साक्षीदार होण्यास सांगितले (प्रेषित १:८). ही त्यांची ओळख होती. ते कोण आहेत. केवळ त्यांनी

सांगितलेली गोष्ट नाही. त्याप्रमाणेच, त्याने त्यांना फळ उत्पन्न करण्यास सांगितले नाही. त्यांनी फळ देणारे व्हावे यासाठी त्यांना बोलावले होते हे तो त्यांना म्हणाला. (योहान १५:१६).

शिष्यत्व हे केवळ निश्चित तत्वांना शिकणे आणि शिकवणे नव्हते. हा एक प्रवास होता- आपल्यामध्ये आणि इतरांमध्ये देखील ख्रिस्ताचे मन आणि चारित्र्य घडवून आणण्याची प्रक्रिया होती. पौलाने हे असे व्यक्त केले, *"माझ्या मुलांनो, तुमच्यामध्ये ख्रिस्ताचे स्वरूप निर्माण होईपर्यंत मला पुनः तुमच्यासंबंधी प्रसूतिवेदना होत आहेत"* (गलती. ४:१९). ख्रिस्ता-समान होण्याचा हा प्रवास त्याक्षणापासून सुरू होतो ज्या क्षणी एखादा व्यक्ती नव्याने जन्मते.

**शिष्यत्व ही एक घटना नाही, तर एक जीवनशैली आहे.**

क्षणाभर कल्पना करा की तुम्ही मानवी दृष्टीने अस्तित्वातील सर्वात प्रभावी सुवार्ताप्रसारक आहात (मानवी दृष्टीकोनाने). बिली ग्राहम, जॉर्ज व्हाईटफिल्ड, जोनाथन एडवर्डस किंवा पेंटेकॉस्टनंतरच्या पेत्रा पेक्षा अधिक शक्तिशाली. समजा कसेतरी तुमच्या सेवाकार्यात दररोज १,००० आत्मे परिवर्तित झालीत, त्या वेगाने (गृहीत धरून चाला की तुम्ही कधीही सुट्टी घेतली नाही, की जगात कोणी जन्माला आला नाही की मृत्यू पावला नाही आणि धर्मांतरे खरी आहेत), तर जगातील सर्वांना ख्रिस्त समजण्यासाठी २०,००० वर्षे लागतील. हे बरोबर आहे. ७,५००, ००० दिवसांपेक्षा अधिक.

आता कल्पना करा की येशू जे बोलला त्याचा अर्थ अगदी तोच होता, *"तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा"* (मत्तय. २८:१९). जर आपण केवळ धर्मांतर घडवून आणणारे नसून शिष्य बनवणारे असलो- ख्रिस्ताविषयी शिकण्यास मदत करणारे, लोकांना त्यांच्या तारणाऱ्याला ओळखणे आणि त्याच्या प्रेमात पडण्याची संधी देणारे असलो-तर त्याचे परिणाम काय असू शकतील? दररोज १,००० आत्मे प्राप्त करण्याऐवजी, असे काय होईल की  जर आपण वर्षाला ख्रिस्ताचा एकच शिष्य बनवणार असलो? कल्पना करा आपण एक पूर्ण वर्षात केवळ एका इच्छुक आत्म्यात गुंतवणूक  केली, आपण वचनात एकत्र चालत, जीवनात सहभागी होत आणि वचनात वाढत त्यांना करुणामयरित्या ख्रिस्त दर्शवला. जर वर्षाला त्या वेगाने, आपण एक शिष्य बनवला आणि पुढील वर्षी तो शिष्य जातो आणि तसेच करतो, आणि असेच होत राहते, तर हेच घडून येईल :

| वर्ष | शिष्य | वर्ष | शिष्य |
|---|---|---|---|
| १ | २ | १८ | २६२,१४४ |
| २ | ४ | १९ | ५२४,२८८ |
| ३ | ८ | २० | १,०२८,५७६ |
| ४ | १६ | २१ | २,०९७,१५२ |
| ५ | ३२ | २२ | ४,१९४,३०४ |
| ६ | ६४ | २३ | ८,३८८,६०८ |
| ७ | १२८ | २४ | १६,७७७,२१६ |
| ८ | २५६ | २५ | ३३,५५४,४३२ |
| ९ | ५१२ | २६ | ६७,१०८,८६४ |
| १० | १,०२४ | २७ | १३४,२१७,७२८ |
| ११ | २,०४८ | २८ | २६८,४३५,४५६ |
| १२ | ४,०९६ | २९ | ५३६,८७०,९१२ |
| १३ | ८,१९२ | ३० | १.०७३,७४१,८२४ |
| १४ | १६,३८४ | ३१ | २,१४७,४८३,६४८ |
| १५ | ३२.७६८ | ३२ | ४,२९४,९६७,२९६ |
| १६ | ६५,५३६ | ३३ | ८,५८९,९३४,५९२ |
| १७ | १३१,०७२ | | |

जरी आज्ञाधारक सेवाकार्याच्या सुरुवातीच्या थोड्या वर्षांमध्ये त्याचे परिणाम फारसे प्रभावी वाटत नसले, तरी अवघ्या ३३ वर्षात, वर्तमान जन्म दरानुसार देखील, सुवार्ता प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचू शकते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, हीच ती वर्षे आहेत जी येशू ख्रिस्ताने पृथ्वी ग्रहावर देहधारण करून व्यतीत करण्याची निवड केली.

आपण आपल्या जीवनाने, प्रीतीने आणि आपल्या ओठांनी आत्म्यांना आपल्या तारणाऱ्याची ओळख करून दिली पाहिजे. ह्यापैकी कोणतेही घटक पर्यायी नाहीत. हे पूर्णपणे उपयोगात आणायचे आहेत. शिष्यत्व हा तुमच्या दिवसाचा काही भाग नसेल, तर तुमच्या जगण्याचा मार्ग असेल.

**शिष्यत्व हा तुमच्या दिवसाचा काही भाग नसेल, तर तुमच्या जगण्याचा मार्ग असेल.**

जर आपण केवळ आपल्या ओठांनी त्याच्याबद्दल बोलले, परंतु आपल्या जीवनाने त्याच्या प्रीतीचा आदर्श दर्शवला नाही, तर आपण *"वाजणारी थाळी किंवा झणझणणारी झांज समान आहोत"* (१ करिंथ. १३:१), ढोंगी आहोत,

जगाला विश्वास ठेवण्यास कारण देत आहोत की त्यांना त्याची काही आवश्यकता नाही- कारण कृत्यावाचून शब्दाचा काय अर्थ असेल? अशा शब्दांना, रिच मुल्लीन्स यांच्या शब्दात सांगायचे तर, *''पाणबुडीवरील पडद्याच्या दरवाजासारखे अनुपयोगी असेल.''*[१८] या उलट, जेव्हा आपण ख्रिस्ताला आपल्या जीवनाने दर्शवतो परंतु आपल्या ओठांनी त्याच्याबद्दल बोलण्यास नकार देतो, तेव्हा आपण त्याच्याशी ओळख दाखवण्यात आपली लज्जा निडरपणे जाहीर करतो आणि शुभवर्तमान पसरविण्यात तातडीचा अभाव आहे असा संकेतही आपण जगाला देतो.

चार्ल्स वेस्ली ख्रिस्ती झाल्यावर थोड्या अवधीत, त्यांनी दोन प्रश्न लिहून काढले :

आणि मी माझ्या पित्याची प्रीती कमी करू का,
किंवा त्याचे दान प्राप्त करण्याची भीती बाळगू का?
त्याच्या कृपेबद्दल जाणीव नसल्याचे सिद्ध होईल काय,
जर मी, पवित्र वधस्तंभाला टाकून देईन?
त्याच्या धार्मिकतेचा स्वीकार करण्यास नकार देईन काय,
ती माझ्या हृदयात लपवून ठेवून?

मग विश्वासाने त्यांनी असा निष्कर्ष काढला :

मनुष्यांतून बहिष्कृत असलेल्यांनो, ज्यांना मी हाक मारतो,
वेश्या, पापी मनुष्य, आणि चोरांनो;
तो आपले हात तुम्हां सर्वांचे स्वागत करण्यासाठी पसरतो,
कारण केवळ पापीच त्याची कृपा स्वीकारतात.
धार्मिकांना त्याची गरज नाही;
तो भटकलेल्यांना शोधण्यासाठी आणि त्यांचे तारण करण्यासाठी आला आहे.[१९]

जर तुम्ही त्याच्याबद्दल बोलण्यास नकार देता, तर तारणारा-प्रभू जो मार्ग, सत्य आणि जीवन आहे त्याला खरेच आपण भेटला आहात का?

आपण इतरांना विश्वासुपणे शिष्य बनवतो का? किंवा आपण लोकांनी निर्णय घ्यावेत म्हणून दबाव आणतो का? लहानपणापासूनच, माझ्या आई-वडिलांनी मला एखाद्या अनोळखी व्यक्तीवर विश्वास न ठेवण्यास शिकविले. आपल्याला हे तत्व माहित आहे. तरीही, आपण कधीकधी लोकांना विनंती करतो की येशू वर विश्वास ठेवा ज्यास ते ओळखत नाहीत? कदाचित याचे कारण असे असावे की शिष्यत्व आपल्या जीवनात निःसंशयपणे दुःख,

असुविधा आणि मागणी घेऊन येते; आणि त्या वास्तवाशी सामना करण्यापेक्षा आपण त्यापासून दूर राहणे पसंत करतो.

म्हणूनच शिष्य बनवण्याचा आणि त्यांची जीवने देवाच्या वचनाने घडवली जात आहेत हे पाहण्याचा प्रवास काय आहे?

## शिष्य बनवणे

जीवनाच्या तीन पैलूंना सुचवू द्या जे आपण शिष्य बनवणाऱ्या लोकांना सांगितले पाहिजेत :

- वचनात (डोक्याकडे प्रवेश).
- मार्गात (हृदयाकडे प्रवेश).
- कामात (हाथाकडे प्रवेश).

## वचनात

ज्यांना तुम्ही हेतुपूर्वक शिष्य बनवण्याचा निर्णय घेता त्यांच्याबरोबर देवाच्या वचनात उद्देशपूर्ण असणे महत्वाचे आहे. *"हेतुपूर्वक शिष्य"* म्हणताना माझा अर्थ असा आहे की, तुम्ही त्यांना तुमच्या जीवनात सतत आणि वैयक्तिक पातळीवर सामावून घेण्याचा जाणीवपूर्वक निर्णय करता. तुम्ही त्यांच्या उपस्थितीमुळे तुमच्या वेळेत व्यत्यय येईल, अडथळे निर्माण होतील—हेही स्वीकारण्याची निवड करता. कदाचित तुमचे शिष्य हे ते लोक असतील जे तुमच्याबरोबर कार्यालयात काम करणारे असतील, किंवा एकत्र राहणारे विद्यार्थी असतील. ते शेजारील मित्र असू शकतात किंवा व्यायाम करण्याच्या ठिकाणी ज्यांना तुम्ही भेटला असे आध्यात्मिक-संवेदनशील आत्मे असू शकतात. ते कदाचित कुटुंबाचे सदस्य असू शकतील किंवा तुमच्या घरात काम करणारे लोक असू शकतील- शिष्यत्वामध्ये व्यस्त राहण्यासाठी हीच कदाचित सर्वात स्वाभाविक ठिकाणे आहेत.

जेव्हा आपण जाणीवपूर्वक इतरांना शिष्य बनवत असतो, तेव्हा आपण एकत्र येऊन देवाच्या वचनाचे सखोल अध्ययन केले पाहिजे- जे सार्वकालिक आहे त्या द्वारे जीवनाची रचना करावी, येशूने जे म्हटले आहे त्यावर प्रश्न विचारले पाहिजेत, देवाची मोठी कथा स्पष्ट केली पाहिजे, आपल्या दैनंदिन जीवनावर त्याच्या वचनाचा कसा उपयोग होतो याची चर्चा केली पाहिजे, आणि वचनाने आपल्या वर्तमान स्थितीला आव्हान देऊ देणे देखील आवश्यक आहे. असे करताना आपण देवाची वाणी, देवाचे मन , देवाचे हृदय आणि देवाचे चारित्र्य

ओळखू लागतो, आणि आत्म्यांना येशू ख्रिस्ताच्या व्यक्तित्वामध्ये आढळणाऱ्या कृपा आणि सत्याकडे इशारा करतो. मग हे योजित बायबल अध्ययन किंवा चर्चेमध्ये देवाच्या वचनाच्या हळुवार शिरकाव करण्याने होत असो, जर आपल्याला आत्म्यांसाठी खरोखर काळजी असेल, तर आपण मित्रांना शुभवर्तमानाची भेट घडवून आणू जे *"तारणासाठी देवाचे सामर्थ्य आहे"* (रोम. १:१६).

## मार्गात

पुढे, हे तितकेच महत्वाचे आहे की आपण दैनंदिन जीवन एकत्र व्यतीत करतो, जेणेकरून ज्यांना आपण शिष्य बनवत असतो (आणि आपल्या अवतीभवतीचे जग) ते आपल्यामध्ये ख्रिस्त, जो गौरवाची आशा आहे त्याचे दर्शन घेऊ शकतील. यालाच मी *"मार्गात"* शिष्य बनवणे असे म्हणतो. हा *"मार्ग"* म्हणजे व्यवसायिक सभा, कॉलेजचे वर्ग, हॉटेलमध्ये भोजन, एखाद्या दुकानात दिलेली झटपट भेट, संध्याकाळचे बॉल खेळणे, किंवा रात्रीचे सहज चालणे अशा सर्व दैनंदिन क्षणांचा समावेश होतो. हे आपल्या जीवनाच्या दैनंदिन प्रवाहातच इतरांना आपल्यामध्ये देवाच्या आत्म्याचे फळ पाहण्याची संधी मिळते. जसे बायबल सांगते, *"म्हणून तुम्ही खाता, पिता किंवा जे काही करता ते सर्व देवाच्या गौरवासाठी करा"* (१ करिंथ. १०:३१).

**मनुष्यांची प्रशंसा किंवा देवाची मान्यता यामध्ये आपण कशाचा शोध घेत आहोत?**

ज्यांच्याबरोबर आपण जीवन जगतो ते आपल्याला लाच नाकारताना पाहतील कारण आपली आवड पैसा नाही. ते हे पाहतील की आपण अफवा पसरविणे आणि निंदा करणे नाकारतो कारण आपला उद्देश हा प्रसिद्धी किंवा मनुष्याची मान्यता मिळवणे हा नाही. धावपळीच्या वेळेत रहदारीच्या अडथळ्यात ते आपला संयम आणि कृपेचे साक्षीदार असतील कारण ख्रिस्ताचे मन आपल्यावर नियंत्रण ठेवते. ते ह्याचे निरीक्षण करतील की आपण वाईट फोन कॉल आणि कोर्ट मधील नुकसान हाताळू शकतो कारण आपला उद्देश हा खेळ जिंकण्याचा नाही तर ख्रिस्ताच्या जीवनाचा आदर्श दर्शवण्याचा आहे. ते समजतील की आपण नम्रपणे आपल्या चुकांवर कसा उपाय करतो, आणि मग पुनः तयार होतो की, पुनर्स्थापित करण्याच्या त्याच्या सामर्थ्यावर भरवसा ठेवत ख्रिस्ताच्या वतीने कार्य करीत राहावे. याचा अर्थ आपण नेहमीच एक परिपूर्ण आदर्श स्थापित करतो हा नाही आहे. पण याचा अर्थ असा नक्कीच आहे की, जेव्हा आपली कृत्ये ख्रिस्तासारखी प्रतिबिंबित होत नाहीत, तेव्हा आपण ती त्वरित कबूल करतो आणि

स्वीकारतो—आणि देव आपल्या त्या अपयशालाही ख्रिस्तासाठी आत्म्यांना आकर्षित करण्याचे साधन बनवू शकतो.

प्रत्येक पुरुष व स्त्री ज्यांच्याशी माझी भेट होते त्यांना येशू ख्रिस्ताचे शिष्य बनवावे अशी माझी इच्छा आहे, हे समजून की येशू जे प्रश्न त्याच्या शिष्यांना विचारत आहे त्याचे त्यांनी स्वतःसाठी उत्तर दिले पाहिजे, *“तुम्ही मला कोण म्हणून म्हणता?”* (मत्तय. १६:१५). या एका प्रश्नाला दिलेले उत्तरच प्रत्येकाच्या जीवनात सर्वकाही बदलून टाकते. मी ज्यांना भेटतो त्या प्रत्येकाला माझ्या चारीत्र्यातून ख्रिस्त दिसावा, माझ्या संभाषणातून ख्रिस्त ऐकू यावा आणि माझ्या करुणेमधून त्यांना ख्रिस्ताचा अनुभव घेता यावा हीच माझी इच्छा असते. प्रभू ज्याला येशू म्हणतात त्याच्या बाबतीत काय करावे हा निर्णय प्रत्येक व्यक्तीने स्वतःच घ्यायचा असतो.

### कामात

कृपा करून ख्रिस्ताच्या सेवाकार्याच्या नमुन्याकडे लक्ष द्या. मत्तय १० मध्ये आपण पाहतो की, शिष्यांना त्याच्याजवळ बोलावल्याच्या थोड्या वेळेनंतर आणि बारा जणांना पृथ्वीवरील त्याचे सर्वात घनिष्ट मित्र म्हणून निवड केल्यावर, येशूने काय केले? त्याने त्याच बारा जणांना जगात पाठवले, आणि त्यांना सांगितले, *“जात असताना अशी घोषणा करत जा की, ‘स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे. रोग्यांस बरे करा, मेलेल्यांना उठवा, कुष्ठरोग्यांना शुद्ध करा, भुते काढा, तुम्हाला फुकट मिळाले, फुकट द्या”* (मत्तय. १०: ७-८).

ह्या समूहात कोण होते ज्यांस येशू पाठवत होता?

असो, यहूदा, जो त्याचा विश्वासघात करणार होता, तो त्यांच्यामध्ये होता. पेत्र, ज्याने अजूनही येशूला देवाचा पुत्र म्हणून कबूल केलेले नव्हते, तो देखील पाठविलेल्या बारा जणांमध्ये होता. प्रत्येक शिष्याने गेथसेमाने बागेत येशूला एकटे सोडले होते आणि मानवी आवश्यकतेच्या त्याच्या मोठ्या घटकेस त्या भयावह परिस्थितीत पळून गेले होते. तरीही, तो जगात काय करत होता त्याचा हिस्सा होण्यासाठी त्यांना पाठवत होता.

जेव्हा ख्रिस्ताने मत्तय १६:२४ हे शब्द बोलले, तेव्हा शिष्य आधीच त्याच्यासोबत चालत होते, त्याच्याकडून शिकत होते, आणि त्याच्याबरोबर काम करत होते. देव जे कार्य करीत होता त्या कामात हिस्सा होण्यासाठी त्याने त्यांना बोलावले होते. परंतु, लक्षात घ्या, येथे केवळ एक शिष्य आणि ख्रिस्ताचा एक खरा अनुयायी यांच्यामध्ये फरक आहे. एक जण त्याच्याकडून शिक्षक म्हणून शिकतो, तर दुसरा त्याला प्रभू म्हणून शरण जातो. आपण

भटकलेल्या लोकांना नियमांची किंवा उपदेशांच्या एखाद्या संचाचे पालन करण्यासाठी शिष्य बनवत नाही. हे केवळ धार्मिक बाह्य बदलांविषयी नाही. त्याऐवजी, आपण भटकलेल्या लोकांना तारणाऱ्याशी प्रत्यक्ष भेट घेण्यास शिष्य बनवतो जेणेकरून त्यांनी निवड करावी की त्यांचा तारणारा आणि जीवन म्हणून त्याचा स्वीकार करावा किंवा तो जो दावा करतो त्यासाठी त्याचा नकार करावा.

योहान अध्याय ६ मध्ये नेमके हेच घडले.

येशू कोण आहे आणि पापांच्या क्षमेकरता त्याने आपले शरीर आणि रक्त वाहून त्याने काय केले आहे हा स्पष्ट संदेश दिला होता. मात्र योहान ६:६६ मध्ये, हे स्पष्ट करते, *"ह्यावरून त्याच्या शिष्यांपैकी पुष्कळ जण परत गेले आणि ते पुन्हा कधी त्याच्याबरोबर चालले नाहीत."* सरळपणे म्हटले तर, ते ह्या मुद्द्यापर्यंत आले जेथे येशूने जे काही म्हटले होते ते त्यांना आवडले नव्हते. म्हणून त्यांनी त्याचा नकार करण्याची निवड केली. तेव्हा येशू आपल्या बारा शिष्यांकडे वळला आणि म्हणाला, *"तुमचीही निघून जाण्याची इच्छा आहे काय?"* शिमोन पेत्राने त्याला उत्तर दिले, *"प्रभुजी, आम्ही कोणाकडे जाणार? सार्वकालिक जीवनाची वचने आपणाजवळ आहेत. आणि आम्ही विश्वास ठेवला आहे व ओळखले आहे की देवाचा पवित्र तो पुरुष आपण आहात"* (योहान ६:६७-६९).

बायबल स्पष्ट आहे : केवळ कृपेने, केवळ विश्वासाद्वारे, आणि केवळ ख्रिस्ता मध्येच आत्म्याचा उद्धार होतो. जो येशू ख्रिस्तावर आपला विश्वास ठेवतो तो पवित्र आत्म्याचा निवास असलेले जीवन होतो, असे जीवन जे पाण्याने बाप्तिस्म्यासाठी तयार असते (ख्रिस्ताबरोबर त्याचा मृत्यू, गाडले जाणे आणि पुनरुत्थानासह एखाद्याची ओळख व ऐक्यता सार्वजनिकपणे जाहीर करणे), आणि नव्याने-जन्मलेला आत्मा पवित्र आत्म्याच्या दानांनी समर्थ केला जातो, तो ख्रिस्ताच्या शरीरात सेवा करण्यास तयार असतो. आपण मग ख्रिस्तासह परिपक्वतेमध्ये त्या आत्म्यासह प्रवास सुरू करतो जेणेकरून आपण कदाचित ओळखू शकावे की, *"ह्या रहस्याच्या गौरवाची संपत्ती परराष्ट्रीयांमध्ये काय आहे हे आपल्या पवित्र जनांना कळवणे देवाला बरे वाटले; गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे तो ते रहस्य आहे. आम्ही त्याची घोषणा करतो, सर्व प्रकारच्या ज्ञानाने प्रत्येक माणसाला बोध करतो व प्रत्येक माणसाला शिकवतो; अशासाठी की, प्रत्येक माणसाला ख्रिस्त येशूच्या ठायी पूर्ण असे उभे करावे"* (कलस्सै. १:२७-२८).

एखाद्याला *"कामात"* शिष्य बनवणे आणि देवाच्या गौरवाकरता एकत्र परिश्रम करणे हे कसे दिसू शकते? ख्रिस्ताच्या शरीरात सेवा करण्यासाठी किंवा आपल्या अवतीभवतीच्या

लोकांना ख्रिस्ताची प्रीती दाखवण्यासाठी त्यांना सहभागी करून घेतल्यास, आपण *“काम करत असताना सेवाकार्याचे प्रशिक्षण”* पुरवीत असतो. जरी शिष्य बनवणे आणि सुवार्ताप्रसार करणे यांना नेहमी दोन वेगळ्या जबाबदाऱ्या असे समजले जाते, तरी ते एकत्रच काम करतात. येशूच्या प्रत्येक अनुयायीला या दोन्हींसाठी बोलावलेले आहे आणि हे दोन्हीही एकाच वेळी घडू शकतात.

दुसऱ्या शिष्याला प्रोत्साहन देण्याचा यापेक्षा प्रभावी मार्ग कोणता असू शकतो की त्यांना शुभवर्तमान केंद्रित कार्यात सहभागी करून घेणे –जसे येशूने स्पष्टपणे सांगितले आहे, *“सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा”* (मार्क. १६:१५). मग आपल्या कामात, बायबल अध्ययन, लेकरांचे क्लब, दु:खित लोकांसाठी सेवा, दवाखान्यात भेटी, पाहुणचार, आपल्या निवासाच्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांकडे जावे किंवा स्थलांतरित आणि शरणार्थी लोकांची काळजी करावी काहीही असो-आपल्या अवतीभवती असणाऱ्या लोकांपर्यंत शुभवर्तमानाची प्रीती सांगण्यासाठी कोणत्याही मार्गाने आपण चाललेले असो, कोणाला तरी *“या आणि पाहा”* हे आमंत्रण देण्यापासून आपल्याला काय अडवत आहे”?

आपण ज्यांना शिष्य बनवले आहे त्यांना जेथे देवाने आपल्याला पेरणे, पाणी घालणे किंवा पीक उत्पन्न करू दिले तेथे त्यांनाही साक्ष आणि काम करू द्यावे. स्पष्टपणे, ज्यांना अजूनही सार्वजनिकपणे येशू ख्रिस्ताला प्रभू आणि तारणारा म्हणून स्वीकारावयाचे आहे ते त्यांच्या सहभाग आणि भुमिकेबद्दल मर्यादित असतील, परंतु त्यांना प्रवासात सामावून घेतले जाऊ शकते.

येशूने जे केले ते करण्यासाठी, आपण भटकलेल्या लोकांना शुभवर्तमान सांगत शिष्य बनवू नये काय ? हे त्याच्या उपदेश आणि आदर्शासह विसंगत ठरत नाही की एक सोडून दुसरे करावे?

## शिष्यत्व एक जीवनशैली

हे तीव्रपणे व्यवहारिक आहे.

प्रवास सुरू होतो जेव्हा आपण आपले जीवन (आपले स्वातंत्र्य आणि कामाची मोठी किंमत देऊन) इतरांमध्ये गुंतवणूककरण्याची हेतुपूर्वक निवड करतो, त्यांना ख्रिस्ताला वचनात, मार्गात आणि कामात ओळख करून देतो. आपण इतरांना येशू ख्रिस्ताला ओळखण्यासाठी आमंत्रित करतो आणि त्यांच्या जीवनांबद्दल आणि आत्म्यांबद्दल प्रामाणिक काळजी घेत

त्याची ओळख करून देतो. देवाच्या वचनाची ओढ, आणि जे आपल्या अवतीभवती दु:खित आहेत त्यांनी ख्रिस्ताची करुणा अनुभवावी ही इच्छा दाखवत आपल्या प्रवासात सहभागी करून घेतो. आपण त्यांना त्या विशेषाधिकारात आमंत्रित करतो — जिथे आशाहीन जीवनात आशा दिली जात आहे हे पाहता येते. जसे माझा मध्य पूर्वेतील मित्र ज्याने स्वतःसाठी आणि इतरांसाठी नाशाशिवाय कोणताही पर्याय पाहिला नव्हता.

**प्रवास सुरू होतो जेव्हा आपण आपले जीवन (आपले स्वातंत्र्य आणि कामाची मोठी किंमत देऊन) इतरांमध्ये गुंतवणूक करण्याची हेतुपूर्वक निवड करतो.**

येशूने स्वर्गात जाण्याआधी त्याच्या शिष्यांना म्हटले, *"तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा"* (मत्तय. २८:१९), आणि त्यांच्यासाठी ही एक स्वाभाविक प्रक्रिया होती. त्यांनी शिष्य बनवण्याचा प्रवास आधीच अनुभवला होता. कल्पना करा, जर भटकलेले लोक त्यांचे तारण होण्यापूर्वीच शिष्य बनवणे किंवा शिष्य बनण्याची-कदाचित अज्ञातपणे साक्ष देऊ शकले तर काय होईल? एखाद्याच्या ख्रिस्ता मधील नवीन जीवनाची ही स्वाभाविक प्रतिक्रिया ठरणार नाही का की जावे आणि तसेच करावे?

२ करिंथ. २:१४-१६ मध्ये, आपल्याला सांगितले आहे, *"जो देव आम्हाला सर्वदा ख्रिस्ताच्या ठायी जयोत्सवाने नेतो, आणि सर्व ठिकाणी आमच्या द्वारे आपल्याविषयीच्या ज्ञानाचा परिमल प्रकट करतो, त्याची स्तुती असो. तारणप्राप्ती होत असलेले आणि नाश होत असलेले अशा लोकांसंबंधाने आम्ही देवाला संतोषदायक असा ख्रिस्ताचा परिमल आहोत. एकाला मृत्यूचा मरणसूचक गंध, आणि एकाला जीवनाचा जीवनसूचक गंध आहोत, हे कार्य करण्यास कोण लायक आहे?"* जर तुम्ही सुगंधित द्रव्य किंवा सुवास लावला, तर कोण वास घेईल यावर तुम्ही नियंत्रण ठेवू शकत नाही. जो कोणी तुमच्याजवळ येईल तो त्या सुगंधाचा अनुभव करील.

त्याच वेळेस, केवळ याकारणासाठी की तुम्ही सोमवारी सुगंधित द्रव्य लावले याचा अर्थ असा होत नाही की मंगळवारपर्यंत तुमच्याजवळ तोच सुगंध टिकून राहील. येथे पुनः पुनः लावण्याची आवश्यकता असेल. जो सुगंध आपण देऊ त्याद्वारे जग हे सांगू शकेल की आपण कोठे जगतो. जसे गलती. ६:७-८ आपल्याला सांगते, *"फसू नका; देवाचा उपहास व्हायचा नाही; कारण माणूस जे काही पेरतो त्याचेच त्याला पीक मिळेल. जो आपल्या देहस्वभावासाठी पेरतो त्याला देहस्वभावापासून नाशाचे पीक मिळेल; आणि जो*

*आत्म्यासाठी पेरतो त्याला आत्म्यापासून सार्वकालिक जीवन हे पीक मिळेल."* ख्रिस्ताचे अनुयायी आणि शिष्य-बनवणारे म्हणून, आपण त्याच्याबरोबरच्या संबंधात सतत वाढले पाहिजे, देवाच्या वचनाच्या शुद्ध करणाऱ्या शक्तीला वारंवार लावले पाहिजे, आणि आपली मने सार्वकालिक गोष्टींवर पुन्हा एकदा स्थापित केली पाहिजेत जसे आपण *"प्रत्येक कल्पना अंकित करून तिला ख्रिस्तापुढे मान वाकवण्यास लावतो"* (२ करिंथ. १०:५).

जर माझी आई कॉफी-केक बनवत असेल, तर सुगंध मोहून टाकणारा असतो. परंतु मी केवळ स्वयंपाकघरात प्रवेश करून आणि जास्त वास घेऊन समाधानी होईन काय? खरोखर नाही. मी केवळ तेव्हाच समाधानी होईल जेव्हा मी त्याचा मोठा तुकडा घेऊन आणि त्यावर वितळणारे लोणी लावून खाईन. आपली जीवने अशी मोहून टाकणारी सुगंधी असली पाहिजे ज्यामुळे जगाने आपल्या तारणाऱ्याची इच्छा बाळगावी-जेणेकरून आपल्या द्वारे त्यांनी त्यांच्या संपूर्ण जीवनात आशा, आनंद, शांती आणि उद्देश ह्यांची जी इच्छा बाळगली त्यांचा ते अनुभव करू शकतील.

जर आपण आपल्या तारणाऱ्याचे विश्वासू अनुयायी बनविण्यापेक्षा आपल्यासाठी प्रशंसकांची गर्दी निर्माण करत असू, तर आपण आपल्या पाचारणाच्या मूळ मुद्याला चुकत आहोत आणि देवाच्या गौरवाला हिरावून घेणारे आहोत. मनुष्यांची प्रशंसा किंवा देवाची मान्यता यामध्ये आपण कशाचा शोध घेत आहोत? अलीकडेच, मला *"तुम्ही शिष्य वाढवणारे आहात का?"* या प्रश्नाने खूप दोषी ठरवले आणि वेदनादायक आव्हान दिले. मी येशू ख्रिस्ताचे किंवा माझ्या स्वतःचे शिष्य बनवत आहे का? मी शिष्य बनवत तरी आहे का किंवा मी केवळ माझ्या स्वतःवरच केंद्रित आहे? माझे जीवन ख्रिस्तासारखे दिसेपर्यंत जगाला माझ्या प्रतिकृतींची आवश्यकता नाही. आपली जीवने ख्रिस्ताचा सुगंध पसरवत आहेत का जे जगाला आशा, आनंद, विश्वास आणि सत्य देईल जे तोच केवळ देऊ शकतो?

## शिष्यत्वाचे ध्येय

शिष्यत्वाच्या ध्येयासाठी मृत्यूची आवश्यकता आहे.

पहिले, स्वतःचा मृत्यू आणि मग आपल्या पापी देहाचा मृत्यू जेव्हा देव सर्व गोष्टी नवीन करतो. ख्रिस्ताने हे सत्य आपल्या शिष्यांना स्पष्ट केले. *"माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे. कारण जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो तो आपल्या जिवाला मुकेल आणि जो कोणी*

*माझ्याकरता आपल्या जिवाला मुकेल त्याला तो मिळेल. मनुष्याने सर्व जग मिळवले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ? अथवा मनुष्य आपल्या जीवाबद्दल काय मोबदला देणार?"* (मत्तय १६:२५-२६).

ख्रिस्ताच्या प्रतिमेत रूपांतरीत होण्याचा प्रवास आपल्या जुन्या व्यक्तिमत्वांना मृत्युमुखी पाडतो. त्यामुळेच देवाचे वचन आपल्याला स्मरण करून देते, *"आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या वधस्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाही अभिमान बाळगणे माझ्या हातून न होवो; त्याच्या द्वारे जग मला वधस्तंभावर खिळलेले आहे व जगाला मी वधस्तंभावर खिळलेला आहे"* (गलती. ६:१४).

आपली मने, हृदये आणि जीवने त्याच्या वचनाने तयार केली जावीत ही देवाची त्याच्या लेकरांसाठी इच्छा आहे. आपण त्याच्या पुत्रासारखे दिसावे, आणि इतर आत्म्यांना त्याच्यासह नातेसंबंधात शिष्य होताना पाहण्यासाठी उत्कट असावे हेच त्याचे ध्येय आहे. हा आपला विशेषाधिकार आहे. हीच आपली जबाबदारी आहे.

परंतु खरे शिष्यत्व स्वीकारण्यासाठी आपल्याला सर्वकाही गमवावे लागेल.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. एक शिष्य आणि एक अनुयायी यांच्यामध्ये काय फरक आहे?

२. तुम्ही तुमच्या वर्तमान परिस्थितीत शिष्य बनवत आहात का? किंवा इतरांना वचनात, मार्गात, आणि/किंवा कामात शिष्य बनवण्याची अपेक्षा करत असणारे कोणते व्यवहारिक मार्ग आहेत?

३. तुम्ही सध्या तुमच्या जीवनात कोणाला शिष्य बनवत आहात?

# ११

# देवाच्या वचनाने आपल्या गुंतवणुकीची तयारी करणे

चेतावणी : कृपा करून ह्या धड्याचा अस्वीकार करू नका कारण हे आपल्या आधुनिक कानाला अत्यंत टोकाचे असे वाटते. याचा तेव्हाच अस्वीकार करा जर हे देवाच्या वचनाच्या प्रकाशात असत्य ठरते.

आपण देवाबरोबर आपल्या नातेसंबंधाची स्पष्ट समज ठेवून, आपल्या गुंतवणुकीच्या रचनेची प्रक्रिया सुरू केली पाहिजे. जर तुम्ही येशू ख्रिस्तावर तुमचा विश्वास ठेवला असेल, तर तुम्ही देवाला निडरपणे आणि सातत्याने *"पिता"* म्हणून हाक मारू शकता. देवाचे वचन आपल्याला सांगते, *"तुम्ही पुत्र आहात, म्हणून देवाने 'अब्बा! बापा!' अशी हाक मारणाऱ्या आपल्या पुत्राच्या आत्म्याला तुमच्याआमच्या अंत:करणात पाठवले आहे. म्हणून तू आतापासून गुलाम नाहीस तर पुत्र आहेस; आणि पुत्र आहेस तर ख्रिस्ताच्या द्वारे देवाचा वारसही आहेस"* (गलती. ४:६-७). या विचारावर काही क्षण मनन करा. बहुतेक ख्रिस्ती लोकांनी या वचनावर सखोलपणे कधीही विचार केलेला नाही हे मला पटले आहे. ते काय म्हणते त्याकडे पाहा! *"पुत्र आहेस तर ख्रिस्ताच्या द्वारे देवाचा वारसही आहेस."* तुम्हाला ते समजले का? ख्रिस्ताचा विश्वासणारा म्हणून, तुम्ही देवाचे वारस आहात! एक वारस हा *"कोणीतरी जो वारसा मिळवतो."* हे किती अद्भुत आहे!

एकदा ख्रिस्तामध्ये आपण कोण आहोत आणि आपल्याजवळ काय आहे ही सत्यता आपल्याला समजली, तर मग त्याच्या वचना द्वारे आत्मविश्वासाने आपली मानसिक गुंतवणूक आणि खर्च करण्याची रचना आपण करू नये का? दावीद राजाने लिहिले आहे, *"आकाश तुझे आहे, पृथ्वीही तुझी आहे; जग व त्यातले सर्वकाही तूच स्थापले*

*आहेस"* (स्तोत्र. ८९:११). स्वर्ग आणि पृथ्वी आपल्या पित्याची आहेत! आपण ह्यावर विश्वास ठेवतो का?

येथे, येशू, देहधारित शब्द ज्याने आपले विश्व निर्माण केले आपल्याला म्हणतो, *"पृथ्वीवर आपल्यासाठी संपत्ती साठवू नका; तेथे कसर व जंग खाऊन नाश करतात आणि चोर घर फोडून चोरी करतात; तर स्वर्गात आपल्यासाठी संपत्ती साठवा; तेथे कसर व जंग खाऊन नाश करत नाहीत व चोर घरफोडी करत नाहीत व चोरीही करत नाहीत; कारण जेथे तुझे धन आहे तेथे तुझे मनही लागेल"* (मत्तय ६:१९-२१).

आपले आर्थिक खर्च लोकांना आपल्या जीवनाच्या खजिन्याकडे इशारा करतात का? चला आपण त्यास पुनः म्हणू या. आपले आर्थिक खर्च लोकांना आपल्या जीवनाच्या खजिन्याकडे इशारा करतात. फक्त एकच खरा प्रश्न आहे, तो हा की *"तो कोणता खजिना आहे ज्याकडे आपले जीवन इशारा करते?"* येशू त्याच्या शिष्यांना पुढे म्हणाला, *"कोणीही दोन धन्यांची चाकरी करू शकत नाही, कारण तो एकाचा द्वेष करील व दुसऱ्यावर प्रीती करील; अथवा एकाशी निष्ठेने वागेल व दुसऱ्याला तुच्छ मानील. तुम्ही देवाची आणि धनाची चाकरी करू शकत नाही"* (मत्तय. ६:२४).

**केवळ दोनच गोष्टी कायमच्या टिकतात : आत्मे आणि देवाचे वचन.**

तुमचा पैसा कुठे जातो? तुमचे क्रेडीट कार्ड किंवा चेकबुक तपासा. ह्या मुद्याला चुकवू नका. येशूचा अनुयायी असणे याचा अर्थ आवश्यकपणे पृथ्वीवरील संपत्तीचा अभाव असा नसतो. खऱ्या अनुयायीला जे परिभाषित करते ते संसाधनांना सार्वकालिकतेसाठी गुंतवणूक जी महत्वाची आहे ते करणे आहे. हे कोणी किती देतो याबद्दल नाही, तर कोणी किती मागे ठेवतो त्याबद्दल आहे. मनुष्य बक्षिसाची किमत पाहतो. पण देव उरलेली रक्कम आणि हृदय पाहतो.

दोन लहान तांब्याची नाणे असलेल्या त्या स्त्रीविषयीची गोष्ट तुम्हांला आठवते का? दोन्हीही नाणे खजिन्यात टाकल्यावर, येशू तिच्याविषयी म्हणाला, *"मी तुम्हाला खरे सांगतो, ह्या दरिद्री विधवेने सर्वांपेक्षा अधिक टाकले आहे. कारण त्या सर्वांनी आपल्या समृद्धीतून [देवाच्या] दानात टाकले; हिने तर आपल्या कमताईतून आपली सर्व उपजीविका टाकली आहे"* (लूक. २१:३-४).

केवळ दोनच गोष्टी कायमच्या टिकतात : आत्मे आणि देवाचे वचन.

त्या गोष्टींमध्ये गुंतवणूक करा.

## चर्च मध्ये उदासीनता

आपण भटकलेल्या आत्म्यांविषयी व ज्यांनी शुभवर्तमान अजून ऐकलेले नाही त्यांच्यासाठी खरोखर काळजी करतो का? मी केवळ ओठांनी बोललेल्या शब्दांबद्दल बोलत नाही, तर आपल्या जीवनाच्या साक्षीबद्दल बोलत आहे. आपल्या जगातील शुभवर्तमान न पोहचलेल्या भागांबद्दल विचार करताना, संपूर्ण चर्च किती अल्प प्रमाणात देतो याबद्दल विचार करा. आजच्या तथाकथीत ख्रिस्ती जगात (ज्यामध्ये पुष्कळ लोक जे येशूचे खरे अनुयायी नाहीत त्यांचा देखील समावेश आहे) असा अंदाज लावला गेला आहे की *“ख्रिस्ती संबंधात कार्यांसाठी”* आपल्या कमाईचे २ टक्क्यांपेक्षाही कमी दिले जाते.

दु:खदपणे, हे औदासिन्य येथेच थांबत नाही.

ख्रिस्ती कार्यासाठी दिल्या जाणाऱ्या २ टक्क्यांपेक्षा कमी रकमेपैकीसुद्धा, केवळ सुमारे ६ टक्के रक्कम तथाकथित मिशन कार्यासाठी खर्च होते (चर्चच्या चार भिंतींच्या बाहेर खर्च होते, मग ते शेजारचे बी. बी. क्यू. असो, महिन्याला लेकरांच्या कार्यक्रमाला देणे, किंवा कमी वेळेसाठी मिशन संघ पाठवणे असो....) सरळ शब्दात सांगायचे तर, ख्रिस्ती देणग्यांचा अधिकतर भाग  हा इमारती, वेतन आणि सुखसुविधांवर खर्च होतो.

परंतु विडंबना इथेच थांबत नाही—ती आणखी गंभीर होते.

ह्यातील सर्वात कमी हिस्सा जो प्रत्यक्षात मिशन कार्याला दिला जातो, तो एक टक्का (सहा टक्क्यांचा दोन टक्के) जगातील त्या लोकांसाठी खर्च होतो,  ज्यांनी अजून शुभवर्तमान ऐकलेले नाही. ती अक्षरशः रक्कम तितकीच आहे जितकी अमेरिका वर्षाला त्यांच्या पाळीव जनावरांसाठी हैलोवीन पोशाखांवर खर्च करते. दुसऱ्या शब्दात म्हटले तर, एक तथाकथित ख्रिस्ती व्यक्ती जो $ १००, ००० कमावतो,  सरासरी $१ अशा लोकांसाठी खर्च होतो ज्यांनी देवाची कथा आणि संदेश कधीही ऐकलेला नाहीत.[२०]

येशूप्रमाणेच, आपल्यालाही खरोखर असे वाटते का की कोणाचाही नाश होऊ नये (२ पेत्र. ३:९)? जर तसे असेल, तर आपली गुंतवणूक ते स्पष्टपणे दाखवेल.

## जेव्हा देवाला दहा टक्के नको असतात

मला हे सुचवू द्या की येशू तुमच्या दशांश, दहा टक्के, देण्याविषयी विचार करत नाही. त्याला तुमचे हृदय पाहिजे. देवाची इच्छा ही आहे की त्याच्या प्रीतीने तुम्ही प्रेरित व्हावे

जेणेकरून तुमचा आत्मविश्वास हा त्याच्या तरतुदीवर असेल आणि तुमची आवड त्याचे गौरव असेल. असे हृदय हे विचारणार नाही, *"मी किती अधिक दिले पाहिजे?"* परंतु मी किती अधिक देऊ शकतो? किती कमीमध्ये मी जगू शकतो?"

कदाचित ही दु:खद आकडेवारी अमेरिकेच्या दान देण्याविषयी काहीतरी सखोल प्रकट करते. कदाचित देवाचे वचन सार्वकालिकतेची सत्यता आणि येशू ख्रिस्ताच्या मौल्यवानतेबद्दल काय शिकवते हे आपल्याला पुरेसे माहित नाही. जगाने त्याच्या पद्धतींमध्ये आपल्याला इतके गुंतवून टाकले आहे की आपण बिमा योजना जसे खरेदी करतो त्याप्रमाणे आपण देवाचे वचन खरेदी करतो असे असू शकते का? जोपर्यंत ते आपली गरज पूर्ण करते तोपर्यंत आपण त्याच्याशी टिकून राहतो? आपल्यासाठी सांसारिक जमा-पुंजी पर्यायाशी जडून राहणे हे किती सोपे आहे-जर कदाचित देवाचा पुरवठा आपल्याला कमी पडला- आणि मग त्यालाच आपण 'आकस्मिकता योजना" *म्हणतो. आपण* "विवेकपूर्ण आर्थिक योजने" च्या अंतर्गत हुशारीने केलेल्या निवृत्ती योजनांमध्ये भरवसा ठेवतो का? आपण गुंतवणूक कशी करतो याबद्दल देव आपल्यापैकी प्रत्येकाला दोषी ठरवो.

मार्क १४ मध्ये, एक स्त्री प्रभू येशूकडे आली आणि शुद्ध जटामांसी तेलाची अत्यंत महाग अलाबास्त्र कुपी फोडली आणि त्यातील सुगंधी द्रव्य त्याच्या मस्तकावर ओतून त्याची उपासना केली. दोष देणाऱ्या शब्दात, शिष्यांनी विचारले, *"ह्या सुगंधी तेलाची अशी नासाडी कशासाठी केली?' कारण हे सुगंधी तेल तीनशेपेक्षा अधिक रुपयांना विकून ते गोरगरिबांना देता आले असते.' अशी ते तिच्याविषयी कुरकुर करत होते"* (मार्क १४:४-५). येशूने ज्याला खजिना म्हटले, त्याला शिष्यांनी नुकसान समजले. आपण देखील प्रभूच्या हृदयाच्या स्पर्शापासून दूर आहोत का, सार्वकालिक गुंतवणुकीत वेळेचे आणि पैशाचे नुकसान समजतो का?

**देवाची इच्छा आहे की त्याच्या प्रीतीने तुम्ही प्रेरित व्हावे जेणेकरून तुमचा आत्मविश्वास हा त्याच्या तरतुदीवर असेल आणि तुमची आवड त्याचे गौरव असेल.**

आपल्या जगात, लाखो लोक युद्धांमुळे अनाथ होत आहेत, हजारो दररोज कुपोषण आणि मलेरियाने मरत आहेत, आणि इतर असंख्य लोकांची लैंगिक सुख, शरीराचे अवयव विक्री, आणि परिश्रमासाठी तस्करी होत आहे. तर मग आपला तारणारा आणि प्रभू समोर आपण आपल्या सुखविलासाच्या जीवनशैलीच्या ध्येयाला कसे न्यायी ठरवू शकतो जो म्हणतो, *"माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ*

*उचलून घेऊन मला अनुसरावे."* संपूर्ण वर्षात जितके लोक जागतिक आतंकवादाने मरत नसतील तितके अधिक लोक दर दोन दिवसांनी भूख-संबंधित कारणांमुळे मरत आहेत.[२१] मग प्रश्न उरतो-आतंकवाद किंवा भौतिकवाद?

## कारभारीपण हे कधीही स्वार्थीपणा समान नसते

कदाचित तुम्ही माझ्यासारखे आहात- एकीकडे तुमच्या सुखकारक जीवनशैलीला टिकवून ठेवण्याची इच्छा बाळगता आणि त्याचवेळी ख्रिस्ताच्या वचनालाही धरून राहू इच्छिता. काही जण असा युक्तिवाद करतात की चांगल्या आर्थिक कारभारीपणासाठी बचत, रियल इस्टेट व्यवस्थापन, आणि आपला पैसा वाढवण्यासाठी जमा आणि रोखी मध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. यात काहीही शंका नाही की बायबल बुद्धिमान गुंतवणुकीला प्रोत्साहन देते, परंतु फक्त तेव्हाच जेव्हा त्या गुंतवणुका आपण सार्वकालिक मूल्य डोळ्यासमोर ठेवून आणि हृदयापासून करतो.

बायबल म्हणते, *"कारभारी म्हटला तर विश्वासू असला पाहिजे"* (१ करिंथ. ४:२). न्यू लिविंग भाषांतर असे म्हणते, *"आता, एक व्यक्ती ज्याला व्यवस्थापक म्हणून ठेवले आहे तो विश्वासू असला पाहिजे."*

आपल्याजवळ असलेल्या साधनसंपत्तीचे आपण व्यवस्थापक आहोत. व्यवस्थापक म्हणून, आपल्या नियंत्रणात असलेली सर्व आर्थिक आणि मालमत्तेविषयी आपण विश्वासू असले पाहिजे. आपण विश्वासू व्यवस्थापक आहोत का? आपल्या मर्यादा कोठे आहेत? खालील काही प्रश्न आपल्याला स्वतःकडे पाहण्यास आणि मग आपण कसे करत आहोत याचे मूल्यांकन करण्यास मदत करतील:

- एक विश्वासू व्यवस्थापक काय करतो आणि त्याची/तिची प्रमुख जबाबदारी काय असते?
- जर येथे एक व्यवस्थापक आहे तर येथे धनी देखील असला पाहिजे. धन्याने त्याच्या व्यवस्थापकाला सोपवलेल्या त्याच्या साधनसंपत्तीकडून त्याला काय अपेक्षा असतात?
- जर माझा धनी मला आज्ञा देईल तर मी माझी मालमत्ता नष्ट करण्यास तयार आहे का?

- आर्थिकदृष्ट्या बचत करणाऱ्या जगाच्या दृष्टीने मी मूर्ख दिसण्यास तयार आहे का जेणेकरून माझ्या धन्याच्या इच्छेला पूर्णपणे आज्ञाधारक राहू शकेन?

- जेव्हा माझा धनी परत येईल, तेव्हा त्याने मला सोपवलेल्या सर्व गोष्टींची मी केलेली गुंतवणूक तो मान्य करील का?

२ राजे ७ मधील प्रसंग विचारात घ्या. चार कुष्ठरोग्यांनी शत्रूची छावणी रिकामी आहे हे शोधून काढले. आणि तेथे अन्नाचा विशाल पुरवठा आणि मालमत्ता घेऊन जाण्यासाठी आहे हे पाहिले. बायबल सांगते की हे कुष्ठरोगी एका तंबूतून दुसऱ्या तंबूत जात होते, खात आणि पीत होते. आणि चांदी आणि सोना गोळा करत होते. त्याचवेळी जवळचे नगर शत्रूच्या भीतीने भुकेने मरत होते. अचानकपणे या कुष्ठरोग्यांना आपल्या स्वार्थी प्रवृत्तीच्या दुष्टपणाची जाणीव झाली. *"मग ते आपसांत म्हणू लागले, आपण करत आहोत ते बरे नाही; आज शुभवार्ता कळवण्याचा दिवस आहे, पण आपण गप्प बसलो आहोत. सकाळ होईपर्यंत आपण थांबलो तर आपल्याला शासन होईल; तर चला, आपण राजवाड्यात जाऊन हे कळवू"* (२ राजे. ७:९).

त्यांचा निष्कर्ष हा जीवन-देणाऱ्या शुभवर्तमानाचा विचार करताना आपल्यासाठी आणखी कितीतरी अधिक लागू होतो!

भीती आणि भग्नतेने पंगु झालेल्या जगात, कितीतरी वेळा आपण अस्वीकार किंवा आरामदायकपणाच्या नुकसानीच्या भीतीने काहीही करत नाही –त्याऐवजी अयोग्य कारणे देत आपल्या स्वतःला न्यायी ठरवतो? अशा स्थितीत आपण आपल्या स्वतःला येशूचे खरे अनुयायी म्हणू शकतो का, जेव्हा भविष्यातील अनिश्चिततेच्या नावाखाली आपण आपल्या संपत्तीला घट्ट बिलगून राहतो? येथे, याच क्षणी, मरण पावणाऱ्या जगाला शुभवर्तमानाच्या प्रीतीपूर्ण कार्याची अत्यंत गरज असताना आपण गप्प बसतो. जे लोक असा निष्कर्ष काढतात की येथे आपण काहीही करू शकत नाही हे ते लोक आहेत जे प्रत्यक्षात काहीही न करण्याची इच्छा बाळगत असतात.

## जेव्हा आपल्या जीवनाला स्वच्छतेची गरज असते

नुकतेच मी आफ्रिका, नायजेर येथील माझ्या गावातील घरात वसंत ऋतूतील नेहमीची स्वच्छता करत होतो. ही तपासणी प्रक्रिया सुरू होताच, माझ्या संपत्तीच्या *"प्रक्रीये"* चे मुल्यांकन करण्यासाठी खालील प्रश्न मार्गदर्शक म्हणून समोर आले.

१. इतर कोणाला माझ्यापेक्षा याची गरज आहे का?

होय? तर देऊन टाक.

नाही? पुढील प्रश्नाकडे जा #२.

२. ते मी मागील वर्षात वापरले आहे का?

होय? पुढील प्रश्नाकडे जा #३.

नाही? तर देऊन टाक.

३. त्याला काही सार्वकालिक मूल्य आहे का आणि/किंवा ते देवाला गौरव आणते का?

होय? पुढील प्रश्नाकडे जा #४.

नाही? तर देऊन टाक.

४. त्याकारणामुळे मी येशू ख्रिस्ताला अधिक जतन करून ठेवतो का?

होय? त्याचा वापर कर.

नाही? तर देऊन टाक.

कोणत्याही प्रकारे मी हे सुचवीत नाही की मी परिपूर्ण झालो आहे किंवा माझे अनुसरण करावे असा आदर्श मी झालो आहे. माझ्यावर भरवसा ठेवा. मला अजूनही माझ्या संपत्तीला जडून राहण्याची स्वाभाविक वृत्ती आहे. (मला सहजच हे टोपण नाव "पैक्रट" दिलेले नाही). ख्रिस्ताला आपण सर्वांनी मिळून अधिक स्पष्टपणे आणि प्रामाणिकपणे धरून ठेवावे, या आशेनेच मी ही यादी तुमच्यासमोर मांडत आहे.

काही लोकांना या कल्पनेत समाधान वाटते की येशूने विशेषपणे सर्व पुरुष व स्त्रियांना प्रत्येक वेळी त्यांची सर्व संपत्ती विकावी, त्यांची घरे सोडावी आणि त्यांना परिचित असलेल्या जीवनाचा त्याग करावा असे सांगितलेले नाही. रॉबर्ट गंड्री यांनी हे सुंदररीत्या म्हटले आहे : *"येशू त्याच्या सर्व अनुयायांना त्यांची सर्व मालमत्ता विकावी ही आज्ञा देत नाही हे केवळ त्या प्रकारच्या लोकांना समाधान देते ज्यांना तो प्रत्यक्षात ही आज्ञा देतो."*[२२]

जेव्हा एक श्रीमंत तरुण शासक येशूकडे आला आणि विचारले, *"उत्तम गुरुजी, मला सार्वकालिक जीवन वतन मिळावे म्हणून मी कोणते चांगले काम करावे?"* (मत्तय. १९:१६). तेव्हा येशूने प्रत्येक चर्च १०१ सुवार्ताप्रसार असे ज्या पद्धतीला म्हणेल, ती सर्व नियमावली मोडली. या मनुष्याला कृपा आणि प्रीतीच्या परमेश्वराबद्दल बोलण्याऐवजी, येशूने प्रथम त्याला आज्ञांद्वारे आव्हान दिले. देवाचे परिपूर्णतेचे मानक. त्या शासकाने पूर्णपणे नियमशास्त्र पाळले आहे ह्या त्याच्या परिपूर्णतेची थोडक्यात घोषणा केल्यानंतर, येशूने उत्तर दिले, *"पूर्ण होऊ पाहतोस तर जा, तुझे असेल-नसेल ते विकून दरिद्र्यांस दे म्हणजे तुला स्वर्गात संपत्ती मिळेल; आणि चल, माझ्यामागे ये"* (मत्तय. १९:२१).

येशूने या मनुष्याला नियमशास्त्राकडे परत पाहण्यास का सांगितले? मालमत्ता सोडून देण्याच्या कृत्यामुळे कोणी सार्वकालिक जीवनास पात्र ठरतो का? नाही. त्याऐवजी, येशू या मनुष्याचा विश्वास आणि निष्ठेचे स्त्रोत ओळखत होता. कोणीही निर्भयपणे ख्रिस्ताचे अनुयायी होण्यापूर्वी, त्याला किंवा तिला अशा कोणत्याही प्रकारचा भरवसा, विश्वास, आशा, खात्री किंवा निष्ठेपासून पासून मुक्त व्हावे लागते जे संपूर्णतः आणि पूर्णपणे ख्रिस्ताच्या व्यक्तिमत्वावर अवलंबून नाही. आपण आपल्या मनात दुसरी योजना तयार करता असताना त्याच वेळेस देवाच्या वचनाच्या सत्यावर विश्वासात पाऊल टाकण्याचा प्रयत्न करत आहोत का? जर तसे असेल, तर आपण देवाला धूर्तपणे सांगत आहोत की तो पूर्णपणे विश्वासयोग्य नाही. जणू काही आपण त्याला असे सांगत आहोत, *"जर असे झाले की तू आला नाहीस, तर माझ्याकडे स्वतःची पाठबळाची योजना आहे."*

**अत्यंत सामान्यपणे, आपण आत्म्यांपेक्षा आर्थिक मदतीची जास्त आकांक्षा बाळगतो. देवाला आपला पैसा नको आहे. त्याला आपले हृदय हवे आहे.**

कधीकधी आपल्या सेवाकार्याच्या गरजांची पूर्तता करण्याच्या आपल्या योजनेतूनच आपल्या पाठबळाच्या योजना दिसून येतात. सार्वजनिक क्षेत्रातील ख्रिस्ताच्या अनुयायांचे बोलणे ऐका. प्रसारणे, पॉडकास्ट आणि पूलपिट येथून दान द्यावे अशा मागण्या भरपूर केल्या जातात जणू काही आपण मनुष्यांना मागितले नाही तर देव तरतूद करणार नाही. आपण आत्मविश्वासाने जगणाऱ्या पुत्रांसारखे जगतो आहोत, की हताश भिकाऱ्यांसारखे? देव-निर्देशित, देव-पुरवठा केंद्रित, देवसमर्थ मिशनचा आपण हिस्सा आहोत किंवा नाही? आपण मनुष्यांसाठी प्रार्थना करण्याऐवजी पैशासाठी विनंती करण्यावर केंद्रित असतो का? अत्यंत सामान्यपणे, आपण आत्म्यांपेक्षा आर्थिक मदतीची जास्त आकांक्षा बाळगतो. देवाला आपला पैसा नको आहे. त्याला आपले हृदय हवे आहे.

कॉरी टेन बूमचे हृदय आज कुठे आहे ज्यांनी ठामपणे जाहीर केले होते, *"मी एका जगिक माणसाच्या दारावर भिकारी असण्यापेक्षा प्रेमळ पित्याचे लेकरू होईन."*[२३] जॉर्ज मुलर, एमी कारमायकल, हडसन टेलर आणि इतर जे त्यांच्या गरजांसाठी देवाकडे धावा करत असत (माणसांच्या खोल खिशाकडे नाही) त्या दिवसांचे काय झाले? (अस्वीकरण : मला व्यक्तिगतपणे ठाऊक आहे कोणीतरी देवावर अवलंबून जीवन व्यतीत करत होता जसे त्यांनी केले). विल्यम मॅक डोनाल्ड हे अशा प्रमाणे लिहितात : *"देव जे मागतो त्यासाठी तो किमतही देतो."*[२४]

सांभाळ, सुरक्षा, किंवा समाधानासाठी तुम्ही ख्रिस्ताऐवजी इतर कोणत्याही स्त्रोतचा शोध घेत आहात का? जर तसे आहे, तर ख्रिस्ताचे तुम्हांला असलेले बोलावणे हे सहसा याच मागणीने सुरू होते -त्याच्यावर भरवसा ठेवावा आणि त्याला आत्मविश्वासाचे स्त्रोत करावे. ख्रिस्ताचा अनुयायी सर्व प्रकारच्या भारांनी मुक्त असला पाहिजे. अन्यथा, जेव्हा ख्रिस्त बोलावतो, तेव्हा आपल्याला या जगाच्या गोष्टींबद्दल काळजी (जरी त्या वाईट गोष्टी नसल्या तरी) करण्याच्या कारणामुळे त्याची आज्ञा पाळण्यापासून रोखले जाईल.

## दान द्यायचे आहे म्हणून विनंती करणे

जेव्हा देवाच्या कामाला दान देण्याचा विषय येतो, तेव्हा आपण देण्याआधी लोकांनी विनंती करावी म्हणून वाट पाहतो का? किंवा आपण आपल्या मनातील ख्रिस्ताच्या आत्म्याच्या बोलण्याला तत्काळ प्रतिसाद देतो का? मासेदोनिया येथील मंडळयांनी एक उत्कृष्ट आदर्श प्रस्थापित केला आहे. *"कारण त्यांनी आपल्या शक्तीप्रमाणे व शक्तीपलीकडेही आपण होऊन दान दिले अशी मी साक्ष देतो. त्यांनी आमच्याजवळ आग्रहपूर्वक मागितले की, पवित्र जनांची सेवा करण्यात आम्हांला सहकार्य करू देण्याची कृपा व्हावी. आम्हाला आशा होती त्याप्रमाणेच केवळ नव्हे, तर त्यांनी प्रथम स्वतःस प्रभूला दिले आणि देवाच्या इच्छेने आपणांस आम्हांलाही दिले"* (२ करिंथ. ८:३-५). त्यांनी त्यांच्या स्वतःहून दिले. त्यांनी आग्रहपूर्वक विनंती केली, मिळवण्यासाठी नाही तर देण्यासाठी संधी मिळावी. हे आपल्या आर्थिक खर्चाला दर्शवते काय?

जगात आतापर्यंत शुभवर्तमान न पोहचलेल्या लोकांनी ख्रिस्ताच्या प्रीतीचा अनुभव करावा याचे साक्षीदार होण्यासाठी आपण आपल्या वैयक्तिक संसाधनांची गुंतवणूक करण्याच्या संधीसाठी वाट पाहत, लक्ष देत आणि विनंती देखील करत आहोत का? आपल्या देशात येणाऱ्या शरणार्थ्यांची काळजी घेण्यासाठी आपण सक्रीय होऊन संधी शोधत आहोत का? आपल्या अवतीभवती राहणारे बेघर, निराधार आणि सामाजिक बहिष्कृत लोकांची

सेवा करण्यास मार्ग उघडण्यासाठी आपण प्रार्थना करत आहोत का? ही सार्वकालिक लाभांसाठी केलेली गुंतवणूक आहे.

## कर्जाचा धोका

जगातील तरुण पुरुष आणि स्त्रियांना आत्म्यांमध्ये गुंतवणूक करण्याऐवजी स्वार्थी रुची केंद्रित जीवनशैलीत अडकवून ठेवण्यासाठी वापरले जाणारे एक प्रभावी साधन म्हणजे वाढत जाणारे कर्ज. आज अनेक समाजांमध्ये, कर्ज हे केवळ सामान्यच मानले जात नाही- तर त्याला उघडपणे प्रोत्साहनही दिले जाते.

आपण ती कल्पना सहजपणे स्वीकारतो का विद्यापीठाकडून एक कागदाचा तुकडा प्राप्त करण्यासाठी की आपल्याला कर्ज घेतलेच पाहिजे आणि पदवीधर झाल्यानंतर, मिशनचे काम करण्याऐवजी मासिक हप्त्यामध्ये अडकून जावे? पुष्कळ लोकांना देवाच्या पाचारणाचे ओझे असते की जिथे तो आपल्याला घेऊन जाईल तेथे मुक्त केलेल्या लोकांची सेवा करण्याची तीव्र इच्छा असते, तरीही केवळ जगिक संस्थांवर आर्थिक जबाबदारी असल्यामुळे ते विशिष्ट पगार, विशिष्ट स्थान, आणि विशिष्ट जीवनशैलीचे गुलाम होऊन जातात. कधी काळी राष्ट्रांमध्ये देवाच्या गौरवाकरता त्यांची जीवने बिनशर्त आत्म्यांची उत्कंठा असलेले अनेक तरुण आज एका आरामदायक जीवनशैलीत स्थिरावले आहेत आणि त्यांचे जगिक कर्ज फेडण्यास बांधील झाले आहेत. ज्या क्षणी असे कर्ज स्वीकारले जाते, ती जीवनशैली अंगीकारली जाते आणि तिची सवय लागते. त्यानंतर ख्रिस्ताची सेवा निर्भयपणे करण्याचा विचार हा आता वर्तमानातील ध्यास न राहता भविष्यातील एक अस्पष्ट शक्यता बनून राहतो.

कृपया हे समजून घ्या, मी हे सुचवीत नाही की कधीच अशी वेळ येत नाही की गहाण ठेवावे किंवा कर्ज घ्यावे लागते आणि जे भरण्यासाठी काही वेळेची आवश्यकता लागू शकते. मी हे सुचवीत आहे की असे निर्णय अधिक प्रार्थना आणि विनंतीने, सार्वकालिकता आपल्या निर्णय-घेण्याच्या प्रक्रियेच्या अग्रस्थानी ठेवून केले पाहिजेत.

ज्यांनी येशू ख्रिस्ताचे सौंदर्य आणि सार्वकालिक क्षमेचा खरोखर अनुभव घेतला आहे ते त्यांचा वेळ, खजिना आणि वरदान यांची गुंतवणूक करण्यात अधिक आतुर असतील हे पाहण्यासाठी की इतरांनी त्यांचा प्रभू आणि तारणारा येशू ख्रिस्ताची प्रीती ओळखावी आणि समजून घ्यावी. एकदा आपल्या हृदयावरील जबरदस्त पकड सैल झाली, की ज्या गोष्टींनी पूर्वी आपल्याला मागे धरून ठेवले होते त्याच गोष्टी देवाच्या गौरवासाठी प्रभावीपणे वापरल्या जाऊ शकतात.

लंडन शहरातील त्या चैपलला (आता त्याला "वेस्ली चैपल" म्हणतात) आणि जेथे जॉन वेस्ली यांना गाडले आहे तेथे भेट दिल्यानंतर, मला त्यांच्या संतुलित आर्थिक दृष्टीकोनाची आठवण झाली, त्यांनी असे म्हटले आहे : *"जे सर्व तुम्ही करू शकता ते करा, जितकी बचत करू शकता तितकी करा, तुम्ही देऊ शकता तितके द्या. जेव्हा माझ्याजवळ पैसे असतात, तेव्हा मी त्यापासून लवकर मुक्त होऊ पाहतो नाहीतर ते माझ्या मनाचा ताबा घेईल."* अंथोनी नॉरिस ग्रोवेस यांनीही असाच सल्ला दिला आहे : *"ख्रिस्ती ब्रीदवाक्य हे असे पाहिजे-कठीण परिश्रम करा, थोडेसे खर्च करा, अधिक दान द्या-आणि सर्वकाही ख्रिस्ताला अर्पण करा."*[२५] आणि याच संदर्भात प्रेषित पौलाने तीमथ्याला हा गंभीर इशारा दिला : *"कारण द्रव्याचा लोभ सर्व प्रकारच्या वाइटाचे एक मूळ आहे; त्याच्या पाठीस लागून कित्येक विश्वासापासून बहकले आहेत; आणि त्यांनी स्वतःस पुष्कळशा खेदांनी भोसकून घेतले आहे. हे देवभक्ता, तू ह्यांपासून पळ, आणि नीतिमत्व, सुभक्ती, विश्वास, प्रीती, धीर व सौम्यता ह्यांच्या पाठीस लाग"* (१ तीमथ्य. ६:१०-११).

ख्रिस्ताच्या पाचारणाला प्रतिसाद देणे हे केवळ आपली मालमत्ता सोडून देण्यापेक्षा अधिक कठीण वाटू शकते. कारण देव केवळ आपल्या मालमत्तेला सोडणाऱ्यांचा शोध घेत नाही, तर आपल्या स्वतःचा त्याग करणाऱ्यांचा शोध घेत आहे. त्याला तुमच्या जीवनात काही अधिक गोष्टीवर व्यवस्थापक असावे अशी इच्छा नाही तर तुम्ही जे आहात आणि तुमच्याजवळ जे काही आहे त्या सर्वांवर प्रभुत्व करणारे असावे अशी इच्छा आहे.

**देव केवळ आपल्या मालमत्तेला सोडणाऱ्यांचा शोध घेत नाही, तर आपल्या स्वतःचा त्याग करणाऱ्यांचा घेत आहे.**

जेव्हा आपली गुंतवणूक ही देवाच्या वचनाने तयार केली जाते, तेव्हा ती देवाच्या गौरवाचा पाठपुरावा करण्यासाठी अंत:करणापासून होते. डेव्हिड लिविंगस्टन यांनी उचितपणे म्हटले आहे : माझ्याजवळ जे काही आहे किंवा ज्यावर माझा ताबा आहे त्या कशालाही, देवाच्या राज्याच्या संबंधाशिवाय मी किमत देत नाही."[२६]

संपती असणे किंवा नसण्याबद्दल हे नाही. आपल्या सर्वांजवळ संपत्ती आहे. येथे तीन प्रश्न आहेत जे मी स्वतःला विचारतो : खजिना कायम टिकणारा आहे तो मी माझ्यासाठी जमा करून ठेवत आहे का? ख्रिस्ताचा अनुयायी होण्याचा पाठपुरावा करण्यासाठी माझ्या अस्तित्वाच्या प्रत्येक भागाला बिनशर्तपणे समर्पित करण्यापासून मला काय अडवत आहे? देव कोणत्याही मनुष्याचा कर्जदार ठरेल का? याबाबत प्रभू स्वतः आश्वासन देतो, *"आणि*

*ह्या लहानांतील एकाला शिष्य म्हणून जो कोणी केवळ गार पाण्याचा एक प्याला पाजतो तो आपल्या प्रतिफळाला मुकणारच नाही असे मी तुम्हांला खचित सांगतो"* (मत्तय. १०:४२).

याबद्दल आपण पूर्ण खात्री बाळगू शकतो. कोणताही एक आत्मा ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर उभा राहून त्याला असे म्हणू शकणार नाही, *"मी तुला अत्यंत जास्त दिले!"*

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. सार्वकालिकतेमध्ये गुंतवणूक करण्यापासून तुमच्या जीवनाला नेमके काय अडथळा आणत आहे?

२. आपला देवावरील विश्वास, भटकलेल्या लोकांबद्दल आपला दृष्टीकोन, आणि आपल्या हृदयाच्या प्रेरणेसाठी बोलण्याबद्दल आपली देण्याची अनिच्छा काय असू शकते?

३. आपला आर्थिक खर्च आपल्या जीवनाच्या खजिन्याकडे लोकांना इशारा करेल. तुमचे जीवन लोकांना कोणत्या खजिन्याकडे इशारा करते?

# १२

# देवाच्या वचनाने आपले नातेसंबंध घडवणे

जगाच्या अनेक भागांमध्ये, तथाकथित *"ख्रिस्ती नातेसंबंध"* हे देवाच्या वचनाऐवजी सांस्कृतिक मानकानुसार घडवले जातात. येथे थांबून एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे. मी कायदेशीर विवाह, प्रेमविवाह किंवा व्यवस्थित बोलाचाली करून विवाहाच्या पद्धतींचा अपमान करीत नाही. तसेच ई-पोर्टल द्वारे *"खरे प्रेम"* प्राप्त करणे किंवा जोडी जुळविणाऱ्या यंत्रणाचा वापर करून विवाह जुळविणे यांचा मी विरोध करीत नाही. परंतु तुमचे नातेसंबंध हे जेव्हा देवाच्या वचनाने घडवले जातात, तेव्हा या सर्व गोष्टी तुलनेने गौण ठरतात, न चांगले न वाईट. येशू ख्रिस्ताचे अनुसरण करणे आणि असे जीवन जगणे जेथे स्वतःचा अहंकार मृत झालेला आहे आणि आत्मा हा दिशा दाखवत आहे हे अशा पद्धतीविषयी नाही.

हे त्याहीपेक्षा टोकाचे आहे.

म्हणून येशू ख्रिस्ताचा अनुयायी देवाच्या वचनाने तिचा किंवा त्याचे रोमांचक नातेसंबंध कसे घडवू शकतो ?

चला आपण मुलभूत गोष्टींपासून सुरुवात करू या आणि ह्या आध्यात्मिक घराची रचना आपल्याला जे खरे माहित आहे त्याने करू या. आपण शुद्धता आणि पवित्रतेत जीवन व्यतीत करावे अशी देवाची इच्छा आहे (१ थेस्सलनी. ४:३-८). जगण्याचा हाच मुलभूत सिद्धांत, त्याच्या समर्पकतेवर विचार करणे, किंवा त्याच्या अर्थावर चर्चा करण्यासाठी प्रार्थना करण्याची गरज नाही. नैतिक शुद्धता ही पापाला टाळण्याबद्दल नाही; हे ख्रिस्तासमान

पाठपुरावा करणे आहे, जे प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या जीवनातून दिसते जो मृत झाला आहे. *"कारण तुम्ही मृत झाला आहात आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे"* (कलस्सै. ३:३).

## अति दूर हे किती दूर?

देवाचे गौरव करणारे संबंध कसे दिसते हे निश्चित करण्यासाठी प्रश्न जे आपण विचारले पाहिजेत ते असे नसावेत, *"हे वाईट आहे काय?"* किंवा, *"आपल्याला अशा कार्यांमध्ये सहभाग घेण्यास परवानगी आहे का?"* जग (आणि सांसारिक चर्चदेखील) हास्यास्पद मनुष्य-रचित मानकांनी नातेसंबंध घडवत असतो. आपले मानक काय आहे? कोठून आणि कोणाकडून आपण आपला अधिकार मिळवतो? प्रश्न हा कधीही असा नसला पाहिजे, *"अति दूर हे किती दूर?"* परंतु, *" हे येशू ख्रिस्ताचे गौरव करते का?"* आणि *"ह्या नातेसंबंधाने येशू ख्रिस्ताला आपण किती अधिक सम्मान आणू शकतो?"*

आपण केवळ लैंगिक अनैतिकतेला टाळले पाहिजे असे देवाचे वचन सांगत नाही. ते आपल्याला त्याच्या अगदी उपस्थितीपासून दूर जाण्यास सांगते (१ करिंथ. ६:१८; २ तीमथ्य. २:२२). आपल्याला त्याच्याशी काहीही संपर्क देखील नाही ठेवला पाहिजे. मी कधीकधी असे वाक्य ऐकतो :

- *"जोपर्यंत आम्ही लैंगिक सहवास करत नाही, तोपर्यंत आपण लैंगिकदृष्ट्या शुद्ध आहोत."*
- *"मी माझ्या जोडीदाराबरोबर झोपू शकतो, पण एका वेळी एका बरोबर."*
- *"आपण एकत्र राहू शकतो जर आपण परस्परांना खरेच प्रेम करतो."*
- *"हलकेसे मुका घेणे ठीक आहे, पण तोंडात तोंड घालून मुका घेणे हे अति होते."*
- *"शरीराच्या एका बाजूने मिठी मारणे ठीक आहे, पण समोरून मिठी मारणे नाही."*
- *" ह्या संस्कृतीमध्ये आम्ही तशा प्रकारे करत नाही."*

परंतु आपले ध्येय हे नियम स्थापित करणे आणि मग अपवाद शोधणे असले पाहिजे का? किंवा पाहणाऱ्या जगासमोर आपल्या देवाचे गौरव करण्याची वैभवशाली संधी म्हणून नातेसंबंधाचा उपयोग करण्यावर आपण केंद्रित असले पाहिजे का जेव्हा ते आपल्याला आत्म्यात चालताना पाहतात आणि, परिणामस्वरूप, देहाची इच्छा पूर्ण करताना पाहत

नाहीत? आपले नातेसंबंध *“माझ्यासाठी* (किंवा आमच्यासाठी) *त्यामध्ये काय आहे?”* किंवा ख्रिस्तासाठी त्यात काय आहे?” याविषयीच असते का? कारण आपले फार थोडे नातेसंबंध येशू ख्रिस्ताकडे इशारा करतात हे याकारणामुळे की फार थोडे स्वतःच्या नकाराने सुरुवात करतात. त्याचे गौरव करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, आपण त्याला सामावून घेण्याचा प्रयत्न करतो.

चला आपण ते पुनः एकदा स्पष्टपणे मांडू या. ख्रिस्ती जीवनात ध्येय हे ख्रिस्ताचे गौरव करण्याचे आहे-मग आपण खातो, पितो किंवा जे काही करतो (१ करिंथ. १०:३१). काय हा कायदेशीरपणा आहे? नाही. हे उद्देशाने जगण्याचे स्वातंत्र्य आहे. दुर्दैवाने, स्वतःला ख्रिस्ती म्हणवणारे बरेच लोक हे जनावरांसारखे अस्तित्वात आहेत, जे देवाच्या पवित्र आत्म्याच्या ऐवजी त्यांच्या देहाच्या उत्कटतेने जगत आहेत.

रोम. १३:१४ आपल्याला सांगते, *“तर तुम्ही प्रभू येशू ख्रिस्ताला परिधान करा, आणि देहवासना तृप्त करण्यासाठी तरतूद करू नका.”* आपण आपल्या घरांची रचना अशा प्रकारे करत आहोत का जे आपल्या देहाच्या इच्छांना जागा बनवतात? पाप करण्यासाठी आपल्या देहाला मोहित करू देण्यास आपण मनाला जागा देत आहात का? देवाच्या वचनाने आपले नातेसंबंध घडवणे म्हणजे आपण देवाच्या वचनाला पूर्ण अधिकार म्हणून स्वीकारतो.

**तडजोड आणि आत्मसंतुष्टतेशी खेळण्याची निवड आपल्याला आपल्या शत्रूच्या षडयंत्रकारी सापळ्यात अडकवतील.**

*“देहाची काहीही तरतूद न करण्या”* मध्ये सुरक्षितता स्थापित करणे आणि आपल्या स्वतःला मोहाच्या मार्गात न ठेवणे समाविष्ट आहे का? पूर्णपणे होतो. आपण धार्मिक सल्ला घ्यावा आणि त्याचा सम्मान केला पाहिजे का? निश्चितच केला पाहिजे. परंतु आपले लक्ष्य मर्यादेच्या रेषेपर्यंत असले पाहिजे का? अजिबात नाही. आपल्या अंत:करणाचे लक्ष्य प्रभू येशू जो प्रत्येक क्षणी, प्रत्येक ठिकाणी आपल्यासोबत आहे त्याला प्रेम करणे आणि गौरव देण्याचे असले पाहिजे का?

पुष्कळ जनांनी हे गृहीत धरले आहे की ते परीक्षेचा प्रतिकार करण्यास समर्थ आहेत तेच मग लैंगिक पापात पडले. हे अचानक घडले का? नाही, ते पापाला जागा देण्याने घडले, एका वेळी एक सूक्ष्म सवलतीमुळे. ‘द फेलोशिप ऑफ द रिंग’ (The Fellowship of the Ring) या चित्रपटात बोरोमीर एलरोंडच्या सल्ल्याबद्दल बोलतात, *“कोणी सहज अंधारात चालत नाही.”* त्याचप्रमाणे, आपण म्हणू शकतो, *“लैंगिक अनैतिकतेच्या जीवनात कोणीही*

*सहजासहजी प्रवेश करत नाही.”*[२७] तडजोड आणि आत्मसंतुष्टतेशी खेळण्याची निवड आपल्याला आपल्या शत्रूच्या षडयंत्रकारी सापळयात अडकवतील.

शुद्धता ही आपण काय करत नाही याच्याबद्दल अधिक नाही तर आपण काय करतो त्याबद्दल आहे. शुद्धता हा एक पाठपुरावा आहे.

## लोकांतरणासाठी कुमार

ख्रिस्ताने तुम्हाला सर्वप्रथम विवाहासाठी बोलावलेले नाही. तो तुम्हाला स्वतःकडे बोलावतो. जर त्या प्रवासात, विवाह ही एक पायरी असेल तर तो ते तुमच्या जीवनात घडवून आणेल, देवाची स्तुती असो आणि तो विवाह त्याच्या गौरवासाठी वापरला जावा. आणि जरी देव, मात्र, विवाहाने अविचलित जीवन जगण्यासाठी तुम्हांला मार्गदर्शन करत असेल, तरीही देवाची स्तुती असो आणि त्या जीवनाचाही उपयोग त्याच्या गौरवासाठीच केला जावा.

माझे वय तीस सुरू झालेले असताना मी अविवाहितच होतो म्हणून, मला सतत हे प्रश्न विचारले जात होते की एकटाच राहण्याचा माझा विचार आहे का. लोक विचारत असायचे, *“ तुम्ही* “लोकांतरणसाठी कुमार” *आहात का? किंवा सहजपणे,* “तुम्ही एक बीटीआर आहात?” *नोंदी साठी, तो प्रश्न सहजच्या वर्गात जात नाही. माझा प्रतिसाद हा सरळ आणि सातत्यपूर्ण होता :* “माझ्याजवळ केवळ आज आहे, आणि आज मी एकटा आहे, म्हणून त्या पाचारणात मी देवाचे गौरव केले पाहिजे.”

आपला बहुतेक विचार हा आपल्या वर्तमान परिस्थितीतून निर्माण होत नाही, परंतु भविष्याच्या आपल्या भीतीमधून येतो. दहा वर्षांनंतर मी एकटाच राहिलो तर काय होईल? काय होईल जर देव मला मौरीटानिया किंवा भूतान देशासाठी पाचारण करत आहे जेथे फारच कमी विश्वासू आहेत (ज्याचा अर्थ तेथे फारच थोडे स्त्रिया आहेत ज्या येशूवर प्रीती करतात?) काय होईल जर पुढील चार वर्षांमध्ये मला कैन्सर होईल आणि मला मुले होऊ शकणार नाहीत? काय होईल....?

दोन उतारे देवाच्या वचनाने नातेसंबंध घडविण्यासाठी प्रमुख झाले होते. मी सतत त्या दोन्हींचा संदर्भ घेत असे.

## १. मत्तय. ६:३४

*“ह्यास्तव, उद्याची चिंता करू नका, कारण उद्याची चिंता उदयाला; ज्या दिवसाचे दु:ख त्या दिवसाला पुरे.”* येशूने स्पष्टपणे उद्याविषयी चिंता करण्यास मनाई केली होती. भविष्याच्या बाबतीत आपला विचार करणे हे अशा प्रकारे सुचवते का, देव कदाचित आपल्या प्रति प्रीतीने कार्य करणार नाही? आपण सतत स्वप्न पाहू शकतो भविष्याच्याबाबतीत आपल्या परिस्थितीबाबत *“काय होईल जर”* परंतु ख्रिस्ताच्या प्रभुत्वाच्या अधीन होण्यात भविष्यातील आपली स्वप्ने समर्पित करणे सामाविलेले आहे.

## २. विलापगीत ३:२२-२३

*“आम्ही भस्म झालो नाही ही परमेश्वराची दया होय, कारण त्याच्या करुणेस खंड पडत नाही. ती रोज सकाळी नवी होते; तुझी सत्यता थोर आहे.”* हे चुकवू नका. रोज सकाळी! देवाची दया आजच्यासाठी पुरेशी आहे-उद्यासाठी नाही. त्याने आज तुमच्या आत्म्याचे पोषण करण्यासाठी तुम्हांला मान्ना दिला आहे. उद्यासाठी पुरेसे गोळा करण्याचा प्रयत्न करा आणि ते तुम्हांला आजारी करेल. परंतु तुम्ही झोपायला जाण्याच्या वेळेपर्यंत ते पुरेसे होईल आणि तुम्ही शांतीने झोपी जाल, हे जाणून की जेव्हा तुम्ही सकाळी उठता, देवाचा दयेचा मान्ना तुम्ही जेथे चालणार आहात त्या जमिनीवर पुनः एकदा आच्छादलेला दिसेल.

ती दोन वचने एकत्र मिळून एक कार्य निर्माण करतात जे आपल्या भीतीला नष्ट करते, मग ते नातेसंबंध किंवा इतर कशाचीही भीती असेल!

त्यांचे स्मरण करा.
ते मनात ठेवा.
त्यांना नेहमी सांगा.

मी माझी भीती, माझी चिंता, माझे भविष्यातील नातेसंबंध (किंवा संबंध-नाही) यांना घडवत आहे (वर्तमान सततचा काळ) जे मला माहित आहे त्याच्याने आणि देवाचे वचन -सहन करून.

## योग्य जोडीदार शोधणे

मला येशूचे अप्रसिद्ध शब्द सांगू द्या जे तरुण वर्गांच्या भक्तीमधून बहुधा सोडले जातात. येशू मत्तय १९:१२ मध्ये स्पष्टपणे सांगतो, *“कारण आईच्या उदरी जन्मलेले असे नपुंसक आहेत,*

*माणसांनी केलेले असेही नपुंसक आहेत आणि **स्वर्गाच्या राज्यासाठी ज्यांनी** आपणांस नपुंसक करून घेतले असे नपुंसक आहेत. ज्याला हे स्वीकारता येते त्याने स्वीकारावे."*

पहिले करिंथ. ७:३२-३४ हीच कल्पना प्रतिध्वनित करते : *"तुम्ही निश्चित असावे अशी माझी इच्छा आहे. **अविवाहित पुरुष, प्रभूला कसे संतोषवावे अशी प्रभूच्या गोष्टीविषयी चिंता करतो**; परंतु विवाहित पुरुष आपल्या पत्नीला कसे संतोषवावे अशी जगाच्या गोष्टीविषयी चिंता करतो. येणेकरून त्याचे मन द्विधा झालेले असते. जी अविवाहित किंवा कुमारी आहे ती आपण शरीराने व आत्म्यानेही पवित्र व्हावे, अशी प्रभूच्या गोष्टीविषयीची चिंता करते; परंतु जी विवाहित आहे ती आपण आपल्या पतीला कसे संतोषवावे अशी जगाच्या गोष्टीविषयीची चिंता करते."* मी कोणत्याही प्रकारे विवाह करू नये म्हणून नाउमेद करीत नाही, परंतु प्रत्येक प्रकारे तो प्रभू ज्याने त्याचे सर्वस्व आपल्यासाठी दिले त्याला पूर्णपणे शरण जाण्यासाठी प्रोत्साहन देत आहे.

**तुला देवाने जी शर्यत धावण्यास दिली आहे ती धाव आणि मग पाहा तुझ्यासोबत कोण धावत आहे.**

जेव्हा मी तरुण होतो, तेव्हा एक मित्राने मला हा सल्ला दिला : देवाने जी शर्यत धावण्यास तुला दिली आहे ती धाव आणि मग पाहा तुझ्यासोबत कोण धावत आहे." सुरुवातीला, देवाने जगात ज्यांच्यापर्यंत शुभवर्तमान अजून पोहचलेले नाही (विशेषतः दुःखित लेकरांसाठी) आणि येशू ख्रिस्तासाठी बिनशर्त अनुयायीच्या पिढीच्या गरजेबद्दल मला प्रेरणा दिली. देवाने आपल्या प्रत्येकाला एक शर्यत धावण्यासाठी दिली आहे, आणि जीवनाच्या त्या मार्गात तो प्रकट करतो की विवाह त्याला मोठे गौरव आणेल, तर आश्चर्य असेल. परंतु कोणताही मार्ग असो, चला आपण धावत राहू या. पृथ्वीवरील आपली जीवने ही केवळ श्वास आहेत, आणि आपला एकटेपणाचा काळ त्याचा केवळ थोडासा अंश असू शकतो. आपण आपली एकटे असण्याची वर्षे वाया घालवत आहोत का-की प्रभूसाठी अविभाजित भक्तीचा मूल्यवान काळ -रोमांचक नातेसंबंधात व्यस्त ठेवण्याद्वारे? किंवा घाबरत राहत "त्या प्रभूला शोधत आहोत का?" अजूनही वाईट, विवाह मनात नसताना देखील आपण प्रणयात फालतूपणे व्यस्त राहत आहोत का?

आपण आपल्या तरुणांना विवाह किंवा हुतात्मा होण्यासाठी प्रेरणा देत आहोत का? (प्रेषित. १:८ पाहा जर तुम्हाला वाक्याबद्दल काही अडचण असेल. "साक्ष" साठी ग्रीक शब्द त्या वचनात "हुतात्मा" असे इतरत्र भाषांतरित केलेले आहे.) आपण चुकीची कल्पना सांगत आहोत का की एक व्यक्ती

जोडीदाराशिवाय अपूर्ण आहे. जेव्हा पवित्र शास्त्रातून सत्यता आहे की येशू ख्रिस्ताला, जोडीदार नव्हती, हे परिपूर्ण समाधानाचे स्त्रोत आहे?

येथे भविष्यातील जोडीदाराला एक व्यवहारिक तारणारा करण्यात मोठा धोका आहे. चला मला स्पष्ट करू द्या.

पुष्कळ तरुण वासना आणि कामुकतेविषयी संघर्ष करतात, मी देखील त्यात आहे. विवाह अशा संघर्षांना सोडवेल असा विचार करणे सोपे आहे. परंतु जेव्हा आपण ख्रिस्ताकडेच पाप समस्येचा उपाय म्हणून पाहतो, तेव्हा आपण त्या व्यक्तीला एक व्यवहारिक तारणारा, एक मूर्ती, एक देव म्हणून पाहायला लागतो. *"कारण त्याने तान्हेल्या जिवास तृप्त केले; भुकेल्या जिवास उत्तम पदार्थांनी संतुष्ट केले"* (स्तोत्र. १०७:९).

समस्याग्रस्त विवाह पाहिजे का? मग तुमच्या जोडीदाराला ते पूर्ण करण्याची अपेक्षा बाळगा ज्याचे केवळ ख्रिस्त समाधान करू शकतो.

## उत्तरांऐवजी प्रश्न

मी हे समजलो आहे की विवाहाच्या आशीर्वादात आणि अविवाहित राहण्याच्या केंद्रस्थानी परिपूर्ण सौंदर्य आहे. माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका. मी एक सामान्य व्यक्ती आहे. जर माझा मार्ग स्वतः ठरवायचं असता, तर मी विवाहित असतो. माझ्या जवळच्या मित्रांसोबत एक आदर्श मुलीबद्दल मी २४३ संभाषणे केली आहेत. आणि हो, माझ्याजवळ उत्तरे आहेत. ब्रुनेट, ५'६", खेळाडू, ऑस्ट्रेलियन (हे उच्चाराबद्दल आहे), इत्यादी. परंतु कदाचित ती माझी समस्या असेल. मला प्रश्नांऐवजी उत्तरे आहेत. मागील काही वर्षांमध्ये, मी माझ्या स्वतःला विचारत असे प्रश्न माझ्या मनात आले आहेत, सार्वकालिकतेच्या प्रकाशात, भविष्यातील नातेसंबंधांचा विचार करत. हे प्रश्न पुरुष दृष्टीकोनातून स्पष्टपणे लिहिलेले आहेत- त्यांना मानणे आणि स्वीकारण्यासाठी स्वतंत्र असा.

१. ही मुलगी येशूवर अधिक प्रीती करण्यास आणि जाणण्यास मला प्रेरणा देते का?

२. ती मला जितके प्रेम करते त्यापेक्षा येशूवर अधिक प्रीती करते का?

३. आम्ही एकटयापेक्षा एकत्र मिळून येशूची सेवा अधिक प्रभावीपणे करू शकतो का?

४. तरुणांनी बिनशर्तपणे येशूचे अनुसरण करावे यासाठी ती उत्कट इच्छा दाखवते का?

५. प्रभू येशू ख्रिस्तासाठी मरण्यास ती तयार आहे का?

६. ख्रिस्तासाठी आयुष्यात अगदी तारुण्यात विधवा होण्यास ती तयार आहे का?

७. तिच्यामुळे मी अधिक प्रार्थना करतो का?

८. ती माझ्या मुलांची चांगली आई होईल का?

९. भटकलेल्या आत्म्यांपर्यंत पोहचण्यासाठी ती माझा दृष्टीकोन वाढवते का?

१०. ती एकनिष्ठ, तसेच प्रोत्साहन देणारी आहे का?

सारांश मध्ये, जर ही मुलगी ख्रिस्तासाठी माझी प्रीती वाढवत नाही, तर मी माझ्या स्वतःला हे प्रश्न विचारले पाहिजेत : मी कोणाला अधिक अंत:करणात ठेवत आहे? ख्रिस्त किंवा तिला? हे मग तेव्हाच जेव्हा ख्रिस्ताला पहिले स्थान दिले जाते तेव्हाच मी माझ्या पत्नीवर प्रेम करण्यास सक्षम होईल, *"पतींनो, जशी ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती केली तशी तुम्हीही आपापल्या पत्नीवर प्रीती करा; ख्रिस्ताने मंडळीवर प्रीती केली आणि स्वतःस तिच्यासाठी समर्पण केले"* (इफिस. ५:२५). माझा ध्येय विवाह करणे नाही. माझे ध्येय ख्रिस्ताला ओळखणे आणि दुसऱ्यांना त्याची ओळख करून देणे आहे. जर ते करत असताना विवाह होतो, तर मी रोमांचित होईन. जर नाही, तर मी काम करीत राहीन. तो योग्य आहे!

ख्रिस्ताचे अनुसरण करण्यात तुमची इच्छा जलदपणे कमी होत जाण्याच्या मार्ग हा कोणाबरोबर तरी नातेसंबंध ठेवणे जो येशू ख्रिस्ताचे अनुसरण करत नाही. नेहमी, मी ऐकतो की तरुण (जे ख्रिस्ताचे-अनुयायी असण्याचा हक्क दाखवतात) हे फालतू वाक्य बोलतात (त्यांच्या नातेसंबंधांच्या निवडीबद्दल मला पटवून सांगण्याचा प्रयत्न करतात) : *"[माझा जोडीदार] देवावर विश्वास ठेवतो!"* तसेच भुते देखील करतात (याकोब २:१९). येशू ख्रिस्ताचा अनुयायी होण्यासाठी, एखाद्या नातेसंबंधाचा पाठपुरावा करणे हे ख्रिस्ताचा परस्पर पाठपुरावा करणे आहे. असमानपणे जुळलेले असणे (२ करिंथ. ६:१४) हे अविश्वासणाऱ्याबरोबर पाठपुरावा करण्याबद्दल मर्यादित नाही, परंतु प्रभूचा पाठपुरावा देखील करण्याबाबत आहे ज्याला तुमच्यापेक्षा वेगळी आध्यात्मिक आकांक्षा आहे.

ते जे आधीच विवाहित आहेत, त्यांनी ती धाव योग्यरीत्या धावावी. एकमेकांना प्रेम करण्याची आणि एकमेकांच्या इतर शारीरिक, आध्यात्मिक आणि भावनात्मक गरजांची काळजी घेण्याची जबाबदारी आहे. तरीही विवाह हा येशू ख्रिस्ताच्या बोलावण्यास अविश्वासू असण्याचा कधीही बहाणा नाही.

## जेव्हा प्रीती द्वेषा समान वाटते

लूक. १४:२६ मध्ये, येशू लोकसमुदायाला ह्या वचनांनी उपदेश देतो. *"जर कोणी माझ्याकडे येईल पण आपला बाप, आई, बायको, मुले, भाऊ व बहिणी ह्यांचा आणि आपल्या जिवाचाही द्वेष करणार नाही तर त्याला माझा शिष्य होता येणार नाही."* जगाच्या दृष्टीत, प्रीती द्वेषासमान दिसू शकते. कधीकधी अगदी त्या गोष्टी ज्यांना आपण प्रीती म्हणून ओळखतो ते प्रत्यक्षात आपल्या कुटुंबाच्या आत्म्यांसाठी उघड द्वेषाचे उदाहरण असतात. आपल्यापैकी पुष्कळ जण सहमत होतील की एका व्यक्तीचे प्रथम सेवाकार्य हे घरी असते. परंतु आपण ते सेवाकार्य गंभीरपणे विचारात घेतो का? तुमच्या लेकरांसोबत किंवा दुसऱ्या तरुणांसोबत आपल्या संधीसाठी आपली प्राथमिकता काय आहे? त्यांना पहिल्या नोकरीसाठी तयार करणे किंवा येशू ख्रिस्ताची भेट घेण्यासाठी त्यांना इशारा करणे? आपण आपल्या मुलीने एके दिवशी लज्जित-चेहऱ्याने ख्रिस्तासमोर उभे असलेले, जगाच्या गोष्टींसाठी तिचे जीवन वाया घालवलेले पाहण्याच्या विचारापेक्षा तिने कमी मार्क प्राप्त केले याबद्दल अधिक काळजी करीत आहोत का? होय, आपण शाळेचे विषय तसेच आध्यात्मिक विषयाबाबत देखील विचार केला पाहिजे? परंतु जेव्हा आपण शाळेचा विचार करण्याबाबत बोलतो, तेव्हा आपण आध्यात्मिक बाबीकडे दुर्लक्ष करू नये! हे अशा प्रकारचे संतुलन येशूने शिकवले आहे. *"ह्या करायच्या होत्या, तरी त्या सोडायला पाहिजेत असे नाही"* (मत्तय. २३:२३)

**ख्रिस्ताचे अनुसरण करण्यात तुमची इच्छा जलदपणे कमी होत जाण्याच्या मार्ग हा कोणाबरोबर तरी नातेसंबंध बनविण्यास पाहावे जो येशू ख्रिस्ताचे अनुसरण करत नाही.**

आपण आपल्या लेकरांमध्ये सार्वकालिक उद्देशासाठी त्यांच्या मनात जगण्याची इच्छा प्रेरित करण्याऐवजी त्यांच्यासोबत सांसारिक जवळीकतेमध्ये राहण्याचा आनंद घेण्याचा प्रयत्न करत आहोत का, जरी ती इच्छा त्यांना विश्वाच्या दुसऱ्या बाजूला जगण्यासाठी नेण्यास कारणीभूत होत असेल? आपल्याला अधिक आनंद कशाने मिळेल : पांढऱ्या फुलांचे कुंपण असलेल्या घरात जीवन जगणाऱ्या आपल्या मुलांचे सांसारिक यश किंवा त्यांनी प्रभू ज्याच्या मनात त्यांच्यासाठी समय आणि सार्वकालिकतेसाठी सर्वात उत्तम आहे त्याला पूर्णपणे सोडून जीवन जगल्याचे पाहून? आपण आपल्या स्वतःला इतके नाकारले नाही की आपण ज्यांच्यावर सर्वात जास्त प्रेम करण्याचा हक्क दाखवतो त्यांच्यासाठी आपण वाया घालवलेल्या जीवनाची खरोखर इच्छा करतो? आपण स्वतःबरोबर आणि आपल्या लेकरांसोबत

खरोखर ठीक आहोत का की *"अमेरिकी स्वप्न"* पूर्ण करण्याचे ध्येय ठेवत आहोत जरी सार्वकालिकतेवर त्याचा कमीत कमी परिणाम होत असेल?

आपण आपल्या लेकरांना शुभवर्तमान न पोहचलेल्या लोकांपर्यंत ते घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहन देतो आणि स्वप्न पाहतो का? येशूच्या नावाकरिता ज्या पुरुष व स्त्रियांनी सर्वस्व अपर्ण केले त्यांच्या कथा आपण त्यांना सांगतो का? त्यांनी देखील विश्वासातील अशा लोकांचे अनुकरण करावे म्हणून आपण तशी महत्वाकांक्षा बाळगतो का? किंवा खेळातील यशस्वी आणि मनोरंजन करणाऱ्या व्यक्तींची नावे आपल्या घरात सर्वात जास्त परिचित आहेत? आपण आपल्या लेकरांच्या मनावर प्रार्थनेचे महत्व बिंबवतो का? किंवा मग ते *"द बैचलर, ब्रिटेन्स गॉट टैलंट* (The Bachelor, Britain's Got Talent) *आणि द मिस्ट्री सराऊडिंग लॉस्ट"* (The Mystery surrounding Lost) विषयी विचार करत घरातून बाहेर जातात का? आपण एसाव इतके मूर्ख आहोत का, आजच्या सुख -समाधान आणि आरामाच्या जीवनासाठी सार्वकालिकतेच्या गोष्टी सोडून देत आहोत का? काय होईल जर येशूने जे बोलले त्याचा वास्तवात तोच अर्थ होता? *"माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे"*

तुमचे नातेसंबंध, तुमचे वैवाहिक जीवन, तुमच्या मैत्री आणि तुमच्या कुटुंबाला घडवण्यासाठी वेळ काढा-समाजाद्वारे नाही, तर देवाच्या वचनाने. सांस्कृतिक ख्रिस्ती धर्मासमान थोडेसे वाटेल अशी अपेक्षा ठेवा.

जेव्हा आपण आपल्या जीवनाच्या ह्या क्षेत्राला घडवत राहतो, लक्षात ठेवा प्रभू ज्याला आपण आपली इच्छा समर्पित केली पाहिजे; हा एकमेव आहे ज्याने आपण सर्व नातेसंबंधात आनंद घेतो तो विचार आणि सत्यता निर्माण केली आहे. त्याच्या प्रीतीत आनंद करा.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. देवाच्या वचनातून सत्य असलेले कोणते काही सिद्धांत आहेत जे आपल्याला आधीच माहित आहेत ज्याचा आपण आपले नातेसंबंध घडवण्यासाठी वापर करू शकतो?

२. तुमच्या वर्तमान नातेसंबंधाच्या निर्णयावर भविष्याची भीती कशी परिणाम करत आहे?

३. तुमच्या भविष्यातील जोडीदाराने तुमचे कोणतेही संघर्ष किंवा समस्या सोडवाव्यात याची तुम्ही अपेक्षा बाळगत आहात का?

४. जर तुम्हाला मुले आहेत, तर त्यांच्यामध्ये तुम्ही कोणत्या प्रकारचे स्वप्न आणि उत्साह रुजवत आहात?

# १३

# देवाच्या वचनाने आपल्या शब्दांची रचना करणे

पुढे, चला आपण आपल्या शब्दांचा विचार करू या. केवळ तेच नाही जे आपल्या मुखातून बाहेर पडतात, तर जे आपल्या बोटांद्वारे लिहिले जातात, आपल्या शरीराच्या हालचालीवरून व्यक्त हो   तात किंवा आपल्या वस्त्रांवर प्रदर्शित असतात.

ख्रिस्ताचे अनुयायी म्हणून, आपली जीवने ही पत्र आहेत जी लोकांकडून वाचली जातात. *"तुम्हीच आमचे पत्र, आमच्या अंत:करणांवर लिहिलेले, सर्व माणसांना कळलेले आणि त्यांनी वाचलेले असे आहात; शाईने नव्हे, तर सदाजीवी देवाच्या आत्म्याने कोरलेले, दगडी पाट्यांवर नव्हे तर 'मांसमय अंत:करणरुपी पाट्यांवर कोरलेले', आमच्या सेवेच्या योगे तयार झालेले ख्रिस्ताचे पत्र, असे तुम्ही प्रसिद्ध आहात"* (२ करिंथ. ३:२-३). देवाचे वचन तुम्ही एक पत्र (किंवा एक ईमेल किंवा शब्द) असावे असे म्हणत नाही, तसेच ते हे देखील म्हणत नाही की मनुष्यांनी तुमचे जीवन वाचले पाहिजे. त्याऐवजी, ते आपल्याला सांगते की तुम्ही एक पत्र आहात आणि ते तुमचे जीवन वाचत आहेत. एकच प्रश्न जो मला आहे तो हा आहे : जग माझ्या जीवनात काय वाचत आहे- येशू ख्रिस्त किंवा नाटे ब्रॅमसेन?

रवी जकारिया, ज्याने माझ्या वयाच्या विसाव्या वर्षी माझ्या जीवनात महत्वाची भूमिका पार पाडली-ते म्हणाले, *"पुष्कळ लोक म्हणतात की येथे पाच शुभवर्तमान आहेत : मत्तय, मार्क, लूक, योहान आणि ख्रिस्ती लोक. दुर्दैवाने, बहुतेक लोक पहिले चार वाचणार नाहीत."*

असंख्य स्त्रोतांना गुणदर्शित करणारी, ही लहान कविता ह्या सत्यतेला समाविष्ट करून आहे.

तुम्ही एक शुभवर्तमान लिहित आहात, एका दिवसाला एक अध्याय,
गोष्टी ज्या तुम्ही करता आणि शब्द जे तुम्ही बोलता त्या द्वारे,
लोक जे तुम्ही लिहिलेले आहे, विकृत किंवा सत्य ते वाचतात,
तुमच्या मते, शुभवर्तमान काय आहे?

म्हणून देवाच्या वचनाने घडवले गेलेले जीवन कसे दिसते?

ख्रिस्ताचे अनुयायी म्हणून, आपल्या जवळ हे असावे की, *"विरोध करणाऱ्याला आपल्याविषयी काही वाईट बोलण्यास जागा नसल्यामुळे लाज वाटावी"* (तीत. २:८). केवळ निंदनीय बोलणे असण्यापेक्षा, आपल्याला आज्ञा दिली आहे : *"तुमच्या मुखातून कसलेच कुजके भाषण न निघो, पण गरजेप्रमाणे उन्नतीकरता जे चांगले तेच मात्र निघो, ह्यासाठी की, तेणेकडून ऐकणाऱ्यांना कृपादान प्राप्त व्हावे"* (इफिस. ४:२९). जे काही मुखातून बाहेर पडते ते निंदनीय नसावे, तर ऐकणाऱ्यांच्या उन्नतीसाठी असावे. जे काही कीबोर्डवर टाईप केले जाते त्याने कृपा प्रदान केली पाहिजे. हा साधा आराखडा केवळ आपल्या जीवनांना बदलू शकणार नाही, तर त्यांच्या देखील जीवनांना बदलू शकेल ज्यांच्याबरोबर आपण संपर्क करतो. आता, चला आपण आपल्या बोलण्यासाठी रचना कशी तयार करू शकतो त्यामध्ये प्रवास करू या जी देवाच्या वचनानुसार असावी.

## आपल्या शब्दांसाठी तपासणी

*"बंधुंनो, शेवटी इतके सांगतो की, जे काही सत्य, जे काही आदरणीय, जे काही न्याय्य, जे काही शुद्ध, जे काही प्रशंसनीय, जे काही श्रवणीय, जो काही सद्गुण, जी काही स्तुती, त्यांचे मनन करा"* (फिलिप्पै. ४:८).

**जे काही आपल्या मुखातून किंवा कीबोर्ड मधून बाहेर पडते त्याने आधीच आपल्या मनातून प्रवास केलेला असतो.**

कल्पना करा जर आपण हे देवाच्या मुखातून आलेले वाक्य केवळ आपल्या बोललेल्या शब्दांपुरतेच मर्यादित न ठेवता, आपल्या सामाजिक माध्यमात पोस्टवरही लागू केले : वाट्सअप, स्नैपचैट, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम (मी जे वापरलेले आहेत त्यांचाच मी उल्लेख करत आहे), आणि येणाऱ्या दिवसांमध्ये आणखी इतर काही ज्यांची या यादीत भर पडेल. कल्पना करा जर प्रत्येक पोस्टला पवित्र आत्म्याच्या तपासणीमधून जावे लागले. सर्वात महत्वाचे, फिलिप्पै. ४:८ तपासणी आपल्या

विचारांच्या जीवनाला प्रथम लागू केले पाहिजे, कारण जे काही आपल्या मुखातून किंवा कीबोर्ड मधून बाहेर पडते त्याने आधीच आपल्या मनातून प्रवास केलेला असतो.

चला आपण ह्या तपासणीकडे अधिक बारकाईने पाहू या.

१. हे खरे आहे का?

सत्य हे पहिल्या क्रमांकावर आहे! शब्द जे आपण बोलत आहोत किंवा पोस्ट करत आहोत ते खरे आहेत याची आपल्याला निश्चितपणे माहित आहे का? पूर्णपणे खरे आहेत का? (हा प्रश्न आपोआप बहुतेक बातम्यांच्या उगमांना अपात्र ठरवतो.) देवाचे चरित्र हे परिपूर्ण सत्य आहे (योहान. ३:३३). काहीही जे पूर्णपणे खरे नाही ते देवाला योग्यपणे प्रतिनिधित करत नाही. जर वाक्यामध्ये अतिशयोक्ती, खुशामत किंवा फसवणुकीचा समावेश असला, तर ते देवाच्या अंत:करणापासून आलेले नसते.

हे खरे आहे का?

नाही? तर यास नष्ट होऊ द्या. होय? तर #२ वर जा.

२. हे थोर आहे का?

*"थोर"* या शब्दाची व्याख्या *"व्यक्तिगत चांगले गुणधर्म किंवा उच्च नैतिक सिद्धांत आणि आदर्श असणे किंवा दाखवणे आहे; ते जे उत्कृष्ट किंवा अत्युच्च गुणधर्म दर्शवते."*[२८] फिलिप्पै. ४ मध्ये वापरलेले शब्द अधिक गहन आहेत. ग्रीक शब्द, सेमनॉस, नवीन करारात फक्त चार वेळा आढळतो. भाष्यकार बार्क्ले लिहितात की हा विशेष शब्द भाषांतरित करणे कठीण आहे, परंतु स्पष्ट करतात की जेव्हा सेमनॉस हा शब्द एखाद्या व्यक्तीचे वर्णन करण्यासाठी वापरला जातो, तेव्हा तो अशा व्यक्तीकडे निर्देश देतो की जो *"संपूर्ण जगभरातून भ्रमण करतो जसे काही [एक जो भ्रमण करीत आहे] ते देवाचे मंदिर आहे...परंतु शब्द [सेमनॉस] खरोखर अशा व्यक्तीचे वर्णन करतो ज्याच्यावर पवित्रतेचा मान आहे."*[२९] ख्रिस्ताच्या अनुयायांना *"पवित्र आत्म्याचे मंदिर"* (१ करिंथ ६:१९) आणि *"एक पत्र जे मनुष्य वाचतात"* (२ करिंथ. ३:२) असे म्हटले आहे. आपण जेव्हा बोलतो तेव्हा जगाला देवाची पवित्रता आणि प्रतिष्ठेचा अनुभवायला मिळते का?

हे थोर आहे का?

नाही? तर यास नष्ट होऊ द्या. होय? तर #३ वर जा.

३. हे न्यायी आहे का?

*"न्यायी"* असणे म्हणजे देवाच्या अपरिवर्तनीय मानकांनुसार जुळवून घेणे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, मानक जे योग्य आहे हे आपले मित्र किंवा आपली संस्कृती ठरवत नाही, तर देवाचे वचन ठरवते. कधी कधी या शब्दाचा *"निष्पाप"* किंवा *"धार्मिक"* असा अनुवादित केला जातो. जो परमेश्वर सर्वकाही पाहतो आणि ऐकतो त्याच्या उपस्थितीत आपले शब्द नीतीमान आहेत का?

हे न्यायी आहे का?

नाही? तर यास नष्ट होऊ द्या. होय? तर #४ वर जा.

४. हे शुद्ध आहे का?

हा एक शक्तिशाली शब्द आहे. पूर्णपणे अस्पष्ट, दूषिततेपासून मुक्त आणि इतरांना दूषित करण्यास असमर्थ अशी अवस्था दर्शवतो. आपण स्वतःला हा प्रश्न विचारतो का, *"असा काही मार्ग आहे का की हा विचार किंवा शब्द आत्म्याला दूषित करू शकतो आणि त्याला अशा दिशेने वळवतो, जी ख्रिस्ताकडे नेणारी नाही?"*

हे शुद्ध आहे का?

नाही? तर यास नष्ट होऊ द्या. होय? तर #५ वर जा.

५. ते आवडते आहे का?

हा शब्द प्रोसफाईल्स-हा सरळपणे *"सुंदर"* असा अर्थ व्यक्त करतो. हा ग्रीक शब्द दोन भागांनी बनलेला आहे, प्रोस म्हणजे *"त्याकडे"* आणि फाईल्स म्हणजे *"मित्र"*. सरळपणे म्हटल्यास, आवडते शब्द ते असतात जे इतरांना प्रसन्न करणारे असतात. ऐम्प्लीफाईड बायबल त्याच्या भाषांतरात *"आकर्षून घेणारा"* हा शब्द योग्यरीत्या वापरते. त्याचवेळेस काही संदर्भ असतात ज्यामध्ये प्रेमात बोललेले शब्द, सार्वकालिकतेच्या प्रकाशात काही वेळा प्रसन्न करणारे वाटत नाहीत, तसेच ते कदाचित एखाद्या मित्राने बोललेली सर्वात प्रेमळ गोष्ट असू शकते.

ते आवडते आहे का?

नाही? तर त्यास नष्ट होऊ द्या. होय? तर #६ वर जा.

६. तो चांगला अहवाल आहे का?

आपण यास साधे-सरळ ठेवू शकतो. आपण आपल्या शब्दांचा उपयोग देवाच्या गौरवासाठी आणि दुसऱ्यांचे नावलौकिक करण्यासाठी करत आहात का? काही वर्षांपूर्वी, देवाने मला माझ्या संदेशांमध्ये (किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक संदर्भात), माझे त्यांच्याबद्दल काहीही मत असो, इतर पाळक, शिक्षक किंवा ख्रिस्ताच्या अनुयायांबद्दल नकारात्मक बोलण्यासंबंधी दोषी ठरवले. याचा अर्थ हा नाही की आपण चुकीचे सिद्धांत आणि पापी आचरणांवर बोलू नये, परंतु आपण इतरांचे चारित्र्य खराब केल्यावाचून तसे केले पाहिजे.

तो चांगला अहवाल आहे का?

नाही? तर त्यास नष्ट होऊ द्या. होय? तर #७ वर जा.

७. त्यामध्ये काही सद्गुण आहे का?

*"सद्गुण"* साठी समानार्थी शब्द *"उत्कृष्टता"* आहे. माझे बोलणे माझ्या ऐकणाऱ्यांची उन्नती करते का? किंवा ते निष्क्रिय आणि व्यर्थ बडबड आहे? माझे शब्द प्रसंगानुरूप आणि आवश्यक आहेत का?

त्यामध्ये काही सद्गुण आहे का?

नाही? तर त्यास नष्ट होऊ द्या. होय? तर #८ वर जा.

८. त्यात काही कौतुकास्पद आहे का?

या आठ नियमांच्या संचामध्ये शेवटची तपासणी आपल्याला सूचित करते की आपले विचार आणि शब्द कौतुकास्पद असले पाहिजेत, याचा अर्थ *"ज्याचे कौतुक केले जाते"* किंवा *"टाळ्या वाजविल्या जाव्यात असे योग्य"*. *"सद्गुण"* पासून वेगळे, हा शब्द बायबलमध्ये देव, जो स्तुतीस पात्र आहे त्याचे वर्णन करण्यासाठी नेहमी वापरला गेला आहे. माझ्या संवादामुळे देवाची स्तुती आणि गौरव होतो का? हेच सर्वकाही आपण करत असताना, तेच ध्येय असले पाहिजे.

त्यात काही कौतुकास्पद आहे का?

नाही? तर त्यास नष्ट होऊ द्या. होय? तर त्यावर विचार करा, ते बोला, ते पोस्ट करा- देवाचा पवित्र आत्मा जसे आपल्याला मार्गदर्शन करतो.

आपला संवाद कायमचा बदलून जाईल जर आपण फिलिप्पै. ४:८ मधून तपासणी करण्याची सवय विकसित केली.

## अफवा पसरविणे : जेव्हा आपण हे करतो ज्याचा देव द्वेष करतो

आतापर्यंत, आपल्यापैकी काहींनी ठरवले असेल की ही रूपरेखा पद्धती खूप पुढे गेली आहे. परंतु काय होईल जर देवाचे वचन जे बोलते तोच त्याचा अर्थ असतो? काय होईल जर तुमच्यात राहणाऱ्या देवाच्या अनुभवाचे स्वातंत्र्य स्वतःचा नकार करून, स्वतः मरून आणि केवळ ख्रिस्तासाठी जगण्याद्वारे येतो? काय होईल जर देवाला तुमच्या बोलण्याच्या काही भागांमध्ये केवळ प्रवेश नको असेल, परंतु तुमच्या संपूर्ण अस्तित्वात. काय होईल जर देवाला तुमचे विचार, शब्द आणि पोस्ट वर प्रभुत्व पाहिजे असेल?

परंतु, चला आपण हे दुसऱ्या क्षेत्राला लागू करू या. अफवा पसरविणे.

ग्रीक भाषेत, सीथायरिस्टेस ("अफवा पसरविणे") म्हणजे : कुजबुज करणारा; गुपितपणे पाठीत खंजीर खुपसणारा; गुप्तपणे दुसऱ्या व्यक्तीचे चारित्र्य नष्ट करणारा; म्हणजे, गुप्तपणे, उघडपणे नाही, परंतु त्याऐवजी *"कोपऱ्यातून"* कार्य करणारा.

अशी वेळ कधी आली होती का जेव्हा दुसऱ्यांसाठी असे करणे योग्य होते? कधीतरी? आपण बहाणे बनवण्याआधी किंवा अपवादाचा विचार करण्याआधी, अफवा पसरविण्याबद्दल देवाचे वचन काय सांगते त्याकडे लक्ष देऊ या (ते त्याबद्दल बरेच काही बोलते). *"आपल्या शेजाऱ्याची गुप्तपणे चहाडी करणाऱ्यांचा मी विध्वंस करीन; जो कुर्रेबाज व गर्विष्ठ मनाचा आहे त्याची मी गय करणार नाही"* (स्तोत्र. १०१:५)

आता, कल्पना करा की जे देव ज्या गोष्टींचा द्वेष करतो त्यातील सात गोष्टींची आपल्याला यादी करायची आहे. योग्य ठरवलेल्या पापांपासून, खुन ते गर्व ते अनैतिकता ते अहंकारपर्यंत, देवाची यादी कशी असेल, याची कल्पना करा?

ओह थांबा. त्याने आधीच यादी बनवली आहे.

*"परमेश्वर ज्यांचा द्वेष करतो अशा सहा गोष्टी आहेत; नव्हे, त्याला अशा सात गोष्टींचा वीट आहे; उन्मत्त दृष्टी, लबाड बोलणारी जिव्हा, निर्दोष रक्त पाडणारे हात, दुष्ट योजना करणारे अंत:करण, दुष्कर्म करण्यास त्वरेने धावणारे पाय, लबाड बोलणारा खोटा साक्षी, व भावाभावात वैमनस्य उत्पन्न करणारा मनुष्य ह्या त्या होत"* (नीतीसूत्रे ६:१६-१९). तुम्ही

याकडे लक्ष दिले का की सात गोष्टींपैकी तीन गोष्टींचा प्रभू द्वेष करतो ज्यामध्ये आपले शब्द सामावलेले आहेत, शेवटचे दोन गोष्टी अफवा पसरविण्याशी संबंधित आहेत?

तुम्ही याकडे लक्ष दिले का की अफवा पसरवणे आणि निंदा करण्यास देव खून, लैंगिक अनैतिकता आणि देवाचा द्वेष करणे यांच्या वर्गात ठेवतो? *"आणखी ज्या अर्थी देवाची जाणीव ठेवण्यास ते मान्य झाले नाहीत, त्या अर्थी देवाने त्यांना अनुचित कर्मे करण्यास विपरीत मनाच्या स्वाधीन केले. सर्व प्रकारची अनीती, जारकर्म, दुष्टपणा, लोभ, वाईटपणा ह्यांनी ते भरलेले होते. ते* ***चहाडखोर, निंदक****, देवाचा तिटकारा असलेले, उद्धट, गर्विष्ठ, बढाईखोर, कुकर्मकल्पक, मातापितरांची अवज्ञा करणारे, निर्बुद्ध, वचनभंग करणारे, ममताहीन, निर्दय असे होते. जे ह्या रीतीने वागतात ते मरणास पात्र आहेत, हा देवाचा निर्णय त्यांना ठाऊक असूनही ते स्वतः त्याच गोष्टी करत असतात; इतकेच केवळ नव्हे तर त्या करणाऱ्यांना संमतीही देतात"* (रोम. १:२८-३२).

ही तीन वचने दिलेली असताना, अफवा पसरविण्याचा कधी चांगला वेळ असतो का?

## उपासना करण्याऐवजी कुरकुर करणे

तक्रार करण्याबद्दल काय? ओह, बरोबर. हे पुस्तक बंद करा, तुम्हाला अजूनही शक्य असेल तोपर्यंत!

फारच उशीर झाला आहे.

*"**जे काही** तुम्ही कराल ते कुरकुर व वादविवाद न करता करा; ह्यासाठी की, ह्या कुटिल व विपरीत पिढीत तुम्ही निर्दोष व निरुपद्रवी अशी देवाची निष्कलंक मुले असे व्हावे. त्या लोकांमध्ये तुम्ही जीवनाचे वचन पुढे करून दाखवताना ज्योतीसारखे जगात दिसता"* (फिलिप्पै. २:१४-१५). ह्या वचनांमध्ये *"जे काही"* याबद्दल तुम्ही काय विचार करता? होय, ते म्हणजे सर्वकाही.

तक्रार करणे हे अविश्वासाचे लक्षण आहे. कुरकुर करणे हे अन्य मार्गाने असे म्हणणे आहे, *"देव नेहमीच चांगला नाही"* किंवा *" देव हा नेहमीच विश्वासयोग्य नाही."*

इस्राएली लोकांनी नुकतेच तांबड्या समुद्राला पार करून आले होते. प्रभूला स्तुतीचे गीत गायल्यानंतर, निर्गम १५:२२ आपल्याला सांगते, *"ते शूर नावाच्या रानात जाऊन पोहचले; त्या रानातून तीन दिवस कूच करीत असता त्यांना पाणी कुठे मिळेना."* ह्या क्षणी लोक

कुरकुर आणि तक्रार करू लागले, जे कार्य त्यांनी रानातील त्यांच्या संपूर्ण प्रवासात चालू ठेवले. आणि रानात तीन दिवस चालून गेल्यानंतर त्यांनी काय करायला पाहिजे होते? निर्गम आपल्याला अनेक अहवाल देते की इस्राएली लोकांना रानात तीन दिवसांचा प्रवास करायचा होता जेणेकरून देवाला अर्पण सादर करावे व त्याची उपासना करावी. आणि तीन दिवसांनंतर, त्याऐवजी त्यांनी काय केले?

त्यांनी तक्रार केली. उपासना करण्याऐवजी ते कुरकुर करत होते.

**जेव्हा आपल्याला कुरकुर करण्याचा मोह होतो, ही शक्यतो उपासना करण्याची वेळ आहे.**

हे महत्वाचे आहे. जेव्हा आपल्याला कुरकुर करण्याचा मोह होतो, ही शक्यतो उपासना करण्याची वेळ आहे. जेव्हा परिस्थिती कठीण वाटत असते, तेव्हा ती देवाचे गौरव प्रदर्शित करण्यासाठी मंच तयार करत असते. आपल्या हृदयाला तक्रार करावीशी वाटते का जेव्हा आपण ज्यास पात्र आहोत असा विचार करत असतो त्यापेक्षा आपल्याला कमी मिळते? देवाची आपल्या कुरकुरीला उपासनेमध्ये बदलायची इच्छा असते, या कारणासाठी नाही की ते त्याला गौरव आणते, परंतु यामुळे की ख्रिस्तामध्ये जी आशा आपल्याला आहे त्याची झलक ते जगाला करून देते. तक्रार होते जेव्हा आपल्या इच्छा पूर्ण होत नाहीत, परंतु जर आपल्या जीवनासाठी असलेल्या देवाच्या सिद्ध योजनेत आपल्या अपेक्षा कमी पडल्या तर काय होईल?

तक्रार करण्याच्या आत्म्याच्या विरोधात आभारी आत्मा आहे. *"सर्व स्थितीत उपकारस्तुती करा; कारण तुमच्याविषयी ख्रिस्त येशूमध्ये देवाची इच्छा हीच आहे"* (१ थेस्सल. ५:१८). अशा आत्म्यांना हिरावून घेणाऱ्यांपैकी एक म्हणजे असंतोष आहे. तो चोर येतो आणि आपला आनंद हिरावून घेतो जेव्हा आपण आपली मने सार्वकालिकतेवर ठेवण्याऐवजी सांसारिक गोष्टींवर केंद्रित करतो. परंतु आपण देवाबद्दल कृतज्ञतेच्या आत्म्याने जगत असलो, तर तो आपल्याला इतरांबद्दल विचार करण्याच्या आत्म्याकडे मार्गदर्शन करील.

## चिंतेचा मृत्यू

चिंता करण्याबद्दल देवाचे वचन काय म्हणते?

येशूने देखील हेच सांगितले. वास्तवात, ही एक वाईट कल्पना आहे असे त्याने केवळ सुचविले नाही; तर त्याने त्याच्या शिष्यांना शिकवले की ते जे त्याचे ज्ञान, सामर्थ्य आणि

प्रीतीवर विश्वास ठेवतात त्यांच्यामध्ये चिंता करण्याला जागा नसावी. नुकतेच, ख्रिस्ताचा अनुयायी असल्याचा दावा करणाऱ्यास दुसऱ्याला सल्ला देताना मी वरवर ऐकले, *"चिंता करणे हे सामान्य आहे."* आहे का? वासना जितकी *"सामान्य"* आहे तितकीच चिंता करणे देखील आहे, पण त्यामुळे दोघेही योग्य ठरतात का? डोंगरावरील त्याच्या प्रवचनात, येशू म्हणाला, *"ह्यास्तव मी तुम्हांला सांगतो की, आपल्या जिवाविषयी म्हणजे आपण काय खावे व काय प्यावे; आणि आपल्या शरीराविषयी, म्हणजे आपण काय पांघरावे, ह्याची चिंता करत बसू नका, अन्नापेक्षा जीव आणि वस्त्रापेक्षा शरीर अधिक आहे की नाही?"* (मत्तय. ६:२५).

येशू त्याच प्रवचनात चिंता करू नका ही ओळ चार वेळा वारंवार म्हणतो. जर देह धारण केलेला परमेश्वर एकाच ठिकाणी तीच गोष्ट पाच वेळा म्हणतो, तर आपण त्याकडे लक्ष दिले पाहिजे. चिंता करणे हे देवाच्या चरित्राचा अपमान करणे आणि त्याची काळजी, दया, सामर्थ्य आणि प्रीतीचा अस्वीकार करणे आहे. तसेच, चिंता करणारा आत्मा तक्रार करणाऱ्या आत्म्यासाठी मार्ग तयार करतो.

काहीही होवो किंवा कोण नियंत्रण ठेवून आहे त्या द्वारे आपण आपल्या भविष्याची तयारी करत आहोत का?

चिंतेवर उपाय हा येशूच्या पुढील वचनांमध्ये आढळतो. *"आकाशातील पाखरांकडे निरखून पाहा; ती पेरणी करत नाहीत, कापणी करत नाहीत की कोठारात साठवत नाहीत; तरी तुमचा स्वर्गीय पिता त्यांना खायला देतो; तुम्ही त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहात की नाही? चिंता करून आपल्या आयुष्याची दोरी हातभार वाढवण्यास तुमच्यापैकी कोण समर्थ आहे?"* (मत्तय. ६:२६-२७).

नायजेर मधील, माझ्या घराला सुंदर बगीचा आहे (जेव्हा मी तेथे गेलो तेव्हा केवळ रानातील जमिनीतून ते उगवलेले होते) ज्यामध्ये पानांनी झाकलेला लतामंडप आहे. माझ्या सकाळच्या नित्याच्या सवयींमध्ये वेलींच्या मध्ये बसून पक्ष्यांचे गाणे ऐकणे आहे आणि याचे स्मरण करावे की एक नवीन दिवस उगवला आहे ज्यामध्ये, पुन्हा एकदा, त्यांचा निर्माणकर्ता त्यांच्यासाठी काळजी करत आहे. जर पक्षी गाऊ शकतात, तर मी देखील त्याच्यावर विश्वास कसा ठेवू नये आणि त्याची स्तुती कशी करू नये? मला स्वर्गीय पिता असल्यामुळे, मी माझ्या चिंता प्रार्थनेत बदलल्या नाही पाहिजेत का?

*"कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा. म्हणजे सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाने दिलेले शांती तुमची अंत:करणे व तुमचे विचार ख्रिस्त येशूच्या ठायी राखील"* (फिलिप्पै. ४:६-७).

## आपले बोलणे समर्पित करणे

आपल्या विचारांना आणि बोलण्याला देवाच्या वचनाने तयार करू देणे कठीण वाटते. असो, तुम्हाला हे समजत असेल....होय!

याकोब आपल्याला सांगतो, *"परंतु मनुष्यांपैकी कोणीही जिभेला वश करण्यास समर्थ नाही; ती शांतिरहित असून दुष्ट आहे व प्राणघातक विषाने भरलेली आहे"* (याकोब ३:८). तर काय करू शकता? आपण अधिक प्रयत्न केले पाहिजे का? नाही, आपण आपल्यावरील नियंत्रणाला सोडून दिले पाहिजे. आपण पवित्र आत्म्याला समर्पित झाले पाहिजे आणि त्याला आपले विचार, आपल्या जीभा, आपले शब्द, आपले पोस्ट, आपले स्नैप्स, आपले ट्वीट्स...आपल्या प्रत्येक गोष्टींवर नियंत्रण करू देण्यास आमंत्रित केले पाहिजे. हे समर्पण केवळ तेव्हाच घडते जेव्हा आपण ओळखतो की आपण मृत झालो आहोत आणि ख्रिस्त आता आपल्यामध्ये जिवंत आहे. होय, पुन्हा एकदा, आपण जुना स्वभाव आणि त्याच्या इच्छांचा नकार केला पाहिजे.

रोम. ६:१३ मध्ये, आपल्याला आज्ञा दिली आहे, *"आणि तुम्ही आपले अवयव अनीतीची साधने होण्याकरता पापाला समर्पण करत राहू नका; तर मेलेल्यांतून जिवंत झालेले असे स्वतःस देवाला समर्पण करा आणि आपले अवयव नीतीची साधने होण्याकरता देवाला समर्पण करा."* आपल्या शरीराचे अवयव ही साधने आहेत. *"साधने"* साठी ग्रीक शब्द जो येथे वापरला आहे तो तटस्थ आहे. ही साधने (मेंदू, जीभ, डोळे, कान, हात, पाय इत्यादी ) हे चांगले किंवा वाईट नाही. हे समजणे आपल्याला काही प्रश्न विचारायला लावते :

- प्रभू आणि त्याच्या वचनाचा विचार केल्यावाचून मी कार्य करण्यास किंवा बोलण्यास जलद आहे का?
- माझ्या शरीराच्या अवयवांवर कोण नियंत्रण ठेवून आहे?
- मी ही साधने कोणाला सोपवीत आहे?

- दिवसासाठी कोण निर्णय करत आहे? स्वतः? किंवा पवित्र आत्मा?
- मी माझे मन आणि मुख प्रभूला समर्पित केले आहे का?

देवाला अशा प्रकारे अधीन राहून जगणे हा एक-वेळचा निर्णय नाही. त्यासाठी क्षणोक्षणी समर्पण करणे आवश्यक आहे. गीत लेखक, काटे विल्किन्सन, यांनी हे परिपूर्णपणे व्यक्त केले आहे :

> ख्रिस्त, माझा तारणारा याचे मन,
>
> दररोज माझ्या जीवनात राहो,
>
> त्याची प्रीती आणि सामर्थ्याने नियंत्रित होण्या द्वारे,
>
> मी सर्वकाही करीन आणि बोलेन.[३०]

असे होईल का?

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. तुमच्या जीवनाच्या पत्रातून कोणत्या, चांगल्या किंवा वाईट गोष्टी इतर वाचत आहेत?

२. फिलिप्पै. ४:८ मधील आठ तपासणींमधून कोणते लागू करण्यास तुम्हाला संघर्ष होतो? ह्या भागात तुम्ही विजय कसे मिळवू शकाल?

३. आपल्या जीवनात जेव्हा देव उपासनेची इच्छा दर्शवतो तेव्हा कुरकुर किंवा तक्रार केव्हा होते?

४. भविष्यात तक्रार करण्यासाठी चिंता आपल्याला कोठे तयार करत आहे ?

५. कोणाच्या नियंत्रणात आहे यापेक्षा काय घडू शकते यावरून मी माझे भविष्य कसे घडवत आहे ?

# १४

# देवाच्या वचनाने क्षमा घडवणे

यावर गंभीरपणे कल्पना करा.

काय होईल जर आपण प्रत्येक जीवनाला येशू ख्रिस्ताच्या दृष्टीने पाहिले?

निःसंशयपणे, आपले अस्तित्व बदलले जाईल आणि आपल्या सभोवतालचे जग आपल्यामध्ये येशूला पाहतील.

होय, ख्रिस्त इतरांबद्दल काय विचार करतो हे आपण ओळखू शकतो, परंतु आपल्याला त्याच्यासारखे विचार करण्याची इच्छा आहे का? पौलाने फिलीप्पी येथील मंडळीला प्रोत्साहन दिले, *"अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो"* (फिलिप्पै. २:५). येथे आणखी एक महत्वपूर्ण मार्ग आहे आपण ख्रिस्ता प्रति समर्पित होण्यासाठी स्वतःचा नकार करायचा आहे.

आपली दररोज ज्या आत्म्यांशी भेट होते त्यांच्यासाठी ख्रिस्ताचे मन काय आहे? - आपल्या स्थानिक हॉटेलमध्ये रोजचे लोक, बातम्यावरील हिंसक कार्ये, सामाजिक माध्यमावरील मित्रांची मते, किंवा वाटर कुलरजवळ ज्या कर्मचाऱ्यांशी आपण गप्पा मारतो? बऱ्याच वेळा, लोकांची कृत्ये, शब्द, प्रतिष्ठा, राजकीय संबंधाद्वारे किंवा त्यांच्याबरोबरच्या भूतकाळातील आपल्या चर्चेवरून आपण त्यांच्या विषयी आपले मत तयार करतो. काय होईल, जर त्याऐवजी, देवाचे वचन त्यांच्याविषयी काय म्हणते त्यावरून आपण त्यांची रचना केली तर?

ख्रिस्तासारखे पाहण्यासाठी आणि विचार करण्यासाठी आपण आपले हृदय आणि डोळे पुन्हा योग्य करण्यासाठी काय करावे लागेल? आपल्याला आत्म्यांसाठी देवाच्या हृदयाशी आपली हृदये समरूप व्हावीत अशी इच्छा आहे का?

## सर्व लोकांबद्दल देवाचा दृष्टीकोन

चला आपण या तीन गोष्टींनी सुरूवात करू या जी प्रत्येक व्यक्तीबाबत खरी आहेत असे आपल्याला ठाऊक आहे.

## सत्य # १ : सर्व लोकांसाठी देवाचे प्रेम

दावीद राजाने उद्गारले, *"मर्त्य मनुष्य तो काय की तू त्याची आठवण करावीस? मानव तो काय की तू त्याला दर्शन द्यावेस?"* (स्तोत्र. ८:४). प्रभू येशू म्हणाला, *"देवाने जगावर एवढी प्रीती केली"* (योहान. ३:१६). देव लोकांना प्रेम करतो. कोणाबद्दल माझ्या विचारांची पर्वा केल्यावाचून, मी हे समजू शकतो की देव यांच्याबद्दल विचार करतो. यीर्मया ३१:३ मध्ये, देव त्याच्या लोकांना स्मरण करून देतो, *"मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो."* आपल्या हृदयाच्या परिवर्तनासाठी उत्प्रेरक हे आहे की *"पहिल्याने त्याने आपल्यावर प्रीती केली, म्हणून आपण त्याच्यावर प्रीती करतो"* (१ योहान. ४:१९).

## सत्य # २ : देवाने सर्व लोकांना निर्माण केले आहे

स्तोत्रकर्ता स्मरण करतो, *"तूच माझे अंतर्याम निर्माण केलेस; तूच माझ्या आईच्या उदरी माझी घडण केलीस. भयप्रद व अद्भुत रीतीने माझी घडण झाली आहे, म्हणून मी तुझे उपकारस्मरण करतो; तुझी कृत्य अद्भुत आहेत हे माझा जीव पूर्णपणे जाणून आहे"* (स्तोत्र. १३९:१३-१४). हे विलक्षण आहे. जेव्हा तुम्ही तुमच्या आईच्या गर्भात होता, ऐम्नीओटिक द्रवात तरंगत होता, देवाने तुम्हाला एकत्र जोडले, डीएनए डबल हेलिक्स आणि सर्व काही. परिपूर्णपणे. काही चूक न करता.

माझी आजी दयेने माझ्यासाठी सर्वात आश्चर्यकारक बेनीस (किंवा जसे कैनाडाइ मित्रे त्यास म्हणतात : 'टोक्स") विणकाम करते. तिला विणत असताना पाहत, मी एक महत्वाची गोष्ट शिकलो. जेव्हा ती चूक करते, तेव्हा ती त्या धाग्याला त्या स्थानापर्यंत ओढून काढते जेथे चूक झाली होती, आणि तेथून पुन्हा विणायला सुरूवात करते. त्याचा परिणाम असा होतो की शेवटी कोणताही धागा किंवा रेषा ढिला न राहता सुंदर बेनी तयार होते. देवाच्या अचूकतेची कल्पना करा. तो कुशल कलाकार, कारागीर आणि डिझायनर आहे- आणि तुम्हांला बनविण्यात, त्याने काही चूक केली नाही. हे खरे आहे की आदामाच्या निवडीमुळे

**ज्या आत्म्यांना आपण नेहमी तुच्छतेने पाहतो ते शत्रूला बळी पडलेले असतात.**

आपण पापात जन्मलो आहोत. आणि हे खरे आहे की आपल्याला एका तारणाऱ्याची नितांत गरज आहे. परंतु हे देखील खरे आहे की देवाने तुम्हाला निर्माण करण्यात काही चूक केलेली नाही. तुम्ही-होय, तुम्हांला-भयप्रद व अद्भुत रीतीने घडवलेले आहे. आणि तसेच ज्या सर्व लोकांना तुम्ही भेटता त्यांनाही.

## सत्य # ३ : देवाने सर्व लोकांसाठी त्याच्या पुत्राला दिले

येशूने त्याच्या शिष्यांना सांगितले, *"आपल्या मित्रांकरता आपला प्राण द्यावा ह्यापेक्षा कोणाची प्रीती मोठी नाही"* (योहान. १५:१३). वधस्तंभावर त्याच्या मृत्यूने, त्याने सर्व लोकांसाठी देवाच्या प्रीतीची पातळी प्रकट केली. त्याने त्याच्या पुत्राला माझ्या आणि त्यांच्या पापांसाठी दु:ख सोसण्यास आणि मरण्यास दिले. *"आणि तोच आपल्या पापांबद्दल प्रायश्चित्त आहे; केवळ आपल्याच पापांबद्दल नव्हे तर सर्व जगाच्याही पापांबद्दल आहे"* (१ योहान. २:२).

अशा प्रकारे, प्रत्येक व्यक्ती ज्यांना मी पाहतो किंवा भेटतो तो : (१) देवाकडून प्रीती केलेला आहे, (२) जशी देवाची इच्छा होती त्याप्रमाणे प्रत्यक्ष निर्माण केलेला आहे, आणि (३) देवाच्या दृष्टीने इतका मौल्यवान आहे की त्याने त्याच्या पुत्राला दिले की त्यांचे सार्वकालिक दोष स्वतःवर घ्यावे. असे ज्ञान लोकांबद्दल माझ्या दृष्टीकोनाला कसे बदलणार नाही?

देवाच्या दृष्टीने एक आत्म्याला पाहण्यासाठी मला काय अडथळा करते?

## आंधळ्या व्यक्तीला चापट मारणे

जरी मी एक खोडकर मुलगा होतो, तरी अंध व्यक्तीला चापट मारल्याबद्दल माझ्या पालकांना मला कधीही शिक्षा करावी लागली नाही. मी असा अपराध कधीही केला नाही. तुम्ही प्रभावित झालात का? (शक्यता आहे, तुम्ही माझ्या चांगल्या आचरणाबद्दल अप्रभावीत झाला आहात!)

जे पापात अडकलेले आहेत त्यांच्याबद्दल देवाचे वचन काय म्हणते त्याचा विचार करा. *"परंतु आमची सुवार्ता आच्छादलेली असल्यास ज्यांचा नाश होत आहे त्यांच्या ठायी ती आच्छादलेली आहे. त्यांची म्हणजे विश्वास न ठेवणाऱ्या लोकांची मने ह्या युगाच्या दैवताने आंधळी केली आहे, अशा हेतूने की, देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या गौरवी सुवार्तेचा प्रकाश त्यांच्यावर प्रकाशू नये"* (२ करिंथ. ४:३-४). अविश्वासी लोक आंधळे झाले आहेत.

ते सैतानाच्या बंधनात आहेत जो त्यांना आंधळे करत आहे. ज्या आत्म्यांना आपण नेहमी तुच्छतेने पाहतो ते शत्रूला बळी पडलेले असतात.

बंधनात आणि आंधळे असलेले आत्मे ज्यांनी आपल्या तारणाऱ्याच्या कृपेचा अनुभव केलेला नाही, अशा आत्मांकडून बायबलच्या उपदेशांप्रती समर्पण करण्याची आपण अपेक्षा ठेवली पाहिजे का? पुनर्निमित न झालेल्या जगाच्या कोणत्या भागांवर आपण अशी अपेक्षा सध्या लादत आहोत?

ज्यावेळेस पुष्कळ विश्वासणारे येशूच्या दृष्टीने भटकलेल्या आत्म्यांना पाहत असताना आणि त्यांच्याजवळ त्याच्या दयेने पोहचत आहेत, त्यावेळेस तथाकथित मंडळी त्यांना वारंवार चापट मारत आहेत हे त्रासदायक आहे. हो की नाही, आपण दृष्टीदोष असलेल्यांकडे जात नाही आणि त्यांच्या चेहऱ्यावर चापट मारत नाही. परंतु आपण आध्यात्मिक समतुल्यता करत असू शकतो : अपुनर्जीवित असलेल्यांना त्यांच्या आंतरिक आणि बाह्य पोकळपणासाठी सेवा करण्याऐवजी त्यांची बाह्ये कृत्ये सुधारत असू. देवाच्या वचनात प्रदान केलेल्या रचनेऐवजी आपण जे पाहतो, ऐकतो केवळ त्याद्वारे लोकांना एका विशिष्ट चौकटीत किती वारंवार बसवत असतो? आपण त्यांच्यासाठी प्रार्थना करण्यास समर्पित असण्याऐवजी त्यांच्या आचरणांबद्दल दोष देण्यास तत्पर असतो का? लोकांनी देवाची प्रीती आणि सत्य जाणावे यासाठी त्यांच्यावतीने आपल्याला वेळ खर्च करायचा आहे आणि केलाही पाहिजे असे असण्याऐवजी आपण त्यांच्याबद्दल अफवा पसरवण्याबद्दल (म्हणजे इतरांनी कदाचित ओळखावे की ते किती वाईट आहेत) अधिक तयार असतो का? जर तसे आहे, तर आपण प्रत्यक्षात, आंधळया लोकांना चापट मारत आहोत.

सतत, आपण एखाद्या व्यक्तीला ते करत असलेल्या विशेष पापाने वर्गवारीत ठेवत असतो परंतु तेच जे त्यांची व्याख्या करत नाही. देव केवळ लोकांच्या दोन वर्गवारी पाहतो : (१) ते ज्यांनी येशू ख्रिस्ताच्या पूर्ण केलेल्या कामा द्वारे क्षमा प्राप्त केली आहे, आणि (२) ज्यांनी ती क्षमा अद्याप प्राप्त केलेली नाही.

आपण प्रत्येक आत्म्याला वधस्तंभाच्या प्रकाशात पाहतो का, मग तो आंधळा असो वा नसो? पहिल्या वर्गवारीतील लोक ख्रिस्त कोण आहे आणि त्याने त्यांच्यासाठी काय केले आहे यावर विश्वास ठेवण्याद्वारे त्यांना नीतीमान घोषित केले गेले आहेत. ते जे दुसऱ्या वर्गवारीत आहेत, ते अजूनही आंधळे आहेत आणि त्यांच्या पापात भटकलेले आहेत, ते अंधाराच्या सैतानाच्या राज्यात बंधनात आहेत. पौलाचे इफिसकरांस पत्र आपल्याला स्मरण करून देते की आपले युद्ध हे लोकांबरोबर नाही तर सैतानाच्या योजनांबरोबर आहे.

*"कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतींबरोबर, आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे"* (इफिस. ६:१२).

आपला शत्रू हा मांस आणि शरीर नाही. कारण मी जगाच्या एका धर्मात जगत आहे, जेथे युद्ध सामान्य गोष्ट आहे, म्हणून आत्म्यांचा विचार करताना मी स्वतःला नेहमी हा प्रश्न विचारतो : *"त्यांच्या नसांमधून रक्त वाहत आहे का?"* जर तर असेल, तर मग ते माझे शत्रू नाहीत. आत्म्यांना अशा प्रकारे पाहणे आपल्याला २ करिंथ. ४:१८ ची गहन समज देते. *"आम्ही दृश्य गोष्टींकडे नाही तर अदृश्य गोष्टींकडे लक्ष लावतो; करण दृश्य गोष्टी क्षणिक आहेत, पण अदृश्य गोष्टी सार्वकालिक आहेत."*

आपण ह्या भटकलेल्या आत्म्यांसाठी तात्पुरते उपाय शोधत आहोत का जेव्हा सार्वकालिक आत्मे धोक्यात आहेत? येशूने काही लोकांच्या गटांवर स्वर्गातून अग्नीचा वर्षाव करावा अशी योहान आणि याकोब यांची इच्छा होती. येशूने त्यांना झिडकारले आणि म्हटले, *"तुम्ही कसल्या वृत्तीचे आहा हे तुम्हांला समजत नाही, कारण मनुष्याचा पुत्र लोकांच्या जीवांचा नाश करायला नव्हे तर त्यांना तारायला आला आहे"* (लूक. ९:५५-५६).

आपल्याला सैतानाच्या योजना माहित आहेत, पण तरीही आपण यास बळी पडत आहोत का?

आपण ख्रिस्ताची करुणा सांगण्यापेक्षा आपल्या देशाच्या व्यवहाराला बदलण्यावर अधिक केंद्रित आहोत का? आपण एक मंडळी म्हणून, पाप्यांना प्रेम करण्याऐवजी मानवजातीच्या नैतिकतेचे कायदे करण्यासंबंधी अधिक विचार करत आहोत का? चांगले आचरण कोणाचे तारण करू शकत नाही. शुभवर्तमान प्रत्येकाचे तारण करू शकते. आपण लोकांच्या वरवरच्या, बाह्य आचरणांना बदलण्याचा प्रयत्न करत आहोत का किंवा आपण देवाच्या बाह्य क्षमेला सांगत आहोत जे हृदयाला बदलते? देवाने येशूला ह्या पतित जगाला सुधारण्यासाठी पाठवले नाही. तो पाप्यांचे परिवर्तन करण्यास आणि त्यांना आपली वधू म्हणून बोलावण्यास आला.

## क्षमाशीलतेचे स्वातंत्र्य

प्रश्न उद्भवतो. आपण जगाला जसे ख्रिस्त पाहतो तसे खरेच पाहू शकतो का? आपल्या भूतकाळातील सर्व यातना आणि आपल्या सभोवती असलेल्या दुष्टपणासह, आपण क्षमा करू शकतो का, आणि कालवरीचे प्रेम या गोंधळलेल्या जगाला दाखवू शकतो का? हा पुढील भाग अपूर्ण असेल, आणि कदाचित, काहींसाठी वेदनादायक असेल. ते

आपल्याला आपल्या प्राथमिक प्रश्नाकडे परत आणेल : काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

*नडिक्स डेग नगा वोलोफ?*

परदेशी भाषे सारखे वाटते? ही वोलोफ भाषा आहे, सेनेगल राष्ट्रातील प्रचलित भाषा आहे, जेथे माझा जन्म झाला (एफवायआय, या वाक्प्रचाराचा अर्थ, "तुम्ही वोलोफ समजत का?"). त्याचप्रमाणे, येशूचे शब्द आपल्या कानाला आज परकेच वाटतात. *"परंतु तुम्हा ऐकणाऱ्यांस मी सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा; जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा; जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या; जे तुमची निर्भत्सना करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा"* (लूक. ६:२७-२८). येशू निष्क्रिय अज्ञानाचे समर्थन करत नाही; तो सक्रीय प्रीती शिकवत आहे. मी ऐकले आहे ख्रिस्ती व्यक्ती मला सांगतात हे शब्द व्यवहारिक किंवा लागू करण्यासारखे नाहीत, परंतु काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता? काय होईल जर आपल्याला ह्याच शब्दांनी आपले प्रत्येक संभाषण तयार करायचे आहे- तर आपण ख्रिस्ता समान अधिक वाटू का?

मी मध्य पूर्वेत असताना, माझ्या शेजारी अत्याधिक दंगे घडले. जेव्हा मी त्या बळी पडलेल्या लोकांच्या घरांना भेटी देत होतो, एका शेजाऱ्याने मला सांगितले, *"जर कोणी मला मारले तर, मी त्याला परत मारले पाहिजे. हे असेच चालते."*

हे अशाच प्रकारे झाले पाहिजे का?

काय होईल जर भूतकाळ लक्षात घेऊन चालणाऱ्यांसाठी क्षमा ही मुक्तीचा अगदी मार्ग ठरू शकते? अपमानित आणि अपमान करणाऱ्यांसाठी क्षमा हा मुक्तीचा मार्ग होऊ शकतो का? ख्रिस्ताचे शब्द आणि कार्य समजून घेण्यास मानव असमर्थ असल्याने आपले जग वाढत्या आक्रमकतेच्या अधोगतीत अडकले नाही का? कटुता आणि राग न बाळगल्याने निराकरण न झालेले ताण, निराशा आणि राग यांची पकड घट्ट होत नाही का? लुईस स्मेडूस म्हणाले, 'क्षमा ही कैद्याला मुक्त करणे आहे आणि तुम्ही हे पाहता की कैदी हे तुम्ही स्वतःच होता."[३१]

## क्षमाशीलतेची रचना

येशूने आपल्या शिष्यांना काय प्रार्थना करण्यास शिकवले? *"जसे आम्ही आपल्या ऋण्यांस ऋण सोडले आहे, तशी तू आमची ऋणे आम्हांला सोड"* (मत्तय. ६:१२). ग्रीक भाषेत

*"जसे"* या शब्दाचे भाषांतर करण्यासाठी काही शब्दांचा वापर केलेला आहे. एक म्हणजे *"सारखा प्रकार"* आणि दुसरे, *"अगदी सारखे."* मत्तय मध्ये वापरलेला शब्द हा *"अगदी सारखे"* हा आहे. या प्रार्थनेत, आपण जशी दुसऱ्यांना क्षमा केली आहे तशी तू आम्हांला क्षमा कर म्हणून देवाला विनंती करत आहोत. कोणाला ही प्रार्थना का करावीशी वाटेल? जसे आपण दुसऱ्यांना क्षमा करतो तसेच देवाने आपल्याला क्षमा करावी अशी आपली इच्छा आहे का? प्रारंभीच्या मंडळीतील एक महान धर्मतज्ज्ञ, अगस्टीन यांनी येशूच्या या प्रार्थनेच्या ह्या भागाला *"भीतीदायक"* आणि *"धोकादायक"* विनंती असे म्हटले आहे.[३२]

जर तुम्हांला वाटत असेल की क्षमा ही येशूच्या उप-मुद्यांपैकी एक आहे, तर त्याने प्रार्थना संपविल्यानंतर लगेचच तो या मुद्द्याकडे वळला आहे : *"कारण जर तुम्ही लोकांना त्यांच्या अपराधांची क्षमा केली तर तुमचा स्वर्गीय पिता तुम्हांलाही क्षमा करील; परंतु जर तुम्ही लोकांना क्षमा केली नाही तर तुमचा पिताही तुमच्या अपराधांची क्षमा करणार नाही"* (मत्तय. ६:१४-१५). तो क्षमेवर विशेष जोर देतो.

मार्क ११:२५ मध्ये, येशूने शिकवले, *"आणखी तुम्ही जेव्हा जेव्हा प्रार्थना करण्यास उभे राहता तेव्हा तुमच्या मनात कोणाविरुद्ध काही असेल तर त्याची क्षमा करा, अशासाठी की, तुमच्या स्वर्गातील पित्यानेही तुम्हांला तुमच्या अपराधांची क्षमा करावी."* जेव्हा क्षमेचा विषय येतो, आपले कोण अपमान करणारा आहे याचे सविस्तर वर्णन- अपमान करणाऱ्याने काय केले आहे, किंवा अपमान करणाऱ्याने किती वेळा तुम्हांला दु:ख दिले आहे हे अप्रसांगिक आहे. मत्तय. १८:२१ मध्ये, पेत्र येशूला विचारतो, *"प्रभुजी, माझ्या भावाने किती वेळा माझा अपराध केला असता मी त्याला क्षमा करावी? सात वेळा काय?"* येशूने हे विचारले काय, *"ठीक आहे, पेत्रा, कोणत्या प्रकारच्या पापाची तुला क्षमा करण्याची इच्छा आहे?"* नाही! क्षमेचे अपमान किंवा अपमान करणारा याबाबतीत काहीही संबंध नाही. याचा संबंध केवळ तुम्हांला कशी क्षमा केली आहे याबाबतीत आहे. म्हणून येशू पेत्राला उत्तर देतो, *"सात वेळा असे मी तुला म्हणत नाही, तर साताच्या सत्तर वेळा"* (मत्तय. १८:२२). दुसऱ्या शब्दात, नेहमीच आणखी एक वेळा क्षमा करा.

**"तुमच्या मनात कोणाविरुद्ध काही असेल तर त्याची क्षमा करा, अशासाठी की, तुमच्या स्वर्गातील पित्यानेही तुम्हांला तुमच्या अपराधांची क्षमा करावी."**

येशू मग एका मनुष्याबद्दल बोलत आहे ज्याला मोठ्या कर्जाबद्दल क्षमा केली होती, परंतु त्याने दुसऱ्या व्यक्तीला थोड्या कर्जाबद्दल क्षमा करण्यास नकार दिला. तो निष्कर्ष देतो,

*“तेव्हा त्याच्या धन्याने त्याला बोलावून म्हटले, ‘अरे दुष्ट दासा! तू गयावया केल्यामुळे मी ते सर्व देणे तुला सोडले होते, मी जशी तुझ्यावर दया केली तशी तूही आपल्या सोबतीच्या दासावर दया करायची नव्हतीस काय?’ मग त्याच्या धन्याने त्याच्यावर रागावून तो सर्व देणे फेडीपर्यंत त्याला हालहाल करणाऱ्यांच्या हाती दिले. म्हणून जर तुम्ही प्रत्येक जण आपापल्या बंधूला त्यांच्या अपराधांची मनापासून क्षमा करणार नाही तर माझा स्वर्गातील पिताही त्याप्रमाणेच तुमचे करील”* (मत्तय. १८:३२-३५). जर तुमचे तारण झालेले असेल, तर पवित्र आणि नीतीमान परमेश्वराच्या विरोधातील तुमच्या सार्वकालिक पापाच्या ऋणासाठी तुम्हांला क्षमा मिळालेली असेल. जेव्हा देवाने ख्रिस्तामध्ये तुमच्यासाठी भरपूर प्रेम आणि क्षमा दिली आहे याचा विचार करता, तेव्हा कोणत्याही मनुष्याचे तुमच्या विरोधात केलेले पाप क्षमा न करण्याइतके भयानक नसू शकते.

**जेव्हा देवाने ख्रिस्तामध्ये तुमच्यासाठी भरपूर प्रेम आणि क्षमा दिली आहे याचा विचार करता, तेव्हा कोणत्याही मनुष्याचे तुमच्या विरोधात केलेले पाप क्षमा न करण्याइतके भयानक नसू शकते.**

मला हे स्पष्ट करू द्या.

तुम्हांला योहानाने दिलेला स्त्रीचा वृत्तांत आठवतो का जिला व्यभिचाराच्या कृत्यात धरले होते? अर्थातच, ती दोषी होती. वास्तवात, कोणीही तिला दिलेला दोष किंवा तिला दगडमार करून शिक्षा केली पाहिजे का यात वाद करत नाही. तसे निष्कर्ष करणे तर सोडून द्या. तिला तसे कृत्य करताना धरले होते. परंतु तो गोष्टीचा मुद्दा नाही. स्पष्टपणे, येथे या कृत्यामध्ये आणखी एक पक्ष दोषी होता. परंतु तोही येथे मुद्दा नाही. त्याऐवजी, येशूने तिला दोष देणाऱ्यांचे विचार त्यांच्याच विरुद्ध केले : *“तुमच्यामध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा”* (योहान. ८:७).

प्रत्येक दगड खाली टाकल्यावर आणि जमाव घरी निघून गेल्यावर, येशू तिला म्हणाला, *“मीही तुला दंड ठरवत नाही; जा; ह्यापुढे पाप करू नकोस”* (योहान. ८:११). तो तिच्याकडे बघत राहिला नाही. त्याने योग्यपणे तिला दगड मारला असता कारण तोच एकमेव जो निष्पाप होता. काय घडत होते? तो लवकरच तिचे पाप स्वतःवर घेणार होता. म्हणून तो बोलू शकला, *“मीही तुला दोष देत नाही कारण तुझ्यासाठी मो दोषी होणार आहे.”* हेच शुभवर्तमान आहे.

वधस्तंभावर पहा, येशूचे सर्वात पहिले नोंदलेले शब्द हे होते, *"हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही"* (लूक. २३:३४). पापी हे वधस्तंभाच्या जवळ होते, त्या क्षणी, सार्वकालिक जीवनासाठी क्षमा दिली होती का? नाही. परंतु कायमच्या क्षमेसाठी एक मार्ग आता लवकरच उघडणार होता.

येशूने व्यभिचाराच्या कृत्यात सापडलेल्या स्त्रीला काय म्हटले ह्याकडे लक्ष द्या. *"मीही तुला दंड ठरवत नाही; जा; ह्यापुढे पाप करू नकोस"*. ख्रिस्त तिला क्षमा करण्याचा मार्ग करणार होता; ख्रिस्त सर्वांसाठी क्षमा करण्याचा मार्ग करणार होता. वधस्तंभावरच ख्रिस्ताने सार्वकालिक क्षमेचा मार्ग उघडला. देवाचा कोकरा येशूने आपल्या सर्व पापांच्या विरोधातील देवाचा अग्निमय, नीतिमान क्रोध सहन केला. त्याने सर्वांसाठी सार्वकालिकरित्या क्षमा करण्यासाठी मार्ग केला. पेत्र त्यास अशा प्रकारे लिहितो, *"त्याच्यावर [येशूवर] विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"* (प्रेषित. १०:४३). येशू देत असलेली क्षमा जे स्वीकारतात त्यांना क्षमा करण्यात आलेली आहे.

## क्षमाशीलतेचा व्यवहारिक बाजू

आपण ज्यांनी त्याची क्षमा प्राप्त केलेली आहे, आपल्याला ठाऊक आहे की आपल्याला दुसऱ्यांना क्षमा केली पाहिजे, परंतु आपण खरेच क्षमा कशी करावी?

मी हे म्हणत नाही की तुम्हांला अत्याधिक दु:खित केलेले नाही. कदाचित तुम्हांला लैंगिक, शारीरिक किंवा शाब्दिक-अथवा तिन्हीही अत्याचाराला तोंड द्यावे लागले असेल. कदाचित, तुमच्या भूतकाळामुळे, तुम्ही येशूच्या रक्ता द्वारे तुमच्या वतीने देवाच्या क्षमेचे सत्य स्वीकारत नसाल. कदाचित तुमच्या नावाची बदनामी केली असेल आणि खोटेपणामुळे संबंध विखरले असतील. कदाचित तुमच्या ऐवजी इतरांना पदोन्नती मिळाली असेल, आणि तुमच्याकडे लक्ष दिले नसेल. कदाचित ज्यांच्यावर तुम्ही विश्वास ठेवला त्यांनी तुम्हांला एकटेच सोडून दिले असेल. मला तुमची गोष्ट माहित नाही, परंतु मला तुमच्यासाठी ख्रिस्ताची प्रीती माहित आहे. त्याच्या अद्भुत प्रीतीच्या प्रकाशातच आपण भटकलेल्या जगाकडे पाहू शकतो आणि प्रामाणिकपणे त्यांना क्षमा करू शकतो जसे आपल्याला क्षमा केलेली आहे. हेच ते बायबल आपल्याला आज्ञा देते. *"आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू*

*व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हांला क्षमा केली आहे तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा"* (इफिस. ४:३२).

वाईट करणारे क्षमा प्राप्त करण्यास पात्र आहेत का? नाही. परंतु तुम्ही किंवा मी देखील नाही.

क्षमा ही कोणीही पात्र आहे किंवा नाही याबद्दल नाही. लक्षात ठेवा, ज्या व्यक्तीला तुम्ही क्षमा करत आहात त्याचा क्षमेशी काही संबंध नाही आणि ख्रिस्ताने तुम्हांला कशी क्षमा केली आहे याशी त्याचा संबंध आहे. जेव्हा ज्यांनी आपले वाईट केले आहे त्यांना क्षमा करण्यास आपण नकार देतो, तेव्हा आपण उघडपणे जगाला घोषित करत असतो की आपण कालवरीवरील येशूच्या प्रीतीला फारच क्षुल्लक समजतो. येशूच्या वधस्तंभासाठी कृतज्ञता ज्यांनी आपले वाईट केले आहे त्यांच्यावर करूणा आणि क्षमा करण्यात दिसून येते.

**ज्या व्यक्तीला तुम्ही क्षमा करत आहात त्याचा क्षमेशी काही संबंध नाही आणि ख्रिस्ताने तुम्हांला कशी क्षमा केली आहे याच्याशी त्याचा संबंध आहे.**

एक शेवटचे स्मरण.

तुम्ही एखाद्याला क्षमा केली आहे याचा अर्थ असा नाही की त्यांना देवाची क्षमा मिळाली आहे. त्याऐवजी, तुम्ही तो विषय खऱ्या न्यायाधीशाकडे सोपवला आहे. जेव्हा तुम्ही क्षमा करता, तेव्हा तुम्ही तो सर्व भार देवावर सोडता. गुन्हेगाराने त्याबदल्यात, ख्रिस्तामध्ये आढळणाऱ्या देवाच्या क्षमेचा धावा केला पाहिजे.

मी हे केवळ एकदा बोलणार आहे. जेव्हा तुम्ही क्षमा करता आणि विषय प्रभूला सोपवता, तो *"दगड"* मग पुन्हा कधीही उचलू नये. एमी कारमायकल यांनी वाचण्यास समर्थ आणि वेदनामय अशी कविता लिहिली आहे जिला 'जर' असे म्हणतात. त्या कवितेमधील एक उतारा असे म्हणतो,

> जर मी दुसऱ्याच्या विरोधात कबूल केलेले, पश्चाताप केलेले आणि त्यागलेले पाप लावतो, आणि त्या पापाने माझ्या विचारांना रंगवतो आणि माझ्या शंकेत भर घालण्यास माझ्या आठवणीत ठेवतो तर मला कालवरीच्या प्रीतीबद्दल काहीही माहित नाही.[३३]

देव त्याच्या क्षमेच्या गुणावर विचार करत आपल्यावर इतका केंद्रित आहे की डोंगरावरील प्रवचनात, येशूने शिकवले की जेव्हा आपण उपासनेसाठी येतो, *"ह्यास्तव तू आपले दान अर्पण करण्यास वेदीजवळ आणत असता आपल्या भावाच्या मनात आपल्याविरुद्ध काही*

*आहे असे तुला स्मरण झाले, तर तेथेच वेदीपुढे आपले दान तसेच ठेव आणि निघून जा; प्रथम आपल्या भावाबरोबर समेट कर, मग येऊन आपले दान अर्पण कर"* (मत्तय. ५:२३-२४).

जग हे सतत युद्ध करत राहील. ते सतत अपमान करत राहणे, रागात राहणे, आणि त्यांच्या समस्यांसाठी बळी शोधत राहील. अशा गोष्टीविषयी चिंता करू नका. आपल्यापैकी ज्यांनी कालवरीच्या क्षमेचा अनुभव केला आहे, त्यांनी हे लक्षात ठेवावे : *"प्रियजनहो, देवाने जर आपल्यावर अशा प्रकारे प्रीती केली तर आपणही एकमेकांवर प्रीती केली पाहिजे"* (१ योहान. ४:११).

कालवरीची प्रीती ध्यानात घेऊन, आपण दुसऱ्यांना क्षमा करू या. आणि आपण केलेल्या क्षमेद्वारे, त्यांनाही कालवरीच्या प्रीतीचा अनुभव येऊ दे.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. एखाद्या अशा व्यक्तीचा विचार करा, ज्याला क्षमा करणे तुम्हांला कठीण वाटते.

खालील तीन सत्यांमध्ये त्या व्यक्तीचे नाव जोडा :

देव ________________प्रीती करतो.

देवाने ________________ त्याला निर्माण केले आहे.

देवाने ____________________ त्याच्यासाठी त्याच्या पुत्राला दिले आहे.

त्या व्यक्तीबद्दल तुमचा दृष्टीकोन यामुळे कसा बदलतो?

२. ज्या विशेष पापांमुळे तुम्ही एखाद्याला क्षमा करण्यास नकार देत आहात त्यांची यादी बनवा. त्यापैकी कोणत्याही अपराधासाठी देवाने तुम्हांला क्षमा केलेली आहे का?

३. क्षमाहीनतेचा आत्मा तुम्हांला बंधनात ठेवत आहे का? कसे?

# १५

# देवाच्या वचनाने आपली सुरक्षितता तयार करणे

सुरक्षा आणि सुरक्षिततेबद्दल या जगात आपला दृष्टीकोन काय आहे? आपण प्रथम भौतिक दृष्टीकोनातून विचार करतो का? किंवा आपण गोष्टींना प्रामुख्याने आध्यात्मिक मुद्द्यांच्या आधारे  पाहतो?

ऑक्टोबर २०१४ मध्ये, एबोला संकट माझ्या भागात पसरले होते. मला परदेशातील मित्रांकडून मी *"सुरक्षित"* आहे का अशी विचारपूस करणारे संदेश सतत येत होते. जरी त्यांची काळजी ही प्रामाणिक होती, तरी माझे अंत:करण ओझ्याने भरलेले होते. *"सुरक्षित"* असणे याविषयी आपला विश्वास काय आहे? शेवटी, मी फेसबुक वर उत्तर दिले.

> मी आता गप्प राहू शकत नव्हतो.
>
> असंख्य संदेशांमधून हीच विचारपूस होत होती की मी एबोला पासून *"सुरक्षित"* आहे का आणि त्यामध्ये ही आशा व्यक्त केली जात होती की मला "ह्या प्राणघातक रोगापासून काहीही झालेले नाही? मग मी बोललो. काळजी करण्यासाठी मी तुमचा आभारी आहे... पण.
>
> माझ्या मित्रांनो, देवाने त्याच्या अनुयायांना सांसारिक सुरक्षेसाठी बोलावलेले नाही. हाच अंतिम निष्कर्ष आहे. ते सेवेचे  निकष नाहीत. वास्तवात, जर तुम्ही आज्ञाधारकपणापेक्षा अधिक सुरक्षिततेचा धावा करता, तर तुम्ही येशूचे अनुयायी कधीही होणार नाही (योहान. १५:१८-२०; लूक. ९:२३-२५ पाहा). आपण समस्या शोधत नाही, आणि आपण शहाणपणाने कार्य करतो, परंतु जर दु:खसहनात गुरफटून गेलेलो असेन, तर येशूची प्रीती आणि स्पर्शाची अधिक आवश्यकता असेल, मग ते प्रत्यक्षपणे तेच असावे जेथे आपण असण्याची इच्छा करतो. मी आभारी आहे येशूने एका सुरक्षित जीवनाची निवड केली नाही. माझ्या वैयक्तिक सुरक्षेबद्दल

> एबोला किंवा हे गोंधळलेले जग जे देते अशा इतर धोक्याबद्दल मला किंचितही चिंता नाही. मी तथापि, ज्यांना हा रोग होत आहे आणि ज्यांना येशू द्वारे मिळणारे सार्वकालिक जीवन माहित नाही त्यांच्याविषयी मला अत्यंत काळजी वाटते. म्हणून, चला आपण असे कधीमधी प्रश्न विचारणे सोडून देऊ की कोणी परदेशी *“सुरक्षित”* आहे का, कारण मी ख्रिस्ताने पूर्ण केलेल्या कामात सार्वकालिकरित्या सुरक्षित आहे. याची खात्री बाळगा. त्याऐवजी, आपल्या गुडघ्यावर या आणि त्या आत्म्यांसाठी प्रार्थना करा जे येशूच्या वधस्तंभाजवळ दिलेली आशा, शांति आणि सार्वकालिक जीवन प्राप्त करण्यासाठी अद्याप *“सुरक्षित”* नाहीत.

जर येशूचे अनुसरण करण्याच्या पाचारणाची आज्ञा पाळण्यासाठी आपली पहिली पूर्व शर्त ही सुरक्षितता असेल, तर आपण एक चांगली कल्पना म्हणून त्याचा आदर करत आहोत, परंतु एक देव म्हणून नाही. आपले आज्ञापालन भौतिक सुरक्षेच्या अधीन आहे का? देवाने आपल्याला सुरक्षित जीवन जगण्यासाठी बोलावलेले नाही. त्याने विशेषकरून वधस्तंभ उचलून घेऊन जीवन जगण्यासाठी आपल्याला बोलावले आहे. (आपण ह्यावर पुढील धड्यांमध्ये चर्चा करणार आहोत.) वधस्तंभ, मृत्यूचे साधन, हे कधीही सुरक्षित नव्हते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, येशूने त्याच्या अनुयायांना सांगितले की यरुशलेमेत त्याचा छळ केला जाईल आणि जिवंत मारले जाईल (मत्तय. १६:२१) आणि त्यानंतर केवळ तीन वचनानंतर, त्याने त्यांना आमंत्रित केले की त्याचे अनुयायी व्हावे. ख्रिस्ताच्या बोलावण्यात कोणताही मुखवटा नाही. आपण त्याचे अनुसरण करतो यासाठी नाही की ते सुरक्षित किंवा आनंद देणारे आहे, परंतु याकारणासाठी की तो समय आणि सार्वकालिकतेसाठी खजिना आहे.

**आपण त्याचे अनुसरण करतो यासाठी नाही की ते सुरक्षित किंवा आनंद देणारे आहे, परंतु याकारणासाठी की तो समय आणि सार्वकालिकतेसाठी खजिना आहे.**

येशूने आपल्या शिष्यांना म्हटले, *“जे शरीराचा घात करतात पण आत्म्याचा घात करण्यास समर्थ नाहीत त्यांना भिऊ नका, तर आत्मा व शरीर ह्या दोहोंचा नरकात नाश करण्यास जो समर्थ आहे त्याला भ्या. दोन चिमण्या दमडीला विकतात की नाही? तथापि तुमच्या पित्याच्या आज्ञेवाचून त्यांतून एकही भूमीवर पडणार नाही. तुमच्या डोक्यावरील सर्व केस देखील मोजलेले आहेत. म्हणून भिऊ नका; पुष्कळ चिमण्यांपेक्षा तुमचे मोल अधिक आहे”* (मत्तय. १०:२८-३१). ख्रिस्ताने त्याच्या शिष्यांना हे सांगितल्यावर असेही म्हटले की तो त्यांना लांडग्यांमध्ये मेंढरू म्हणून पाठवत आहे-की त्यांना राजासमोर ओढून नेण्यात

येईल, फटके मारतील, नकार केला जाईल, वाईट बोलले जाईल आणि त्यांच्याजवळच्याच लोकांकडून देखील जिवंत मारले जातील.

धोक्याचा शोध घेणे आणि सुरक्षिततेसाठी आग्रह धरणे यांमध्ये फरक आहे.

डिसेंबर १८३८ मध्ये, वेस्लीयन परंपरेतील तीन नवीन अविष्कार करणारे मिशनरी, जॉन हंट, थॉमस जागर आणि जेम्स काल्वर्ट फिजी बेटात लाकेबा तटाजवळ पोहचले. जहाजाच्या कप्तानने त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला की ते जर तेथे उतरले तर तेथील नरभक्षक लोकांकडून त्यांचा मृत्यू अवश्य होईल. काल्वर्ट आणि इतर हे ऐकून बिथरले नाही. शेवटचा प्रयत्न म्हणून कप्तानने पुन्हा एकदा विनंती केली, *“जर तुम्ही ह्या जंगली लोकांमध्ये गेलात तर तुम्ही आणि तुमच्या बरोबर सर्व जण आपले प्राण गमवाल.”* याला उत्तर देताना, काल्वर्ट शांतपणे म्हणाले, *“आम्ही येथे येण्यापूर्वीच मेलो आहोत.”*[३४] काल्वर्ट ख्रिस्ताच्या बोलावण्यास समजले होते. त्याच्या तारणाऱ्याचे त्याच्या प्रति प्रेम आणि त्याच्या तारणाऱ्यासाठी त्याच्या प्रेमाने तो ओतप्रोत आणि प्रेरित झालेला होता. अशा पुष्कळ प्रारंभीच्या शुभवर्तमान प्रसारकांनी त्यांच्या सर्वस्वाला शवपेटीत बंद केलेले होते, हे जाणून की ते एकतर्फी प्रवासावर जात आहेत, ज्यामध्ये येशू ख्रिस्ताचे मुख त्यांचे गंतव्यस्थान आहे.

जेव्हा यशयाने देवाचे साधे आणि सरळ बोलावणे ऐकले, *“मी कोणाला पाठवू? आमच्यासाठी कोण जाईल?”* तेव्हा त्याने उत्तर दिले, *“हा मी आहे! मला पाठव”* (यशया ६:८). देवाने यशयाला तो ज्या धोक्यांना सामोरे जाणार आहे किंवा ज्या जबाबदाऱ्या त्याला मिळतील याच्याविषयी सूचना आधीच दिलेली नव्हती. त्याप्रमाणेच, ख्रिस्ताची निवड करताना, आपण एका नोकरीच्या वर्णनाला उत्तर देत नाही. आपण त्या परमेश्वराला उत्तर देत आहोत जो आपल्याला त्याच्यासोबत काम करण्यास आमंत्रित करत आहे.

माझा मित्र, क्रिस लेगेटची हीच गोष्ट होती.

## जेव्हा मृत्यू हा गुंतवणूक आहे

ख्रिस आणि मी काही संमेलनात भेटलो होतो. आम्ही दोघेही उत्तरी आफ्रिकेत समान काम करत होतो. क्रिसचे कुटुंब होते आणि चार लेकरे, परंतु तो आणि त्याच्या पत्नीने टेनेसेमधील त्यांच्या आरामदायक घराला सोडले होते जेणेकरून त्यांच्या जीवनात देवाच्या मार्गदर्शनानुसार चालावे. ते त्यांना माहित नसलेल्या लोकांना प्रेम देण्यासाठी

गेले होते जेणेकरून त्या लोकांनी त्या एकच सत्य देवावर प्रीती करावी ज्याला ते अजून ओळखत नव्हते. ते त्यांचा राजा, येशू प्रति त्यांच्या प्रेमाखातर गेले. कठीण स्थानिक भाषा शिकण्यावाचून, क्रिस गरीब लोकांना कम्प्युटर शिकवत होता, आणि कैद्यांच्या व्यवस्थेमध्ये काम करत होता की मुलांना समाजात पुन्हा प्रवेश मिळवण्यासाठी प्रशिक्षित आणि सज्ज करावे, एका बहु-उद्देशीय प्रशिक्षण केंद्राचे निर्देशन करत होता आणि लघुकर्ज प्रणालीवर लक्ष देत होता जी अनेक लहान व्यवसायिकांच्या वाढीसाठी साहाय्यक होती. ह्या सर्व कार्यांद्वारे, क्रिसने एकमेव परमेश्वराकडे आत्म्यांना इशारा करण्याकडे लक्ष दिले ज्याच्याविषयी सर्व संदेष्टे लिहितात (लूक. २४:२५-२७).

जून, २००९ मध्ये, जेव्हा मी एक संमेलनासाठी न्युझीलंड येथे होतो, मी माझ्या हुंडाई कार मधील रेडीओ स्थानिक स्टेशनवर लावला आणि मायकल जॅक्सन "पॉप संगीताचा राजा' याच्या मृत्यूची बातमी ऐकली. ही दु:खद बातमी सर्व रेडिओ स्टेशनावर पसरत होती. माझ्या गंतव्यस्थानी पोहचल्यावर, मी माझे ईमेल तपासले आणि कळले की जुन २३ (जॅक्सनच्या मृत्युच्या दोन दिवसांआधी), माझा मित्र, क्रिस लेगेट, वर हल्ला केला गेला आणि दोन अल-कैदा बंदुकधारी व्यक्तींनी त्याला जिवंत मारले होते. तो ३९ वर्षाचा होता.

मी स्तब्ध झालो होतो, आणि त्यावर विचार करू लागलो.

कोणीही यावर वाद करणार नाही की मायकल जॅक्सन हा एक कुशल संगीतकारच नव्हता तर त्याच्या कामाची जाहिरात करणारा एक चांगला व्यक्ती देखील होता. अनेक जण हे मान्य करतील की इतिहासातील तो एक सर्वात यशस्वी गायक-नर्तकांपैकी एक होता. या उलट, क्रिस लेगेटला काही थोडे मूल्यवान लोक ओळखत असतील. त्याच्या कामाला जगाने जास्तकरून दुर्लक्षित केले असेन आणि ख्रिस्ती लोकांमध्ये देखील- त्याला फारशी दाद मिळाली नव्हती.

आणि तरीही, एके दिवशी दोघेही देवाच्या सिंहासनासमोर उभे राहतील. देवाशी असलेल्या नात्यात मायकेल जॅक्सन नेमका कुठे उभा असेल याची मला खात्री नाही. पण जेव्हा क्रिस लेगेटच्या आत्म्याने जुन २००९च्या मंगळवारच्या सकाळी उत्तरी आफ्रिकेच्या धुळीच्या रस्त्यावर गोळ्या लागलेल्या शरीराला सोडले असेन, मला विश्वास आहे येशू त्याच्या सिंहासनावरून उभा राहिला असेन आणि घोषणा दिली असेल, *"माझा पुत्र घरी येत आहे!"*

क्रिसच्या स्मरणार्थ प्रार्थनासभेत, भाषण देणाऱ्या एकाने हे वक्तव्य केले : *"मोठा आवाज करणारे जीवन आणि खरा बदल घडवून आणणारे जीवन — यांच्यात फरक असतो."*

दोन जीवने.
दोन वारसा.
दोन सार्वकालिकता.
दोघेही जीवन जगले.
दोघेही मरण पावले.

बायबल असे सांगते, *"ज्या अर्थी माणसांना एकदाच मरणे व त्यानंतर न्याय होणे नेमून ठेवले आहे"* (इब्री. ९:२७). आज, ज्या ठिकाणी ख्रिस्ताने हे अस्तव्यस्त जग सोडले, त्या ठिकाणी अरबी, फ्रेंच आणि इंग्रजी भाषांमध्ये एक फलक आहे, ज्यावर तीन शब्द लिहिलेले आहेत जे सांगण्यासाठी तो मरण पावला.

الله محبة

*Dieu est amour*

*God is love*

*देव प्रीती आहे.*

सुरक्षा आणि सुरक्षितता परमेश्वराची आज्ञा पाळण्यासाठी आपली पूर्व शर्त होऊ शकत नाही जो म्हणतो, *"मी तुम्हांला खचित खचित सांगतो, गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेला नाही तर तो एकटाच राहतो, आणि मेला तर पुष्कळ पीक देतो. जो आपल्या जीवावर प्रीती करतो तो त्याला मुकेल, आणि जो ह्या जगात आपल्या जीवाचा द्वेष करतो तो त्याचे सार्वकालिक जीवनासाठी रक्षण करील. जर कोणी माझी सेवा करतो तर त्याने मला अनुसरावे म्हणजे जेथे मी आहे तेथे माझा सेवकही असेल; जर कोणी माझी सेवा करतो तर पिता त्याचा मान करील"* (योहान. १२:२४-२६).

फिलीप हेन्रीचे शब्द (मैथ्यू हेन्रीचे वडील, प्रसिद्ध बायबल भाष्यकार) खरे बोलतात, *"जो ते सोडून देतो जे तो ठेवू शकत नाही, आणि ज्याला खात्री आहे की त्याला ते भरपाई म्हणून मिळेल जे तो कधीही गमावू शकत नाही—तो मूर्ख नाही."*[३५]

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. तुमची सुरक्षा किंवा इतरांच्या सुरक्षेचा विचार तुम्हांला तुमच्या जीवनात आत्म्याच्या नेतृवाला अडथळा करत आहे का? स्पष्टीकरण द्या.

२. देवाचे बोलावणे मानण्यासाठी एखादा व्यक्ती ज्याने वैयक्तिक सुरक्षेचा धोका पत्करला आहे त्याच्याबद्दल विचार करा. काय वेगळे झाले असते, जर त्यांनी आज्ञा पाळण्याची निवड केली नसती?

# १६

# देवाच्या वचनाने घडवलेल्या जीवनाचे शत्रू

जरी माझा खेळ फारसा विशेष नसला, तरी मी माझ्या तरुण वयात बरेच टेबल टेनिस खेळलो आहे. सुरुवातीला, मला हे लक्षात आले की माझ्या कौशल्याला आणखी चांगले करण्यासंबंधात जिंकणे हे तितके महत्वाचे नव्हते तर माझ्या विरोधकाचा कमकुवतपणा समजणे आणि त्यानुसार खेळ सुधारणे अधिक महत्वाचे होते. मला वाटते मी हे माझ्या थोरल्या भावाकडून शिकलो, ज्याने हे ओळखले होते की डोक्यावरून मारलेले माझे फटके हे सतत चुकत असत. तो माझ्या कमकुवतपणाची जाणीव करून देण्यासाठी फक्त उंच, लहान फटके मारायचा.

दु:खदपणे, आपल्या आत्म्याचा शत्रू येशूच्या अनुयायांसोबत नेमके हेच करतो. तो आपला मानवी कमकुवतपणा ओळखतो आणि त्याचा तो फायदा घेतो. तो धूर्त आहे. चांगली वार्ता ही आहे की तो तेच तंत्र वारंवार वापरतो. वाईट बातमी काय? आपण तरीही त्यास बळी पडतो. आपण आपल्या जीवनाचा *"बॉल"* अनियंत्रितपणे मारतो आणि आपल्यासाठी असलेल्या देवाच्या 'टेबल" ला चुकतो.

हे दृश्य कसे घडते? देवाच्या वचनाने आपली जीवने घडवण्यात आपण का अपयशी ठरतो? आपण शत्रूच्या हातात वारंवार का पडतो? मी माझ्या जीवनातून काही उदाहरणे सांगेन.

### पुन्हा व्याख्या केलेले शब्द

मी सरळपणे पापाची पुन्हा व्याख्या केली आहे.

अश्लील चित्रे पाहणे पाप आहे हे माहित असूनही, शब्दांची पुन्हा व्याख्या करून मी माझ्या वासना पूर्ण करण्यासाठी दुसरा मार्ग शोधत असे. आपले जग, मग कॅटलॉग मधील अर्धनग्न मॉडेल किंवा नॅशनल जीओग्राफिक किंवा स्पोर्ट इलुस्ट्रेटेड मधील कमी कपडे घातलेली स्त्री असो, माझे डोळे वेधून घेण्यासाठी आपल्या जगाने पर्यायी "स्वीकृत' पद्धती माझ्यासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत.

मी येथेच थांबत नाही.

लैंगिक अनैतिकता देवाच्या नियमशास्त्राचे उल्लंघन आहे हे मला माहित आहे. म्हणून जोपर्यंत मी विवाहाआधी लैंगिक संबंध ठेवण्यापासून दूर राहतो (मी एखाद्या मुलीचे चुंबन देखील घेणार नाही), तोपर्यंत माझे मार्ग मनुष्याच्या (आणि मंडळीच्या) दृष्टीने योग्य मानले जातील असे मला वाटते. त्यामुळे मी शब्दांची पुन्हा व्याख्या करून मुलींशी भावनिक खेळ करत, त्यांच्या हृदयाशी खेळून, आणि पापाशी फ्लर्ट करत राहिलो. मी चूक होतो.

अफवा पसरवणे हा दुष्टपणा आहे हे जाणून, मी भ्रमित ख्रिस्ती लोकांसाठी सार्वजनिकपणे प्रार्थना करून किंवा माझ्या मित्रांच्या अयोग्य वर्तनाला उघड करण्याच्या गुपित उद्देशाने माझ्या *"भटकलेल्या मित्रां"* विषयी सल्ला मागण्याने मी पद्धतींची पुन्हा व्याख्या केली.

**शत्रूचे सूक्ष्म मोह अनेकदा दुर्भावनापूर्ण पद्धतींपेक्षा चुकीच्या प्राथमिकता असतात.**

खोटे बोलणे हे चूक आहे हे मला कोणाला शिकवावे लागले नाही, परंतु मी माझ्या स्वतःच्या आवडी आणि उद्धीष्टांना अनुकूल असलेल्या कथा सादर करण्यासाठी अतिशयोक्ती करणे, अंशतः सत्य सांगणे आणि तपशील लपवणे स्वीकारण्यासाठी अटी पुन्हा परिभाषित केल्या. माझे लक्ष्य हे माझ्या प्रभूला प्रसन्न करणे नव्हते, परंतु नश्वरांच्या मतांना वळण देणे होते.

सरळ सांगायचे तर, मी माझ्या तारणाऱ्याचा अपमान करत आहे याविषयापेक्षा माझ्या मित्रांना प्रसन्न करण्याविषयी अधिक विचार करत होतो.

## प्राथमिकतांना पुन्हा क्रमात आणणे

प्रत्येक वर्षी, मी कामासाठी आणि भाषण देण्यासाठी जवळजवळ वीस देशांना भेटी देतो. अनेकदा, प्रवास करण्याचा माझा प्रकार हा कार भाड्याने घेणे असते. प्रत्येक देशाचे वाहतुकीचे नियम थोड्याफार प्रमाणात वेगवेगळे असतात; परंतु कार चालवण्याआधी एक गोष्ट मला ठाऊक असली पाहिजे की वळणाच्या ठिकाणी किंवा एखाद्या चौकातून

जाताना कोणाला मार्ग योग्यप्रकारे माहित आहे. *"योग्य मार्ग"* साठी दुसरा शब्द त्या संदर्भात *"प्राथमिकता"* आहे. अक्षरशः, *"प्राथमिकता"* म्हणजे *"गोष्टी ज्या दुसऱ्या गोष्टींपेक्षा अधिक महत्वाच्या आहेत."*[३६] येथे माझा प्रश्न आहे : आपल्या जीवनात प्राथमिकता काय आहे? जर आपण प्राथमिकतांची यादी केली (आपले कुटुंब, काम, मोकळा वेळ इत्यादी.) तर यादीतील प्रत्येक बाब देवाच्या वचनाने प्रभावित व नियमित होत असल्याचे आपल्याला दिसेल का ? किंवा यादी ही सांसारिक मते, प्राधान्ये, आणि सुविधांनी प्रभावित होत असलेली आपल्याला दिसेल?

आपण जगाच्या तात्पुरत्या दबावासाठी देवाच्या सार्वकालिक प्राथमिकतांची अदलाबदली केली आहे का? येशू ख्रिस्ताने आपल्या शिष्यांना म्हटले, *"तर तुम्ही पहिल्याने देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील"* (मत्तय. ६:३३). नंतर बायबलमध्ये आपल्या स्वतःच्या गरजांपेक्षा दुसऱ्यांच्या गरजांना प्राधान्य देण्यास आपणांस सांगितले आहे : *"तट पाडण्याच्या अथवा पोकळ डौल मिरवण्याच्या बुद्धीने काहीही करू नका, तर लीनतेने एकमेकांना आपल्यापेक्षा श्रेष्ठ माना. तुम्ही कोणीही आपलेच हित पाहू नका, तर दुसऱ्यांचेही पाहा"* (फिलिप्पै. २:३-४).

शत्रूचे सूक्ष्म मोह अनेकदा दुर्भावनापूर्ण पद्धतींपेक्षा चुकीच्या प्राथमिकता असतात. तो आपल्याला दुसऱ्यांपेक्षा आपल्या स्वतःला आधी ठेवण्याचा मोह घालतो. सुवार्ता प्रसारापूर्वी आराम, आज्ञाधारकपणापूर्वी सुरक्षितता, विश्वासापूर्वी व्यवहारिकता, विश्वासूपणापूर्वी मौज यांना तो प्राधान्य देण्यास प्रवृत्त करतो. देवाच्या वचनाने आपल्या प्राथमिकतांची रचना करण्यास आणि इतर गोष्टींना त्यांच्या योग्य वेळी होऊ देण्यास आपण तयार आहोत का? देवाच्या *"वाहतुकीच्या नियमांच्या"* अधीन होण्यास आपण तयार आहोत का? (कृपा करून लक्षात घ्या : जास्त वेळा नाही, अशा मार्गाने निर्णय घेतले तर ते जगाला अर्थपूर्ण वाटणार नाहीत.)

## आत्मसंतुष्टता : सावकाशपणे नष्ट करणारी

ख्रिस्चीयानीटी टुडे ऑनलाईनवरील संपादकीय प्रकाशनामुळे तथाकथित ख्रिस्ती संस्कृतीत आत्मसंतुष्टतेची उपस्थिती किती आहे याबद्दल मला पूर्ण जाणीव झाली. ह्या छोट्याशा लेखात आपण कोमट जीवन जगणे, आपल्या देहाला संतुष्ट करणे आणि देवाच्या मुखातून ओकून टाकले जाणे का निवडू शकतो हे उघड केले आहे (प्रकटीकरण ३:१५-१७ नुसार). लेखाचे शीर्षक, *"मे यु नॉट बी वीयर्ड एंड ३० आदर प्रेयर्स फॉर माय फ्युचर हसबंड."* (May you Not Be Weird and 30 Other Prayers for My Future Husband). लेखात विनोदी घटक होते, परंतु देवाच्या कल्पनेवर आपली पकड सैल करून देहाला राज्य करू

देण्याची आपली इच्छा स्पष्टपणे दर्शवली. येथे अनेक चांगले मुद्दे मांडले होते. त्यापैकी काही पुढे दिले आहेत :

• # १८ : तुमच्या जीवनात दररोज प्रार्थनेचा चांगला भाग असावा आणि दैनंदिन शांत समय पाळा.

• # २३ : न्याय आणि नीतिमत्वासाठी तुम्हांला सतत तीव्र भावना असावी.

• # २७ : तुम्ही तुमच्या शरीराला पवित्र आत्म्याचे मंदिर म्हणून कारभारीपण करणारे असावे.

हे ऐकायला चांगले वाटते, बरोबर? मग, ह्या सुंदरतांच्यामध्ये अडकलेले हे आहे :

• # २१ : ब्राईड्समेड्स चित्रपटासाठी गहन प्रीती तुमच्यामध्ये प्रभूने निर्माण करावी असे होवो.

मी कायदेशीर होण्याकडे लक्ष देत नाही, परंतु जर तुम्ही भविष्यातील एक पत्नी आहात, भविष्यातील तुमच्या पतीने आपल्या शरीराची पवित्र आत्म्याचे मंदिर म्हणून काळजी घ्यावी असे तुम्हांला वाटते का ( # २७), त्याचवेळेस ब्राईड्समेड्स (Bridesmaids) सारख्या चित्रपटासाठी *"गहन प्रीती"* देखील असावी, तर त्याने लैंगिकतेला करमणूकीचा विषय म्हणून विकृत केले आहे असे म्हणावे लागेल? पतित जग देखील प्रेक्षकांना अशा चित्रपटांविषयी ताकीद देते, त्यांना प्रबळ लैंगिकतेसाठी *"आर"* अशी श्रेणी देते. मी असा विचार केल्याशिवाय राहू शकत नाही की असे शब्द येशूचा शिष्य, योहानाने लिहिले आहेत, त्याचा आपल्या पिढीसाठी बोधपूर्ण अर्थ आहे : *"जगावर व जगातल्या गोष्टींवर प्रीती करू नका, जर कोणी जगावर प्रीती करत असेल तर त्याच्या ठायी पित्याची प्रीती नाही. कारण जगात जे सर्व आहे ते, म्हणजे देहाची वासना, डोळ्यांची वासना व संसाराविषयीची फुशारकी, ही पित्यापासून नाहीत, तर जगापासून आहेत; आणि जग व त्याची वासना ही नाहीशी होत आहेत; पण देवाच्या इच्छेप्रमाणे करणारा सर्वकाळ राहतो"* (१ योहान. २:१५-१७).

**आपण पाप आणि विकृतीला इतके बळी पडलो आहोत का की आपले जीवन अशा भ्रष्टाचाराला सामावून घेत नाही तर त्यावर हसते?**

वर उल्लेखलेल्या लेखावरील माझ्या टिप्पण्या हे त्याच्या लेखकावर आरोप नाहीत; मी अशा आत्मसंतुष्टतेच्या आचारणापासून मुक्त नाही. उलट, मला माझ्या स्वतःच्या जीवनात तेच पाप दिसून येते. आपण पाप आणि विकृतीला

इतके बळी पडलो आहोत का की आपले जीवन अशा भ्रष्टाचाराला सामावून घेत नाही तर त्यावर हसते. परंतु आपण लक्षात ठेवा, मी देखील गुन्हेगार आहे.

## तुलना करण्याचा आणि दोष देण्याचा खेळ

देवाच्या वचनाकडे दुर्लक्ष करण्यातील एक मार्ग म्हणजे आपण स्वतःची दुसऱ्याशी तुलना करणे. उदाहरणार्थ, आपण सांसारिक आणि अधार्मिक संबंधांकडे पाहतो आणि त्याच्या तुलनेत आपल्या संबंधांना पवित्र मानतो. परंतु स्वतःची इतरांशी तुलना करून, आपण धैर्याने जाहीर करतो की आपण त्याच्या पवित्रतेपेक्षा वेगळे काहीतरी मानक ठरवले आहे. आपली दृष्टी ख्रिस्तावरून काढल्यावाचून आणि मनुष्याकडे न पाहता आपण आपल्या जीवनाची तुलना इतरांशी करू शकत नाही.

देवाच्या वचनाने आपल्याला कधीही हे सांगितलेले नाही की आपल्या सभोवती जे आहेत त्यांच्यापेक्षा *"थोडेसे वेगळे असावे"* किंवा *"थोडेसे उत्तम असावे."* त्याऐवजी, तो जसा पवित्र आहे तसे पवित्र व्हावे (१ पेत्र. १:१५) आणि जसा आपला स्वर्गीय पिता सिद्ध आहे तसे सिद्ध व्हावे (मत्तय. ५:४८) यासाठी आपल्याला पाचारण केलेले आहे. आपल्याला त्याच्या प्रिय मुलांसारखे अनुसरण करण्यास सांगितले आहे (इफिस. ५:१). काय होईल जर देवाने त्याच्या वचनात जे प्रकट केले आहे तेच प्रत्यक्षात त्याचे म्हणणे होते? आपण आपले सूक्ष्म, सांसारिक तडजोडी कोठे न्यायी ठरवत आहोत त्याचवेळेस देवाची पवित्रता आणि वचनाच्या प्रखर प्रकाशाकडे दुर्लक्ष करत आहोत? कारण पतित मनुष्य, जो पुन्हा मातीत जाईल, तो केव्हापासून आदर्श झाला आहे ज्याचे आपण अनुकरण करावे?

हे समजून घ्या : क्षेत्रे ज्यामध्ये आपण आपल्या जीवनांची आणि कृत्यांची दुसऱ्यांशी तुलना करतो ती सामान्यपणे तीच क्षेत्रे आहेत ज्यामध्ये पवित्र आत्म्याला परिवर्तन घडवून आणण्याची इच्छा आहे. जीवनाच्या व्यस्ततेमध्ये, आपल्या पापांबद्दल आपल्याला दोष देणाऱ्या पवित्र आत्म्याच्या आवाजाकडे किती अधिक वेळा आपण दुर्लक्ष करतो? मी लहान वही ठेवण्यास सुरुवात केली, जिला प्रेमाने मी *"पवित्र आत्म्याची वही"* म्हणतो. त्यामध्ये, मी माझ्या स्वतःच्या पापी विचारांची किंवा कृत्यांची नोंद करण्यास सुरुवात केली. पुढे, जेव्हा दुसऱ्यांच्या कृत्यांना दोषी ठरवण्याचा मोह झाला, तेव्हा मी थांबत असे आणि विचारत असे, *"प्रभू, हे पाप माझ्या स्वतःच्या जीवनात कोठे आहे?"* आणि मग मी त्या दोषाची नोंद करत असे. आपण दुसऱ्यांच्या चुकांवर लक्ष द्यावे आणि देवाला आपल्या जीवनात जे करायचे आहे त्याकडे दुर्लक्ष करावे हे शत्रूला आवडते!

देव जे तुमच्यात परिवर्तन आणत आहे त्याशी शत्रू युद्ध करेल. हे लक्षात ठेवा ; शत्रू दोषी ठरवतो, परंतु देव दोषसिद्धी करतो. देवाने खात्री करून ठेवलेली रचना तुमच्यातील ख्रिस्ताचे चारित्र्य घडवण्यासाठी आहे. शत्रूने दोषी ठरवण्याची रचना केली आहे की तुम्ही आशारहित प्रकरण आहात आणि देव तुमच्याबाबतीत संयम सोडत आहे यावर विश्वास ठेवावा.

शत्रू खोटे बोलत आहे.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. या धड्यात सादर केलेल्या काही *"शत्रूंशी"* (पापांशी) तुम्ही कोणत्या मार्गाने संघर्ष करत आहात?

२. दोष देणे आणि दोषसिद्धी करणे यांच्यामधील फरक काय आहे? कोणते देवापासून आहे? तुमच्या जीवनात कोणते क्षेत्र आहे का जेथे तुम्हांला दोष दिल्यासारखे वाटते, आणि जर तसे आहे, तर तुम्ही तुमचे विचार पुन्हा कसे मांडू शकता?

# १७

# पवित्र आत्म्याशी लयबद्ध होणे

आयुष्यात मला मिळालेल्या मोठ्या आनंदांपैकी एक म्हणजे मी मध्य पूर्वेत राहत असताना पोहण्याचे प्रशिक्षण देणे होते.  मला ते खेळामुळे आवडत नव्हते, परंतु माझ्या संघातील प्रत्येक पोहणाऱ्या व्यक्तीवरील प्रेमामुळे आवडत होते. आमचा संघ अत्यंत वैविध्यपूर्ण होता- ऑस्ट्रेलिया ते इटली, साऊथ आफ्रिका ते हॉलंड अशा वीस देशांचे प्रतिनिधित्व करणारा होता.  प्रत्येक दिवशी, मुले माझी वाणी ऐकत होते, कदाचित त्यांना ऐकण्याची इच्छा असेल त्यापेक्षा अधिक वेळा! सरावाच्या वेळी, ते त्यांना चांगलेच माहित होते-तो आवाज वेगळा, खोल आणि मोठा असे. *"सज्ज व्हा! सुव्यवस्थित करा! मारा! मुख्य गट आळीपाळीने! भिंतीवर आक्रमण करा! तुमच्या हाताच्या-प्रवेशावर लक्ष द्या!"*

एका खेळण्याच्या दिवशी- अड्रेनालाईनसह, पालक व जमावाच्या उत्साहामुळे आणि सुरू असलेल्या घटनांच्या व्यत्ययामुळे- माझा आवाज हरवून जाणे सोपे होते. त्यामुळे, मी अनेकदा तरुण व्यक्तीला जवळ ठेवत असे, कमी अनुभवी पोहणाऱ्याला जमावापासून बाजूला ठेवत असे आणि त्यांना आठवण करून देत असे, *"केवळ एकच लयात रममाण होऊन जा : प्रशिक्षक नाटे. मी तुम्हांला सांगितलेल्या गोष्टी लक्षात ठेवा."*

## पवित्र आत्म्याची वाणी

ज्याप्रमाणे माझ्या पोहणाऱ्या संघाला माझी वाणी जाणणे आणि त्यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज होती, त्याप्रमाणे येशूच्या समर्पित अनुयायींनी या कर्कश जगाच्या भ्रमामध्ये त्याची वाणी ओळखली पाहिजे. तर, पवित्र आत्म्याची वाणी कशी वाटते?

हे खूपच सोपे आहे. पवित्र आत्मा भटकलेल्या लोकांना तीन क्षेत्रांमध्ये दोष देतो. योहान. १६:८ त्यास स्पष्ट सांगते, *"तो येऊन पापाविषयी, नीतिमत्वाविषयी व न्यायनिवाड्याविषयी जगाची खातरी करील."* हे वाक्य पापी व्यक्तींना पश्चातापाकडे आणण्याचे आत्म्याचे कार्य करत असताना (मन आणि दिशेचे परिवर्तन), ते येशूच्या अनुयायांसाठी देखील लागू होते. एका नवीन प्रकारच्या मार्गाने, त्याची वाणी **पाप, नीतिमत्व आणि न्याय** ह्या तीन क्षेत्रांमध्ये दोषसिद्धीच्या भावनेने आपल्या हृदयांना सतत स्पर्श करते.

## १. पाप

पापाबद्दल आपल्या जीवनात त्या गोष्टींचा विचार करा ज्या असाव्या, पण असू नयेत-त्या ज्या अस्तित्वात आहेत, पण नाही असल्या पाहिजेत. वासना. आळशीपणा. गर्व. स्वार्थीपणा. अफवा पसरवणे. फसवणूक. तुम्हांला कल्पना आली, नक्कीच. आपण त्याच्या पवित्रतेची सिद्धता कोठे चुकत आहोत? (जर तुम्ही माझ्यासारखे आहात, तर तुम्ही शक्यतो विचार करत आहात, "मो कोठे त्याच्या पवित्रतेची सिद्धता चुकत नाही?")

पाप, ही गोष्ट जी आपणांस त्याला अधिक जाणण्यापासून रोखतात. जेव्हा पवित्र आत्मा ह्या गोष्टी तुमच्या जीवनात ओळखतो तेव्हा प्रोत्साहित व्हा. याचा अर्थ तुमच्यावर अधिक प्रेम केले आहे (प्रकटीकरण ३:१९; इब्री. १२:६). पवित्र आत्मा आपल्याला येशूचे हृदय सांगत आहे, चुका ज्या आपण केलेल्या आहेत त्यासाठी दोष देत नाही. (दोष देणे आणि दोषसिद्धी करणे यांच्यामधील फरक तुम्हांला आठवतो का? धडा १६ पाहा.) जेव्हा दोषी ठरवले जाते, तेव्हा आपण आज्ञाधारकतेमध्ये कार्य करतो का, देवाच्या पवित्रतेच्या मानकास जाणून? किंवा आपण पवित्र आत्म्याने दोषी ठरवावे याचा अस्वीकार करतो जेणेकरून जगाच्या क्षणभंगुर, अपूर्ण सुखाचा आनंद घ्यावा काय?

## २. धार्मिकता

योहान १६:८ विश्वासणाऱ्यास लागू करण्याने, *"धार्मिकते"* ला ख्रिस्तासमान गुणधर्म असे पाहणे जे आपल्या जीवनात उपस्थित असले पाहिजेत, पण ते नाहीत. पवित्र आत्मा आपल्याला सक्रीय आज्ञाधारकपणाचा पाठपुरावा करावा म्हणून पटवून सांगतो. येशू आपल्याला सांगतो की प्रथम त्याचे राज्य आणि धार्मिकता मिळवण्यास झटा (मत्तय. ६:३३). हे आपल्याला दु:खित जणांची सेवा करण्यास, एकाकी लोकांना प्रेम करण्यास, करुणा दाखवण्यास, संतांना प्रोत्साहित करण्यास, इतरांसाठी खर्च करणे आणि स्वतःला वाहून घेणे इत्यादीकडे मार्गदर्शन करते. धार्मिकतेची ही कृत्ये आपल्याला देवाच्या सिद्ध इच्छेच्या

दिशेकडे नेते, जसे एपफ्रासने कलस्सै. येथील मंडळीसाठी प्रार्थना केली : *"देवाच्या संपूर्ण इच्छेनुसार तुम्ही परिपूर्ण व दृढनिश्चयी असे स्थिर राहावे"* (कलस्सै. ४:१२).

३. न्याय

न्यायाला प्रत्येक परिस्थितीसाठी शहाणपण म्हणून विचार केला जाऊ शकतो. आपण जीवनात पुढे जात असताना, देवाचा आत्मा आपल्याला कोणती निवड करावी याबाबत मार्गदर्शन करतो. आणि-सर्वात महत्वाचे- प्रत्येक निवडीसह योग्य वृत्ती आपल्यात निर्माण करण्याची सूचना तो देतो. दुसऱ्या शब्दात, एखाद्या मोठ्या विद्यापीठात प्रवेश घेण्याचे आपले लक्ष्य असू शकते परंतु त्याऐवजी तो विचार करा की तेथील निवासस्थानावर माझा उद्देश काय आहे. त्या विशेष निवासस्थानावर माझे विचार, शब्द आणि कृत्यांनी देवाचे गौरव करण्याची माझी मनापासून इच्छा आहे का? कदाचित एका विशेष नोकरीसाठी मी अर्ज करावा हा मोठा विषय नाही, परंतु माझी इच्छा ही आहे का की देवाचा त्या कामाच्या माध्यमातून सन्मान व्हावा आणि त्याला ओळखले जावे. अनेकदा, आपण आपल्या निवड करण्याला अधिक आध्यात्मिक करतो, जेव्हा देवाची इच्छा ही परिस्थितीच्या तपशीलांपेक्षा त्याच्या गौरवासाठी अधिक असते. त्याने आधीच प्रकट केलेल्या मार्गावर त्याला प्रसन्न करत आपण सरळपणे चालावे ही त्याची इच्छा असते. कोणते घर विकत घ्यावे यासाठी तो तुम्हांला एक चमत्कारिक प्रकटीकरण देणार नाही, परंतु तो तुम्हांला ज्ञान देईल (याकोब १:५) की सार्वकालिक मूल्य लक्षात घेऊन योग्य न्याय आणि निवडी कराव्यात.

दिवसाच्या शेवटी, आत्म्याची भूमिका ही आपल्याला येशूकडे इशारा करावा आणि त्याचे गौरव करावे ही आहे. *"तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो तुम्हांला मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईल; कारण तो आपल्या स्वतःचे सांगणार नाही; तर जे काही ऐकेल, तेच सांगेल; आणि होणाऱ्या गोष्टी तुम्हांला कळवील. तो माझे गौरव करील, कारण जे माझे आहे त्यातून घेऊन ते तुम्हांला कळवील"* (योहान. १६:१३-१४).

## पवित्र असण्यासाठी खूप व्यस्त

**जर आपण देवाचे ऐकण्यास खूप व्यस्त असलो, तर आपण खूप व्यस्त आहोत.**

जर आपली कार्ये आपल्याला त्याच्यासोबतच्या घनिष्ट संबंधापासून दूर नेत असतील, तर आपण आपल्या जीवनाचे आत्मपरीक्षण करावे आणि विचारावे, *" कोणाची वाणी मी ऐकत आहे?"* कोणाच्या निर्देशानुसार मी चालत आहे?" जर आपण इतकी कामे करत आहोत की आपल्याला प्रभूच्या

सान्निध्यात व्यतीत करण्यासाठी वेळ नाही, तर मग आपण अत्यंत व्यस्त आहोत आणि तो आपल्याला विचारत आहे त्यापेक्षा आपण अधिक करत आहोत (लूक. १०:४२). किंवा, जर आपली कार्ये लोकांना आपल्याकडे इशारा करत असतील, आणि आपण आपल्या कृत्यांसाठी गौरव मिळवत असो, तर कोण मार्गदर्शन करत आहे याचे आपण पुनर्परीक्षण केले पाहिजे. लक्षात ठेवा, देव त्याचे गौरव कोणालाही घेऊ देत नाही. जेव्हा आपल्याला गौरव मिळते, देवाला नाही (यशया ४२:८) .

ह्या गोष्टींवर मनन करण्यासाठी वेळ काढा. देवाच्या ऐवजी आपण गौरव कोठे प्राप्त करत आहोत? आपण आपल्या जीवनात सर्वशक्तिमान परमेश्वरा ऐवजी दुसऱ्यांना गौरव कोठे देत आहोत?

आपण एका गोंधळाच्या जगात राहत आहोत. सर्वकाही आपले लक्ष आणि वेळ आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. काम. पैसा. कुटुंब. मनोरंजन. मित्र. राजनीती. संघर्ष. नातेसंबंध. भीती. जेव्हा मी देवाची वाणी ऐकण्यासाठी संघर्ष करतो, हे असू शकते का की माझे जीवन अत्यंत कर्कश झालेले आहे? कदाचित त्या एका आवाजासाठी, त्याच्या आवाजासाठी लयबद्ध होणे जितके आवश्यक आहे हे तितके इतर आवाजांशी लयबद्ध होण्याविषयी नाही. स्तोत्रकर्ता आपल्याला सांगतो, *“शांत व्हा आणि लक्षात ठेवा की मीच देव आहे”* (स्तोत्र. ४६:१०). ही आज्ञा शांतीत समाप्त होत नाही, परंतु हे जाणण्यात बुडून गेलेली असते की तो देव आहे जेव्हा आपण आपल्या जीवनात त्याचे स्थान आणि आपल्या क्षणांसाठी त्याचे उद्देश शोधावे आणि ओळखावे.

आपण गोंगाट करणाऱ्या आपल्या जगाला नेहमीच शांत करू शकत नाही, परंतु आपण त्याच्या वचनात राहून आपल्या स्वामीची वाणी ऐकू शकतो. येशूने योहान १०:२७ मध्ये त्याच्या अनुयायांना आठवण करून दिली, *“माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात; मी त्यांना ओळखतो व ती माझ्यामागे येतात.”* येशूने हे स्पष्ट केले की पवित्र आत्म्याची भूमिका ही त्यांना त्याचे वचन स्मरण करून देणे होते. *“तरी ज्याला पिता माझ्या नावाने पाठवील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हांला सर्वकाही शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या त्या सर्वांची तुम्हांला आठवण करून देईल”* (योहान. १४:२६).

**एक जीवन जे स्वतःचा नकार करते ज्यामध्ये पवित्र आत्म्याचा आवाज ऐकला आणि मानला जाऊ शकतो.**

स्वतःचा नकार करणारे असे जीवन ज्यामध्ये पवित्र आत्म्याचा आवाज ऐकला आणि मानला जाऊ शकतो. हे समजून घ्या. देव तो नाही जो

संवाद साधण्यात चुकतो. तो त्याच्या वचनामधून आपल्याशी सतत बोलत आहे. प्रश्न हा आहे : आपण ऐकत आहोत का?

जर आपण देवाचे ऐकण्यास खूप व्यस्त असलो, तर आपण खूप व्यस्त आहोत.

## पवित्र आत्म्याचे कार्य

एका तरुण मुलाची गोष्ट सांगितली आहे जो एका शिल्पकाराकडे गेला जो एका लाकडाच्या मोठ्या ओंडक्यातून बारकाईने काही तुकडे काढत होता. उत्सुकतेने, तरुणाने त्या शिल्पकारास विचारले, *"तू काय करत आहेस?"* त्याने उत्तर दिले, *"मी एक सिंह घडवत आहे."* पुन्हा एकदा, मुलाने त्या परिस्थितीवर विचार केला आणि म्हटले, 'हे कसे शक्य आहे? तू लाकडाच्या एका ओंडक्यात एक सिंह कसा पाहू शकतो?"

त्याची पटाशी बाजूला ठेवत, शिल्पकाराने मुलाकडे पाहिले आणि उत्तर दिले, *"हे खूपच सोपे आहे. मी ह्या ओंडक्यातून जे सिंहाला प्रतिनिधित करत नाही ते मी बाजूला काढत आहे आणि मग मला शेवटी मिळते तो हा एक सिंह आहे."* त्याचप्रमाणे, पवित्र आत्म्याचे कार्य हे आपल्याला सर्व सत्यात नेणे आहे आणि शेवटी, आपल्याला येशू ख्रिस्ताच्या प्रतिमेत घडवण्याचे आहे, जेव्हा तो सर्वकाही बाजूला करत असतो जे ख्रिस्तासमान दिसत नाही.

आज्ञाधारकपणाचे पहिले पाऊल उचलण्यासाठी देव तुम्हांला कोणत्या दिशेने निर्देश देत आहे? तुम्ही पहिले पाऊल उचलण्यापूर्वी त्याला तुम्हांला दुसरे पाऊल स्पष्ट करण्याची अपेक्षा करू नका. ही सांसारिक यात्रा सरळ विश्वासाचा प्रवास आहे, क्षणोक्षणी आज्ञाधारकपणात त्याच्या पवित्र आत्म्यात चालणे आहे.

हा घनिष्ठ संबंध त्याच्याबरोबर गंभीर जबाबदारी घेऊन असतो. बायबलमधून या तीन आज्ञांवर मनन करा ::

### १. पवित्र आत्म्याला विझवू नका

*"आत्म्याला विझवू नका"* (१ थेस्सल. ५:१९). *"विझवणे"* हे प्रकाश किंवा अग्नी विझवणे याला संबोधते. आपण आपल्यातील आणि आपल्या द्वारे होणाऱ्या पवित्र आत्म्याच्या कार्याल विझवतो जेव्हा आपण त्याच्या बोलण्यास प्रत्युत्तर देण्यास चुकतो आणि अशा प्रकारे *"जगात प्रकाश म्हणून चमकण्यास चुकतो"* (फिलिप्पै. २:१५). विश्वासणाऱ्यास

सत्यात मार्गदर्शन करावे ही पवित्र आत्म्याची इच्छा आहे, परंतु तो आज्ञा पाळण्यासाठी जबरदस्ती करणार नाही.

## २. पवित्र आम्याला दु:खी करू नका

*"देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका; खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रित झाला आहात. सर्व प्रकारचे कडुपण, संताप, क्रोध, गलबला व निंदा ही अवघ्या दुष्टपणासह तुमच्यापासून दूर करण्यात येवोत; आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हांला क्षमा केली आहे तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा"* (इफिस. ४:३०-३२). हे खरोखर आश्चर्यकारक आहे. *"खिन्न"* करण्यासाठी वापरलेला समान शब्द तीव्र खिन्नतेसाठी वापरला आहे जी होते जेव्हा आपले प्रियजन मरण पावतात. आपण पवित्र आत्म्याला दु:ख देतो जेव्हा आपण पवित्रता आणि प्रीतीत चालण्यास अपयशी ठरतो. यावर विचार करा! देव अशक्त, पतित मनुष्यास त्याच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू देतो! यावरून देवाचे त्याच्या लेकरांसाठी सौम्य आणि कृपायुक्त हृदय दिसून येते, परंतु आपल्यावर इतके प्रेम करणाऱ्याला आपण दु:ख देणे किती दुष्टपणाचे आणि अकृतज्ञपणाचे आहे !

## ३. पवित्र आत्म्याने भरलेले असणे

*"आत्म्याने परिपूर्ण व्हा; स्तोत्रे, गीते व आध्यात्मिक प्रबंध ही एकमेकांना म्हणून दाखवा; आपल्या अंत:करणात प्रभूला गायनवादन करा; आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने सर्व गोष्टींबद्दल सर्वदा देवपित्याची उपकारस्तुती करत जा. ख्रिस्ताचे भय बाळगून एकमेकांच्या अधीन असा"* (इफिस. ५:१८-२१). *"पवित्र आत्म्याने भरलेले असणे"* हे प्रत्यक्ष येशूच्या आत्म्याने मार्गदर्शित आणि समर्थ केलेले आहे, त्याचा आनंद, प्रीती आणि इतर गुणांनी ओतप्रोत जे त्याच्या चरित्राची परिपूर्णता प्रतिबिंबित करते (गलती. ५:२२-२५). व्याख्येने, जर आपण एका गोष्टीने भरलेले असलो, तर आपण दुसऱ्या गोष्टीने भरू शकत नाही. आपण जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या दृष्टीकोनाला देवाच्या विचारांनी भरू देत आहोत का? परिणाम हा जीवन हे येशू ख्रिस्तासमान दिसेल आणि प्रेम करणारे असेल.

पवित्र आत्मा तुमच्यामध्ये आणि तुमच्या द्वारे काय करू शकतो त्याला काही मर्यादा नाही जेव्हा तुम्ही स्वतःचा नकार करता, तुमचा वधस्तंभ उचलता आणि त्याची वाणी ऐकता-तर प्रत्यक्ष येशूची वाणीच ऐकता.

*"तुम्ही पुत्र आहात, म्हणून देवाने 'अब्बा! बापा!' अशी हाक मारणाऱ्या आपल्या पुत्राच्या आत्म्याला तुमच्याआमच्या अंत:करणात पाठवले आहे. म्हणून तू आतापासून गुलाम नाहीस तर पुत्र आहेस; आणि पुत्र आहेस तर ख्रिस्ताच्या द्वारे देवाचा वारसही आहेस"* (गलती. ४:६-७).

गंभीरपणे. स्वर्गाच्या ह्या बाजूला, ह्यापेक्षा काही उत्तम असेल का?

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. पाप, धार्मिकता आणि न्यायाच्या क्षेत्रात पवित्र आत्मा सध्या तुम्हांला कसे दोष देत आहे?

२. तुम्ही तुमच्या जीवनात सध्या येशूच्या पवित्र आत्म्याला विझवणे किंवा खिन्न कसे करू शकता?

३. तुम्ही पवित्र आत्म्याची वाणी उत्तमरीत्या ऐकण्यासाठी कोणती व्यवहारिक पाऊले उचलू शकता?

# भाग ३

# "...व आपला उच्चलून

# वधस्तंभ

# घेऊन ...”

# १८

# येशूने तुम्हाला वधस्तंभापासून वाचवलेले नाही

केवळ तर्क एखाद्याला सांगतो की जर मी बर्मुडा अर्धी चड्डी, एक हवाईन टी-शर्ट आणि सैंडल्स घातलेले असतील, तर मी शक्यतो कॉर्पोरेट बैठकीला जात नाही. त्याच प्रमाणे, जर माझे कपडे फुटबॉल पैड्स, एक जर्सी, हेल्मेट, माऊथगार्ड आणि क्लीट्स असेल, तर तुम्ही सहज गृहीत धरू शकता की मी फुटबॉल खेळत आहे-तेही अमेरिकी फुटबॉल, हे तसेच आहे. म्हणून, जेव्हा ख्रिस्त त्याच्या अनुयायांना त्यांचे वधस्तंभ उचलण्यास बोलावतो, तेव्हा काय गृहीत धरले जाते? होय, एक व्यक्ती जो वधस्तंभ घेऊन चालत आहे त्याच्या किंवा तिच्यासमोर दु:ख सोसणे, छळ आणि मृत्यू हे आहेच.

तुमचा वधस्तंभ घेऊन चालणे हे त्या जीवणाबद्दल बोलते जे अस्वीकार आणि वेदनेची अपेक्षा करते. दु:ख सोसणे हे अपेक्षित आहे. तसेच मृत्यूही. तुम्ही तुमच्या तारणाऱ्याच्या आज्ञेने वधस्तंभ उचलला आहे. आश्चर्य हे असू शकते की छळ सहन केला जाऊ नये. मृत्यूकडे नेले जाऊ नये. त्याच्या नावासाठी अपमानित केले जाऊ नये. असे विचार आपल्या २१व्या शतकाच्या कानांना अज्ञात आहे का? आपल्या तारणकर्त्याला वधस्तंभावर खिळलेल्या जगात आपण इतके आरामदायी झालो आहोत का की *"वधस्तंभाची"* लज्जा आणि वेदना सहन केल्यावाचून आपण *"त्याचे अनुसरण"* करण्याची आशा करतो? जर जग सक्रीय होऊन त्याला विरोध करीत आहे, तर मग त्यांनी आपली प्रशंसा करावी अशी आपण अपेक्षा ठेवू शकतो का?

येशू वधस्तंभाच्या सत्यतेबद्दल आणि ते उचलण्याच्या आज्ञेबद्दल कधीही मुखवटा धारण करीत नाही. एक प्रिय मित्र म्हणून, केविन टर्नर, याने मला विचारले, *"या आणि मरा!' या शब्दांनी कोण क्रांती सुरू करतो?"*

सर्वसामान्य ख्रिस्ती लोकांना सांगा की येशूने तुम्हांला वधस्तंभापासून तारण दिलेले नाही, आणि तुम्हांला मग एक पाखंडी म्हणतील. ही मानसिकता काही कारणांपैकी एक असू शकते का की आपण ख्रिस्ताची प्रीती, मिशन आणि दयेची गहनता समजण्यास चुकत आहोत? हे तसे असू शकते का की वधस्तंभाचा स्वीकार करण्याची आपली अनिच्छुकता देखील आपल्याला त्याचा स्वीकार करण्यापासून रोखत आहे? आणि वधस्तंभाला टाळण्याच्या आपल्या प्रयत्नांमुळे आपण त्याच्या प्रीतीची पूर्णपणे कदर करत नाही का?

अनेक पुरुष आणि स्त्रिया वधस्तंभावर खिळून मरण पावले आहेत. योसेफस, यहुदी इतिहासकार, येशूच्या स्वर्गारोहणानंतर थोड्याच वर्षांनी जन्मले होते, ते याची साक्ष देतात की रोमन लोकांनी केलेली यरुशलेमेची घेराबंदी (इसविसन ७०) दरम्यान दिवसाला ५०० लोकांना वधस्तंभावर खिळून मारण्यात येत होते.[३७] आज देखील, येथे हिंसक धार्मिक कट्टरपंथी आहेत जे त्यांच्या विश्वासाशी असहमती दाखवणाऱ्या लोकांना वधस्तंभावर खिळतात. अनेकांना वधस्तंभावर खिळले गेले आहे. तर नासरेथच्या येशूच्या वधस्तंभाला इतरांपेक्षा कसा वेगळा केले आहे? काय ते प्रत्यक्ष वधस्तंभावर देण्याविषयी आहे का, किंवा यामध्ये काहीतरी असीमितपणे अधिक भयंकर गोष्ट आहे?

हे विलक्षण आहे की गेथसेमाने बागेत, अत्यंत वेदना आणि खिन्नतेत, येशूने वधस्तंभापासून त्याला वाचवावे अशी पित्याला विनंती केली नाही. येशूची अशी कोणतीही प्रार्थना नाही जी म्हणत आहे, *"हे माझ्या बापा, होईल तर **हा प्याला** माझ्यावरून टळून जावो; तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो"* (मत्तय. २६:३९).

प्याला का आणि वधस्तंभ का नाही?

## देवाच्या क्रोधाचा प्याला

जुन्या करारात सर्वत्र, आपण ह्या प्याल्याला देवाच्या क्रोधाचे प्रतिक म्हणून पाहतो जे मानवजातीच्या दुष्टतेच्या विरोधात भरलेले आहे. स्तोत्र. ७५:८ मध्ये, आसाफ लिहितो, *"पाहा, परमेश्वराच्या हाती **प्याला** आहे; व त्यात द्राक्षारस फेसाळत आहे; त्यात मसाला मिसळला आहे आणि त्यातून तो ओतून देतो; पृथ्वीवरील सर्व दुर्जनांना तो खातरीने*

*गाळासकट **प्याला** लागेल."* नंतर यिर्मया संदेष्ट्याने प्रभूच्या ह्या शब्दांची नोंद केली : *"परमेश्वर, इस्राएलाचा देव, मला म्हणाला की, 'माझ्या हातून संतापरूप द्राक्षारसाचा हा प्याला घे व ज्या राष्ट्रांकडे मी तुला पाठवतो त्यांना तो पाज"* (यिर्मया २५:१५).

ख्रिस्त वधस्तंभावर जाण्याआधी, याकोब आणि योहान, त्यांची आई आणि येशू यांच्यामध्ये एक संभाषण झाले. त्या भेटीत, शिष्यांच्या आईने तिच्या मुलांसाठी विनंती केली की त्याच्या राज्यात तिच्या पुत्रांना त्याच्या हाताच्या उजवी आणि डावीकडे बसण्याचा अधिकार द्यावा. मला ख्रिस्ताचे उत्तर आवडते. *"तुम्ही काय मागता हे तुम्हांला समजत नाही; जो **प्याला** मी पिणार आहे तो तुम्हांला पिता येईल काय?"* (मत्तय. २०:२२).

ते त्याला म्हणाले, *"आम्हांला शक्य आहे' त्याने त्यांना म्हटले,* "माझा प्याला तुम्ही प्याल खरा, व जो बाप्तिस्मा मला घ्यायचा आहे तो घ्याल. पण माझ्या उजवीकडे व माझ्या डावीकडे बसण्याचा अधिकार देणे माझ्याकडे नाही, तर ज्यांच्यासाठी माझ्या पित्याने हा सिद्ध केला त्यांच्यासाठी तो आहे" (मत्तय. २०:२३).

शब्दांचा बदल लक्षात घ्या. प्रथम त्याने विचारले जर ते तो प्याला पिऊ शकतील का. मग तो त्यांना म्हणतो ते तो प्याला पितील.

**ख्रिस्ताने देवाच्या क्रोधाचा प्याला पिला जेणेकरून आपण कायमचे त्याच्या प्रीतीचा प्याला पिऊ शकावे.**

आपण हे चुकू नये.

*"ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्याआमच्याकरता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्व असे व्हावे"* (२ करिंथ. ५:२१). येशू आमच्यासाठी पाप झाला (पवित्र, असीमित पापार्पण). जेव्हा तो वधस्तंभावर गेला, तेव्हा काय घडले? त्याने मोठ्याने आरोळी मारली, *"एली, एली, लमासबखथनी,' म्हणजे 'माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?"* (मत्तय. २७:४६). पृथ्वीवर असताना ही पहिलीच वेळ येशू प्रार्थना करतो आणि देवाला *"पिता"*म्हणून हाक मारत नाही. का? वधस्तंभावर, येशू त्यागलेला होता, पित्यापासून घनिष्ट संगतीपासून वेगळा झालेला होता जेणेकरून आपण त्याच्या प्रीतीपासून कधीही वेगळे केले जाऊ नये.

हा पापाचा दंड आहे- म्हणजेच वेगळे होणे. एदेन बागेच्या पुढे, पापाने मनुष्याला देवापासून वेगळे केले होते, जोपर्यंत येशू ख्रिस्त आला नाही आणि पित्याशी आपला समेट केला नाही. आता ख्रिस्ताचा अनुयायी म्हणून, आपण आनंदाने हे वाचू शकतो, *"कारण माझी खातरी आहे की, मरण, जीवन, देवदूत, अधिपती, वर्तमानकाळच्या गोष्टी, भविष्यकाळच्या गोष्टी,*

*बले, उंची, खोली, किंवा* ***दुसरी कोणतीही सृष्ट वस्तू*** *ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची आपल्यावरील जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करायला समर्थ होणार नाही"* (रोम. ८:३८-३९).

ख्रिस्ताने देवाच्या क्रोधाचा प्याला पिला जेणेकरून आपण कायमचे त्याच्या प्रीतीचा प्याला पिऊ शकावे. संपूर्ण सार्वकालिकतेमध्ये, आपल्यावरील देवाच्या प्रीतीची गहनता आपल्याला पूर्णपणे कधीही कळणार नाही, आपल्या तारणाला विकत घेण्यासाठी त्याला किती किमत भरावी लागली हे आपल्याला पूर्णपणे कळणार नाही, कारण आपण देवाच्या क्रोधाच्या प्याल्याच्या एका थेंबाचा देखील अनुभव कधीही करणार नाही.

परंतु ह्या प्याल्यात यापेक्षाही अधिक आहे. ज्या रात्री त्याचा विश्वासघात केला गेला, येशूने प्याला घेतला आणि त्याच्या शिष्यांना दिला आणि म्हटले, *"हा प्याला माझ्या रक्ताने झालेला नवा करार आहे; जितक्यांदा तुम्ही हा पिता तितक्यांदा माझ्या स्मरणार्थ हे करा"* (१ करिंथ. ११:२५). हा प्याला. त्याने आपला प्याला पिला म्हणजे आपण त्याचा घेतला पाहिजे. आपला प्याला हा प्रीतीचा आणि त्याच्यासोबत सहभागीतेचा आहे.

काही वर्षांपूर्वी, जेव्हा मी मध्य रात्री देवाच्या क्रोधाच्या ह्या भयानक प्याल्यावर विचार करत होतो, तेव्हा हे शब्द मला दिले गेले.

एक प्याला हा तुझ्या हातात आहे,
न्याय, मृत्यू आणि नरकावर उपाय.
पवित्रता मागणी करत असलेल्या न्यायाबद्दल बोल,
त्याबद्दल कोणीही मर्त्य कधी सांगू शकणार नाही.

माणूस रागावतो तेव्हा वेळेनुसार तयारी कर,
हा प्याला एक सतत आठवण देणारा पुरावा आहे,
की पाप, जरी अत्याधिक आहे तरी त्याचा न्याय होईल,
आणि देव, जो न्यायी आहे, तो कधीही ढळणार नाही.

तरीही प्रीती ही अज्ञात, विचारांच्याही पलीकडील,
स्वर्गातू बाहेर आले की सर्वांनी पाहावे,
ते जे शरीरात आच्छादलेले आहे ज्याची जग कदाचित झलक पाहतात,
दया न्यायाशी भेट घेते, आपल्याला मुक्त करते.
आणि, ओह तो भयानक प्याला घेतला गेला आहे,

त्याला निष्पाप व्यक्तीवर ओतले गेले आहे,
ते देवाच्या शब्दाच्या ओठांवर,
पूर्ण झाले आहे, कायमचे पूर्ण केले गेले आहे.

आणि आता त्याला सर्व क्षेत्रांपेक्षा अत्युच्च केले गेले आहे,
त्याचा प्याला मेजावर पाहतो,
तो बोलतो, “हे माझे रक्त आहे जे तुम्ही पिता,
जोपर्यंत मी परत येत नाही, माझे स्मरण करत राहा.”

येशू देवाच्या क्रोधापासून आपल्याला तारण्यासाठी आणि पुढे येणाऱ्या सार्वकालिक वेगळेपणापासून वाचवण्यासाठी मरण पावला, परंतु तो वधस्तंभापासून आपल्याला तारण्यासाठी मरण पावला नाही. कोणतेही ईश्वरविज्ञान जे ख्रिस्ताचे अनुसरण करणे म्हणजे काय यापासून वधस्तंभाला दूर करण्याचा प्रयत्न करते, ते असे ईश्वर विज्ञान आहे जे *“दुसऱ्या येशूला”* सादर करते (२ करिंथ. ११:२-४). येशू त्याचे अनुसरण करण्यात दु:ख सोसणे समाविष्ट आहे हा केवळ इशारा देत नाही. येशूने त्याच्या भावी अनुयायांना वधस्तंभाची निवड करण्याची आज्ञा दिली. *“माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे”* (मत्तय. १६:२४).

वधस्तंभ हा केवळ एक पर्याय नाही. हा ख्रिस्तासोबत घनिष्ठतेसाठी मार्ग आहे.

येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. *“येशू तुम्हांला वधस्तंभापासून तारण्यासाठी मरण पावला नाही”* या वाक्याचे स्पष्टीकरण द्या.

२. तुमच्या जीवनातील एखाद्या विशेष पापाबद्दल विचार करा. क्रोधाच्या प्याल्यात काय होते जे ख्रिस्ताने तुमच्यावतीने प्याले? त्याने त्या बदल्यात तुम्हांला कोणता प्याला पिण्यास दिला?

३. तुमचा वधस्तंभ उचलून घेण्याचा परिणाम म्हणून तुम्ही कोणत्या दु:खाचा अनुभव केला आहे? आणि, जर तुम्ही अद्याप कोणतेही दु:ख अनुभवलेले नसेल, तर का नाही?

# ११

# वधस्तंभ समजणे

वधस्तंभ सहज आपल्या जीवनात घडत नाही. तुम्ही त्याची निवड करता. तुम्ही आपला वधस्तंभ उचलावा आणि त्याचे अनुसरण करावे हे ख्रिस्ताचे आमंत्रण एखाद्या विशेष काहीतरी गोष्टी टाळण्याबद्दल नाही. हे एका विशेष व्यक्तीचा शोध घेण्याबद्दल आहे. तुम्ही वधस्तंभ उचलताच त्याचे अनुसरण करण्याच्या निवडीची वास्तविकता दिसून येईल.

परंतु थांबा, आता हे रोमांचक होत आहे.

## जाणूनबुजून निर्णय

तुमच्या जीवनात *"वादळा"* च्या कारणामुळे तुम्ही त्रास सहन करणे आणि तुम्ही उचललेल्या वधस्तंभामुळे त्रास सहन करणे यांच्यामध्ये फरक आहे. मला आठवते एक स्त्री तिच्या पाठीच्या दु:खण्याने शोक करत होती आणि म्हणाली, *"हे केवळ माझा वधस्तंभ उचलणे आहे."* तसे आहे का? या अस्तव्यस्त जगात, भटकलेले पापी आणि ख्रिस्ताचे अनुयायी दोघांनाही वादळाचा तडाखा लागेल. गोष्टी जसे कैन्सर, बेरोजगारी, किंवा प्रिय व्यक्तींचा मृत्यू ही जीवनाची वादळे आहेत, आणि ते कोणालाही होऊ शकतात. म्हणून वधस्तंभापासून वादळाला काय वेगळे करते? फक्त दु:ख सहन करणे आणि छळ यांमध्ये काय फरक आहे? वधस्तंभाची निवड कशी केली जाते?

वधस्तंभ उचलणे म्हणजे काय याचे तुम्हांला मला एक उदाहरण देऊ द्या. माझे अंकल वस्त्रे बनवणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय कंपनीत चित्रासह वस्त्रे डिजाईन करण्याचे अनेक वर्षे काम करत होते. जागतिक आर्थिक संकट आणि अति बेरोजगारीच्या काळात त्यांनी हे काम केले. व्यवस्थापक अनेक वेळा त्यांना भेटून सांगत असे की अनैतिक वर्तनाला प्रोत्साहन

देणारे संकेत आणि प्रतिमा असलेले कपडे डिजाईन करा. जरी त्यांनी वारंवार त्यांना सांगितले होते की एक ख्रिस्ती या नात्याने अशी गोष्ट करणे हे त्यांच्या सदसदविवेकबुद्धीच्या विरोधात होईल, तरीही त्यांच्यावर ते करण्याचा दबाव टाकला जात असे. शेवटी, त्यांनी अंतिम निर्णय सांगितला : असे शर्टस डिजाईन करा किंवा बेरोजगार बना. इब्री. १३ च्या आत्म्यात, त्यांनी वधस्तंभ निवडला आणि नोकरी गमावली. *“तर आता आपण त्याचा अपमान सोसत तळाबाहेर त्याच्याकडे जाऊ या. कारण आपल्याला येथे स्थायिक नगर नाही; तर जे नगर पुढे येणार आहे त्याची आपण वाट पाहत आहोत”* (इब्री. १३:१३-१४).

देवाने तुम्हांला कोणता वधस्तंभ उचलण्यास सांगितले आहे? कदाचित लाच घेणे, टोमणे मारणे आणि गुंडगिरी करण्यास प्रतिकार करण्याचा हा वधस्तंभ आहे जो अनेकदा व्यवसायिक जगाच्या सर्वोच्चस्थानी जाण्याच्या मार्गाचा भाग आहे. कदाचित तो घर, सुखविलास आणि सुविधांचा त्याग करण्याचा वधस्तंभ आहे जो अद्याप जेथे ख्रिस्ताचे शुभवर्तमान पोहचलेले नाही तेथपर्यंत ते घेऊन जाण्याचे उच्च मिशन आहे. वधस्तंभ कोणताही असो आणि त्याशी संबंधित किंमत काहीही असो, येशूचे शब्द लक्षात ठेवा, *“आणखी ज्या कोणी घरे, भाऊ, बहिणी, बाप, आई, मुले किंवा शेते माझ्या नावाकरता सोडली आहेत त्याला शंभरपटीने मिळून सार्वकालिक जीवन हे वतन मिळेल; परंतु जे पहिले ते शेवटले आणि शेवटले ते पहिले असे पुष्कळ जणांचे होईल”* (मत्तय. १९:२९-३०).

जॉन जी. एलिऑट यांच्या गीताचे बोल, १९८०च्या शेवटी लिहिले होते, ते मला आठवले.

> वधस्तंभाचा स्वीकार करा, जेथे येशूने दु:ख सोसले,
> जरी जे सर्व तुमचे आहे असा दावा तुम्ही करता ते सर्वस्व समर्पण करावे लागेल.
> रिकामी कबर गुलगुथाच्या शोकाने समाप्त होते.
> तुमच्या वधस्तंभाचे दु:ख, उद्यापर्यंत सहन करा.
> वधस्तंभाचा स्वीकार करा.[३८]

वधस्तंभ स्वयं येशू ख्रिस्ताशी संबंधित असण्याची आणि त्याच्या नावाशी संबंधित लज्जा सहन करण्याची स्वीकृती आहे. सामाजिक क्षेत्रात नाकार झाला याचे कारण तुम्ही संस्कृतीच्या वेदीवर तडजोड करण्यास नकार दिला. तुम्ही स्पष्ट दिसणाऱ्या गोष्टींपेक्षा सार्वकालिकतेला मूल्य दिले, तेव्हा तुमच्या मित्रांकडून तुम्हांला मूर्ख म्हणण्यात आले.

हे मग आपल्याला वधस्तंभाच्या पुढील पैलूकडे घेऊन जाते.

## जाणूनबुजून घोषणा करणे

वधस्तंभ उचलणे हे एका खाजगी निर्णयापेक्षा अधिक आहे. आपण केलेल्या अपराधासाठी आपल्या दोषाची  सार्वजनिक घोषणा आहे.

रोमन काळात, जेव्हा दोषी व्यक्ती वधस्तंभावर देण्याच्या टेकडीकडे चालत असे, एक पाटी प्रत्येकाच्या गळयात लटकवलेली असे, जी त्याचा किंवा तिचा अपराध पाहणाऱ्या लोकांना दर्शवत असे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, सार्वजनिक शिक्षा पाहणाऱ्या जमावाला हे अचूक माहित असे की प्रत्येक व्यक्ती का दु:ख भोगणार आणि मरणार आहे, जरी त्या वर्णनात अपराधी व्यक्तीची निंदा करण्यासाठी व्यंगाचा वापर केला जात होता.[३९ ४०] ख्रिस्ताने देखील शक्यतो त्याच्या गळयात विवादित पाटी घातलेली असेल, *"नासरेथचा येशू, यहूद्यांचा राजा."* केलेल्या अपराधांच्या सर्व जाणीवेची शेवटची आठवण साक्षीदार ठरणाऱ्या प्रेक्षकांना करून देण्यासाठी अपराधाची घोषणा ही अपराध्याच्या डोक्यावर वधस्तंभावर लावली जात असे.

येशू ख्रिस्ताचे अनुयायी होण्यासाठी कोणताही वधस्तंभ उचलण्याचा निर्णय जो आपण घेतो, ते येशू ख्रिस्तामध्ये जे अंतिम मूल्य आणि खजिना आम्हांला सापडलेला आहे त्याची जगाला घोषणा असेल. ते दोन गोष्टींची घोषणा करेल : (१) आपला दोषीपणा आणि (२) त्याची योग्यता. एका गीतामध्ये हे विचार सामर्थ्यशाली स्वरूपात मांडत, एलिझाबेथ क्लीफने, स्कॉटिश गीत लेखिकेने, तिच्या मृत्यूच्या एक वर्षाआधी हे शब्द लिहिले.

> येशूच्या वधस्तंभावर,
> माझे डोळे काही वेळ पाहू शकतात
> परमेश्वराचा प्रत्यक्ष मरण्याचा प्रकार,
> ज्याने तेथे माझ्यासाठी दु:ख सहन केले,
> आणि भग्न हृदयापासून, अश्रूंसह,
> दोन आश्चर्यांना मी कबूल करते,
> त्याच्या गौरवी प्रीतीचा अद्भुतपणा,
> आणि माझ्या स्वतःची अयोग्यता.[४१]

जेव्हा आपण वधस्तंभ उचलून घेण्याची निवड करतो, तेव्हा आपण जाहीर करतो आम्ही दोषी होतो, ते हे की आम्हांला तारणारा सापडला आहे आणि हे की खजिना जो आम्हांला त्याच्यामध्ये सापडला आहे त्याच्यासाठी जगणे आणि मरणे हे योग्य आहे.

वधस्तंभ उचलणे हे देवासह नातेसंबंध प्राप्त करून देत नाही. त्याऐवजी, ते चिन्हित करते की प्रभू येशू ख्रिस्तामध्ये आम्हांला अंतिम नातेसंबंध सापडले आहे, आणि आम्हांला त्याच्याबरोबर आणि त्याच्या दु:खात घनिष्ठपणे संबंधित राहण्याची इच्छा आहे (फिलिप्पै. ३:१०).

येशू तुमचा खजिना आहे हे जगाला माहित आहे का? जर नाही, तर तुम्ही खरोखर वधस्तंभ उचलला आहे का?

## जाणूनबुजून टाकून देणे

वधस्तंभ उचलण्याची कृती ही सर्वस्व पणाला लावण्याची आहे. चला मला हे स्पष्ट करू द्या. तुम्ही हातात जेवणाचे ताट असताना रेफ्रिजरेटर हलवण्याचा प्रयत्न कधी केला आहे का? कदाचित नाही. असे काम होत नाही. सॅक्सोफोन वाजवत असताना कारचे तेल बदलण्याचा प्रयत्न करा. तुमचे वाजविणे किंवा तेल बदलणे हे दोन्हीही यशस्वी होणार नाहीत. त्याचप्रमाणे, तुमच्या हातात जगाचा खजिना असताना तुम्ही वधस्तंभ उचलू शकत नाही. या कामाला रिकामी हाताची आवश्यकता आहे. वधस्तंभ उचलणे हा एक निर्णय आहे : ख्रिस्ताबरोबर आपल्या सहभागीतेसह इतर गोष्टी सोडून दिल्या जातात. पौलाच्या शब्दात, *"तरी ज्या गोष्टी मला लाभाच्या होत्या त्या मी ख्रिस्तामुळे हानीच्या अशा समजलो आहे; इतकेच नाही, तर ख्रिस्त येशू माझा प्रभू, ह्याच्याविषयीच्या ज्ञानाच्या श्रेष्ठत्वामुळे मी सर्वकाही हानी असे समजतो; त्याच्यामुळे मी सर्व गोष्टींना मुकलो, आणि त्या केरकचरा अशा लेखतो; ह्यासाठी की, मला ख्रिस्त हा लाभ प्राप्त व्हावा. आणि मी त्याच्या ठायी आढळावे आणि माझे नीतिमत्व-माझे स्वतःचे नव्हे, म्हणजे नियमशास्त्राच्या योगे प्राप्त होणारे नीतिमत्व नव्हे-तर ते ख्रिस्तावरील विश्वासाने प्राप्त होणारे म्हणजे देवापासून प्राप्त होणारे नीतिमत्व असे असावे"* (फिलिप्पै. ३:७-९).

जर एखाद्या ऑलिम्पिक जलतरणपटूने शर्यतीसाठी तिच्या नेहमीच्या वस्त्रांवर त्वचेला घट्ट चिकटणारे पोहण्याचे वस्त्र घातले, तर आपण त्या जलतरणपटूला स्पर्धेतून बाहेर आहे असे समजू. जर एखादा एनबीए खेळाडू त्याच्या गणवेशाच्या वर तीन-पीस सूट घालून आणि त्यावर गणवेशाचे बूट घातलेले असले, तर आपण त्याला *"तयार नाही"* असे म्हणू. ज्याप्रमाणे खेळामध्ये खेळाची वस्त्रे घालण्याआधी

**आपण वधस्तंभ उचलणे आणि येशूचे अनुसरण करण्याआधी, आपण आपल्या जीवनातील प्रयत्न, गर्व, कार्ये, आणि भूतकाळाला त्याच्या नेतृत्वासाठी सोडले पाहिजे.**

नेहमीची वस्त्रे काढावी लागतात, त्याप्रमाणेच हे ख्रिस्ताच्या बोलावण्यात आहे. आपण वधस्तंभ उचलणे आणि येशूचे अनुसरण करण्याआधी, आपण आपल्या जीवनातील प्रयत्न, गर्व, कार्ये, आणि भूतकाळाला त्याच्या नेतृवासाठी सोडले पाहिजे.

जसे आपण अगोदरच चर्चा केली आहे, ज्या जीवनासाठी ख्रिस्त आपल्याला बोलावतो ते त्याच्या जीवनाच्या दैवी मध्यस्थीशिवाय (तारणाचे त्याचे दान) मानवी दृष्टीने अशक्य आहे. आज्ञा ही जाणूनबुजून आहे. हे केवळ ख्रिस्ताने आपल्याला त्याचे जीवन दिल्यावरच आपण वधस्तंभ उचलू शकतो. जसे ऑगस्टीन टोप्लाडी यांनी लिहिले :

> माझ्या हाताचे परिश्रम नाही
> जे तुझ्या नियमशास्त्राची मागणी पूर्ण करू शकते;
> माझा उत्साह पाप दूर करू शकेल का,
> माझे अश्रू कायमचे वाहत राहू शकतील का,
> पापासाठी सर्व काही प्रायश्चित करू शकणार नाही;
> तूच केवळ तारले पाहिजे आणि केवळ तूच.[४२]

## प्रीतीला प्रतिसाद

वधस्तंभ उचलणे हे त्याच्या प्रीतीला प्रतिसाद आहे, त्याची प्रीती प्राप्त करण्याचे माध्यम नाही. देवाचे वचन हे वारंवार कसे म्हणते त्याकडे लक्ष द्या :

- *"म्हणून बंधूजनहो, मी **देवाच्या करुणांमुळे** तुम्हांला विनवतो की, तुम्ही आपली शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पण करावीत"* (रोम. १२:१).

- *"तेव्हा प्रियजनहो, **आपल्याला ही अभिवचने मिळाली आहेत**, म्हणून देहाच्या व आत्म्याच्या सर्व अशुद्धतेपासून आपण स्वतःला शुद्ध करू आणि देवाचे भय बाळगून पावित्र्याला पूर्णता आणू"* (२ करिंथ. ७:१).

- *"**म्हणून तुम्ही ख्रिस्ताबरोबर उठले आहात**, तर ख्रिस्त देवाच्या उजवीकडे जेथे बसला आहे, तेथल्या वरील गोष्टी मिळवण्याचा यत्न करा"* (कलस्सै. ३:१).

आपली प्रेरणा आपल्या स्वतःला ख्रिस्ताला देणे हे तारण प्राप्त करण्यासाठी नाही, किंवा त्याच्या प्रीतीसाठी पात्रता नाही, परंतु आपल्या तारणाऱ्याला ओळखणे आहे, ज्याने स्वतःला आमच्यासाठी दिले. आपण त्याच्यावर प्रीती करतो कारण त्याने आपल्यावर प्रथम प्रीती केली आहे आणि ती प्रीती त्याने देवाच्या क्रोधाच्या प्याल्याला पिऊन व्यक्त केली आहे.

## वैयक्तिक (परंतु खाजगी नाही) संबंध

चला आपण उजळणी करू या. वधस्तंभ (१) हा जाणूनबुजून निवडला आहे, (२) हे आपल्या अपराधाची घोषणा आहे, आणि (३) ते अन्य गोष्टींना सोडून देण्याची मागणी करते. वधस्तंभ उचलणे हे (४) त्याच्या प्रीतीला उत्तर देखील आहे, आणि शेवटी, (५) ते वैयक्तिक आणि खाजगी असे दोन्हीही आहे. ख्रिस्ताने आपल्या शिष्यांना म्हटले, *"माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे"* (मत्तय. १६:२४). येशू वापरत असलेल्या सर्वनामाला अगदी जवळून पाहा : *"आपला"*. ख्रिस्ताच्या प्रत्येक अनुयायाने त्याचा किंवा तिचा वधस्तंभ उचलावा.

रोमन काळात, तेथे गुपित वधस्तंभ अशी काही संकल्पनाच नव्हती. ती कल्पनाच प्रत्यक्षात हास्यास्पद आहे. एखादा व्यक्ती विशाल रोमन वधस्तंभ किंवा वधस्तंभाचे एक लाकूड उचलून जवळच्या लोकांना स्पष्ट दिसल्याशिवाय वाहून नेऊ शकत नव्हता. तर मग आपण का गृहीत धरतो की वधस्तंभ जो ख्रिस्त आज आपल्याला उचलण्यास सांगतो तो काही वेगळा असेल? ख्रिस्ताचे अनुयायी होणे हा एक वैयक्तिक निर्णय आहे, परंतु सर्वात स्पष्टपणे एक खाजगी बाब नाही.

जेव्हा त्याच्या शिष्यांबरोबर बोलत आहे, येशूने मीठ, प्रकाश आणि टेकडीवरील नगराशी त्यांची तुलना केली (मत्तय. ५:१३-१६). हे तिन्हीही घटक त्यांच्या उपस्थितीची सहज जाणीव करून देतात आणि लक्ष वेधून घेतात : चव, मार्गदर्शन आणि आशा जे ते पुरवतात. येशूने आपल्या शिष्यांना हेही देखील सांगितले, *"जो कोणी माणसांसमोर मला पत्करील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर पत्करीन; पण जो कोणी माणसांसमोर मला नाकारील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर नाकारीन"* (मत्तय. १०:३२-३३). ख्रिस्ताचे अनुयायी होण्याला उद्देशपूर्ण सार्वजनिक बाजू आहे जिचा हेतू आपल्या सभोवतालच्या जगावर प्रभाव टाकण्याचा आहे.

जर तुम्ही येशूचे अनुयायी आहात, तर तो तुम्हांला तुमचा वधस्तंभ उचलण्यास आज्ञा देतो-ख्रिस्तासोबतची वैयक्तिक ओळख. त्याने आपल्याला ह्या सहभागीतेच्या सत्याची आठवण देण्यासाठी स्पष्ट प्रतिक दिले आहे.

बाप्तिस्मा.

## बाप्तिस्मा हा साखरपुडा सारखा

बाप्तिस्मा हा व्यक्तीने पश्चाताप करणे आणि शुभवर्तमानावर विश्वास ठेवणे आणि ख्रिस्ताचे अनुयायी होण्याची निवड करण्याची सार्वजनिक घोषणा करणे आहे. मला याची तुलना मध्य पूर्व येथील साखरपुडा विधीशी करण्यास आवडेल.

येशूच्या काळात, एक तरुण जोडपे जे विवाहासाठी तयारी करत आहे त्यांना त्यांच्या दोघांच्याही कुटुंबांकडून साखरपुडा होण्याआधी परवानगी मिळत असे. जरी त्यांचा विवाह अद्याप झालेला नसला, तरी समाज आणि कायद्याच्या दृष्टीने ते कायदेशीर आणि कायद्याने बंधनकारक मानला जात असे. मित्रपरिवार आणि कुटुंबीय त्यांच्या साखरपुड्याची घोषणा सार्वजनिक आणि मोठी मेजवानी देऊन साजरी करत असत. सर्व उपस्थितांच्या समोर हे स्पष्ट होत असे की, ते आतापासून एकटे किंवा उपलब्ध नाहीत. ते आयुष्यासाठी एक झालेले आहेत; ते त्यांच्या एकटेपणाच्या जीवनासाठी मृत झालेले आहेत.

मी मध्य पूर्वेतील माझ्या मित्राच्या घरात बसलो होतो, नवरा आणि नवरींचे साखरपुड्यात घातलेली वस्त्रे, केक कापणे आणि नृत्याची चित्रे पाहत होतो. चित्रे जी माझ्या मित्राने मला दाखवली होती ती विवाहातील चित्रांसारखी दिसत होती, परंतु तुम्ही अंदाज लावू शकता काय? ती तशी नव्हती. ती चित्रे साखरपुडा विधींची होती, जेथे त्यांनी सार्वजनिकपणे त्यांच्या ऐक्याची घोषणा केली होती. रूढीप्रमाणे, साखरपुड्यानंतर, होणारा पती निघून जातो आणि त्याच्या नवरीसाठी राहण्याची जागा तयार करतो. जागा तयार झाल्यावर, तो परत येतो आणि तिला घेऊन जातो जेणेकरून ते आता पती व पत्नी म्हणून एकत्र राहू शकतील. हे तुम्हांला परिचयाचे वाटत नाही का?

येशू म्हणाला, *"तुमचे अंत:करण अस्वस्थ होऊ नये; देवावर विश्वास ठेवा आणि माझ्यावरही ठेवा. माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत; नसत्या तर मी तुम्हांला तसे सांगितले असते; मी तुमच्यासाठी जागा तयार करायला जातो. आणि मी जाऊन तुमच्यासाठी जागा तयार केली म्हणजे पुन्हा येऊन तुम्हांला आपल्याजवळ घेईन; ह्यासाठी की, जेथे मी आहे तेथे तुम्हीही असावे"* (योहान. १४:१-३).

त्याचप्रमाणे, बाप्तिस्मा हा जगासमोर होणारा एक सार्वजनिक साखरपुडा विधी आहे, जो स्वर्गातील पती, येशू ख्रिस्ताबरोबर आपली अतूट निष्ठा आणि संबंधाची घोषणा आहे. आतापासून आपण जगाच्या प्रीतीसाठी उपलब्ध नाहीत. आपण आता त्याच्या प्रीतीने बांधले गेलो आहोत आणि त्याच्या प्रस्तावाला *"होय"* म्हटलेले आहे. *"तर मग आपण त्या*

*मरणातील बाप्तीस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो; ह्यासाठी की, ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यांतून उठला व त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे"* (रोम. ६:४).

जेव्हा आम्ही नायजेर मध्ये बाप्तिस्मा विधी करत होतो, तेव्हा आम्ही अक्षरशः रानातील जमिनीत एक मोठी कबर खोदली, त्याच्यावर प्लास्टिक लावले, आणि त्या खड्ड्याला जवळच्या नळ किंवा विहिरीतून पाण्याने भरले. जो व्यक्ती सार्वजनिकपणे ख्रिस्ताची घोषणा करत असे तो त्या *"कबरेत"* जात असे आणि नाट्यमय प्रतीक जे आपल्याला देवाच्या वचनात दिलेले आहे-तो पृथ्वीत जात आहे (जे ख्रिस्ताबरोबर मृत्यूचे प्रतिनिधिक आहे) आणि मग बाहेर येतो (ख्रिस्तामध्ये नवीन जीवनाचे प्रतिनिधिक असे आहे).

**तुम्ही तुमचा विश्वास खाजगीपणे जगण्याचा प्रयत्न करत आहात का जेव्हा प्रभू येशूने असा पर्याय दिलेला नाही?**

प्रतीकामध्ये काहीही चुकीचे नाही. आतापासून आम्ही स्वतःसाठी जगत नाही, तर ख्रिस्त आपल्यामध्ये जगतो. बाप्तिस्मा हे सार्वजनिक कृत्य आहे जे एखाद्याच्या जुन्या जीवनाच्या मृत्यूला आणि नवीन जीवनाला पूर्णपणे अधीन होण्याला घोषित करते.

एक अपरिवर्तनीय बदल.

तुम्ही तुमचा विश्वास खाजगीपणे जगण्याचा प्रयत्न करत आहात का जेव्हा प्रभू येशूने असा पर्याय दिलेला नाही? तुमचा बाप्तिस्मा झाला आहे का आणि सार्वजनिकपणे येशू ख्रिस्ताशी तुमची निष्ठा आणि संबंधाची घोषणा केली आहे का?

परंतु येथे आणखी आहे.

हा संबंध आता याहूनही अधिक गंभीर होत आहे.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. जीवनाची वादळे आणि जो वधस्तंभ तुम्हांला उचलण्यास सांगितले आहे यांच्यामध्ये काय फरक आहे? दोघांचीही उदाहरणे द्या.

२. तुमचे लक्ष कशाने व्यापलेले आहे आणि वधस्तंभाकडे दुर्लक्ष करण्याचे कारण होत आहे? वधस्तंभ उचलता यावा यासाठी तुमच्या जीवनातून कशाचा त्याग केला पाहिजे?

३. ख्रिस्ताचा वधस्तंभ उचलण्यासाठी तुम्ही जगातील कोणत्या गोष्टी सोडून दिल्या आहेत?

४. ख्रिस्तावरील तुमच्या विश्वासाला तुम्ही सार्वजनिकरित्या कसा व्यक्त केला आहे? तुमच्या वैयक्तिक विश्वासाला तुम्ही कोठे खाजगी ठेवण्याचा अजुनही प्रयत्न करत आहात?

५. वधस्तंभाने तुमच्या जीवनात आणि तुम्हांला माहित असलेल्या लोकांच्या जीवनात नापसंती कशी आणली आहे.

# २०

# देवाचे नाव व्यर्थ घेणे

सीनाय पर्वतावर मेघगर्जना, वीज आणि धुराच्या छायेत, देवाने मोशेला त्याचे नियमशास्त्र पालन करण्यास दिले. देवाच्या नियमात हे ठोस शब्द होते, *"तुझा देव परमेश्वर ह्याचे नाव व्यर्थ घेऊ नकोस, कारण जो परमेश्वराचे नाव व्यर्थ घेईल त्याची तो गय करणार नाही"* (निर्गम २०:७). वारंवार, हा उतारा केवळ आपल्या शब्दांना संबोधित आहे असे उथळपणे भाषांतरित केले जाते जसे ("शाप देऊ नका."). परंतु असे भाषांतर देवाचा जो सांगण्याचा हेतू आहे त्या संदेशाची व्याप्ती कमी करते, जे असे होते : *"जर तुम्ही माझे नाव घेणार असाल, तर ते हलक्या तऱ्हेने घेऊ नका."*

**"जर तुम्ही माझे नाव घेणार असाल, तर ते हलक्या तऱ्हेने घेऊ नका."**

*"एखाद्याचे नाव घेणे"* म्हणजे काय? अनेक संस्कृतींमध्ये, जेव्हा एक स्त्रीचा विवाह होतो, तिचे आडनाव बदलते. ती नातेसंबंध, करार आणि ऐक्यतेचे चिन्ह म्हणून तिच्या पतीचे नाव लावते. मार्क १०:७-८ मध्ये, येशू म्हणतो, *"ह्या कारणामुळे 'पुरुष आपल्या आईबापांस सोडून आपल्या बायकोशी जडून राहील; आणि ती दोघे एकदेह होतील.' ती पुढे दोन नव्हत तर एकदेह आहेत."* पतीचे नाव लावून, नवरी त्याचे कुटुंब, त्यांचे नाते, आणि त्यांच्या घराला प्रतिनिधित करते.

*"नासा"* हा इब्री शब्द निर्गम २०:७ मध्ये वापरला आहे. नासा चे भाषांतर *"घेणे"* असे केले आहे, परंतु ते अधिक अक्षरशः *"शस्त्र-वाहक असणे"* असे केले जाऊ शकते. प्रभू प्रत्यक्षात असे म्हणत आहे : *"जर तुम्ही तुमच्या जीवनशैलीने त्याचे संरक्षण करण्यास तयार नसाल, तर माझ्या नावाचे शस्त्र-वाहक* (संरक्षक) *होऊ नका."* ख्रिस्ताचे नाव धारण

करणाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अनेक जण ख्रिस्ताचा नकार करताना आपण किती वेळा ऐकतो?

स्टॅनली जोन्स त्यांचे पुस्तक *"द ख्राईस्ट ऑफ द इंडियन रोड"* मध्ये गांधींना विचारतात ख्रिस्ती धर्म भारतात कसा स्वाभाविक केला जाऊ शकतो. गांधी यांनी उत्तर दिले, *"मी असे सुचवेन, सर्वात प्रथम, तुम्ही सर्व ख्रिस्ती लोक, मिशनरी आणि सर्वांनी येशू ख्रिस्तासारखे वागायला सुरुवात केली पाहिजे."*[४३] जरी एखाद्या व्यक्तीसाठी ख्रिस्ताचा स्वीकार किंवा अस्वीकार करणे केवळ दुसऱ्या *"ख्रिस्ती व्यक्ती"* वर आधारित करणे हे मूर्खपणाचे आहे (कारण ख्रिस्त मनुष्या द्वारे वैध किंवा अपात्र ठरवला जात नाही), तरी गांधीचे हे वाक्य दोष देणारे आहे. आपली जीवने कृपा आणि पवित्र सामर्थ्य जे आपण प्राप्त केले आहे त्याची साक्ष देतात का? आपली जीवने आत्म्यांना ख्रिस्ताकडे आकर्षित करतात का किंवा त्यांना त्याच्या सुंदरतेपासून दूर नेतात? भटकलेले जग आपण ज्या आशेचा आनंद घेतो त्याची इच्छा करते का? आपण त्याच्या नावाला संरक्षण आणि सन्मान देत आहोत का? किंवा आपण त्यास लज्जित करत आहोत?

जेव्हा दावीद राजाने बथशेबाबरोबर व्यभिचार केला, त्याने पश्चाताप केला आणि देवाने त्याला क्षमा केली. परंतु, नाथान संदेष्ट्याने त्याला हेही सांगितले, की त्याच्या कृत्याने देवाच्या विरोधात निंदा करण्यास द्वार उघडले गेले. *"मी परमेश्वराविरुद्ध पातक केले आहे.' नाथान दाविदाला म्हणाला, 'परमेश्वराने तुझे पातक दूर केले आहे; तू मरणार नाहीस.* ***तरी तू हे काम करून परमेश्वराच्या शत्रूंना उपहास करायला निमित्त दिले आहेस,*** *ह्यास्तव तुला जो पुत्र झाला आहे तो खात्रीने मरणार"* (२ शमुवेल १२:१३-१४). देवाच्या नावाचे संरक्षण करणारे म्हणून, आपण आपले विचार, आचरण, शब्द आणि कृत्यांनी त्याचा सांभाळ करण्यास काळजी करतो का? आपली जीवने येशू ख्रिस्ताच्या प्रतिष्ठेला आदर आणत आहे की निरादर?

पौल रोम मध्ये यहूद्यांना ह्याच मुद्यावर उपदेश देतो : *"तर मग दुसऱ्याला शिकवणारा तू स्वतःलाच शिकवत नाहीस काय? चोरी करू नये अशी घोषणा करणारा तू स्वतःच चोरी करतोस काय? व्यभिचार करू नये असे सांगणारा तू स्वतःच व्यभिचार करतोस काय? मूर्तीचा विटाळ मानणारा तू स्वतःच देवळे लुटतोस काय? नियमशास्त्राचा अभिमान बाळगणारा तू स्वतःच नियमशास्त्राच्या उल्लंघनाने देवाचा अपमान करतोस काय? 'तुमच्यामुळे परराष्ट्रीयांमध्ये* ***देवाच्या नावाची*** *निंदा होत आहे,' असे शास्त्रात लिहिलेले आहे"* (रोम २:२१-२४).

## एक अनन्य संबंध

जेव्हा कोणी ख्रिस्तामध्ये गहन नातेसंबंधात प्रवास करतो, तेव्हा अशा घनिष्ठतेच्या मागणीला समजणे आणि स्वीकार करणे हे महत्वाचे आहे. ख्रिस्ताचे नाव पवित्र आहे आणि ते जे त्याचे अनुयायी होतात आणि त्याचे नाव धारण करतात त्यांच्याकडून अशा गुणांची अपेक्षा केली जाते. *"तर तुम्हांला पाचारण करणारा जसा पवित्र आहे तसे तुम्हीही सर्व प्रकारच्या आचरणात पवित्र व्हा; कारण असा शास्त्रलेख आहे की, 'तुम्ही पवित्र असा, कारण मी पवित्र आहे"* (१ पेत्र. १:१५-१६).

**ख्रिस्ताचे नाव पवित्र आहे आणि ते जे त्याचे अनुयायी होतात आणि त्याचे नाव धारण करतात त्यांच्याकडून अशा गुणांची अपेक्षा केली जाते.**

पवित्र असणे म्हणजे देवासाठी वेगळे केलेले; त्याच्यासाठी आणि त्याच्या उद्देशासाठी पूर्णपणे राखीव असलेले. पवित्र असणे हे इतरांपासून वेगळे असण्याविषयी नाही. हे देवासाठी समर्पित असण्याविषयी आहे. ज्याप्रमाणे वैवाहिक जीवनात पवित्रता आवश्यक आहे (केवळ एकमेकांसाठीच वेगळे असलेले), तसेच ख्रिस्ताच्या अनुयायांनी पवित्र असले पाहिजे (केवळ ख्रिस्तासाठीच वेगळे केलेले). पौलाने म्हटले, *"कारण तुमच्याविषयी माझी आस्था ईश्वरप्रेरित आस्था आहे; मी एका पतीबरोबर तुमचे वाग्दान केले आहे, अशा हेतूने की, तुम्हांला शुद्ध कुमारी असे ख्रिस्ताला सादर करावे. तरी जसे 'सापाने कपट करून' हव्वेला 'ठकवले' तसे तुमची मने कशाने तरी बिघडून ती ख्रिस्ताविषयीचे सरळपण व शुद्धता ह्यांपासून भ्रष्ट होतील असे मला भय आहे"* (२ करिंथ. ११:२-३).

मध्य पूर्वेतील एका मित्राकडे मी एकदा पाहिले-त्याच्या हाताच्या बोटांमध्ये विवाहाच्या दोन-वेगवेगळ्या अंगठ्या होत्या. त्याच्याबरोबर स्थानिक बाजारात बोलताना, मी त्याला त्या अंगठ्यांचे महत्व विचारले. त्याने उत्तर दिले, *"मला दोन बायका आहेत; ह्या अंगठ्या माझ्या दोन विवाहाला प्रतिनिधित करतात."* मी विचार केल्याशिवाय राहू शकलो नाही : कितीतरी वेळा ख्रिस्ताचे तथाकथित अनुयायी देखील दोन घनिष्ठ संबंधांमध्ये अडकलेले असतात-एक ख्रिस्ताबरोबर आणि एक जगाबरोबर? अशा लोकांसाठी कठोर भाषा वापरली आहे जे दोन संबंधांमध्ये द्विधा अवस्थेत असतात. याकोबाच्या पुस्तकात, जे विश्वासणाऱ्यांसाठी लिहिलेले आहे, आपण वाचतो, *"अहो अविश्वासू लोकांनो, जगाची मैत्री ही देवाबरोबर वैर आहे, हे तुम्हांला ठाऊक नाही काय? जो कोणी जगाचा मित्र होऊ पाहतो तो देवाचा वैरी ठरला आहे"* (याकोब. ४:४).

येशूचे नाव उच्चारणे म्हणजे त्याच्याशी निष्ठा घोषित करणे. व्याखेने, त्याचा अर्थ दुसऱ्या निष्ठेंना सोडणे देखील आहे. आपण दोन जोडीदारांसोबत एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा करू शकतो का? शेवटी, आपली निष्ठा आणि हृदय हे देवाबरोबरच एकनिष्ठ असते. ख्रिस्ता प्रति आपली निष्ठा आपल्या प्राथमिकतांना निश्चित करतील. आपण दुसऱ्या राष्ट्राचे नागरिक आहोत (२ करिंथ. ५:२०; फिलिप्पै. ३:२०). आपल्याला जगाबरोबर *"स्थापित"* होण्यासाठी बोलावलेले नाही जेणेकरून लोकांना ख्रिस्ताकडे आकर्षित करावे. त्याऐवजी, आपल्याला त्याचे चरित्र प्रतिबिंबित करण्यासाठी बोलावलेले आहे. जगाला आपल्या हुशार उपायांची आवश्यकता नाही-त्यांना आपल्या सुंदर तारणाऱ्याची आवश्यकता आहे. आपण सांस्कृतिकदृष्ट्या प्रासंगिक किंवा पवित्र शास्त्राच्या दृष्टीकोनातून आज्ञाधारक असण्यावर अधिक केंद्रित आहोत का?

देव त्याचे नाव व्यर्थ घेऊ नये ही मागणी करतो. *"व्यर्थ"* शब्दाचा अर्थ पोकळपणा किंवा अयोग्यपणा. देवाचे नाव आपण उच्चारण्यापूर्वी, आपण त्याच्या व्यक्तिमत्वाच्या योग्यतेला समजावे हे बंधनकारक आहे, केवळ तेव्हाच मग  आपण अशी पवित्रता, कृपा आणि गौरवासाठी जबाबदारी समजू.

## घनिष्ठतेत प्रवास

उज्जीया राजा मरण पावला त्या वर्षी, यशयाला देवाच्या सिंहासनाच्या खोलीचा दृष्टांत दिला गेला.  जेव्हा हे विलक्षण दृश्य स्पष्ट केले गेले, यशया अंतःकरणाने भग्न होऊन पापाची कबुली देण्याच्या त्या टप्प्यावर पोहोचला आणि अशी घोषणा केली, *"हायहाय! माझे आता वाईट झाले, कारण मी अशुद्ध ओठांचा मनुष्य आहे आणि अशुद्ध ओठांच्या लोकात राहतो; आणि सेनाधीश परमेश्वर, राजाधिराज ह्याला मी आपल्या डोळ्यांनी पाहिले!"* (यशया ६:५). अशी पापकबुली त्याच्या वैयक्तिक आणि त्याच्या लोकांच्या पापांबद्दलच्या सखोल तपासणीबद्दल दाखवलेल्या तिरस्कारातून किंवा त्याच्याकडून मिळालेल्या कबुलीजबाबातून निर्माण झाली नाही, तर देवाच्या पवित्रतेच्या प्रकटीकरणाने उत्पन्न झाली होती.

**जर आपण निर्गम अध्याय १९ आणि २० उलट्या क्रमाने घेतले, तर आपल्याला धर्म मिळतो, परंतु जेव्हा आपण त्यांना क्रमाने घेतले, तर आपल्याला संबंध मिळतो.**

त्याचप्रमाणे, देवाच्या तेजस्वी पवित्रतेच्या पार्श्वभूमीवर जेव्हा आपले पाप उघडकीस येते तेव्हा ते आपल्याला अत्यंत घाणेरडे असे दिसेल. जर आपल्या स्वतःला आपण खरेच कोण आहोत हे पाहायचे असेल,

तर आपण देवाकडे पाहिले पाहिजे-त्याच्या पवित्रतेकडे, त्याच्या चरित्राकडे. पश्चाताप हा आपण काय केले आहे त्याबद्दल केवळ वाईट वाटण्याविषयी नाही; तर ख्रिस्त येशूमध्ये प्रकट झालेल्या देवाच्या पवित्रतेवर आणि प्रीतीवर आधारित मन व हृदयाचे परिवर्तन होय.

त्याच्या परिवर्तनानंतर थोड्याच अवधीत, प्रेषित पौलाने लिहिले, *"कारण प्रेषितांत मी कनिष्ठ आहे; प्रेषित म्हणवायला मी योग्य नाही, कारण मी देवाच्या मंडळीचा छळ केला"* (१ करिंथ. १५:९). जे ह्या विश्वासू, अति उत्साही प्रेषिताला ओळखतात त्यांनी त्याला वांशिक चिन्ह असलेल्या यादीच्या तळाशी ठेवले नसते.

परंतु पौल येथेच थांबला नाही. पुढे त्याच्या सेवाकार्यात, त्याने इफिस येथील मंडळीला लिहिले, *"मी जो पवित्र जनांतील लहानाहून लहान"* (इफिस. ३:८). ठीक आहे, थोडे थांबा. आपण एका माणसाविषयी बोलत आहोत ज्याला ख्रिस्तासाठी मोजता येईल त्यापेक्षा अधिक वेळा मार खावा लागला होता. दगडमार. तीन वेळा जहाज फुटले ज्यामध्ये तो होता. एक दिवसभर समुद्रात वाहवत जावे लागले. तुरुंगात. भुकेला, थंडीत. सतत धोक्यात. गैरसमज केलेला. (२ करिंथ ११:२४-२८ मधील यादी पाहा) आणि तो स्वतःला सर्व संतांपैकी कनिष्ठ मानतो?

त्याहूनही पुढे तो म्हणतो. जसे पौल त्याच्या सांसारिक प्रवासाच्या शेवटास आला, त्याने एक पत्र लिहिले ज्यामध्ये त्याने स्वतःला *"सर्वात मोठा पापी"* (१ तीमथ्य. १:१५) म्हणून घोषित केले. असा ख्रिस्तकेंद्रित मनुष्य *"सर्वात कनिष्ट प्रेषित"* यापासून ते *"सर्व संतांपैकी सर्वात कनिष्ठ"* ते *"सर्वात मोठा पापी"* असे स्वतःला म्हणवतो? जसा तो वृद्ध होत गेला तसा पौल मागे गेला होता का? मी असे सुचवेन की फक्त त्याच्या उलट झाले आहे : जसे पौल येशू ख्रिस्ताच्या जवळ आणि जवळ होत गेला, त्याने ख्रिस्ताची पवित्रता आणि सुंदरतेच्या वैभवात त्याच्या स्वतःच्या जीवनाचे जास्त परीक्षण केले. तसेच यशया सारखे, त्याला हे म्हणावयास लावले, *"किती मी वाईट माणूस!"* (रोम. ७:२४). जर आपण आपल्या स्वतःला तशाच प्रकारे पाहण्यात चुकतो, तर हे ख्रिस्ताबरोबर घनिष्ठतेचा अभाव असू शकतो?

## संबंधाची व्याख्या करणे

देवाने त्यांना निर्गम २० मध्ये कोणत्या आज्ञा दिल्या आहेत त्याआधी निर्गम १९ मध्ये काय घडले हे समजणे महत्वाचे आहे : *"परमेश्वर जो तुमचा देव याचे नाव तुम्ही व्यर्थ घेऊ नका"*. निर्गम १९ मध्ये, देवाने त्याच्या लोकांसोबत करार स्थापित केला, त्याच्याबरोबर

संबंधात येण्याचे आमंत्रण दिले. तो संबंध अर्पण केलेल्या कोकऱ्याच्या वाहिलेल्या रक्ताच्या आधारावर होता, ज्याने त्यांच्या पापांसाठी प्रायश्चित केले (आच्छादन केले) त्यावेळेपर्यंत जेव्हा येशू जो देवाचा कोकरा जगाच्या पापाच्या ऋणासाठी किंमत भरेल. निर्गम २० मध्ये, ते आधीच त्याचे निवडलेले लोक असल्यामुळे, देवाने त्यांना नियमशास्त्र देण्यास सुरुवात केली. त्याने त्यांना हे नियमशास्त्र का दिले? एक कारण त्यांना हे दाखवण्यासाठी होते की ते धार्मिकतेच्या त्याच्या सिद्ध मानकासाठी अपूर्ण पडत होते. परंतु देवाने त्यांना हे नियम ह्यासाठी देखील दिले की त्यांनी त्यांच्या सभोवतालच्या राष्ट्रांसमोर योग्यपणे त्याला प्रतिनिधित करण्यासाठी कसे जीवन जगावे हे शिकवावे. परंतु चला आपण स्पष्ट राहू. देवाने इस्राएली लोकांना ह्या आज्ञा दिल्या नाहीत जेणेकरून ते त्याच्याबरोबर संबंधास पात्र ठरावेत. ज्याप्रमाणे आपण स्वतःच्या प्रयत्नांनी देवाशी संबंध निर्माण करू शकत नाही, तसेच ते सुद्धा मिळवू शकत नव्हते.[४४] जर आपण निर्गम अध्याय १९ आणि २० उलट्या क्रमाने घेतले, तर आपल्याला धर्म मिळतो, परंतु जेव्हा आपण त्यांना क्रमाने घेतले, तर आपल्याला संबंध मिळतो.

जेव्हा ख्रिस्ताने फिलीप्पियाच्या कैसरीयात शिष्यांना उपदेश दिले, त्याने त्यांना तसेच आमंत्रण दिले. *"माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे"* (मत्तय. १६:२४). ही वचने संबंधाला स्थापित करण्याऐवजी रूपरेषा देण्यासाठी दिल्या आहेत, कारण आपले देवासोबत संबंध हे केवळ कृपेनेच स्थापित आहे. येशूची वचने ही ते जे आधीच त्याच्यासोबत संबंधात आहेत त्यांना महत्वाचे उपदेश आहेत.

मग ते निर्गम किंवा मत्तय मधील प्रकट केलेले असो, देवाच्या हृदयाचा ठोका हा तसाच आहे की त्याचे लोक, जे त्याचे नाव घेतात, हे त्याच्यासारखे असावेत आणि त्याला अचूकपणे प्रतिनिधित करावे. ख्रिस्त त्याच्या अनुयायांना त्यांची जुनी प्रतिष्ठा, जीवनाचा मार्ग आणि व्यर्थ जगण्याला बाजूला ठेवावे, सार्वकालिक शोध, दैवी वारसा आणि आता त्या परमेश्वराच्या सावलीतून प्राप्त होणारी नवीन ओळख जगण्याची संधी देते, ज्याचे ते अनुसरण करत आहेत.

बाहेरील जगाने अंत्युखिया येथील विश्वासणाऱ्यांना *"ख्रिस्ती"* हे नाव दिले कारण ते येशू सारखे दिसत, कार्य करत, बोलत आणि प्रीती करत होते (प्रेषित. ११:२६). त्यांनी वापरलेला शब्द ख्रिस्टीयानोस हा होता. लैटीन भाषेतून घेतला होता, त्याची शेवटची अक्षरे-इयानोस हे रोमन साम्राज्यात विस्तुतपणे वापरले जात होते. हे प्रत्यय धन्याच्या नावाच्या शेवटी

लावले जात होते की जे सर्व त्याचे आहेत त्यांना ओळखावे. जास्त शब्दशः, हा शब्द *"दास, किंवा* "ख्रिस्ताच्या कुटुंबातील" *असे दर्शवतो. अंत्युखियामधील ह्या विश्वासणाऱ्यांना* "ख्रिस्ताचे दास" म्हणून चिन्हित केले होते.[४५]

आज आपल्या विकृत आणि दुष्ट जगात, पुष्कळ ख्रिस्ती अनुयायांना योग्यपणे ओळखले जाण्यासाठी *"ख्रिस्ती"* या शीर्षकाने स्वतःला चिन्हित करण्यासाठी जबरदस्ती केली जात आहे हे अस्वस्थ करणारे आहे. येशूच्या प्रारंभीच्या अनुयायांप्रमाणे आपली जीवने आणि कृत्ये ख्रिस्तासोबत त्वरित ओळखली नाही गेली पाहिजे का? येशू ख्रिस्तासोबत आपले ऐक्य ओळखले जाण्यासाठी आपण एखादे शीर्षक हताशपणे वापरावे का?

कदाचित हेच जे येशूच्या मनात होते जेव्हा त्याने आपल्या शिष्यांना हे सांगितले, *"त्याप्रमाणे तुमचा प्रकाश लोकांसमोर असा पडू द्या की त्यांनी तुमची सत्कर्मे पाहू तुमच्या स्वर्गातील पित्याचे गौरव करावे"* (मत्तय. ५:१६). येशू काय बोलत आहे त्याकडे लक्ष द्या : आपली चांगली कामे ही देवाच्या गौरवासाठी केली जातात. देवाने आपल्याला स्वीकारावे म्हणून नाही, आपल्याला सार्वकालिक जीवन मिळावे म्हणून नाही. परंतु ज्याप्रमाणे आपण बोलण्याने, आणि कृत्यांने जगतो, त्या द्वारे आपली ओळख त्याच्या नावाशी जोडली गेली पाहिजे.

वधस्तंभ उचलणे हे त्याचे नाव धारण करण्यासमान आहे. *"तुम्ही त्याच्या द्वारे देवावर विश्वास ठेवणारे झाला आहात, त्या देवानेच त्याला मेलेल्यांतून उठवून त्याचे गौरव केले, ह्यामुळे तुमचा विश्वास व आशा देवावर आहे"* (१ पेत्र. १:२१).

आमंत्रण हे दिलेले आहे...

वधस्तंभ उचला, माझ्यासोबत ओळख दाखवा, आणि तुमच्या सभोवतालच्या लोकांना मला प्रतिनिधित करा- *"जगाच्या शेवटपर्यंत देखील"* (प्रेषित. १:८).

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. *"देवाचे नाव व्यर्थ घेणे"* म्हणजे काय हे स्पष्ट करा. देवाचे नाव कोणत्या मार्गाने तुम्ही व्यर्थ घेता? विशेष उदाहरणे द्या.

२. तुमचे जीवन आत्म्यांना ख्रिस्ताकडे कसे आकर्षित करते? तुमचे जीवन त्याच्या सुंदरतेपासून त्यांना कसे दूर नेते?

३. दोन जग, दोन संबंधांच्या मध्ये तुम्ही कसे कसरत करण्याचा प्रयत्न करता? (विवाहाच्या दोन अंगठ्या असलेल्या माझ्या मित्राच्या उदाहरणाचा विचार करा.)

# २१

# वधस्तंभाचे आशीर्वाद

त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या वर्षात, डेव्हिड लिविंगस्टन, दक्षिणीय आफ्रिकेसाठी एक प्रसिद्ध शोधक आणि मिशनरी, यांनी इंग्लंड येथील केम्ब्रिज युनिवर्सिटी मध्ये विद्यार्थी संघटनेला भाषण दिले. त्यांच्या अखेरच्या शब्दात, त्यांनी म्हटले :

> *"आफ्रिकेमधील माझ्या आयुष्याचा बराच अवधी सेवेत घालवण्याच्या त्यागाविषयी लोक बोलतात ...चिंता, आजार, दु:ख किंवा सामान्य सुविधांना सोडून दिल्याने अधून-मधून धोके आणि आयुष्याची धर्मादाय कार्ये, कदाचित आपल्याला थांबायला लावेल आणि आत्म्याला डगमगवेल आणि प्राणास मूर्च्छित करेल; परंतु हे केवळ काही क्षणासाठी असू द्या. हे सर्वकाही गौरवाच्या तुलनेत काहीही नाही, जी आपल्यात आणि आपल्यासाठी प्रकट केली जाईल. मी कधीही त्याग केलेला नाही."*[४६]

ख्रिस्ताचे अनुसरण करण्याच्या त्याच्या पाचारणाचा नकार करावा इतका मोठा त्याग एखादा करू शकतो हे होऊ शकते का? कदाचित आपण ज्याचा शोध घेत आहोत : ख्रिस्त, जो पुरस्कार, त्यापेक्षा आपण जे गमावत आहोत त्यावर लक्ष्य केंद्रित करण्यामुळे त्याग करण्यास घाबरतो. आपण उथळ, सांसारिक स्वप्ने जे आपल्या शरीराच्या वाढत्या वयाने विरून जाते, या जगाच्या निराशांमुळे चुकते आणि शेवटी मृत्युच्या आपल्या क्षणात संपुष्टात येते त्यावरच लक्ष ठेवून आहोत का? आपण ह्या जगाच्या क्षणभंगुर यशाच्या वेदीवर येशूचे अनुसरण करण्याच्या आमंत्रणाचा त्याग केला आहे का? एसाव पवित्र शास्त्रातील एक कायमचे उदाहरण ठरते ज्याने जे तात्पुरते होते (वरणाची वाटी) त्याच्या बदल्यात सार्वकालिक महत्वाची (जेष्ठत्वाचा हक्क) अदलाबदली केली. तरीही, आपण किती असमंजस आणि मूर्ख आहोत जेव्हा सार्वकालिक पुरस्कार आणि सर्वशक्तिमानसोबत घनिष्ठता जी आपल्यासमोर आहे त्याऐवजी आपण या जगाच्या गोष्टींसाठी जगतो. कदाचित आपण

वर्तमानसाठी जगतो कारण आपण त्या परमेश्वरावर पूर्णपणे भरवसा ठेवत नाही ज्याच्या हातात सार्वकालिकता आहे.

येशूने सांगितलेल्या त्या गोष्टीवर विचार करा, ज्यात एका माणसाला शेतात लपवलेला खजिना सापडतो. *"स्वर्गाचे राज्य शेतात लपवलेल्या ठेवीसारखे आहे; ती कोणाएका मनुष्याला सापडली आणि त्याने ती लपवून ठेवली. मग आनंदाच्या भरात तो जातो, आपले सर्वस्व विकतो आणि ते शेत विकत घेतो"* (मत्तय. १३:४४). त्या मनुष्याच्या हृदयात शोक नाही जेव्हा तो त्याच्या आणि शेत विकत घेण्याच्या मध्ये जे काही आहे ते त्वरित आपल्या जीवनातून काढून टाकतो. तो पूर्ण आनंदाने गौरवी भविष्यासाठी त्याच्या भूतकाळाला काढून टाकतो. जोपर्यंत आपण ख्रिस्ताला खजिना म्हणून पाहत नाही, तोपर्यंत आपण जगाच्या मौल्यवान गोष्टींना गमावण्याचा विलाप करत राहणार, त्याचे अनुसरण करण्यासाठी ते सर्वकाही मागे सोडले पाहिजे. आपल्याला पौलासारखे हृदय प्राप्त होवो. *"इतकेच नाही, तर ख्रिस्त येशू माझा प्रभू ह्याच्याविषयीच्या ज्ञानाच्या श्रेष्ठत्वामुळे मी सर्वकाही हानी असे समजतो; त्याच्यामुळे मी सर्व गोष्टींना मुकलो, आणि त्या केरकचरा अशा लेखतो; ह्यासाठी की, मला ख्रिस्त हा लाभ प्राप्त व्हावा"* (फिलिप्पै. ३:८).

**ख्रिस्ताचे अनुसरण करण्याच्या त्याच्या पाचारणाचा नकार करावा इतका मोठा त्याग एखादा करू शकतो हे होऊ शकते का?**

२०व्या शतकाच्या सुरुवातीला एक मेथडीस्ट प्रचारक, चार्ली टीन्डले, यांनी पुढील गीत लिहिले.

माझा आत्मा आणि तारणाऱ्याच्या मध्ये काहीही नाही,
जेणेकरून त्याचे आशीर्वादित मुख पाहता येऊ शकेन;
त्याच्या कृपेला काहीही अडथळा आणू नये,
मार्ग स्पष्ट ठेवा ! मध्ये काहीही नाही.

दुसरा उतारा हा काही कमी प्रभावी नाही.

जगाच्या सुखविलासासारखे, काहीही मध्ये येऊ नये;
जीवनाच्या सवयी, जरी त्या कितीही हानिकारक नसल्यासारख्या वाटल्या,
माझे हृदय त्याच्याकडे पाहण्यापासून दूर होऊ नये;
तो माझे सर्वस्व आहे, येथे मध्ये काहीही नाही.[४७]

चार्ली टीन्डले यांनी जीवनाचा खजिना स्पष्टपणे ओळखला आणि त्यांना समजले की त्यांच्या आणि ख्रिस्ताच्या मध्ये येणारी कोणतीही गोष्ट लक्ष विचलित करणारी होती.

## जेव्हा आशीर्वाद रोखलेले वाटतात

प्रभू येशूने आपल्या शिष्यांना जे सांगितले ते विश्वभरातील अनेक पूलपीट वरून घोषित केल्या जाणाऱ्या समृद्धीच्या संदेशापेक्षा पूर्णपणे वेगळे वाटते. *"परंतु तुम्हां धनवानांची केवढी दुर्दशा होणार! कारण तुम्ही आपले सांत्वन भरून पावलाच आहात. अहो, जे तुम्ही आता तृप्त झाला आहात त्या तुमची केवढी दुर्दशा होणार! कारण तुम्हांला भूक लागेल. अहो, जे तुम्ही आता हसता त्या तुमची केवढी दुर्दशा होणार! कारण तुम्ही शोक कराल व रडाल. जेव्हा सर्व लोक तुम्हांला बरे म्हणतील तेव्हा तुमची केवढी दुर्दशा होणार! त्यांचे पूर्वज खोट्या संदेष्ट्यांना असेच म्हणत असत"* (लूक. ६:२४-२६). श्रीमंती, तृप्त पोट, हास्य, आणि लोकांच्या मान्यतेची आपण शाप म्हणून कल्पना करू शकतो का? येशूचे लूकच्या शुभवर्तमानातील शब्द आपल्याला निर्णय घेण्यास प्रेरणा देतात. आपण *"आशिर्वाद"* या शब्दाचा अर्थ चुकीने भाषांतरित केला आहे का? आपण ख्रिस्ताच्या मनापासून इतके वेगळे झालो आहोत काय की ज्यासाठी तो विलाप करतो, त्यास आपण *"आशीर्वाद"* म्हणतो, आणि ज्यास तो *"आशीर्वाद"* म्हणतो, आपण त्यास विलाप म्हणतो? काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

प्रश्न हा आहे : देव कशाला आशीर्वाद असे म्हणतो?

जेव्हा देव आशीर्वादितांविषयी बोलतो, तेव्हा तो आत्म्याने गरीब, ते जे शोक करतात, दीन, ते धार्मिकतेचे भुकेले आणि तहानेलेले, दयावान, शुद्ध हृदयाचे, शांति करणारे, धार्मिकतेसाठी ज्यांचा छळ झाला आहे, आणि जे त्याच्याकडून अपमानित झालेले नाहीत यांच्याविषयी बोलतो (मत्तय. ५:३-१२; मत्तय. ११:६). कदाचित असे असू शकेल जे काही आपल्याला ख्रिस्ताला जाणून घेण्याच्या आणि त्याच्यावर प्रेम करण्याच्या जवळ आणते ते एक आशीर्वाद आहे? आपल्या जीवनातील कोणत्या परिस्थिती आपण सध्या गमावत आहोत ज्यांचा वापर देव आपल्या वाढीसाठी आणि त्याच्या गौरवासाठी करू इच्छितो ?

**आपण ख्रिस्ताच्या मनापासून इतके वेगळे झालेले आहोत काय की ज्यासाठी तो विलाप करतो, त्यास आपण "आशीर्वाद" म्हणतो, आणि ज्यास तो "आशीर्वाद" म्हणतो, आपण त्यास विलाप म्हणतो?**

आपल्या पदवीदान प्रशस्तीपत्रकास सजवण्यासाठी आपण किती जलद असतो आणि त्यास यिर्मया २९:११ शी जुळवतो, *“परमेश्वर म्हणतो, तुमच्याविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांला तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत.”* आपण थोडे थांबा! यिर्मया २९:१० हे यिर्मया २९:११ अगोदर येते. वचन दहा मध्ये, देव त्याच्या लोकांना बोलतो (माझ्या स्वतःच्या शब्दात), *“तुम्ही सत्तर वर्षांसाठी बंदिवासात जाणार आहात. तुमच्यापैकी बरेच जण परत घरी माघारी येणार नाहीत, परंतु चिंता करू नका : माझी कथा अजून पूर्ण झालेली नाही.”* ही महान बातमी आहे! देवाच्या योजना ह्या तुमच्या क्षणभंगुर सांसारिक अस्तित्वापेक्षा खूप मोठ्या आहेत. आपण आपल्या कथांमध्ये देवाला सामील करण्याचा प्रयत्न थांबवला पाहिजे आणि आपल्या कथा देवाच्या मोठ्या चित्रात सामील करायला सुरुवात केली पाहिजे. ‘द लास्ट बैटल’ मध्ये ‘द क्रोनिकल ऑफ नार्निया’, च्या शेवटी सी. एस. लुईस लिहितात, *“ ह्या जगात त्यांच्या संपूर्ण आयुष्यात आणि नार्नियामधील त्यांचे सर्व साहस हे केवळ मुखपृष्ठ आणि सुरुवातीचे पान होते : आता शेवटी ते महान कथेच्या पहिल्या अध्यायाची सुरुवात करत आहेत जिला पृथ्वीवर अजून कोणीही वाचलेले नाही : जी कायम टिकणारी आहे : ज्यामध्ये प्रत्येक अध्याय मागील अध्यायांपेक्षा उत्तम आहे.”*[४८]

मला एकदा विमान प्रवासात दुसरे विमान बदलण्याच्या वेळेत लंडन मध्ये थोडा वेळ मिळाला होता. सुंदर संध्याकाळ वाया घालवू नये असे वाटत होते, म्हणून प्रत्यक्ष राणीचे नाट्यगृह जे वेस्ट एंड वर होते तेथे ‘द फैन्टम ऑफ द ऑपेरा’ त्याचे अंत्यत सवलतीच्या दरातील तिकीट मला खरेच मिळाले. तिकीट इतक्या कमी किमतीत कसे मिळाले याचे मला आश्चर्य वाटत होते, जोपर्यंत मला माझी बसण्याची जागा मिळाली नाही. ती जागा बाल्कनी मध्ये प्रत्यक्ष एका विशाल खांबाच्या मागे होते, जेथून मी स्टेजवरील काही भागच पाहू शकत होतो. सुदैवाने, ‘फैन्टम ऑफ द ऑपेरा’ हे इतर कशाहीपेक्षा संगीताविषयी अधिक होते, परंतु त्या परिस्थितीने मला एक धडा शिकवला. जीवनात, आपण हे समजले पाहिजे की जीवनात जे काही घडत आहे त्याचा केवळ काही भागच आपण पाहतो. आपण काळाच्या मर्यादेत जगतो. देव सार्वकालिक आहे. तो ज्यास आशीर्वाद म्हणतो त्यास आपण कधीकधी शाप म्हणून संबोधतो. हे याकारणामुळे की आपण सांसारिक आहोत आणि आपण बऱ्याच वेळा, सांसारिक-मनोवृत्तीचेच राहतो. *“कारण हल्ली आपल्याला*

**आपण आपल्या कथांमध्ये देवाला सामील करण्याचा प्रयत्न थांबवला पाहिजे आणि आपल्या कथा देवाच्या मोठया चित्रात सामील करायला सुरुवात केली पाहिजे.**

*आरशात अस्पष्ट असे दिसते; परंतु नंतर आपण साक्षात पाहू, आता मला कळते ते अपूर्ण आहे”* (१ करिंथ. १३:१२अ).

तुम्ही काळजी करीत आहात का कारण तुम्ही तुमच्या मार्गातील पुढील वळणाच्या पलीकडे पाहू शकत नाही? तुम्ही विश्वास ठेवत आहात का की परमेश्वर ज्याला सुरुवातीपासून शेवट ठाऊक आहे तो तुमचा वैयक्तिक मार्गदर्शक आहे-आणि तुम्ही तुमची काळजी करता त्यापेक्षा अधिक तो तुमची काळजी करतो? फन्नी क्रॉसबी, जरी आंधळी होती, तरी ती इतिहासातील सर्वात यशस्वी गीतकारांपैकी एक होती. तिच्या ८००० गीते आणि शुभवर्तमान गीतांपैकी एकामध्ये, तिने लिहिले :

> माझा तारणारा मला सर्व मार्गात मार्गदर्शन करतो;
> याच्यापेक्षा अधिक मी त्याच्याकडे काय मागू?
> मी त्याच्या सौम्य दयेवर शंका घेऊ का,
> ज्याने आपल्या जीवना द्वारे माझे मार्गदर्शन केले आहे?”[४९]

जेव्हा ख्रिस्त वधस्तंभ उचलणे आणि त्याचे अनुयायी होण्यास आपल्याला बोलावतो, तेव्हा तो आपल्याला आशीर्वादाच्या जीवनासाठी बोलावत आहे. खरा आशीर्वाद. ऐहिक संपत्तीच्या मोहापोटी नाही किंवा इतर कशासाठीही नाही जे आपल्याला सार्वकालिक पुरस्कारापासून अडथळा करू शकेल. त्याऐवजी, तो आपल्याला जे कायम टिकणारे आहे त्याद्वारे तयार केलेल्या आणि परिपूर्ण जीवनासाठी आमंत्रित करत आहे. आपल्या प्रभूने ज्या गोष्टींचे आश्वासन दिले आहे ते आपल्यावर येतात तेव्हा आपण किती लवकर थकून जाऊ शकतो आणि निराश होऊ शकतो हे गंभीर आहे.

विचित्रपणे, हे अनेकदा होते जेव्हा आपल्या प्रभूने जे आश्वासन दिले आहे तेच तो पूर्ण करतो किंवा प्रत्यक्ष होऊ देतो, तेव्हा आपण आपल्या जीवनात त्याच्या उपस्थितीविषयी जास्त शंका घेतो.

खरेच आहे.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. तुमच्या जीवनात कोणत्या काही गोष्टी आहेत ज्याविषयी तुम्ही विलाप करत आहात? त्याच गोष्टींनी तुम्हांला आशीर्वाद देण्यासाठी देव कसा वापर करू शकतो?

२. तुमच्या जीवनात असे काहीही आहे का की जग त्यास *"आशीर्वाद"* समजू शकते जे तुम्हांला देवासोबत चालण्यास अडथळा करत आहे?

३. ख्रिस्ताचे अनुसरण करण्याच्या त्याच्या पाचारणाचा नकार करणे आहे हा कोणीही करू शकणारा सर्वात मोठा त्याग कसा आहे?

# २२

# दु:ख व छळातील दहा आशीर्वाद

दु:ख आणि छळातून मिळणाऱ्या दहा आशिर्वादांचा आपण विचार करू या. लक्षात ठेवा, दु:ख अनुभवणे हा आपल्या अस्तव्यस्त जगात जगण्याचा अंतर्भूत परिणाम असू शकतो, परंतु ख्रिस्ताचे-अनुयायी म्हणून छळ अनुभवणे हा वधस्तंभ उचलण्याचा थेट परिणाम आहे. जेव्हा आपण दु:ख आणि छळाचा शोध घेत नाही, आणि आपण ख्रिस्ताचे नाव धारण केले म्हणून दु:ख सहन करतो (१ पेत्र. ४:१६), तेव्हा आपले दु:ख सहन करणे येशू ख्रिस्ताबरोबरच्या आपल्या संबंधाच्या सत्यतेची साक्ष देते.

## १. दु:ख आणि छळात ख्रिस्तासोबतचा आपला नातेसंबंध अधिक दृढ होतो.

*"हे अशासाठी आहे की, तो व त्याच्या पुनरूत्थानाचे सामर्थ्य व त्याच्या दु:खाची सहभागिता ह्यांची, त्याच्या मरणाला अनुरूप होऊन मी ओळख करून घ्यावी"* (फिलिप्पै. ३:१०).

आपण किती वेळा प्रार्थना करतो, *"प्रभू, मला तुला अधिक जाणून घ्यायचे आहे!"* हे त्या व्यक्तीच्या हृदयातून आक्रोश आहे ज्याने तारणाऱ्याच्या सुंदरतेची झलक पाहिली आहे. आणि तरीही देवाने आपल्या प्रार्थनेचे उत्तर द्यावे अशी अपेक्षा आपण कशी ठेवत असतो? आपण ख्रिस्ताचे ज्ञान व अनुभवाने पूर्णपणे भारावून गेलेलो आहोत अशी अपेक्षा करतो का, किंवा देवाने त्याच्याबद्दल अधिक घनिष्ठपणे शिकण्याची संधी देण्याची आपण अपेक्षा करतो का?

आपला सांत्वनदाता म्हणून त्याला खरेच जाणण्यासाठी, वेदना असल्या पाहिजेत.
आपला पुरवठा करणारा म्हणून त्याला जाणण्यासाठी, गरजेची आवश्यकता असली पाहिजे.
आपला बरे करणारा म्हणून त्याला जाणण्यासाठी, अशक्तपणा असला पाहिजे.

आपला पुनर्स्थापित करणारा म्हणून त्याला जाणण्यासाठी, काहीतरी केले पाहिजे. आपला तारणारा म्हणून त्याला जाणण्यासाठी, काहीतरी गमावलेले असले पाहिजे. आपले पुनरुत्थान म्हणून त्याला जाणण्यासाठी, मृत्यू असला पाहिजे.

प्रभू स्वतःच आपल्याला घनिष्ठ सहभागीतेमध्ये भागीदार होण्यासाठी परिस्थिती निर्माण करतो-ज्यामध्ये *"त्याच्या दु:खसहनाची सहभागीता"* देखील समाविष्ट आहे. कठीण परिस्थितीच्या मध्यात देवाला जाणण्याची मौल्यवान संधी चुकू नका (जी तुम्ही कधीही निवडलेली नसेल). *"त्याला जाणण्याची"* तुमची प्रार्थना तो कदाचित उत्तरीत करेल.

शद्रख, मेशख आणि अबेदनगो यांनी देवाबरोबर सर्वात घनिष्ठ सहभागितेचा केव्हा आनंद घेतला? हे त्या नबुखद्नेस्सराच्या अग्नीच्या भट्टीत झाले होते. तेथून बाहेर येण्याची त्यांना काही घाई नव्हती. वास्तवात, राजाच्या आज्ञेने त्यांना तेथून बोलावण्यात आले. अग्नीने फक्त त्यांना बंधनात बांधलेल्या दोऱ्याच जाळल्या (दानीएल ३:२५-२७).

ख्रिस्ताने आपल्या अनुयायांना शारीरिक सुरक्षेचे आश्वासन कधीही दिले नाही. त्याने काहीतरी उत्तम असे आश्वासन दिले आहे : त्याची उपस्थिती. त्याच्या पित्याकडे स्वर्गात जाण्याआधी शिष्यांना आज्ञा देताना, येशू त्यांना म्हणाला, *"तेव्ह तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा;...आणि मग त्यांना हे आश्वासन दिले :* "आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे" (मत्तय. २८: १९अ-२०). कधीकधी शारीरिक ज्वाला आपल्या जीवनास अवश्य स्पर्श करतात, परंतु ख्रिस्ताने देवाच्या क्रोधाच्या आणि न्यायाच्या भयानक ज्वाला स्वतःवर घेतल्या जेणेकरून आपण त्याच्या जीवनाचा सदैव आनंद घेऊ शकावे. ख्रिस्ताचा वधस्तंभावर त्याग करण्यात आला जेणेकरून आपण देवाच्या उपस्थितीत सार्वकालिकरित्या निवास करू शकावे. हे सध्याचे दु:ख हे येशू ख्रिस्ताची उपस्थिती आणि मौल्यवानता प्रदर्शित करण्यासाठी फक्त एक व्यासपीठ आहे.

## २. दु:ख आणि छळात, आपण कोण आहोत याची आठवण आपल्याला करून दिली जाते.

*"ख्रिस्त येशूमध्ये सुभक्तीने आयुष्यक्रमण करण्यास जे पाहतात त्या सर्वांचा छळ होईल"* (१ तीमथ्य. ३:१२).

हे वचन आपल्यासमोर एक प्रश्न उभा करते, *"जर मी छळाचे दु:ख अनुभवत नाही, तर मी ख्रिस्त येशूमध्ये धार्मिक जीवन जगत आहे का?"* आपण ख्रिस्ताचे अनुयायी म्हणून जेव्हा

छळाचे दु:ख अनुभवतो किंवा जेव्हा आपण दु:ख अनुभवत नाही याच्याविषयी आपण अधिक विचार करतो का? कदाचित नंतरचा विचारच अधिक गंभीर असला पाहिजे.

आपण छळ व्हावा म्हणून नाही पाहिले पाहिजे, पण आपण हे ओळखले पाहिजे की छळ हा धार्मिक जीवन जगण्याचा परिणाम असेल. शारीरिक छळाच्या नाट्यमय उदाहरणांचा विचार करणे सोपे आहे, पण छळ विविध प्रकारांनी येऊ शकतो. कधीकधी, छळाचे परिणाम हे भावनात्मक असतात जेव्हा विश्वासणाऱ्यांना त्यांच्या विश्वासासाठी बहिष्कृत, दुर्लक्षित, अपमानित, धमकी देणे, निंदा केली जाणे किंवा कमी लेखले जाते. पहिले पेत्र ४:१ब आपल्याला सांगते, *"ज्याने देहाने दु:ख सोसले आहे तो पापापासून निवृत्त झाला आहे."* यावर विचार करा. जर आपल्या देहाला पाप करावेसे वाटते पण आपण पवित्र आत्म्याला शरण जातो, देह दु:ख सोसतो. आपला काही अंश मरतो. हे खरे आणि वेदनादायक आहे. जेव्हा आपल्याजवळ वेदनादायक अपमानासाठी एक तेजस्वी प्रत्युत्तर मिळते, परंतु ते ओळखा की ते ख्रिस्ताच्या मनाकडून नाही आणि आपण ते बोलण्याचा नकार करतो, आपला देह दु:ख सोसतो. जेव्हा वासना येते आणि गोड पदार्थ देऊन कामुकता देते, पण आपण त्या विचारांना लक्षात घेण्यास नकार करतो, आपला देह दु:ख सोसतो. जेव्हा आपल्याला दुसऱ्यांसमोर स्वतःची प्रशंसा करण्याची संधी मिळते पण तेव्हा आपण कमीपणा घेण्याची निवड करतो, आपला देह दु:ख सोसतो.

**जेव्हा आपण ख्रिस्तासाठी ठामपणे उभे राहतो, तेव्हा आपण जगापेक्षा वेगळे दिसतो.**

आपण दु:ख सोसणे आणि छळाला नाट्यमय स्वरूप देऊ शकतो, पण सत्यता ही आहे : जर तुम्ही एक धार्मिक जीवन जगणार असाल, तर तुम्ही छळाचे दु:ख सोसणार- मग ते कोणत्याही प्रकारे येवो. आपण आपल्या तारणाऱ्याला वधस्तंभावर खिळलेल्या ह्या जगात स्थिर होण्याची अपेक्षा करू नये. जेव्हा आपण ख्रिस्तासाठी ठामपणे उभे राहतो, तेव्हा आपण जगापेक्षा वेगळे दिसतो.

ह्या वचनात (२ तीमथ्य ३:१२) दोन समान सुंदर आठवणी आहेत : आपण कोण आहोत आणि आपण कोणाचे आहोत. २०१३च्या फेब्रुवारी महिन्याच्या एका मंगळवारी ह्या सत्यतेची माझ्या तीन सहकाऱ्यांना आणि मला घरात जाणीव झाली.

## आशीर्वादाचा अग्नी

आफ्रिकेत, नायजेर मधील आमच्या गावात ही सकाळ इतर सकाळसारखीच होती. उष्ण आणि कडक उन्हाची. सकाळची प्रार्थना नुकतीच संपवून, आम्ही चौघे जण राजधानीत काही शासकीय कामासाठी निघालो. मी माझी होंडा सीआरवी चालवतो होतो, प्रेमाने मी तिला ‘कैमिला” हे नाव दिले होते. रस्त्यावर नेहमीप्रमाणेच आठवड्याच्या सकाळची भयंकर गर्दी होती. आम्ही एका गजबजलेल्या वळणावरून जात असताना अचानक एका माणसाने आमच्या वाहनासमोर उडी मारली.

त्या माणसाला धडक लागू नये म्हणून मी ताबडतोब ब्रेक मारला. क्षणातच आमच्याभोवती पंधरा ते वीस तरुणांचा घोळका जमा झाला. जरी त्यांच्यातील बरेच केवळ ओरडत होते, थोड्याच क्षणात इतरांनी लगेचच आमच्या कारच्या समोरच्या भागावर टायर फेकले, दुसरा टायर कारच्या हूडवर लावला आणि मागील टायर घसरत गेला-आग लावलेली होती-आमच्या गाडीच्या समोरच्या खालच्या भागाला. आम्हांला चारही बाजूंनी अनेक कार लावून घेरले होते.

त्याक्षणी आम्हांला जाणवले की आम्हांला आता जिवंत जाळले जाणार आहे.

हे समजताच आम्हांला त्वरित काहीतरी करणे आवश्यक होते, मी आमच्या मागे तपासले. एक टैक्सी माझ्या बंपरवर होती. मी मागे जाऊ शकत नव्हतो. मी पुढे पाहिले, तर जमावातील सदस्यांना दुखापत किंवा मारल्याशिवाय पुढे जाऊ शकत नव्हतो. (ते सार्वकालिकतेसाठी तयार दिसत नव्हते- आम्ही होतो). मी जणूकाही आयुष्यभर हॉर्न वाजवत होतो असे वाटले- खरे तर कदाचित ते फक्त तीन सेकंद असतील-टैक्सी मागे जवळजवळ पाच फुट जाऊ शकली. दरम्यान जमाव दुसरा टायर पेटवण्याचा प्रयत्न करत होते, परंतु ते पाच फुट पुरेसे होते. कैमिलाला मागे करून, मी लगेचच टैक्सीला धक्का देत मागे सरकलो. (हो, टैक्सीला स्पर्श झाला, परंतु बंपर त्यासाठीच असतात.)

पुढील काही क्षण सकाळी कामाला जाणाऱ्या साध्या प्रवासासारखे नव्हते; ते जणू ‘बोर्न आयडेंटीटी’ मधील दृश्यासारखे जास्त वाटत होते. दोन कारच्या मध्ये अडकल्यानंतर, मी वाहन थेट फुटपाथवर चढवले (आणि परिणामी तीन लोकांना वाहनाच्या रस्त्यातून बाजूला केले होते), आणखी काही कारच्या मधून मार्ग काढत, आणि रस्त्याच्या विरुद्ध बाजूला जात, आम्हांला मोकळा फुटपाथ मिळाला आणि शेवटी, एक सुरक्षित स्थान.

कोणीही वापरत नसलेल्या घाण रस्त्याच्या बाजूला जात, आम्ही देवाने केलेल्या चमत्कारासाठी त्याचे आभार मानले (जरी आम्ही पृथ्वीवर आहोत यामुळे आम्हांला थोडीशी निराशा वाटली तरी प्रभूसोबत कायमचे असण्याची संधी गमावली होती). आम्ही हिंसाचार कायम ठेवणाऱ्या ह्या माणसांच्या आत्म्यांसाठी प्रार्थना करू लागलो, आणि अमरीकन दूतावासाला फोन केला आणि जोपर्यंत त्या घटनेबद्दल आणखी माहिती प्राप्त करत नाहीत तोपर्यंत आम्ही *"एखाद्या आश्रयस्थानी निघून जा"* असे त्यांनी आम्हांला सांगितले.

माझ्या घरी परत आल्यानंतर, मी ही घटना फेसबुकवर पोस्ट केली :

> आश्चर्य करत होतो की माझ्या आणि माझ्याबरोबरच्या मित्रांसाठी ह्या सकाळी ९.३० वाजता कोण कोण प्रार्थना करत होते. नियामी वेळेनुसार (३.३० सकाळ इएसटी). आम्ही कारमध्ये जिवंत जाळले गेलो नाही हा एक पूर्ण चमत्कार होता (किंवा, कमीत कमी, जखमी झालो नव्हतो आणि कार जास्त खराब झाली नव्हती). जमावाने आमच्यावर हल्ला केला होता. देवाचे त्याच्या संरक्षणासाठी आभार.

मला जे अनुभवायला मिळाले ते म्हणजे ख्रिस्ताच्या शरीराची घनिष्ठता होती आणि आम्ही कोणाचे आहोत त्याचे स्पष्ट स्मरण. माझ्या ईमेल बॉक्स मध्ये संदेशा-नंतर संदेश येऊ लागले. येथे काही संक्षिप्तपणे सादर करत आहे.

मसुरीमधील एक मित्र :

> *मागील काही आठवडे, मी स्वतः रात्री २ वाजता सतत उठलो आहे आणि मागील रात्र काही वेगळी नव्हती, शिवाय जेव्हा मी रात्री २ वाजता उठलो, तेव्हा मी जवळजवळ एक तास थंडगार घामात होतो. जसे मागील दिवसांत, घडत होते, मी प्रार्थना केली. परंतु मी तुमच्यासाठी आग्रहाने प्रार्थना केली. मी केंद्रित होतो, आणि प्रार्थना केली, इफिस. ३:१४-२१ विशेषतः तुमच्यासाठी. मी मसुरीमध्ये आहे...म्हणजे सीएसटी, इएसटी च्या १ तास मागे, याचा अर्थ ह्या सकाळी प्रत्यक्ष नियामीमध्ये ९.०० वाजता मी प्रार्थना करत होतो आणि सकाळी १०.०० वाजेपर्यंत प्रार्थना केली-तुमच्या वेळेनुसार-योग्य वेळी.*

ओरेगॉन येथील आणखी एक मित्र लिहितो :

> मी माझ्या वेळेनुसार रात्री १२.३० वाजता प्रार्थना करत होतो, म्हणजे सकाळी ३.३० इएसटी वेळेनुसार. तुम्ही सर्व जण माझ्या विचारात असताना मी जागा झालो. मी त्याकडे दुर्लक्ष करू नये हे शिकलो आहे. मी आरोग्यासाठी प्रार्थना केली, मी सुरक्षेसाठी प्रार्थना केली आणि मी संरक्षणासाठी प्रार्थना केली. मग मी पुन्हा झोपी गेलो. मी एका अग्नीच्या भट्टीचे स्वप्न पाहत

> एक तासाने पुन्हा उठलो आणि पुन्हा प्रार्थना केली. सर्व गौरव देवाला. मी आज सकाळी *"तुम्हां सर्वांचा बचाव केल्याबद्दल आणि* "कैमिला" साठी मार्ग काढल्याबद्दल कृतज्ञ अंत:करणाने त्याची स्तुती करत आहे. तुम्ही सर्वजण तेथे असणे आवश्यक होते.....आज सकाळी त्याचे उघड संरक्षण हे केवळ याचे स्मरण आहे की तो तुमच्यासोबत आहे. जरी गोष्टी ह्या जेव्हा सामन्यापेक्षा अत्यंत तीव्र होत गेल्या, तुम्ही सर्वजण तेथे असणे आवश्यक होते. देवाचे आश्चर्य कधीही थांबत नाही. मी आज सकाळी कृतज्ञतेने भरून गेलेलो आहे. परमेश्वर चांगला आहे. मी आज तुमच्याबरोबर आनंद साजरा करत आहे!

मैसाचुसेट्स येथून एक स्त्री म्हणाली :

> आज सकाळी ३.३० वाजता, मी वाईट स्वप्नाने जागी झाली. मी एक साधी प्रार्थना केली : *"आमचे संरक्षण कर आणि आम्हांला शांती दे."* त्यावेळी, मी हे समजले नाही की *"माझे"* ऐवजी *"आमच्यासाठी"* मी का प्रार्थना केली, परंतु आता कदाचित त्याच कारण कळते. मागील दोन किंवा तीन महिने, देवाने मला सात किंवा आठ वेळा तुमच्यासाठी विशेषकरून प्रार्थना करण्यास उठवले होते, आणि प्रत्येक वेळी, ती सकाळी ३.३० वेळ होती.

साऊथ कॅरोलिना येथून, मला हे  मिळाले :

> मला तुला हे सांगावेसे वाटत होते की सकाळी १.५२ तो ३.२६ एएसटी वेळेनुसार मी नायजेर मधील संघासाठी प्रार्थना करत होतो. मी आज सकाळी ७.२८ वाजता झोपेतून उठले आणि अर्ध्या तासापूर्वी माझ्या वडिलांनी मला  एक बातमी सांगण्यासाठी हाक मारली होती! मी केवळ एवढेच बोलू शकतो की "हे माझ्या आत्म्या, हे माझ्या आत्म्या, प्रभूचे आभार मान. मी त्याच्या पवित्र नावाची उपासना करते! माझा आत्मा पूर्वी कधीही केले नाही याप्रमाणे गातो, मी तुझ्या पवित्र नावाची उपासना करतो.

हे येथेचे थांबले नाही. तथापि, उत्तरीपूर्व अमेरिकामधील आणखी एका मुलीने लिहिले :

> जळत्या टायरच्या त्या रात्री, देखील माझे वडीलही उठले की तुमच्यासाठी प्रार्थना करावी. माझ्यासारखे, त्यांना देखील कल्पना नव्हती की ते कशासाठी प्रार्थना करत आहेत, पण त्याने हे निकडीचे, भयंकर अंधाराचे-तातडीची भावना असे वर्णन केले.

तुम्हांला हे जाणण्याची आवश्यकता आहे, मी ह्या माणसाला कधीही भेटले नव्हते.

आयुष्यातील माझा एक जवळचा मित्र, इरीश भाऊ, त्या दिवशी वेगळीच प्रार्थना करत होता. त्याने नायजेरमधील आमच्या संघासाठी प्रार्थना केली की देव आम्हांला *“त्या अग्नीतून पुढे नेवो”* की आम्ही शुद्ध होऊ शकावे. देवाला विनोदाची भावना आहे.

किती हा विशेषाधिकार आणि आशीर्वाद आहे की त्या स्पष्ट घटनांचे साक्षीदार व्हावे जेथे आपण कोण आहोत आणि आपण कोणाचे आहोत हे जाणतो.

## ३. दु:ख आणि छळात, आपण आपल्या चारित्र्याची सुधारणा पाहतो.

*“इतके नाही, तर संकटांचाही अभिमान बाळगतो, कारण आपल्याला ठाऊक आहे की, संकटाने धीर, धीराने शील व शीलाने आशा निर्माण होते; आणि ‘आशा लाजवत नाही; कारण आपल्याला दिलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंत:करणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे”* (रोम. ५:३-४).

एकदा उत्तरी कॅरोलिनामध्ये एका उन्हाळी शिवीरमध्ये मी भाषण देत होतो, एका विद्यार्थिनीने तिच्या काही कौटुंबिक समस्यांचा संघर्ष आणि मित्रांसोबत काही संघर्षांना ती तोंड देत आहे याबद्दल सांगितले. प्रभूची आज्ञा पाळण्याबद्दल तिची खूप टीका होत होती. तिच्याबरोबर बोलण्याच्या मध्ये, मला काही जाणीव झाली. मी तिला विचारले, “तू प्रभूला आणखी जाणण्यासाठी कधी प्रार्थना केली आहे का? तिने माझ्याकडे विचित्रपणे पाहिले आणि मानले की ती तसे करत होती, ही तिची प्रार्थना होती. हसत, मी इशारा केला की देव तिच्या प्रार्थनांचे सरळपणे उत्तर देत होता की तसे करण्याने तिचे चरित्र तयार व्हावे आणि नवीन आणि शुद्ध व्हावे जेणेकरून तिने त्याला अधिक घनिष्टतेत ओळखावे.

देव आपल्या जीवनात कठीण समय येऊ देतो म्हणजे ख्रिस्त आपल्याला प्रकट व्हावा. लक्षात ठेवा येशू ख्रिस्ताला *“सैतानाकडून परीक्षा व्हावी म्हणून आत्म्याने त्याला अरण्यात नेले”* (मत्तय. ४:१). आत्मा येशू ख्रिस्ताला परीक्षेत कसा नेऊ शकतो कारण *“देव कोणाची परीक्षा घेत नाही?”* (याकोब १:१३). जो शब्द परीक्षा असा भाषांतरित केला आहे तसाच शब्द मोहात पाडणे असा देखील भाषांतरित केला जाऊ शकतो. देव त्याच्या लोकांची परीक्षा घेतो म्हणजे ते सिद्ध केले जावेत, परंतु शत्रू आपल्याला मोहात पाडतो जेणेकरून आपले पतन व्हावे.

१ करिंथ. १०:१३ मध्ये, आपल्याला सांगितले आहे, *“मनुष्याला सहन करता येत नाही अशी परीक्षा तुमच्यावर गुदरली नाही; आणि देव विश्वसनीय आहे, तो तुमची परीक्षा तुमच्या शक्तीपलीकडे होऊ देणार नाही, तर परीक्षेबरोबर तिच्यातून निभावण्याचा उपायही करील,*

*ह्यासाठी की, तुम्ही ती सहन करण्यास समर्थ व्हावे."* ज्यावेळेस देव आपल्याला ह्या कठीण समयामधून जाऊ देतो, तरी तो त्यातून सुटण्याचा मार्ग नेहमीच पुरवतो.

परंतु आपल्याला हे लक्षात ठेवण्याची गरज आहे की अनेकदा देवाचा सुटकेचा मार्ग परिस्थितीतून बाहेर काढण्यात नसतो, तर ती सहन करण्याची शक्ती देण्यात असतो. कदाचित तुमच्या जीवनात काही परिस्थिती असेल, की तुम्ही अपेक्षा करता की देवाने तुम्हांला त्यातून सुटका करावी किंवा ती पूर्णपणे काढून टाकावी. कदाचित त्याची प्रीती परिस्थितीला तुमचे जीवन घडवण्यासाठी इतकी मौल्यवान मानते की तो ती त्वरित दूर करीत नाही –हेही शक्य आहे का?

**देव आपल्या जीवनात कठीण समय येऊ देतो म्हणजे ख्रिस्त आपल्याला प्रकट व्हावा.**

वर्ष १८५१ होते. एलिझाबेथ प्रेन्टीस यांनी नुकतेच त्यांच्या दोन लेकरांना पुरले होते. शोकाने व्याकूळ होऊन, तिने प्रभूसाठी एक लहान कविता लिहिली :

> एक बालक आणि दोन ताज्या कबरा माझ्या आहेत,
> हे देवाकडून मला मिळालेले दान आहे;
> रक्तबंबाळ, मूर्च्छित, भग्न हृदय-
> हे तुला माझे अर्पण आहे.

तिच्या यातनेच्या समयात, तिच्या पतीने टिप्पणी केली, *"प्रीती आत्म्याला आंधळे होण्यापासून रोखू शकते."* हे ते शब्द होते ज्यांनी तिच्या गीतांच्या शब्दांसाठी प्रेरणा दिली, — More Love to Thee, O Christ— अधिक प्रीती, हे ख्रिस्ता, तुला आणि विशेषतः, हा तिसरा उतारा :

> शोकाला त्याचे कार्य करू द्या, मग शोक किंवा वेदना येऊ देत;
> तुझे सेवक मधुर आहेत, मधुर त्यांचे परावृत्त,
> जेव्हा ते माझ्याबरोबर गाऊ शकतात; अधिक प्रीती, हे ख्रिस्ता, तुला;
> तुला अधिक प्रीती, तुला अधिक प्रीती![५०]

गोष्टी ज्या आपण आपल्यासाठी कधीही निवडल्या नसत्या त्या कदाचित देवाचे संदेशवाहक असू शकल्या असत्या, जे आपल्या जीवनाच्या अस्पष्ट अशा दिसणाऱ्या अंधकारमय काळात त्याच्या मधुर प्रीतीला सांगत आहेत.

माझी प्रिय बहिण, कॉरी, प्रतिभावान कवयित्री आणि माझी चांगली मैत्रीण, तिने हे सत्य एका प्रभावी कवितेत व्यक्त केले आहेत, ही कविता त्यांनी त्या संकटमय परिस्थिती

दरम्यान लिहिली आहे जेव्हा तिचे जीवन तरुण वयातच नष्ट होत होते. ते सावकाशपणे वाचा, आणि तिचा संदेश मनापासून स्वीकार करा.

मी रविवारी स्तोत्र गायले,
आणि मला सर्व ओळी माहित आहेत.
“येशूला मी सर्वकाही समर्पित करते,”
आणि त्याचे हात माझे आहेत.”
परंतु मग एक दिवस येतो
जेव्हा देव परीक्षा घेतो.
तो म्हणाला, “मला तुझ्या जीवनाचा उपयोग करायचा आहे,
हे दाखवण्यासाठी की माझा मार्ग सर्वोत्तम आहे.”

माझी ही इच्छा नाही की
लोकांनी फक्त भरवसा आणि स्तुतीचे शब्द ऐकावे.
ह्या ओळींचा संदर्भ देणे हे पुरेसे नाही,
ज्यानुसार तुमचे पालनपोषण झाले आहे.

माझी इच्छा आहे की तुझ्या जीवनाने ते सिद्ध करावे.
जगाने पाहावे अशी माझी इच्छा आहे.
मी माझ्या हृदयात काय करू शकते,
मला शरण ये.

कारण मी महान गोष्टी दाखवणार आहे
की मी, प्रभू, ते करू शकतो.
मी माझे गौरव प्रदर्शित करेन,
आणि तुझा उपयोग करण्यासाठी मी विनंती करत आहे.

परंतु मला तुझ्या प्रयत्नांची गरज नाही,
तुझी शक्ती किंवा सामर्थ्य.
मी एखाद्या नायकाचा शोध घेत नाही,
किंवा काही श्रेष्ठ मानव संत.

मला तुझा अशक्तपणा हवा आहे.
मला तुझ्या वेदना घ्यायच्या आहेत.
आणि तुझी असमर्थता वापरायची आहे,

की माझ्या नावाचे गौरव करावे.

आणि माझी इच्छा आहे की तू माझ्यावर भरवसा ठेवावा,
दररोज माझ्या मुखाचा धावा करावा,
मी उत्तरांचे आश्वासन दिलेले नाही,
मी केवळ कृपेचे आश्वासन दिलेले आहे.

अंतर्गत विषयांसाठी,
हे खरेच त्याविषयी नाही,
सर्व महान गोष्टी ज्या मी करतो मी त्या तुझ्या द्वारे करीन,
किंवा ज्या मार्गाने तू मला त्यात मदत करेन.

परंतु हेच जे मी तुझ्यामध्ये करत आहे,
की माझी इच्छा आहे हे जगाने पहावे.
की शून्य असलेला जीवनाचा मार्ग,
माझ्यामध्ये सुंदर असा केला आहे.

म्हणून माझ्यावर भरवसा ठेव, मौल्यवान लेकरा,
आणि एखाद्या दिवशी तू ते समजशील.
की तुला जे भावनाहीन असे वाटत होते,
तेच प्रत्यक्षात मी योजले होते.

## ४. आपले दु:ख आणि छळ आपल्या तारणाऱ्याला प्रकट करते.

*"ही आमची संपत्ती मातीच्या भांड्यात आहे, अशा हेतूने की, सामर्थ्याची पराकोटी देवाची आहे, आमच्यापासून होत नाही, हे समजावे. आमच्यावर चोहोंकडून संकटे आली तरी आमचा कोंडमारा झाला नाही; आम्ही घोटाळ्यात पडलो तरी निराश झालो नाही; आमचा पाठलाग झाला तरी परित्याग करण्यात आला नाही; आम्ही खाली पडलेले आहोत तरी आमचा नाश झाला नाही; आम्ही प्रभू येशूचा वध सर्वदा शरीरात वागवतो, अशा हेतूने की, येशूचे जीवनही आमच्या शरीरात प्रकट व्हावे. कारण जे आम्ही जिवंत राहतो ते आम्ही येशूप्रीत्यर्थ सदाचेच मरणाच्या हाती सोपवलेले आहोत, ह्यासाठी की, येशूचे जीवनही आमच्या मर्त्य देहात प्रकट व्हावे. आमच्यामध्ये मरण, पण तुमच्यामध्ये जीवन आपले कार्य चालवते"* (२ करिंथ. ४:७-१२).

बायबल मध्ये, आपल्या शरीरांना मातीचे भांडे, मातीच्या पात्रांशी तुलना केलेली आहे. ही प्रतिमा आपल्याला दाखवते की ख्रिस्ताने आपल्यामध्ये त्याच्या पवित्र आत्म्याने निवास करण्याची निवड केली आहे. आपल्या मातीच्या पात्रामध्ये तो खजिना आहे.

गिदोनाचे वृत्त आणि विशाल, सुसज्जित शत्रूला पराजित करण्यासाठी त्याला देवाने दिलेल्या युद्धाच्या योजनेविषयी विचार करा, ज्या शत्रूंचे वर्णन असे केले आहे, *"ते आपले पशू व डेरे घेऊन चढाई करत आणि टोळधाडीप्रमाणे उतरत. ते व त्यांचे उंट अगणित होते; अशा प्रकारे ते देश उजाड करायला येत असत"* (शास्ते ६:५).

प्रथम, तेथे विषमता होती. देवाने गिदोनाची सेना ३२,००० सैनिकांपेक्षा अल्प अशी ३०० पर्यंत कमी केली. सैनिकांच्या दोन भिन्न गटांना गिदोनाने माघारी लावले, परंतु शेवटी ३०० पुरुष हे थोडे होते जे घाबरलेले नव्हते, आणि झऱ्यातून पाणी पिण्याची निवड करण्याद्वारे ज्यांनी परीक्षा उतीर्ण केली होती त्यांनी दाखवले होते की ते कोणत्याही क्षणी युद्ध करण्यास तयार आहेत.

पुढे, तेथे रणनीती होती. मी कल्पना करतो गिदोन त्याच्या लहान सैन्याची जमवाजमव करत होता आणि त्यांना सांगत होता, *"ठीक आहे मित्रांनो. आता हल्ला करण्याची वेळ आहे, तर ही योजना आहे. प्रत्येकाने एक रणशिंग आणि रिकामे घागर घ्यावी आणि घागरीत तुमच्या मशाली पेटवा. मग आपण १००च्या तीन तुकडीत विभागणार आहोत, शत्रूच्या छावणीभोवती घेरा घालू, रणशिंग फुंकू, घागरी फोडू आणि मग ओरडू,* "प्रभू साठी, आणि गिदोनासाठी!*" मी कल्पना करतो सैनिकांचे तोंड उतरले असेन आणि 'द लायन किंग' मधील तीमोन सारखे बोलले असतील,* "मी काय चुकत आहे का?*" परंतु गिदोन आणि त्याच्या लहान सैन्याने* "प्रभूच्या तरवारीने" शक्तिशाली विशाल शत्रूला नष्ट केले (शास्ते ७:२०).

मानवी दृष्टीकोनाने, गिदोनाला देवाकडून युद्धाची दिलेली योजना विजय आणेल असे अनोखे वाटत होते जसे यहोशवाचे सैनिक यरीहोभोवती सात वेळा फेरा घालत होते, रणशिंग वाजवत होते आणि भिंत पडण्याची अपेक्षा केली होती. गिदोनाच्या युद्धाबद्दल मला दोन प्रश्न विचारावेसे वाटतात : (१) घागरीमधील मशालींचा प्रकाश केव्हा उघड झाला? (२) विजय केव्हा मिळाला? विजय निश्चित झाला जेव्हा घागरी फोडल्या गेल्या आणि प्रकाश दिसला.

नवीन करारात आपण पाहतो की येशू बोलला, *"तुम्ही जगाचा प्रकाश आहात; डोंगरावर वसलेले नगर लपू शकत नाही. दिवा लावून मापाखाली ठेवत नसतात; दिवठणीवर ठेवतात*

*म्हणजे तो घरातल्या सर्वांना प्रकाश देतो. त्याप्रमाणे तुमचा प्रकाश लोकांसमोर असा पडू द्या की त्यांनी तुमची सत्कर्मे पाहून तुमच्या स्वर्गातील पित्याचे गौरव करावे"* (मत्तय. ५:१४-१६). येशूचे प्रेक्षक *"प्रकाश"* बद्दल जी प्रतिमा लक्षात घेत असतील ते एक लहान मातीचे भांडे होते-एक साधा मातीचा दिवा ज्याला सतत तेलाने भरावे लागत की ते पेटते ठेवावे.

**पारदर्शक असणे म्हणजे हे लोकांना तुमच्या जीवनात पाहू देणे नाही-हे त्यांना तुमच्या द्वारे पाहू देणे आहे.**

ख्रिस्तामधील बंधुंनो आणि भगिनींनो, आपण जगाचा प्रकाश आहोत कारण येशू, जगाचा प्रकाश आहे, जो आपल्यात निवास करतो. तो आपल्या *"मातीच्या घड्यात"* खजिना आहे. गिदोनाच्या काळातील युद्धासारखे, आपले युद्ध प्रभावी होण्यासाठी, आपले मातीचे घडे हे फोडले पाहिजेत जेणेकरून प्रकाश प्रकट झाला पाहिजे. हे आपल्या भग्नतेतच जग येशू ख्रिस्ताला पाहील.

आपण पारदर्शिकतेबद्दल बोलतो, परंतु त्याचा काय अर्थ हे आपल्याला माहित आहे का? हा शब्द स्वयं १६व्या शतकाच्या शेवटी आला आणि त्याचा अर्थ *"त्यातून चमकणे"* असा होतो. हे चुकू नका. पारदर्शक असणे म्हणजे हे लोकांना तुमचे जीवन पाहू देणे नाही-तर हे त्यांना तुमच्या द्वारे पाहू देणे आहे. येथे मोठा फरक आहे. खरी नम्रता म्हणजे आपल्या सर्व कमकुवतपणावर भर देणे नाही. तर त्याऐवजी, आपले अपयश असूनही त्याचे तारण दाखवण्याबद्दल आहे. भग्न असणे हे त्या ध्येयासाठी एक मार्ग आहे. येथे एक लिटमस परीक्षा आहे : जेव्हा दुसरा व्यक्ती तुमच्याबरोबरचे संभाषण संपवतो, तेव्हा ते तुमच्या जीवनाबद्दल विचार करत ते संपवतात का (मग ते तुमचे यश किंवा अपयश समजलले असो) किंवा ते तुमच्या तारणाऱ्याबद्दल असते का? जग तुमच्या कष्टी जीवनाद्वारे ख्रिस्ताची सुंदरता जिवंत आणि कार्यरत आहे हे पाहते का-तो कष्टीपणा जो तुम्हांला येशू ख्रिस्ताच्या प्रतिमेमध्ये अधिक आणि अधिक बदलत आहे?

चला आपण अगदी युद्धाच्या योजनेनुसार धावू नये  जे आपल्या तारणाऱ्यास भटकलेल्या आणि मरत असलेल्या जगाला प्रकट करेल.

## ५. दु:ख आणि छळ आपल्या शक्तीला पुनर्जीवित करतात.

*"प्रकटीकरणाच्या विपुलतेमुळे मी चढून जाऊ नये म्हणून माझ्या शरीरात एक काटा, म्हणजे मला ठोसे मारण्याकरता सैतानाचा एक दूत, ठेवण्यात आला आहे. हा माझ्यापासून दूर व्हावा अशी मी प्रभूजवळ तीनदा विनंती केली; परंतु त्याने मला म्हटले आहे, 'माझी कृपा तुला पुरेशी आहे; कारण अशक्तपणातच माझी शक्ती पूर्णतेस येते.' म्हणून ख्रिस्ताच्या*

*सामर्थ्याची छाया माझ्यावर राहावी म्हणून मी विशेषेकरून आपल्या अशक्तपणाची प्रौढी फार आनंदाने मिरवीन. ख्रिस्तासाठी दुर्बलता, अपमान, अडचणी, पाठलाग, संकटे ह्यांत मला संतोष आहे; कारण जेव्हा मी अशक्त तेव्हाच मी सशक्त आहे"* (२ करिंथ. १२:७-१०).

मंडळी अधिकतर अशक्त आणि आजारी आहे. याकारणामुळे नाही की ख्रिस्त पुरेसा नाही, परंतु याकारणामुळे की आपण अशक्तपणा आणि शक्ती यामध्ये भ्रमात आहोत. आपण दु:ख आणि छळाच्या संकटांना दूर करण्यासाठी प्रार्थना करण्याचा प्रयत्न करतो, जेव्हा आपल्या प्रभूने अनेक वेळा पौलाच्या काट्याला काढण्याचा नकार दिला, परंतु अशक्तपणाला एक माध्यम म्हणून घोषित केले ज्याद्वारे देव त्याचे सामर्थ्य प्रदर्शित करतो.

२ करिंथ १२:७ मध्ये, पौलाने स्पष्ट केले की एक काटा त्याला *"दिला"* गेला. लादला गेला नाही, पण एक दान-संपत्ती म्हणून दिला गेला. पुढे, तुम्ही काट्याचा उद्देशाकडे लक्ष दिले का? प्रेषिताने स्पष्ट केले, *"मी चढून जाऊ नये म्हणून.'* "सैतानाचा दूत" याबद्दल हे गृहीत धरणे सोपे होईल की तो सरळपणे शत्रू होता जो पौलावर हल्ला करत होता, परंतु कारण आपल्या आत्म्याचा शत्रू आपण चढून जाऊ नये अशी कधीपासून इच्छा करतो? देव पूर्ण नियंत्रण ठेवून आहे.

देवापासून धडे किंवा संधी ह्या अनेकदा सैतानापासून संदेशासह येतात. शत्रूला पाहिजे की आपण काट्यावर लक्ष द्यावे आणि देवाने आपल्यासाठी जी परीक्षा तयार केली आहे ती गमवावी. आपण कदाचित समस्या पाहू शकतो जेव्हा देवाची इच्छा असते की आपण त्याच परिस्थितीचा आपल्याला संयम शिकवण्यासाठी उपयोग करावा. आपण कदाचित आपले अपयश पाहू जेव्हा देव आपल्याला त्याच्या विश्वसनीयतेला दाखवत आहे. आपण कदाचित आपल्या शोकाला पाहू जेव्हा देव आपल्यात त्याचे सामर्थ्य प्रकट करत आहे. आपण कदाचित रोग पाहू जेव्हा देव आपल्याला निर्भरता शिकवत असेल. देव त्याच्या लोकांची परीक्षा घेतो की त्यांना सिद्ध करावे, त्यांना अपात्र ठरवू नये.

**देव त्याच्या लोकांची परीक्षा घेतो की त्यांना सिद्ध करावे, त्यांना अपात्र ठरवू नये.**

पवित्र शास्त्राच्या पुष्कळ विद्वानांनी पौलाचा *"काटा"* काय असेल याबद्दल निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याला हे सांगण्यात आलेले नाही. आपल्याला केवळ एवढेच माहित आहे की पौलाने आत्ताच त्याचे परिश्रम, तुरुंगवास, फटके मारले जाणे, आणि जवळजवळ मृत्यूच्या अनुभवाबद्दल लिहिले आहे. तो पुढे म्हणतो, *"पाच वेळा मी यहूद्यांच्या हातून एकोणचाळीस फटके खाल्ले. तीन वेळा छड्यांचा मार खाल्ला. एकदा मला दगडमार झाला;*

*तीन वेळा माझे गलबत फुटले व एक दिवस व एक रात्र मी समुद्रात घालवली; मी कितीतरी प्रवास केला; नद्यांवरील संकटे, लुटारुंमुळे आलेली संकटे, माझ्या देशबांधवांनी आणलेली संकटे, परराष्ट्रीयांनी आणलेली संकटे, नगरातली संकटे, रानातली संकटे, समुद्रावरची संकटे, खोट्या बंधूंनी आणलेली संकटे; श्रम व कष्ट, कितीतरी वेळा केलेली जागरणे, तहानभूक, पुष्कळ उपासतापास, थंडी व उघडेवागडेपणा, ह्या सर्वांमुळे मी अधिक आहे. शिवाय ह्या व अशा इतर गोष्टींखेरीज माझ्या मनावरचे ओझे, म्हणजे सर्व मंडळ्यांविषयीची चिंता ही आहे"* (२ करिंथ. ११:२४-२८). पुढे पौल अद्भुत अनुभवाचे स्मरण करतो, *"माणसाने ज्याचा उच्चारही करणे उचित नाही"* (२ करिंथ. १२:४).

मग त्याच्या *"काट्या"* विषयी अस्पष्ट संदर्भ येतो.

यावरून प्रोत्साहन प्राप्त करा. कदाचित पौल, पवित्र आत्म्याने मार्गदर्शित झाला असेन, तो आपल्याला ह्या काट्याविषयी बोलत नाही जेणेकरून आपण त्याच्याशी संबंध जुळवू शकावे. कदाचित त्याचा काटा हा सतत परीक्षा असेल जिच्यापासून पौलाला पळायचे आणि प्रतिकार करायचा होता. कदाचित ही त्रासदायक शारीरिक समस्या असेल जी देवाने बरी न करण्याची इच्छा केली. कदाचित ही अयोग्यता असेल जी पौलाला त्याच्याकडे असलेल्या सामर्थ्यापासून मागे रोखून ठेवत होती. आपल्याला माहित नाही-आणि कदाचित हे त्या मार्गाने उत्तम आहे. आपल्याला जे माहित आहे ते हे की देवाची कृपा आपल्या सर्व काट्यांसाठी पुरेशी आहे.

गिदोनाचे मिद्यानी लोकांसोबत युद्धाकडे परत जाऊ, ३२,००० सैनिकांसह युद्धात न जाण्यासाठी देवाचे काय कारण होते? *"तुझ्याबरोबर असलेले लोक फारच आहेत; इतक्या लोकांच्या हाती मिद्यान्यांना द्यावे असे मला वाटत नाही. दिले तर मीच माझ्या मनगटाच्या जोरावर विजय मिळवला आहे अशी फुशारकी माझ्यापुढे इस्राएल मारील"* (शास्ते ७:२). हे अल्प जीवन हे देवाच्या गौरवाकरता आहे-देवाच्या गौरवाकरता जो आपल्याला प्रेम करतो आणि त्याच्या राज्यात त्याच्याबरोबर आपण कायमचे आनंद करावा अशी त्याची इच्छा आहे. जेव्हा येशू आपल्याला स्वतःचा नकार करण्यास आणि आपला वधस्तंभ उचलण्यास सांगतो, तेव्हा ही एक शिक्षा नाही पण एक विशेषाधिकार आहे. आपल्या मर्त्य शरीरात, कांटे आणि सर्व गोष्टींमध्ये देवाचे जीवन प्रकट होऊ देण्याचे हे आमंत्रण आहे. खरेच, *"जेव्हा मी अशक्त आहे तेव्हाच मी सशक्त आहे"* (२ करिंथ. १२:१०).

### ६. दु:ख आणि छळ त्याच्या गौरवाकरता व्यासपीठ पुरवते.

*"प्रियजनहो, तुमची पारख होण्यासाठी जी अग्निपरीक्षा तुमच्यावर आली आहे तिच्यामुळे आपणांस काही अपूर्व झाले असे वाटून त्याचे नवल मानू नका. ज्या अर्थी तुम्ही ख्रिस्ताच्या दु:खाचे वाटेकरी झाला आहात त्या अर्थी आनंद करा; म्हणजे त्याचे गौरव प्रकट होण्याच्या वेळेसही तुम्ही उल्लास व आनंद कराल. ख्रिस्ताच्या नावामुळे तुमची निंदा होत असल्यास तुम्ही धन्य आहात; कारण गौरवाचा आत्मा म्हणजे 'देवाचा आत्मा' तुमच्यावर येऊन राहिला आहे. त्यांच्याकडून त्याची निंदा होते, पण तुमच्याकडून तो गौरविला जातो. तरी खून करणारा, चोर, दुष्कर्मी, किंवा दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ करणारा असे होऊन कोणी दु:ख भोगू नये; ख्रिस्ती ह्या नात्याने कोणाला दु:ख सहन करावे लागत असेल तर त्याला लाज वाटू नये; त्या नावामुळे देवाचे गौरव करावे"* (१ पेत्र. ४:१२-१६).

ख्रिस्ताचे सामर्थ्य आणि सुंदरता दाखवण्याच्या संधी देणाऱ्या परिस्थिती आपण टाळण्याचा प्रयत्न करतो का?

कठीण काळ आल्यावर आश्चर्यचकित होऊ नका किंवा अगदी विचित्र वाटून घेऊ नका असे सांगून पेत्र सुरुवात करतो. आजच्या बहुतेक चर्चमध्ये, विचित्र विरोधाभास आहे. जसे पूर्वीच्या धड्यात उल्लेखले आहे, जर आपण त्याचे अनुसरण केले तर येशूने ज्या गोष्टी घडतील असे वचन दिले होते त्याच गोष्टी आपल्याला त्याची उपस्थिती आणि प्रीतीवर शंका घेण्यास प्रवृत्त करतील. जर जीवनातील कथित वळणे खऱ्या आशीर्वादांकडे जाण्याचा सर्वांत थेट मार्ग असतील तर? काय होईल जर सर्वात अनिच्छुक परिस्थितीच देवाच्या गौरवाचे व्यासपीठ असतील?

२०१५च्या जानेवारीत, धार्मिक अतिरेकींनी नायजेर मध्ये एकाच दिवसात राष्ट्रातील बऱ्याच चर्च इमारती आणि काही चर्च पुढाऱ्यांची घरे जाळण्यासाठी जमावाला चिथावले. त्याच दिवशी त्यांनी आमच्या शेजारी असलेले अनाथालय आणि शाळा देखील जाळली.

**काय होईल जर सर्वात अनिच्छुक परिस्थितीच देवाच्या गौरवाचे व्यासपीठ असतील?**

ह्या घटना शनिवारी सकाळी घडल्या, जेव्हा आठवड्याचे लेकरांचे बायबल वर्ग आमच्या एका आंगणात सुरू होते. जमाव आमच्या गावात प्रवेश करण्याच्या वीस मिनिटे आधी, शेजारी रडतरडत बायबल क्लब सुरू असणाऱ्या अंगणाच्या दरवाजाजवळ आले, आणि येणाऱ्या धोक्याची आमच्या संघाला सूचना दिली, अशा प्रकारे आम्हांला एका सुरक्षित

ठिकाणी जाण्यासाठी वेळ मिळाला. जेव्हा अपराधी पोहचले, तेव्हा आमची काही घरे जाळण्याची त्यांची इच्छा होती-माझे घर देखील त्यात होते. आमच्या काही शेजाऱ्यांनी आणि मुस्लीम मित्रांनी हल्ला करणाऱ्यांचा विरोध केला जेव्हा ते आमच्या दरवाजाजवळ पोहचले होते. एकाने त्याच्या जीवनाचा धोका पत्करून भिंतीवरून उडी मारली आणि पेटलेली पेट्रोल बॉम्बची बाटली विझवली.

आमची घरे वाचली, परंतु बऱ्याच लोकांची घरे जळून गेली. एक ख्रिस्ती व्यक्ती जो आमच्या घराच्या जवळच्याच रस्त्याकडे राहतो त्याचे घर लुटले आणि जाळले गेले होते. जमाव त्याला वधस्तंभावर द्यावे म्हणून ओरडत होते जेव्हा ज्वाला वाढत होत्या, पण जमावाने त्याला धरण्याआधी तो त्यातून थोडक्यात निसटला. आणखी एक नायजेर येथील मित्र जो स्थानीय मंडळीचा पाळक होता त्याचे घर, त्याची संपत्ती आणि चर्च इमारत उध्वस्त झाले होते. नंतर त्याने मला सांगितले, *"हा असा आशीर्वाद आहे, कारण देवाने ह्या गोष्टी होतील हे सांगितले आहे,* "मी देवाचे किती आभार मानतो की त्याने आमची इमारत वाचवली नाही. जर त्याने तसे केले असते, तर आम्ही त्याच्या आशिर्वादाला मुकलो असतो."

ह्या विश्वासणाऱ्यांनी यास दुर्घटना म्हणून पाहिले नाही. त्यांनी त्यास देवाच्या गौरवाचे व्यासपीठ म्हणून पाहिले. देव तुम्हांला कदाचित कोणते व्यासपीठ देत असेल जे तुम्हांला टाळण्याची इच्छा असेल? कधीकधी अमान्यता? जवळच्या लोकांकडून चुकीचे आरोप? संपत्तीचे नुकसान? हा व्यासपिठांचा हेतू तुमच्या विश्वासाला प्रदर्शित करण्याचा आहे, ते नष्ट करण्याचा नाही.

## ७. दु:ख आणि छळ आपल्या शत्रूला फटकारतो.

*"सांगायचे ते इतकेच की, ख्रिस्ताच्या सुवार्तेस शोभेल असे आचरण ठेवा. मी येऊन तुम्हांला भेटलो किंवा तुमच्याकडे आलो नाही तरी तुमच्यासंबंधाने माझ्या ऐकण्यात असे यावे की, तुम्ही एकजिवाने सुवार्तेच्या विश्वासासाठी एकत्र लढत एकचित्ताने स्थिर राहता; आणि विरोध करणाऱ्या लोकांकडून कशाविषयीही भयभीत झाला नाहीत; हे त्यांना त्यांच्या नाशाचे पण तुमच्या तारणाचे प्रमाण आहे, आणि ते देवापासून आहे"* (फिलिप्पै. १:२७-२८).

पश्चिम आफ्रिकेत, मला अनेक शेजारी आहेत की जग कदाचित त्यांना *"कट्टरपंथी इस्लामवादी"* म्हणतील. दुपारच्या वेळेस, शेजारच्या नवीन घरात स्थलांतर केल्यानंतर थोड्याच अवधीत, मी एक मित्राच्या लहानशा झोपडीसारख्या दुकानात टमाटे पेस्ट घेण्यासाठी गेलो होतो. मला जे पाहिजे होते ते मला मिळाले. जेव्हा मी घरी जाणारच

होतो, मी त्या दुकानदाराला सांगितले की आम्ही ख्रिसमस पार्टी देणार आहोत. येशूच्या पृथ्वीवर येण्याचा उत्सव साजरा करण्यास येण्यास आमंत्रण मी त्याला दिले.

आणखी एक तरुण माणूस जो जवळजवळ वीस वयाचा असेल त्याने आमचे बोलणे वरवर ऐकले आणि मला विचारले, *"मला देखील आमंत्रण आहे का?"* लगेचच मी त्याला म्हटले, होय आपण देखील या!" *तो ताबडतोब बोलला,* "तुम्हांला तुमच्या पार्टीत अल-कैदाचे व्यक्ती आलेले चालतील का?" *मी त्याला सांगितले तू आमचा शेजारी आहे आणि आमची इच्छा आहे की तुम्ही यावे. अधिक आरामदायक वाटत तो पुढे म्हणाला,* "तुम्ही संदेष्ट्यांवर विश्वास ठेवता का?" *मी लगेचच त्याला म्हटले की मी विश्वास ठेवतो, कारण संदेष्टे येशूकडे इशारा करतात. हा खेळ माहित असल्यामुळे, त्याने पुन्हा विचारले,* "तुम्ही सर्व संदेष्ट्यांना मानता का?" *हे समजून की तो विचारत आहे की तुम्ही मुहम्मद, इस्लामचा शेवटचा संदेष्टा यावर विश्वास ठेवता का? मी उत्तर दिले,* "माझ्या मित्रा, मी येथे दुकानात टमाटे पेस्ट घेण्यासाठी आलो, मला ती मिळाली. आता, मग मी आणखी टमाटे पेस्ट शोधत राहील का किंवा घरी जाऊन स्वयंपाक करीन? *"तू घरी जाशील आणि स्वयंपाक करशील,"* त्याने उत्तर दिले. *"अगदी बरोबर, मी पुढे बोललो.* "जीवनात, मी शांति, आनंद, आशा, प्रीती आणि सार्वकालिक जीवन शोधत होतो. मला हे सर्व आणि आणखी बरेच काही येशू ख्रिस्तामध्ये सापडले. मुहम्मद त्याच्यानंतर शेकडो वर्षांनी आले आणि त्यामुळे ते माझ्या विश्वासासाठी प्रासंगिक नाहीत. माझा शोध येशूसह संपला. तर मला जे सापडले आहे त्यासाठी मी इतरत्र का शोधत राहणार?"

संपूर्ण संभाषादरम्यान, आम्ही मित्र झालो. मग त्याने म्हटले की नंतर परत ये म्हणजे विश्वासाच्या विषयावर आणखी चर्चा करू या. जेव्हा आपण लोकांच्या धमक्यांना घाबरत नाही, तेव्हा ते त्यांचे लक्ष आपल्या आशेवर करू शकतात, जसे माझ्या नवीन मित्राने केले. जेव्हा आपल्या आत्म्यांचा शत्रू आपल्याला रिकामी, सांसारिक भीती दाखवण्यात अपयशी ठरतो (जे आपल्या शरीराला प्रभाव करू शकतात, पण आपल्या आत्म्यांना काही धोका पोहचवू शकत नाही), तेव्हा ते आध्यात्मिक जगात त्यांची पकड गमावतात.

## ८. दु:ख आणि छळ आपल्याला पुरस्कार देतात.

*"नीतिमत्वाकरता ज्यांचा छळ झाला आहे ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. माझ्यामुळे जेव्हा लोक तुमची निंदा व छळ करतील आणि तुमच्याविरुद्ध सर्व प्रकारचे वाईट लबाडीने बोलतील तेव्हा तुम्ही धन्य. आनंद करा, उल्लास करा, कारण स्वर्गात*

*तुमचे प्रतिफळ मोठे आहे; कारण तुमच्यापूर्वी जे संदेष्टे होऊन गेले त्यांचा त्यांनी तसाच छळ केला"* (मत्तय. ५:१०-१२).

**काही वेळेला आपण त्याच गोष्टींविरोधात प्रार्थना करतो ज्या आपल्याला देवाचा आशीर्वाद आणि पुरस्कार आणणार असतात.**

काही वेळेला आपण त्याच गोष्टींविरोधात प्रार्थना करतो ज्या आपल्याला देवाचा आशीर्वाद आणि पुरस्कार आणणार असतात. येशूने केवळ सहज सुचविले नाही की ज्यांचा त्याच्या नावाकरता छळ केला जाईल ते धन्य आहेत व त्याने त्याचे आश्वासन दिले आहे. आणि जसे काही इतके पुरेसे नाही, तर तो आपल्याला हेही सांगतो की हा पुरस्कार *"मोठा"* आहे. चला आपण छळ थांबावा म्हणून प्रार्थना करू नये, परंतु ते सहन करण्यास कृपेसाठी प्रार्थना करावी-म्हणजे ख्रिस्ताचे गौरव होईल.

२००१ च्या सप्टेंबर महिन्यात न्यूयॉर्क शहरात हल्ले झाल्यानंतर थोड्याच अवधीत, जेव्हा अमेरिकी सेना इराक मध्ये प्रवेश करत होती, करेन वाटसन नावाच्या स्त्रीने गरज पाहिली. तिने ओळखले की अनेक आत्मे इराक मध्ये युद्धात मरणार आहेत आणि इच्छा जाहीर केली की त्यांनी येशू ख्रिस्ताची सुवार्ता कदाचित पहिल्यांदाच ऐकावी. तिला धोका माहित होता, पण तिला हे देखील माहित होते की परमेश्वर तिला त्या पिकलेल्या शेतात पाठवत आहे. अमेरिका सोडण्याआधी, तिने तिच्या पाळकांना एक पत्र दिले, हे सांगत की तिचा मृत्यू झाला तरच ते पत्र उघडावे. ती २००२ मध्ये इराकला गेली आणि त्या राष्ट्रातील लोकांची सेवा केली, येशू ख्रिस्ताचे शुभवर्तमान विश्वासुपणे सांगितले आणि व्यवहारिक मार्गांनी त्याची प्रीती दाखवली.

मार्च १५, २००४ मध्ये, तिच्या पाळकाच्या कार्यालयात फोन वाजला. तो फोन करेनच्या मिशन संस्थेकडून होता, त्याला सूचना देत की करेन, इतर दोघांसोबत, त्या दिवशी जेव्हा ती उत्तरी इराकमध्ये एक स्त्री आणि मुलांची सेवा करण्यास जात होती तेव्हा स्थानिक हल्लेखोरांनी त्यांना जिवंत मारले आहे. ती बातमी ऐकल्यावर, त्याला करेनच्या पत्राची आठवण झाली जे त्याच्या फाईल्स मध्ये कोठेतरी ठेवलेले होते. ते पाकीट उघडून, त्याने ती चिठ्ठी वाचली. *"मला एखाद्या ठिकाणी बोलावलेले नाही; मला त्याने बोलावलेले आहे. आज्ञा पाळणे हे माझे लक्ष्य होते, दु:खसहन करणे अपेक्षित होते, त्याचे गौरव हा माझा पुरस्कार आहे."* करेन छळ आणि मृत्यूने आश्चर्यचकित झाली नाही. सार्वकालिकता

तिच्या दृष्टीत मुद्रित झालेली होती, ती इराकला प्रभू व लोकांची सेवा करण्यास गेली होती. तिच्यासाठी, जगणे हे ख्रिस्त, आणि मरणे हे लाभ होते (फिलिप्पै. १:२०-२१).[५१]

देवाने जे आश्वासन दिले आहे त्याची आपण का अपेक्षा करू नये? आपण का आश्चर्यचकित होतो जेव्हा देव त्याच्या वचनानुसार खरा आहे? आशीर्वादाच्या स्त्रोतपासून आपल्याला पळण्याची इच्छा का होते?

चीनच्या काही भागांमध्ये, ख्रिस्ताच्या नवीन अनुयायांचा बाप्तिस्मा करण्याआधी, त्यांना हे वाक्य म्हणावयास लावत :

> मी कोणत्याही वेळी किंवा ठिकाणी दु:ख सोसण्यास, बंदिवासात जाण्यास,
> तुरुंगातून निसटून जाण्यास, आणि माझ्या प्रभू साठी मरण्यास देखील तयार आहे.
>
> **जर तुम्ही कैदेत ठेवले, तर तुम्ही मला**
> बंदिवासातील प्रेक्षक देत आहात की इतरांना सुवार्ता सांगावी.
>
> **जर तुम्ही मला एकाकी ठिकाणी ठेवले,**
> तर मी प्रार्थना आणि मनन करू शकतो.
>
> **जर तुम्ही माझे घर आणि माझी संपत्ती घेतली,**
> तर मी कोठेही प्रवास करू शकतो आणि सुवार्ता सांगू शकतो.
>
> **जर तुम्ही मला फटके मारले, तर मी देवाचे गौरव करीन**
> आणि ते त्याला संधी देते की मला बरे करावे.
>
> **जर तुम्ही मला जिवंत मारले, तर तुम्ही मला गौरव-माझ्या अंतिम ध्येयाकडे पाठवत आहात.**[५२]

याबरोबर, त्यांना पित्याच्या नावात, आणि पुत्राच्या नावात आणि पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा दिला जात असे.

माझी आई मला सतत एस्तेर केर रुस्थोई यांच्या शब्दांची आठवण करून देत असे जे खाली दिले आहेत.

> हे सर्व लाभाचे होईल जेव्हा आपण येशूला पाहू,
> जीवनाची संकटे इतकी लहान दिसतात जेव्हा आपण ख्रिस्ताला पाहतो,
> त्या प्रियकराच्या मुखाची एक झलक, सर्व शोक विरून जाईल,
> म्हणून धाडसाने शर्यत धावा जोपर्यंत आपण ख्रिस्ताला पाहत नाही.[५३]

## ९. दु:ख आणि छळ आपल्याला सार्वकालिकतेवर पुन्हा केंद्रित करते.

*"म्हणून आम्ही धैर्य सोडत नाही; परंतु जरी आमचा बाह्य देह क्षय पावत आहे, तरी अंतरात्मा दिवसानुदिवस नवा होत आहे. कारण आमच्यावर येणारे तात्कालिक व हलके संकट हे आमच्यासाठी अत्यंत मोठ्या प्रमाणात सार्वकालिक गौरवाचा भार उत्पन्न करते. आम्ही दृश्य गोष्टींकडे नाही तर अदृश्य गोष्टींकडे लक्ष लावतो; कारण दृश्य गोष्टी क्षणिक आहेत, पण अदृश्य गोष्टी सार्वकालिक आहेत"* (२ करिंथ. ४:१६-१८).

२०१४ मध्ये, अंत्युखिया, ग्रीसला भेट देत असताना, मी ऐकलेली गोष्ट खरी आहे का हे पाहण्यासाठी रेल्वेने प्रवास करण्याचा निर्णय घेतला. नेरन्त्झिओटिस्सा स्टेशनवर उतरलो, मी पूर्वीच्या ऑलिम्पिक पार्क कडे गेलो जेथे फक्त दहा वर्षांपूर्वीच, अंत्युखियाने २८वे ऑलिम्पिकचे आयोजन केले होते.

अफवा खऱ्या होत्या.

ऑलिम्पिक पार्क हे आता भूतांचे नगर, आठवणींच्या स्मरणाचे कब्रस्थान झाले आहे. दहा बिलियन डॉलर मैदानावर कोणालाही न पाहता चालत होतो तो भयावह अनुभव होता. वेलोड्रम, जलविज्ञान केंद्र, ऑलिम्पिक स्टेडीयम, कारंजे, पदपथ, ध्वजस्तंभ आणि कमानी सर्वांनी मला ते पूर्वी कसे होते याची आठवण करून दिली. ते रिकामी वाटले; काहीतरी चुकत होते. पुष्कळशा सुविधा बंद आणि कुंपणाने घेरलेल्या होत्या. एक सुविधाचा दरवाजा उघडा मिळाला, मी पडीक, चालून जाण्याच्या ओल्या मार्गाचा शोध घेतला जेथे ऑलिम्पिक खेळाडू एकत्र जमत असत. अनुभव अतिवास्तव होता.

काही एकाकी स्तंभ शोधून, मी एका स्तंभावर टेकून उभा राहिलो आणि लिहिणे, मनन आणि प्रार्थना करू लागलो. गुगलचा वापर करून दहा वर्षांमागील प्रतिमा शोधण्याचा प्रयत्न केला, मी कल्पना करण्याचा प्रयत्न केला की पार्क ज्यामध्ये मी बसलो होतो ते तेव्हा कसे दिसत असेन जेव्हा जगातील सर्व प्रतिष्ठित व्यक्ती तेथे थोड्या आठवड्यांसाठी एकत्र जमले असतील.

बायबल उघडून, पौलाचे हे शब्द माझ्या हृदयाशी प्रतिध्वनित झाले, *"आम्ही दृश्य गोष्टींकडे नाही तर अदृश्य गोष्टींकडे लक्ष लावतो; कारण दृश्य गोष्टी क्षणिक आहेत, पण अदृश्य गोष्टी सार्वकालिक आहेत"* (२ करिंथ. ४:१८). किती जलद, प्राप्ती, कौतुक आणि लोकांच्या टाळया गायब झाल्या होत्या. तरीही आपण किती तरी वेळा अशा तात्पुरत्या गोष्टींच्या मागे लागतो?

ह्यां वचनांमध्ये, आपल्याला आठवण करून दिली आहे की हलके दु:ख जे आम्हांला होतात ते महान सत्यता भाकीत करतात. पुढे काय येणार आहे त्याचे ते केवळ एक स्मरण चिन्ह नाही, परंतु ते साधन आहे जे आपल्यासाठी कितीतरी जास्त आणि गौरवाचा सार्वकालिक भार उत्पन्न करत आहे?” *येशू ख्रिस्तासोबत सहभागीतेमध्ये राहिल्याने* “हलकी संकटे” येतील त्यांना स्वीकारण्याचा आमच्या नकारामुळे आपणांमध्ये दृष्टांताचा अभाव असू शकतो का? आपल्या शाश्वत दृष्टिकोनाचा अभाव तात्पुरत्या गोष्टींवरील आपल्या घट्ट पकडीतून निर्माण होऊ शकतो का? जीवनाच्या संकटांना आपले उत्तर इतरांना सार्वकालिकतेवर लक्ष केंद्रित करायला लावते का किंवा ते त्यांना व्यर्थ संशोधनाकडे इशारा देते ज्याचा शेवट जसे अंत्युखिया येथील पडीक ऑलिम्पिक पार्क सारखे दिसण्यात होईल?

**जीवनाच्या संकटांना आपले उत्तर इतरांना सार्वकालिकतेवर लक्ष केंद्रित करायला लावते का किंवा ते त्यांना व्यर्थ संशोधनाकडे इशारा देते?**

## १०. दु:ख आणि छळ आपल्या आशेला पुनर्जीवित करते.

*“कारण आपल्यासाठी जे गौरव प्रकट होणार आहे त्याच्यापुढे सांप्रत काळाची दु:खे काहीच नाहीत असे मी मानतो. कारण सृष्टी देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची प्रतीक्षा अत्यंत उत्कंठेने करत आहे. कारण सृष्टी व्यर्थतेच्या स्वाधीन करण्यात आली ती आपखुशीने नव्हे, तर ती स्वाधीन करणाऱ्यामुळे. सृष्टीही स्वतः नश्वरतेच्या दास्यातून मुक्त होऊन तिला देवाच्या मुलांची गौरवयुक्त मुक्तता मिळावी ह्या आशेने वाट पाहते. कारण आपल्याला ठाऊक आहे की संबंध सृष्टी आजपर्यंत कण्हत आहे व वेदना भोगत आहे. इतकेच केवळ नव्हे, तर ज्या आपल्याला आत्मा हे प्रथमफळ मिळाले आहे ते आपणही स्वतः दत्तकपणाची म्हणजे आपल्या शरीराच्या मुक्तीची वाट पाहत असता आपल्या ठायी कण्हत आहोत. कारण आपण अशी आशा धरून तरलो; जी आशा दृश्य झाली आहे ती आशाच नव्हे, जे दृश्य झाले आहे त्याची आशा कोण धरील? पण जे अदृश्य त्याची जर आपण आशा धरली तर धीराने आपण त्याची प्रतीक्षा करत असतो”* (रोम. ८:१८-२५).

किती सोपे आहे थकून जाणे! परंतु दु:खसहन करण्याच्या आशीर्वादित कामाकडे पुन्हा लक्ष द्या.

दु:ख सहन करणे हे केवळ आपल्याला सार्वकालिकतेवर लक्ष केंद्रित करायला लावत नाही, परंतु ते आपली आशा देखील पुनर्जीवित करते. *"धन्य आशाप्राप्तीची म्हणजे आपला थोर देव व तारणारा असा जो येशू ख्रिस्त त्याचे गौरव प्रकट होण्याची वाट पाहत आपण अभक्तीला व ऐहिक वासनांना नाकारून सांप्रतच्या युगात मर्यादेने, नीतीने व सुभक्तीने वागावे"* (तीत. २:१३). हे असे असू शकते का, ख्रिस्ताच्या वधूचा सदस्य म्हणून, आपल्याला आपल्या पतीच्या परत येण्याची इतकी कमी आतुरता आहे कारण आपण ह्या जगात इतके आरामदायक आहोत ज्याने त्याला वधस्तंभी दिले?

१ योहान ३:२-३ मध्ये, प्रेषित स्पष्ट करतो, *"प्रियजनहो, आपण आता देवाची मुले आहोत; आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रकट झालेले नाही; तरी तो प्रकट होईल तेव्हा आपण त्याच्यासारखे होऊ हे आपल्याला माहित आहे, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल. जो कोणी त्याच्यासंबंधाने ही आशा बाळगतो तो, जसा तो शुद्ध आहे, तसे आपणाला शुद्ध करतो."* आपण त्याच्यासारखे होण्याची इच्छा बाळगतो का? यातना, छळ आणि दु:ख सहन करणे आपल्याला त्या सत्यतेसाठी जागृत करते की आपली आशा या जगात दीर्घायुष्य जगण्याची नाही, पण त्याच्या उपस्थितीत असण्याची आहे. *"ह्या गृहात असताना आम्ही स्वर्गीय गृहरूप वस्त्र परिधान करण्याच्या उत्कंठेने कण्हतो; आम्ही अशा प्रकारे वस्त्र परिधान केलेले असलो म्हणजे आम्ही उघडे सापडणार नाही. कारण जे आम्ही ह्या मंडपात आहोत ते आम्ही भाराक्रांत होऊन कण्हतो; वस्त्र काढून टाकावे अशी आमची इच्छा आहे असे नाही, तर ते परिधान करावे अशी इच्छा बाळगतो; ह्यासाठी की, जे मर्त्य आहे ते जीवनाच्या योगे ग्रासले जावे"* (२ करिंथ. ५:२-४).

**आपल्या जीवनात प्रश्न निर्माण झाले पाहिजेत. प्रश्ने कशाविषयी? आपली आशा.**

## जेव्हा तुमच्या जीवनास प्रश्न मिळतो

पेत्र, एक शिष्य जो ख्रिस्तासोबत त्याच्या सांसारिक सेवाकार्यात संपूर्ण वेळेत सहभागी होता, त्याने प्रारंभीच्या मंडळीला म्हटले, *"तर ख्रिस्ताला 'प्रभू' म्हणून आपल्या अंत:करणात पवित्र माना; आणि तुमच्या ठायी जी आशा आहे तिच्याविषयी विचारपूस करणाऱ्या प्रत्येकाला उत्तर देण्यास नेहमी सिद्ध असा; तरी ते सौम्यतेने व भिडस्तपणाने द्या"* (१ पेत्र. ३:१५). आपल्या जीवनात प्रश्न निर्माण झाले पाहिजेत. प्रश्ने कशाविषयी? आपली आशा. आणि असे प्रश्न हे सहसा अविश्वासू लोकांकडून येतील जेव्हा कठीण समयामध्ये आपण आनंद करतो.

तशा प्रकारची आशा जी सांसारिक समजेच्यापलीकडील असते ती सामान्यपणे तुमच्या लग्नाच्या दिवशी किंवा जेव्हा तुमचे अधिकारी तुम्हांला पदोन्नती देतात तेव्हा दिसत नाही. *"कारण आपण अशी आशा धरून तरलो; जी आशा दृश्य झाली आहे ती आशाच नव्हे, जे दृश्य झाले आहे त्याची आशा कोण धरील?"* (रोम. ८:२४). आशा स्वयं प्रमाण देते जेव्हा पाया तुमच्या जीवनातून पडतो आणि तरीही तुम्हांला उभे राहण्यासाठी पाया असतो. आपण आशेचे प्रदर्शन करण्यासाठी कठीण समयास साधन होऊ देत आहोत का? तुमच्याजवळ काहीतरी आहे का ज्यामध्ये दुखावलेले जग सहभागी होऊ इच्छिते? आपली जीवने प्रश्नांना उत्तेजना देतात का?

२ ऑगस्ट, १५५७ मध्ये, एलिझाबेथ फोल्क्सला पाखंडचा विरोध करण्यासाठी जिवंत जाळण्यात आले. तिचा छळ करणाऱ्यांनी तिला त्या खांबाजवळ नेत असताना तिची निंदा केली आणि तिच्याशी गैरवर्तन केले. मरणासाठी तयार होत असताना, तिने हे शेवटचे शब्द उच्चारले, *"सर्व जगाला शेवटचा निरोप! विश्वासाला निरोप! आशेला निरोप! प्रीतीचे स्वागत!"*[५४] तिने ओळखले की विश्वास आणि आशा ह्या दानाचा उपयोग पृथ्वीवर केला पाहिजे, परंतु एकदा की प्रभूच्या उपस्थितीत जातो, तेव्हा फक्त प्रितीच राहते. हे मग विश्वास आणि आशेच्या सांसारिक-उद्देशाच्या दानांनी आपल्या आयुष्याच्या सभोवती अदृश्य सत्यतेला आपण जगाला दाखवू शकतो. आणि जे जग आपल्याला पाहत आहे त्यांना आशेची ही अदृश्य सत्यता काय प्रकट करते? छळ आणि दुःख.

आशा ही ह्या अपमान करणाऱ्या जगात मोठा आवाज आहे.

असे म्हटले आहे की जेव्हा याकोब-जब्दीचा पुत्र, योहानाचा भाऊ- यास जेव्हा शिरच्छेद करण्यास नेत होते, त्याची जिवंत आशा आणि विश्वासाने रोमन सुरक्षाधिकारी जो त्याच्यासोबत चालत होता त्याच्या मनावर जीवन-परिवर्तन करणारा प्रभाव केला. त्याला प्राणदंड देण्याच्या वेळी, सुरक्षाधिकारी याकोबाच्या शेजारी गुडघ्यावर आला, ख्रिस्ताला त्याचा तारणारा आणि प्रभू म्हणून स्वीकारले. काही क्षणांनंतर, याकोब आणि सुरक्षाधिकारी या दोघांनाही त्याच प्रकारे सार्वकालिकतेमध्ये नेण्यात आले.[५५] इतिहास नोंद करते की येशूच्या बारा शिष्यांपैकी फक्त दोघे सोडून इतर सर्वजण हुतात्मा म्हणून मरण पावले. एक अपवाद हा प्रेषित योहान ज्याला ख्रिस्ताचा अनुयायी होण्याच्या अपराधासाठी तेलात उकळले गेले-आणि तो वाचला.[५६] नंतर योहानाला धरणाऱ्यांनी त्याला भूमध्य बेटात एकाकी असे बंदिवासात टाकले, जेथे प्रभूने त्याला शब्द दिले की पुस्तक लिहावे ज्यास येशू ख्रिस्ताचे प्रकटीकरण म्हणतात. दुसरा जो हुतात्मा झाला नाही तो यहूदा होता, ज्याने मुठभर पैशासाठी येशूचा विश्वासघात केला आणि स्वतः आत्महत्या केली.

शिष्यांनी असा मृत्यू आनंदाने का स्वीकारला? त्यांनी असे केले कारण त्यांनी पुनरुत्थित ख्रिस्ताला पाहिले होते आणि सार्वकालिक जीवनाची त्यांची आशा निश्चित होती. त्यांना ठाऊक होते की मृत्युच्या शक्तीचा पराभव केला आहे.

जेव्हा येशूने पहिल्यांदा आपल्या शिष्यांना पाठवले, त्याने त्यांना चेतावणी दिली होती, *"आणि माझ्या नावामुळे सर्व लोक तुमचा द्वेष करतील; तथापि जो शेवटपर्यंत टिकेल तोच तरेल. जेव्हा एका गावात तुमचा छळ करतील तेव्हा दुसऱ्यात पळून जा"* (मत्तय. १०:२२-२३अ). छळ हा 'जर' चा विषय नव्हता, तर 'केव्हा'.

वधस्तंभावर जाण्यापूर्वी, येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, *"जग जर तुमचा द्वेष करते तर तुमचा द्वेष करण्यापूर्वी त्याने माझाही केला आहे हे तुम्हांला माहित आहे. तुम्ही जगाचे असता तर जगाने स्वकीयांवर प्रेम केले असते; परंतु तुम्ही जगाचे नाही. मी तुम्हांला जगातून निवडले आहे, म्हणून जग तुमचा द्वेष करते. 'दास धन्यापेक्षा मोठा नाही' हे जे वचन मी तुम्हांला सांगितले आहे त्याची आठवण करा. ते माझ्या पाठीस लागले तर तुमच्याही पाठीस लागतील"* (योहान १५:१८-२०अ).

काय होईल जर तुमचा सर्वात मोठा आशीर्वाद हा छळापासून येतो? काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. येशूचे अनुयायी होण्याचा परिणाम म्हणून तुम्ही तुमच्या जीवनात छळाला कसे तोंड दिले आहे? ह्यामुळे तुमच्या जीवनात कोणते आशीर्वाद आणले आहे?

२. काही गोष्टींची नावे द्या जी छळामुळे मिळणाऱ्या आशीर्वादांना अडथळा करू शकतात?

३. देव स्वतःला (त्याचे चरित्र) तुमच्या दुःखात कसे प्रकट करत आहे?

# भाग ४

# "...मला

अनुसरावे”.

# २३

# जेव्हा ख्रिस्तच घर होतो

मला आश्चर्यचकित होण्यास आवडते. माझ्या सर्वात स्मरणीय वाढदिवसाच्या पार्ट्या ह्या त्या आहेत ज्यांचे आयोजन करण्यात माझा काहीही सहभाग नसतो. मला आनंद होतो जेव्हा पाहुण्यांची यादी, भोजन वस्तूंची यादी, आणि कार्यांचे माझ्याशिवाय आयोजन केले जाते -जेव्हा कुटुंब किंवा मित्र जे मला प्रेम करतात सावधानीपूर्वक बारकाईने प्रत्येक काम योग्यरीत्या पूर्ण करतात आणि फक्त मला त्या उत्सवासाठी आमंत्रित करतात. अशा पार्टीचे सौंदर्य केवळ त्या कार्यक्रमातच नसते. त्यात आश्चर्यचकित करण्याचा विचार आणि हेतू आहेत, जे प्रेमाची खरी भावना व्यक्त करतात!

एवढेच, अशा पुष्कळ *"आश्चर्यचकित"* करणाऱ्या पार्ट्या अगोदर, मला माहित असायचे की काहीतरी घडत आहे. मला ते कोठे, केव्हा किंवा कसे घडत आहे हे माहित नसायचे, परंतु कारण की मला माहित असायचे की काही व्यक्ती ती योजना करत आहेत, मला माहित असायचे की होणारा उत्सव हा मोठा असेल. मी प्रत्येक पार्टीचा आनंद घेत व आत्मविश्वासाने प्रतीक्षा करत असे, कारण त्या कार्यक्रमांना आयोजित करणाऱ्या व्यक्तींमध्ये मला विश्वास होता.

या उलट, मी कुमार व्यक्तीची पार्टी किंवा सामाजिक कार्यक्रमांना हजर राहिलेलो आहे ज्यामध्ये ज्यांचा सन्मान केला जाणार आहे ते निश्चित केले जात असे, *"आम्हांला काही आश्चर्य नको"*. असे विधान नियोजनकर्त्यांवरील विश्वासाचा अभाव, नियंत्रण ठेवण्याची इच्छा किंवा दोन्हीही दर्शवू शकते.

ख्रिस्ताचे धाडसी आमंत्रण ऐकल्यावर शिष्य स्वतःला ह्या दोन दृष्टीकोनांमध्ये कुठेतरी पाहतात. मत्तय. १६:२४ मध्ये, येशू प्रवासाचे सविस्तर वर्णन सांगत नाही. वास्तवात,

बोलावण्याच्या वैशिष्ट्यांवर तो जाणीवपूर्वक मुखवटा घालत असे आणि ह्या बोलावण्याचा निष्कर्ष *"माझ्या मागे या"* या एका साध्या आमंत्रणाने करत होता.

आपल्याला एखाद्या योजनांच्या स्थापित गोष्टींसाठी, एका निश्चित स्थानी, किंवा काहीतरी नवीन अविष्कार करायचे आहे यासाठी बोलावलेले नाही. आपल्याला त्याच्याकडे बोलावलेले आहे. तो आपले स्वप्न होतो. तो आपली योजना होतो. तो आपले स्थान होतो. तो आपले लक्ष्य होतो. आपण हे समजले का? सत्यता? सुरुवातीपासून शेवटपर्यंत, एकच महान ध्येय-ख्रिस्ताला ओळखणे.

दावीदाच्या मनात ही एक मोठी इच्छा होती : *"परमेश्वराजवळ मी एक वरदान मागितले, त्याच्या प्राप्तीसाठी मी झटेन; ते हे की, आयुष्यभर परमेश्वराच्या घरात माझी वस्ती व्हावी; म्हणजे मी परमेश्वराचे मनोहर रूप पाहत राहीन"* (स्तोत्र. २७:४).

ख्रिस्ताच्या चरणाजवळ बसण्यासाठी जीवनाच्या धावपळीतून बाहेर पडावे याच एका गोष्टीची मरीयेला आस होती. म्हणूनच, येशूने म्हटले, *"परंतु थोडक्याच गोष्टींचे, किंबहुना एकाच गोष्टीचे अगत्य आहे; मरीयेने चांगला वाटा निवडून घेतला आहे, तो तिच्यापासून काढून घेतला जाणार नाही"* (लूक. १०:४२).

पौल, जरी पुष्कळ कामे करणारा व्यक्ती होता, तरी त्याने ह्या विधानाने त्याच्या जीवनाचा सारांश दिला : *"बंधूंनो, मी अद्यापि ते आपल्या कह्यात घेतले असे मानत नाही; तर मागील गोष्टींकडे दुर्लक्ष करून व पुढील गोष्टींकडे लक्ष लावून, ख्रिस्त येशूच्या ठायी देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचे बक्षीस मिळवण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे मी धावतो; हेच एक माझे काम"* (फिलिप्पै. ३:१३-१४).

एकाच गोष्टीने दावीद, मरीया आणि पौलाचे जीवन परिभाषित केले. त्याला ओळखणे.

**सुवार्ता आपल्याला त्याला ओळखण्यासाठी आमंत्रण देते-केवळ त्याच्याविषयी आणखी जाणून घेण्यासाठी नाही.**

जर ख्रिस्त अधिक सविस्तर धार्मिक प्रथा परिचित करून देतो आणि त्याचे पालन करण्यास शिकवतो, तर आपले लक्ष त्याच्या मार्गानुसार चालण्याकडे न जाता, त्याच्या क्रोधाला घाबरण्याकडे वळेल. अशा परिस्थितीत त्याच शब्दांनी आपल्याला नियमशास्त्राकडे नेले असते, त्याच्या प्रीतीकडे नाही. जर ख्रिस्ताचे जीवन आपल्याला अनुकरण करण्यासाठी केवळ एक आदर्श असेल, तर ते आपल्याला दोषी ठरवेल कारण आपण सर्व जण पतित आहोत. परंतु हेच शुभवर्तमान

आहे. सुवार्ता आपल्याला त्याला ओळखण्यासाठी आमंत्रण देते-केवळ त्याच्याविषयी आणखी जाणून घेण्यासाठी नाही.

‘द फिडल ऑन द रुफ’ या संगीतमय चित्रपटात, शेवटी, एक शक्तिशाली दृश्य आहे ज्यामध्ये मुख्य चरित्र टेवी त्याची मुलगी होडेल सोबत रेल्वेस्टेशनवर वाट पाहत आहे, जी तिच्या जोडीदाराला भेटण्यासाठी जाणार आहे, जो सैबेरियाच्या वेस्टलैंडमध्ये राजनीतिक कैदी आहे. तेथे रेल्वेस्टेशनवर, हे जाणून की ती तिच्या वडिलांकडे परत कधीही येणार नाही, ती त्याला तिच्या भावना गीतातून व्यक्त करते :

मी तुला समजावून सांगण्यासाठी कशी अपेक्षा करू शकते,
मी जे करत आहे ते मी का करत आहे?
मी दूर देशी का जात आहे,
ज्या घरावर माझे प्रेम आहे त्यापासून फार दूर.

कधीकाळी मी येथे आनंदाने संतुष्ट असे,
जसे मी होते, जेथे मी होते,
त्या लोकांच्याजवळ जे माझ्या जवळ आहेत,
येथे घरात ज्यावर मी प्रेम करते.

**कोण हे पाहू शकतो की एक माणूस येईल,**
**कोण माझ्या स्वप्नांचे आकार बदलेल?**

आता असहाय्य, मी त्याच्याबरोबर उभी आहे,
जुनी स्वप्ने धूसर होताना पाहत,
ओह, किती उदासीन निवड आहे ही,
घर पाहिजे, तो हवा...
त्याच्याशिवाय इतर सर्व आशेसाठी माझे हृदय बंद करत आहे,
ज्या घराला मी प्रेम करते ते सोडत आहे.

तेथे जेथे माझे हृदय फार पूर्वी स्थिर झालेले आहे,
मला गेले पाहिजे, मला गेले पाहिजे.
मी माझ्या आवडत्या घरापासून दूर भटकत जाईल
याची कोण कल्पना करू शकेल?
ज्या घरावर मी प्रेम करते त्याच्यापासून फार दूर.

**तरीही, माझ्या प्रियकरासोबत, मी घरी आहे.**[५७]

मी जवळजवळ कल्पना करू शकत होतो की याकोब किंवा योहान गालील समुद्राच्या तटाजवळ, त्यांचा पिता जब्दी याच्यासाठी मोठ्या, घोगऱ्या आवाजात हे शब्द गात होते जेव्हा ते ख्रिस्ताचे अनुयायी होण्यासाठी त्याला सोडून जात होते. हे शब्द पुन्हा वाचा, पण ह्यावेळी ख्रिस्ताच्या संबंधात, जो आपला नवरा आहे. आपल्याला एक नवीन घर आहे आणि ते घर जेथे तो आहे. त्याहूनही उत्तम, तो आपले घर आहे. स्टीव ग्रीन हे अशाप्रमाणे लिहितात : *"मी जाईन आणि हा प्रवास माझे घर होवो, मी केवळ तुझ्यासाठी जगेन, मी जाईन कारण हे जीवन माझ्या स्वतःचे नाही, मी जाईन."*[५८]

हे प्रत्यक्षात कसे घडते? देवासोबत कोणता आत्मविश्वास निर्माण होतो जे आपण पाहू शकत नाही? येशू सोबत अशा मार्गाने चालण्याची व्यवहारिक सत्यता काय आहे ज्यामध्ये आपण *"तो व त्याच्या पुनरुत्थानाचे सामर्थ्य व त्याच्या दु:खाची सहभागिता ह्यांची, त्याच्या मरणाला अनुरूप होऊन मी ओळख करून घ्यावी"* (फिलिप्पै. ३:१०).

सर्व काही प्रेमात पडण्यापासून सुरू होते.

मध्य पूर्वेत राहत असताना, मी एका गृहस्थाला भेटलो ज्याने प्रभूच्या नावाकरता खूप दु:ख सोसले होते. तो मुस्लीम धर्मातून ख्रिस्ताकडे आला होता आणि त्याच्या विश्वासासाठी अनेक वेळा त्याला अटक झाली होती. तुरुंगातील सुरक्षाधिकाऱ्याने त्याला हिंसक गुन्ह्यांसाठी राखीव अशा सार्वजनिक खोलीत ठेवले आणि इतर कैद्यांना देखील सांगितले, *"तुम्हांला त्याच्याबरोबर जे वाटेल ते करा. त्याने इस्लाम धर्माला सोडले आहे."* वेळोवेळी, ते त्याला प्रश्न विचारण्यास आणि छळण्यास बाहेर आणत असे, उघडपणे त्याला सांगत होते, *"जर तू येशू ख्रिस्तावरील तुझ्या विश्वासाचा त्याग केला, तर आजच तुला सोडले जाईल."*

**आपल्याला एक नवीन घर आहे आणि ते घर जेथे तो आहे. त्याहूनही उत्तम, तो आपले घर आहे.**

चौकशीच्या त्यांच्या आवडत्या पद्धतींपैकी एक हे त्याचे हात बांधून त्याला लटकवणे होते म्हणजे त्याचे शरीर हलत राहील. त्याला छळणारे त्याला फटके मारत असत, त्याला वारंवार आठवण करून देत असत की त्याला मुक्त केले जाऊ शकते, जर तो येशूला सोडून देईल. असे काही दिवस होत गेले, एके दिवशी, देवाच्या आत्म्याने आवश्यक उत्तर त्याला दिले. त्याने सुरक्षाधिकाऱ्याला म्हटले, *"मला काय झाले आहे हे तुला समजत नाही. देवाची प्रीती ही कोळ्याच्या जाळ्यासारखी आहे आणि मी एक किडा आहे. मी देवाच्या प्रीतीच्या जाळ्यात अडकलो आहे आणि प्रत्येक वेळी मी हलतो आणि त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा मी त्यात आणखी अडकत जातो. मी आता त्याच्या प्रीतीत कायमचा*

*अडकलेलो आहे. म्हणून मला सतत फटके मारण्याची मोकळीक घ्या आणि माझ्या त्वचेवर तुमच्या सिगारेटचे चटके देत राहा, पण मी येशू ख्रिस्ताचे नाव सोडून देऊ शकत नाही.”*

माझ्या मित्राचे त्याचा छळ करणाऱ्यांना प्रेरणा देणारे उत्तर हे एक कविता जिचे शीर्षक ‘अक्दामुत मिलन’ आहे त्यात प्रतिध्वनित होते, जी इसविसन १०५० मध्ये रब्बी मीर बेन इसहाक ने इब्री भाषेत लिहिली आहे. जी कविता फ्रेडरिक एम. लेहमन यांना तुरुंगाच्या खोलीच्या भिंतीवर कोरलेली मिळाल्यावर या कवितेला नंतर त्यांनी गीतामध्ये रूपांतरीत केले.

> आपण शाईने समुद्र भरू शकतो का, आणि चर्मपत्रांचे आकाश बनले होते का,
> पृथ्वीवरील प्रत्येक देठाकडे एक काटा होता आणि प्रत्येक माणूस व्यवसायाने एक लेखनिक होता,
> देवाची प्रीती वर लिहिणे समुद्राला कोरडे करू शकते,
> आकाशापासून आकाशापर्यंत पसरलेले असले तरी त्या गुंडाळीत संपूर्ण पुस्तक सामावले जाऊ शकत नव्हते.[५९]

ही ती प्रीती आहे जी आपल्याला प्रेरणा देते,
ही ती प्रीती आहे जी आपल्याला घरी आणते.
ही ती प्रीती आहे जे आपले घर आहे.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. तुमच्या स्वतःच्या जीवनावर मनन करा. ख्रिस्ताचे अनुयायी होण्यात तुमच्या निवडीत तुम्ही कोणताही अपवादित कलम जोडला आहे का? स्पष्टीकरण द्या.

२. त्याच्यासोबत तुमच्या संबंधाविषयी त्याच्या योजनेत आत्मविश्वासाची कमतरता तुमच्यासाठी काय प्रकट करते?

३. ख्रिस्ताने तुमच्या स्वप्नांना कसा आकार दिला आहे?

# २४

# अनुसरण करण्यास शिकावे

ख्रिस्ताचे अनुयायी होण्याच्या परिणामावर विचार करताना, मला असे वाटले की ही एक चांगली कल्पना असेन की *"अनुसरण"* करणे ह्या शब्दाविषयी थोडे आणखी जाणून घेऊ या. ह्या शब्दाचा अर्थ *"कोणाच्या मागे जाणे,"* असू शकते, पण त्याचा अर्थ *"कोणावर किंवा कशावर तरी घनिष्ट नजर ठेवणे"* देखील असू शकते. हे आपल्याला आजच्या जगात सहज पाहायला मिळते. नाहीतरी, जर मी तुझे ट्वीट्स किंवा स्नैप्स पाहिले, तर हे दर्शवते की तुझ्या जीवनात काय घडत आहे हे मला समजून घ्यायचे आहे. पण, व्यवहारिकपणे बोलले तर, ख्रिस्ताचे सक्रीय होऊन अनुयायी होणे हे कसे वाटते?

### येशूचे अनुयायी होण्याचे पहिले तत्व

जेव्हा आपण येशूचे अनुसरण करण्यास सुरू करतो, एक गोष्ट जी आपण समजली पाहिजे. तो गती स्थापित करतो.

कठीण काम, खर्च करणे आणि खर्च करवून घेणे चांगले असू शकते, पण केवळ व्यस्ततेला आध्यात्मिक ठेवा म्हणून पाहण्यापासून सावधान राहावे. देव आपल्याला व्यस्त राहण्यास बोलावत नाही, परंतु पवित्र होण्यासाठी बोलवतो. येशू आपल्या जीवनात जी गती स्थापित करतो तिचा हेतू जगाच्या दृष्टीत प्रभावी होणे नाही, परंतु आपल्या तारणाऱ्याच्या दृष्टीत घनिष्ट असणे आहे.

**दररोजचे आज्ञापालन एखाद्याला दैवी संधीसाठी तयार करते.**

दररोजचे आज्ञापालन एखाद्याला दैवी संधीसाठी तयार करते. नोहाने जलप्रलयात पृथ्वीवर तरंगत जाण्याआधी आज्ञाधारकपणात कोरड्या भूमीवर जहाज बनवले. अब्राहाम एका राष्ट्राचा जनक होण्यापूर्वी विश्वासुपणे

तंबूत राहत होता. योसेफ एखाद्या शक्तिशाली अधिकारीचा सल्ला घेण्यापूर्वी नम्रपणे कैद्यांना सल्ला देत होता. मोशे फारो समोर उभा राहण्यापूर्वी मेंढरांचे पालनपोषण करताना आढळला. दाविदाने मुकुट घालण्यापूर्वी गीते लिहिली. अलीशा एक संदेष्टा म्हणून पदोन्नती प्राप्त करण्यापूर्वी शेत नांगरत होता. दानीएलाने राजाकडून प्रशंसा प्राप्त करण्यापूर्वी तडजोडीचा प्रतिकार केला. देव तुमच्या प्रेक्षकांच्या संख्येकडे पाहत नाही, पण सर्वशक्तिमान प्रति तुमच्या सेवेला पाहतो.

वर्षांपूर्वी, मी एका प्रचारकाला BUSY साठी परीवणी शब्द देताना ऐकले : Being Under Satan’s Yoke- सैतानाच्या ओझ्याखाली असणे. सुरुवातीला मी जरासा नाराज झालो आणि त्यावर विचार करणे सोडून दिले, पण मग पवित्र आत्म्याने माझ्या हृदयावर सत्याचा भार टाकला. व्यस्ततेबद्दल त्याच्या टिप्पणी प्रति माझी सुरुवातीची चिडचिड ही माझ्या जीवनशैलीमुळे होती. मी देवासाठी व्यस्ततेला देवाबरोबर घनिष्टतेत अदलाबदल केले होते. मी नाट्यमय संधीसाठी दैनंदिन आज्ञापालन करण्यात अदलाबदल केली होती. दु:खदपणे, मी हे आजही करतो. त्याच्यासाठी काही गोष्टी करण्यापेक्षा त्याला अधिक ओळखावे अशी त्याची इच्छा आहे. आपल्या द्वारे त्याचे काम व्हावे यापेक्षा आपल्यात त्याचे काम व्हावे याकडे त्याचे अधिक लक्ष आहे.

तर मग हे कसे घडते?

आपण त्याच्या गतीमध्ये कसे स्थापित होऊ शकतो?

हे मग येथेच आध्यात्मिक शिस्त ही ख्रिस्ताच्या अनुयायामध्ये महत्वाची होती.

## येशू कडून एक शिकवण

जेव्हा ख्रिस्त देहधारी झाला आणि आपल्यामध्ये चालला, तेव्हा त्याच्या शिष्यांनी त्याला प्रचार करणे, भाकरी बहुगुणीत करणे किंवा वधस्तंभ उचलण्यासाठी कधीही विचारले नाही. ख्रिस्ताच्या जीवनाच्या एक पैलूवर त्यांनी लक्ष दिले आणि त्यास पूर्णपणे जाणण्याची इच्छा केली ते त्याचे प्रार्थनेचे जीवन होते. *“प्रभू, आम्हांला प्रार्थना करण्यास शिकव”* (लूक. ११:१).

येशू कदाचित काहीवेळा आपल्याला अप्रभावी वाटतो. जगिक दृष्टीकोनातून अप्रभाविपणासाठी यापेक्षा कोणतेही मोठे उदाहरण नाही. *“परंतु तू जेव्हा जेव्हा प्रार्थना करतोस तेव्हा तेव्हा ‘आपल्या खोलीत जा व दार लावून घेऊन’ आपल्या गुप्तवासी पित्याची ‘प्रार्थना कर’ म्हणजे तुझा गुप्तदर्शी पिता तुला उघडपणे तिचे फळ देईल”* (मत्तय. ६:६).

तुम्हांला समजले का? जा, कोणीही जवळ नसताना स्वतःला खोलीत बंद करा, आणि ज्याला तुम्ही पाहू शकत नाही त्याशी बोला. विश्वासहीन जगाच्या दृष्टीत यापेक्षा काहीही अधिक हास्यास्पद आहे का? आणि तरीही, प्रेमळ देवाच्या दृष्टीत विश्वासाचे असे स्पष्ट प्रदर्शन आहे का?

देव तुमची इच्छा करतो. त्याची इच्छा आहे की तुम्ही त्याच्यासोबत चांगला वेळ व्यतीत करावा-भांडे धुताना किंवा दाढी करताना किंवा अंघोळ करताना किंवा तुमच्या कामाच्या प्रवासात त्याच्याशी संभाषण करण्याद्वारे अनेक कामे (ह्यासारखे चांगल्या कामाने) केवळ करताना नाही. आपला स्वर्गातील पिता व्यत्ययरहित, *"बंद खोलीत"* त्याच्यासोबत चांगला वेळ व्यतीत करण्याची इच्छा करतो. तुम्हाला दिलेल्या वेळाची किंमत आपण समजून घ्यावी. पृथ्वीवरील कार्यक्षमतेच्या बाबतीत, देवासोबत घनिष्ठता ही गैरसोयीची आहे. ती तुमच्या जीवनात सोयीची होईल अशी अपेक्षा करू नका. त्याचा पाठपुरावा करणे इतर सर्वकाही बदलून टाकेल. ज्याला देवाच्या उपस्थितीत निवास करण्याची इच्छा आहे त्याने त्याची वाणी ऐकण्याची वाट पाहण्यासाठी या जगाची गती, योजना, व्यक्ती आणि गोंधळापासून दूर जाण्यास तयार असले पाहिजे.

जेव्हा येशू स्वतःचा नकार करण्याबद्दल बोलतो, मी हा विचार केल्यावाचून राहू शकत नाही की प्रार्थना ही त्याचे वचन दररोज लागू करण्याचा एक प्राथमिक मार्ग आहे. एकदा हे शिकलात, तर त्याच्यासोबत घालवलेला वेळ तुमच्या घरी जाण्याच्या प्रवासातील सर्वात मधूर घटकांपैकी एक बनेल.

## प्रार्थनेचे परिणाम

प्रार्थनेची खोली हे एक *"धोकादायक"* स्थान आहे कारण हे ते स्थान आहे जेथे देव आपल्या सांसारिक विचारांना त्याच्या सार्वकालिक दृष्टीकोनाने बदलतो. आपल्या जगाच्या आवश्यकतांनी भारावून जाणे हे सोपे आहे, पण आपल्याला आवश्यकतांचे अनुसरण करण्यास बोलावलेले नाही, तर आपले प्रथम पाचारण हे त्याचे अनुसरण करणे आहे.

**प्रार्थनेची खोली हे एक "धोकादायक" स्थान आहे कारण हे ते स्थान आहे जेथे देव आपल्या सांसारिक विचारांना त्याच्या सार्वकालिक दृष्टीकोनाने बदलतो.**

मत्तय. ९:३७ मध्ये येशू त्याच्या शिष्यांना सांगतो, *"पीक फार आहे खरे, पण कामकरी थोडे आहेत."* जर मी हे येशूच्या मुखातून ऐकले आहे, तर माझे प्रथम उत्तर हे, *"चला*

*आपण जाऊ"* असे असेल. परंतु शक्यता आहे, मी चुकीची दिशा निवडेल. का? कारण त्याचे पुढील वाक्य प्रथम *"गंतव्यस्थान' प्रकट करते ज्याची तो इच्छा करतो.* ***"ह्यास्तव*** पिकाच्या धन्याने आपल्या कापणीस कामकरी पाठवून द्यावेत म्हणून त्याची ***प्रार्थना करा"*** (मत्तय. ९:३८). ख्रिस्ताचे अनुयायी होण्यात पहिली पायरी ही प्रार्थनेच्या खोलीत जाणे आहे. थोड्या वचनांनंतर, तो अवश्य त्याच्या शिष्यांना जगात पाठवतो, परंतु, प्रथम, तो त्यांना त्याच्याजवळ बोलावतो (मत्तय. १०:१, ५).

जेव्हा देवाने उत्तर आफ्रिकेतील नायजेर गावाचा माझ्या मनात भार टाकला, तेव्हा मी न्यूजर्सी येथील माझ्या काही कॉलेजच्या मित्रांना बोलावले की स्थानीय हॉटेलमध्ये माझ्याबरोबर सकाळची न्याहरी करण्यासाठी यावे. ऑपरेशन जगतचा हातात नकाशा आणि काही इतर साधने टेबलावर होती. मी ह्या तरुण पुरुषांना विचारले की जेथे सुवार्ता अजून पोहोचलेली नाही असा देशासाठी माझ्याबरोबर प्रार्थना करण्यास ते तयार आहेत का.

प्रार्थना करीत काही आठवडे गेल्यानंतर, आम्हांला हा विश्वास झाला की काहीतरी चुकत आहे.

माझ्या मित्रांना पुन्हा भेटल्यावर, मी कबूल केले की जरी नायजेरला माझ्या प्रार्थनेच्या यादीत होते, तरी ह्या भागासाठी प्रार्थना करण्याने माझ्या जीवनशैलीत काहीही बदल झाला नाही. आम्हांला समजले की पहिली गोष्ट जी बदलण्याची गरज आहे ते आपले हृदय आहे, म्हणून आम्ही स्वतःला २४ तासांसाठी खोलीत बंदिस्त करून इतर काही व्यक्तींसोबत प्रार्थना आणि उपास करणार आहोत. आम्ही तो कोण आहे, त्याचे गौरव आणि नायजेरसाठी त्याचे हृदय याबाबत देवाला आग्रहाने विचारले, माझे मुख त्या खोलीच्या कारपेटच्या दिशेने मग्न होते, आत्म्यांसाठी अनियंत्रितपणे रडत होतो ज्यांना मी पूर्वी कधीही भेटलेलो नव्हतो किंवा त्यांच्याबद्दल पूर्वी कधी काळजी केली नव्हती.

मला आठवते पहिल्यांदाच मी एयर फ्रांस मधून जेव्हा नायजेरच्या सूर्यप्रकाशात प्रवेश केला. मी विमानतळाच्या डांबरी धावपट्टीवर नायजेरच्या सेनेच्या सदस्याला पाहिले आणि ओळखले की देवाने ह्या लोकांसाठी माझ्या मनात प्रीती भरली आहे. हे विचित्र प्रेम होते- मी ओळखले की देवाने माझ्या मनाला तयार केले होते की त्या लोकांना प्रेम करावे जे मला कधीही ठाऊक नव्हते.

**सामान्य संपर्क हा त्याची मदत मागण्याऐवजी त्याचा शोध घेणे होता.**

नायजेरच्या प्रवासात प्रार्थनेच्या पुष्कळ भागांचा समावेश आहे. पूर्ण रात्र प्रार्थना सहा वर्षांच्या लेकरांपासून तर सकाळपर्यंत माझ्या मोठ्या भावाचा

फोन येऊ पर्यंत हे सर्व आमच्याबरोबर प्रार्थना करत होते, माझा भाऊ सहारा येथील आत्म्यांसाठी प्रार्थना करण्यास विनंती करत होता, हा प्रार्थना करण्याचा प्रवास पायांवर उभे असताना सुरू झाला नाही, तर आम्ही गुडघ्यावर आलो होतो. सामान्य संपर्क हा त्याची मदत मागण्याऐवजी त्याचा शोध घेणे होता. त्याचे अनुसरण करण्यास बोलावलेल्या लोकांमध्ये आम्ही प्रथम होतो. तो आम्हांला मनुष्यांना धरणारे करणार होता.

परंतु सावधान. त्याच्या उपस्थितीत राहण्याने मिळणाऱ्या शक्तीला कमी लेखणे सोपे आहे.

## बाळ ज्यांनी माझे जीवन बदलले

माझे वय एकोणीस होते.

मध्ये पूर्वेत सहा महिन्यांच्या अभ्यासाच्या सत्रासाठी पोहचल्यावर, लवकरच मिसर, कैरो येथे कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर मदर तेरेसा यांनी सुरू केलेले लेकरांचे घर या ठिकाणी आठवड्यातून तीन दिवस स्वयंसेवक या नात्याने सेवा करण्याची मला संधी मिळाली. तेथील परिचारिका जे त्या घराचे देखरेख करत होते त्यांनी सहा बाळांची काळजी घेण्यासाठी माझ्याकडे सोपवले, त्यामध्ये पाच मुली व एक मुलगा होता. ही माझी बालके होती.

लेकरांच्या ह्या घरात बाटल्या, ढेकर देणे, शांत करणे, डायपर बदलणे, गाणी गाणे, खेळणे आणि बाळांना झोपवणे या कामामध्ये माझे जीवन व्यस्त होते. यातील माझी दोन आवडती बालके ही जुळया बहिणी होत्या त्यांचे नांव मेर्ना आणि जैक्लीन होते. त्या सुंदरी आनंदाचे मूर्तिमंत रूप होत्या. त्यांचे लहान चेहरे खरेच अलौकिक आनंदाने उजळून दिसत असत.

कैरोमध्ये काही महिने हे काम केल्यावर, मला कळले की मेर्ना आणि जैक्लीन हे आता त्या लेकरांच्या घरात नाहीत. जरी मला ठाऊक होते की हे चांगले होते की ते आता चांगले मोठे झाले होते की कोणत्याही विशेष काळजीवाचून ते जगू शकत होते आणि ते कदाचित त्यांच्या जैविक पालकांकडे परत जाऊ शकतात, तरीही मला दु:ख झाले. मला त्यांची अनुपस्थिती खूपच जाणवली. माझ्या डोळयात अश्रूसह, आता रिकामी असलेल्या त्यांच्या पाळण्याजवळ त्या अनाथ आश्रमच्या थंड फरशीवर गुडघ्यावर येऊन मी रडत आणि प्रार्थना करीत असे.

माझ्या प्रार्थना साध्या होत्या. *"देवा, माझ्या मुलींची काळजी घे. कोणालातरी त्यांच्या जीवनात आण जे त्यांना प्रेम करतील आणि कोणीतरी येशूची प्रीती त्यांना सांगतील."* एवढेच मी म्हणत असे.

मला अशा प्रार्थनेच्या शक्तीच्या सामर्थ्याबद्दल खूपच कमी माहिती होती.

मला आठवते ते अभ्यासाचे सहामाही सत्र संपवून माझे विमान कैरो विमानतळावरून उड्डाण करत होते. विमान उड्डाण करत असताना अश्रू माझ्या चेहऱ्यावर वाहत होते आणि विमानातील परिचारिकेने ते पुसण्यासाठी एक रुमाल दिला. त्या रुमालावर, मी पाच मिनिटातच हे शब्द लिहिले-जसे काही ते आधीच माझ्या हृदयात होते.

रिकामी पाळणे रडत आहे, माझ्या हृदयात मोठी पोकळी करून जात आहे,
बाळाला कोठे निवास मिळाला आहे आणि ते तेथून कधीही जाऊ नयेत.
अशी लहान आत्मे जी मला अति प्रिय होती त्यांना सोडून मी सहज कसा जाऊ शकतो?
मी माझ्या स्वर्गीय पित्यावर भरवसा ठेवू शकतो की त्यांचे प्रत्येक अश्रू पुसावे?
प्रभू, तुझ्या खजिन्याबरोबर काही दिवस आणि काही क्षण देण्यासाठी तुझे आभार,
आणि पुष्कळ धडे जे मी शिकलो जे फक्त सार्वकालिकता त्याचा ठाव घेऊ शकते,
आणि मी ह्या जीवनात जर माझ्या बाळांची झलक पुन्हा कधीही पाहणार नसलो,
तर माझ्या अंत:करणापासून, प्रभू, मी तुला एवढेच बोलू शकतो, *“पुन्हा एकदा आभार!”*

अमेरिकेत परत आल्यावर, माझ्या खोलीच्या दरवाजावर त्या मुलींचे चित्र लावले होते आणि मी विद्यापीठाचे शिक्षण पूर्ण करत होतो. त्या दोन मुलींसाठी माझी प्रार्थना ही नेहमी तीच होती.

दोन वर्षानंतर, विद्यापीठाची डिग्री हातात होती, मी लेबनानला जाण्यासाठी सुट्टी घेतली किंवा तसा मी विचार केला होता. देवाकडे दुसरीच योजना होती. युद्ध, लॉजिस्टिक समस्या, आणि दैवी मार्गदर्शनाने मला अनपेक्षितपणे पुन्हा कैरोमध्ये आणले. दावीद राजासह, मी हे जाणले होते, *“कारण पुष्कळांच्या तोंडून माझी बेअब्रू झालेली मी ऐकली आहे; पाहावे तिकडे भयच भय! माझ्याविरुद्ध मनसुबा करून त्यांनी माझा जीव घेण्याची योजना केली. हे परमेश्वरा, मी तर तुझ्यावर भाव ठेवला आहे; मी म्हणतो, ‘तूच माझा देव आहेस”* (स्तोत्र. ३१:१३-१४). माझ्या योजना ह्या बदलल्या आहेत हे जाणले परंतु देवाच्या योजना बदलल्या नव्हत्या, मी रस्त्यावरील लेकरे, शरणार्थी आणि आंतरराष्ट्रीय तरुणांसोबत काम करू लागलो.

डिसेंबर २००६च्या एका दिवशी, मी शेजारच्या एका विशेष रस्त्यावरून जाण्याचा निर्णय केला. काही लहान मुलांच्या गटांकडून जात असताना, मी एका दहा वर्षाच्या मुलीला मला हाक मारताना ऐकले, *“पार्लेझ-वाउस फ्रांचाईस?”* मिसर देश हा अरबी भाषा बोलणारा देश आहे, म्हणून हे असामान्य होते की ती फ्रेंच भाषेत बोलत होती. बालपणापासून फ्रेंच

**तुम्ही कशासाठी प्रार्थना करता त्याबद्दल सावधानी राहा, देव कदाचित तुम्हाला तुमच्या स्वतःच्या प्रार्थनेचे उत्तर होण्यासाठी तयार करत असतो.**

बोलणारा असल्यामुळे, मी तिला उत्तर देऊ शकलो, आणि एक मित्रता निर्माण झाली. तिचे नाव लोब्ना होते. तिच्या पालकांबद्दल जाणल्यानंतर आणि हे जाणून की लेकरे फ्रेंच भाषेत शिकली आहेत, मी त्या लेकरांना, त्यांच्या चुलत भावांना आणि त्यांच्या चुलत्यांच्या चुलत भावांना शिकवू लागलो.

काही महिने पुढे जाऊ या.

माझे फ्रेंच विद्यार्थी आणि मी लोब्नाच्या घरात एक मोडकळलेल्या प्लास्टिक टेबलभोवती बसलो होतो, भूतकाळातील फ्रेंच क्रियापदांचे संयुग्मन करत होतो. आमच्याभोवती कचऱ्यांचे ढिगारे होते आणि अधूनमधून एक कोंबडी डोक्यावर फडफडत होती. मग हे घडले.

दोन लहान मुली माझ्या जीवनात आल्या. पुन्हा.

त्या अनवाणी होत्या, कचऱ्याच्या ढिगाऱ्यात खेळल्यामुळे पायापासून डोक्यापर्यंत धुळीने भरलेल्या होत्या. त्यांचे कपडे थोडेसे विस्कळीत झालेले, त्यांचे केस सुंदररित्या बांधलेले. त्यांना पाहत, त्या दोन लहान मुलींच्या डोळ्याच्या झलककडे माझे लक्ष वेधले गेले जे आमच्या वर्गात भटकत आले होते. मी शिकवणे थांबवले. ते डोळे परिचयाचे आहे हे जाणून, मी त्या दोन लहान मुलींबद्दल लोब्नाला विचारले. ती माझ्या प्रश्नाकडे विशेष लक्ष न देत म्हणाली, *"त्या माझ्या लहान बहिणी आहेत."* मी म्हणालो, नाही. त्यांची नांवे काय आहेत?" *लोब्ना बोलली,* "जैक्लीन आणि मेर्ना."

ताबडतोब, मी आश्चर्यचकित झालो होतो.

एक शहर जेथे वीस दशलक्षच्यावर निवासी आहेत, एका राष्ट्रात जेथे मी पुन्हा कधीही राहायला येणार नाही अशी योजना केली होती, देवाने केवळ मेर्ना आणि जैक्लीनला माझ्या जीवनात परत आणले नव्हते, तर त्याने मला त्यांच्या घरातच आणले होते, जणू काय सतत मी त्यांच्याकडे जाऊ शकत होतो. देवाने माझ्या स्वतःच्या प्रार्थनेचे उत्तर दिले होते. आज, त्या दोघांना माहित आहे की त्यांना प्रेम केले जाते. आणि-मी हे बोलत रोमांचित झालो आहे-ते दोघेही येशूला प्रेम करतात.

तुम्ही कशासाठी प्रार्थना करता त्याबद्दल सावधानी राहा- कारण देव कदाचित तुम्हाला तुमच्या स्वतःच्या प्रार्थनेचे उत्तर होण्यासाठी तयार करत असतो.

## ख्रिस्ती लोकांना हा शब्द टाळायला आवडतो

ह्या लहान पुस्तकात या पुढील भागाचा समावेश करण्यास मी बिचकत होतो, पण मी विश्वास ठेवतो की या विषयात महत्व आणि समर्थता आढळते जी येशूचे अनुसरण करण्याशी सरळपणे संबंधित आहे.

उपास.

आपण अनेकदा उपासाला ते देवाकडून मिळालेले अद्भुत दान समजण्याऐवजी, त्याचे स्थान आणि उद्देश समजण्याऐवजी त्याबरोबर असा व्यवहार करतो जसे काही ते काही कायदेशीर आचरण आहे. उपास हा देवासाठी नाही. उपास आपल्यासाठी आहे. आपण ज्याचे अनुसरण करतो त्याच्यावर लक्ष केंद्रित करण्याच्या प्रयत्न करत असताना जिवंत मृत राहण्यासाठी आणि दररोज स्वतःचा नकार करण्यासाठी हे एक उत्तम साधन आहे.

उपास हा देहाला अगदी त्या गोष्टींचा नकार करण्याचे कृत्य आहे  जे त्याला वाटते की ते अस्तित्वात असायला हवे होते, आणि त्याच्या जागी देवाच्या वचनाचा आणि व्यक्तीचा आनंद घ्यावा. देवाचे वचन बाप्तिस्म्यापेक्षा उपासाचा अधिक उल्लेख करते. येशू ख्रिस्ताने पृथ्वीवरील त्याचे सेवाकार्य चाळीस दिवस उपास करून सुरू केले, हे आपल्याला शिकवते की  उपास हे कसे वाटते, हे स्पष्ट केले की त्याचे शिष्य तो गेल्यानंतर उपास करतील, आणि हे देखील शिकवते की काही शक्ती ही फक्त प्रार्थना आणि उपासाच्या माध्यमातूनच प्राप्त होतात. तरीही, मंडळी ही नेहमी त्याच्या महत्वाबद्दल प्रश्न उपस्थित करते.

उपास हे शरीराला वंचित ठेवण्याबद्दल इतके नाही, जितके की  ते प्राथमिकतांना पुन्हा आयोजित करण्याबद्दल आहे. हे देहाला आत्म्याच्या खातर अतृप्त ठेवण्याबद्दल आहे. हे आपल्याला आठवण करून देते की ज्यावर आपले पोषण होते तसेच मग ते वाढते. कशावर आपले पोषण होते तेच आपल्याला चालना देईल. आपण स्वतःला कशाने भरू तेच मग प्रवाहित होईल. कदाचित सर्वात महत्वाचे घटक समजावा हा तो आहे की आपण केवळ उपास करण्यासाठी उपास करत नाही. आपण उपास करत असताना खाल्ले पाहिजे-आणि जे आपण खातो हे देवाच्या वचनाचे मांस आहे. आपण आपल्या स्वतःला सांसारिक गोष्टींचा नकार देतो की आपण सार्वकालिक गोष्टींनी भरू शकावे. उपास करताना, मला तरीही नियमित भोजनाच्या वेळी टेबलजवळ बसायला आणि *“खायला”* आवडते. अनुवाद हा भोजन यादीवर आहे (येशू देखील उपास करताना आध्यात्मिकतेवर पोषण केला जात होता, मत्तय. ४:१-११). किंवा कदाचित हे यशयाची सेवा आहे, किंवा माझे आवडते भोजन, मत्तय.

स्पष्टपणे, उपास करण्याचा अर्थ आपल्या स्वतःला अनेक गोष्टींचा (अन्नाशिवाय इतर गोष्टी) नकार देणे आहे जे आपल्या शारीरिक इच्छांना संतुष्ट करतात. तथापि, स्पष्ट जे त्याकडे दुर्लक्ष करू नये : उपास हे प्रामुख्याने बायबलमध्ये अन्नाबद्दल आहे. मला ते मनोरंजक असे वाटते की पाश्चिमात्य जगातील (आणि सिंगापूर) फक्त ख्रिस्ती लोकांनी मला कधी सुचवले होते की आरोग्याच्या कारणामुळे ते अन्नापासून उपास करू शकत नाही. तुमच्या देहाला आवश्यक असलेल्या गोष्टींची आठवण करून देण्यासाठी उपासाला तुमच्या जीवनाचा नियमित भाग बनवण्यासाठी मी तुम्हांला प्रोत्साहित करू इच्छितो.

संक्षिप्त मध्ये, हे प्रामुख्याने देव तुमच्या द्वारे काय करत आहे त्याबद्दल नाही-तो त्याचे काम कोणालाही निवडण्याद्वारे करू शकतो. हे तो तुमच्यामध्ये काय करत आहे त्याबद्दल आहे. तुम्ही केवळ तुम्हीच आहात आणि तुमच्यामध्ये गौरवान्वित होण्याची त्याची इच्छा आहे. जर त्याचे अनुसरण करण्याची तुमची इच्छा असेल, तर तुम्ही स्वतःचा नकार केला पाहिजे. त्याला तुमचे हृदय, तुमचे मन, तुमचा आत्मा आणि तुमचे सामर्थ्य द्या.

जेव्हा आपण प्रभूबरोबर चालतो, तो काय पाहतो ते पाहण्यासाठी तो आमचे डोळे उघडतो. जितकी आपण प्रार्थना करतो, तितकीच अधिक त्याची आपल्याला आवश्यकता आहे हे आपण ओळखू. समस्या ही नाही की आपण हताश होऊन देवाजवळ कधीही मागत नाही. खरी समस्या ही आहे की आपण हे ओळखण्यास चुकतो की त्याची आपल्याला नेहमीच आवश्यकता असते.

कितीतरी वेळा आपण प्रार्थना करतो की आपण कदाचित इतरांच्या प्रार्थनांना उत्तर असावे? कितीतरी वेळा आपण प्रार्थना करतो की आपण आपल्या स्वतःच्या प्रार्थनांना उत्तर व्हावे? प्रार्थना आणि उपास हे देवाकडून आपल्याला जे पाहिजे त्याच्याबद्दल आहे का? किंवा हे कदाचित देव आपले हृदय बदलत आहे याच्याबद्दल असू शकते का जेणेकरून आपण कदाचित आत्म्यांसाठी त्याची प्रीती आणि उत्कटता दाखवावी, आणि आपल्या सभोवतालच्या परिस्थितीसाठी त्याचे मन आपल्याला असावे?

## येशूचे अनुसरण करण्याचे दुसरे तत्व

चला आपण पुनरावलोकन करू या.

येशूचे अनुसरण करण्याचे पहिले तत्व हे आहे की तो गती स्थापित करतो. प्रार्थना आणि उपास ही दोन दाने देवाने आपल्याला दिली आहेत की त्याच्या सोबत चालण्यास शिकण्यासाठी आपल्याला शिकवावे. दुसऱ्या तत्वावर आपण विश्वास ठेवू शकतो जेव्हा येशू मार्गदर्शन

करीत आहे तो हा आहे : आपण जे काही अनुभव करणार आहोत ते त्याने आधीच अनुभवले आहे.

शेजारील क्षेत्र जेथे मेर्ना आणि जैक्लीन राहत होते ते शेवटी माझे घर झाले. तुटकी सांडपाण्याची पाईपलाईन, नवीन कचऱ्यांचा ढीग, आणि उंदरांची टोळी, त्यांचे शेजारचे क्षेत्र पृथ्वीवरील माझी आवडती जागा झाली होती. एकदा, जेव्हा माझी आई मला भेटायला आली, तेव्हा आम्ही एका अरुंद मार्गाने जात होतो, उंदरांचा प्रादुर्भाव असलेली जागा. माझ्या आईला उंदरांसाठी तितकी खोल आवड नव्हती (त्यात, जेव्हा शेपूट देखील आहे, जी खूपच मोठी असे). एक दयाळू शेजारी, तिची अडचण जाणून, त्या भागातून तिच्या समोर चालण्याचा निर्णय केला, ज्यामुळे त्या जनावरांना तिच्या मार्गातून बाजूला करावे म्हणजे तिचा पाय त्यांच्यावर पडू नये. ते दयाळूपणाचे कृत्य होते-मला माहित आहे माझी आई यास सहमत होईल.

सुंदर मार्गाने, प्रभू आपल्यासमोर चालतो, आपले मार्ग तयार करतो. यावर मनन करा. आपण आत्मविश्वासाने सांगू शकतो की त्याचे मार्ग परिपूर्ण आहेत. आपण हे समजू शकतो की आपण काही पाऊले उचलण्यापूर्वी तो प्रत्येक पाऊल उचलतो. जसे इब्री लोकांस पत्राचा लेखक आपल्याला सांगतो, *“कारण आपल्या सर्वांच्या दुर्बलतेविषयी ज्याला सहानुभूती वाटत नाही, असा आपला प्रमुख याजक नाही, तर तो सर्व प्रकारे आपल्याप्रमाणे पारखलेला होता; तरी निष्पाप राहिला. तर मग आपल्यावर दया व्हावी आणि ऐन वेळी साहाय्यासाठी कृपा मिळावी, म्हणून आपण धैर्याने कृपेच्या राजासनाजवळ जाऊ”* (इब्री. ४:१५-१६).

त्याच्यावर भरवसा करणे सोपे आहे जेव्हा तो आपल्याला स्तोत्र २३च्या *“हिरव्यागार कुरणातून”* नेतो जेथे आपले आत्मे विश्रांती पावतात. तथापि, त्याच स्तोत्रात आपल्याला सांगण्यात आले आहे की तो आपल्याला *“मृत्युच्छायेच्या दरीतूनही”* मार्गदर्शन करतो आणि आपल्या शत्रूच्या समोर आपल्यासमोर मेज तयार करतो. देवाच्या मार्गदर्शनाचा अर्थ हा नाही की संकटांपासून आपल्याला सुरक्षित ठेवलेले आहे, परंतु संकटात त्याची उपस्थिती आहे. तितकीच चांगली सुवार्ता ही आहे की तो आपल्या मागे देखील येतो. *“कारण परमेश्वर तुमचा पुढारी आहे; इस्राएलाचा देव तुमचा पाठीराखा आहे”* (यशया ५२:१२). आपण त्याच्या उपस्थितीने घेरलेले आहोत (स्तोत्र. १२५:२, १३९:५).

## राखेत देवाची उपस्थिती

पूर्वीच्या धड्यामध्ये, नायजेरमध्ये जानेवारी २०१५ला घडलेल्या हल्ल्यांचा मी उल्लेख केला आहे, जेव्हा जवळजवळ प्रत्येक मंडळीची इमारत २४ तासाच्या अवधीत जाळून टाकली होती. ह्या कथेमध्ये आणखी अधिक आहे.

माझ्या घराच्या जवळ त्या गावात हिंसा आणि जाळपोळ झाल्याच्या तीन दिवसांनंतर चालत असताना, मी एक चर्च आणि घरापर्यंत आलो होतो जे पूर्णपणे जाळले गेले होते. रस्त्यावर जळालेली गीते, जळालेले ख्रिस्ती साहित्य आणि काळे झालेले पुष्कळ बायबल पडलेले होते. जेव्हा मी ढिगाऱ्यातून आणि कचऱ्यातून चालत होतो, मी वाकलो आणि बायबलचे अर्धे-जळालेले एक पान उचलले. मी हसलो जेव्हा मी ओळखले की देवाने मला उचलण्यासाठी कोणत्या पानाकडे मार्गदर्शन केले होते. यशया ४३ चा तो पहिला भाग होता : *"तू जलांतून चालशील तेव्हा मी तुझ्याबरोबर असेन; नद्यांतून जाशील तेव्हा त्या तुला बुडवणार नाहीत; अग्नीतून चालशील तेव्हा तू भाजणार नाहीस; ज्वाला तुला पोळणार नाही. कारण मी परमेश्वर तुझा देव आहे; इस्राएलाचा पवित्र प्रभू तुझा त्राता आहे"* ...भिऊ नकोस, कारण मी तुझ्याबरोबर आहे" (यशया ४३:२-३, ५).

जेव्हा आपण येशूचे अनुसरण करतो, तेव्हा तो आपल्याला अग्नीपासून वाचवण्यासाठी आश्वासन देत नाही परंतु तो अवश्य आश्वासन देतो की तो आपल्याला त्यातून जाण्यासाठी एकटे सोडणार नाही. तो मार्ग दाखवतो आणि मागून येतो असे दोन्हीही काम करतो. देवाची उपस्थिती दीर्घायुष्याची शास्वती, विपुल आर्थिक स्थिती, आणि आपल्या शत्रूंवर शापाची हमी देत नाही. परंतु त्याची उपस्थिती त्याचे सामर्थ्य, त्याचा पुरवठा आणि त्याच्या संरक्षणाची शास्वती देतात. आपण त्याच्या प्रभुत्वाला शरण जाताच त्याचे वैभव आपल्या जीवनातून दिसून येईल. आपण आपल्या तारणाऱ्यासोबत चालत असताना, आपले वधस्तंभ उचलून घेऊन जाताना आणि जिवंत मृत जगत असताना आपण येशूचे अनुसरण करण्याचे ते साधे, पण प्रभावी सत्य, आपल्या मनाच्या अग्रभागी ठेवले पाहिजे.

तो आपल्याला सुरक्षितपणे घरी नेईल.

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. देवासाठी व्यस्ततेला देवाबरोबरच्या घनिष्ठतेची अदलाबदली करण्याच्या धोक्याच्या विरोधात तुम्ही स्वतःचे संरक्षण कसे करू शकता?

२. तुम्ही येशूचे अनुसरण करण्यास शिकत असताना तुमच्या जीवनात प्रार्थना आणि उपास ह्यांनी कोणत्या भूमिका पार पाडल्या आहेत?

३. तुमच्या जीवनाच्या कोणत्या परिस्थितीत तुम्ही देवाच्या आश्वासनावर ठाम राहू शकता की जो देव तुमच्यासमोर जातो आणि तुमच्या मागून येतो?

# २५

# काय करावे हे प्रभूला सांगणे?

तुम्ही संभवतः ही चीनी म्हण ऐकली असेन : *"हजारो मैलांचा प्रवास हा एका पावलाने सुरू होतो."* फ्रेंच लेखक, आंद्रे गिडे, यांनी याच अर्थाने असे लिहिले आहे : *"मनुष्याकडे किनाऱ्याकडे दुर्लक्ष करण्याचे धाडस असल्याशिवाय तो नवीन महामार्ग शोधू शकत नाही."* जर तुम्हांला शास्वती पाहिजे असेल की तुम्ही येशूचे अनुसरण कधीही करणार नाही, तर तुम्ही पहिले पाऊल उचलण्यापूर्वी भविष्यात काय घडणार आहे हे त्याने तुम्हांला दाखवण्यासाठी विनंती करा.

जर आपण ख्रिस्ताच्या मार्गदर्शनावर, त्याच्या वचनावर आणि त्याच्या हृदयावर भरवसा ठेवण्यास तयार नसलो तर आपण खरोखर त्याचे अनुसरण करू शकतो का?

आज पुष्कळ ख्रिस्ती लोक ख्रिस्ताचे वचन ऐकतात, त्याच्यावर विश्वास ठेवण्याचा दावा करतात, तरीही देवाच्या वचनात विश्वासाने पुढे पाऊल टाकण्यास नकार देतात कारण त्यांना परिस्थिती कशी घडेल हे दिसत नाही. परंतु पहिले पाऊल उचलण्यापूर्वी आपल्याला दुसरे पाऊल माहित असणे अपेक्षित आहे  का? आपली भूमिका ही आज्ञा पाळणे आहे.

चला आपण आज्ञाधारकपणास अति-आध्यात्मिक करू नये.

देव तुम्हाला तो जे काही सांगत आहे त्यामागील कारणे समजून घेण्याची आवश्यकता नाही. हे तुमच्या बुद्धीमत्तेला समाधानी करण्याबद्दल नाही, परंतु त्याची आज्ञा बिनशर्त पाळण्याच्या योग्यतेबद्दल आहे. जसे आपण मागे चर्चा केली आहे, जर आपण येशू ख्रिस्ताची आज्ञा केवळ तेव्हाच पाळतो जेव्हा काय म्हटलेले आहे हे आपण समजतो, तर आपण त्याला

एक शिक्षक म्हणून मानतो. तो विचारत आहे ते का विचारत आहे हे आपल्याला माहित नसतानाही आपण त्याच्या आज्ञा पाळतो, तेव्हा आपण त्याला प्रभू म्हणून गौरवतो.

स्तोत्रकर्ता देवाच्या वचनाच्या सुंदरतेवरून आश्चर्यचकित झाला, आणि घोषित केले, *“तुझे वचन माझ्या पावलांसाठी दिव्यासारखे व माझ्या मार्गावर प्रकाशासारखे आहे”* (स्तोत्र. ११९:१०५). प्रवासाला प्रज्वलित करण्यासाठी तो एक दिवा नाही , परंतु पुढील पाऊल स्पष्ट करण्यासाठी एक दिवा आहे.

निश्चितपणे, देव भविष्यातील तपशील दाखवू शकतो, परंतु कदाचित त्याच्या दयाळूपणात तो आपल्यापासून काही माहिती लपवून ठेवतो- जेणेकरून आपण अनावश्यक काळजी करण्यापासून वाचावे, ज्याची आपण कदाचित चिंता करू लागलो असतो.

मी देवाला अनेक प्रसंगी विचारले आहे की तो मला मोठे दृश्य का दाखवत नाही. गोष्टी कशा पूर्ण होतील हे मला समजून घ्यायचे होते. एकच उत्तर माझ्या आत्म्यात मी जाणले ते असे काहीतरी होते : *“नाथान, जर मी तुला पुढील काही पावले दाखवली, तर तुझे डोळे हे माझ्यावर असण्याऐवजी तुझ्या योजनेवर असतील.”* जोपर्यंत देव प्रथम आपल्याला दाखवतो की आपले आज्ञापालन आपल्याला कोठे नेऊ शकते तोपर्यंत आज्ञाधारक राहण्याची इच्छा करणे हे सोपे आहे. आपल्या प्रवासातील रसद अशा प्रकारे लपवली गेली असेल का की आपण कदाचित आपल्या कार्यक्रमावर इतके केंद्रित राहू नये की आपण ख्रिस्ताला जाणण्याची घनिष्टता टप्प्याटप्प्याने गमवावी? जेव्हा आपल्याला पुढील पाऊल माहित नसते, तेव्हा आपल्याला नेतृत्व करणाऱ्याकडे पाहण्यास भाग पाडले जाते. आज आपण त्याची आज्ञा कशी पाळावी हे विचारत असताना आपण देवाला आपल्या आयुष्याची रूपरेखा विचारतो का ?

हे लक्षात ठेवा. तुमच्या परिस्थितीपासून दूर पळण्यापेक्षा, तुमच्या परिस्थितीला प्रभू येशूकडे धावण्यास गती द्या. तो आपल्या परिस्थितीपेक्षा आपले चरित्र बदलण्यात अधिक रुची ठेवतो.

मत्तय १६:२४ मध्ये त्याच्या पूर्वीच्या वचनांची तपासणी करण्याआधी काय घडले त्याकडे लक्ष द्या. येशूने त्याच्या शिष्यांना एकत्र बोलावले आणि हे विचारत त्यांचे मत घेतले, *“मनुष्याच्या पुत्राला लोक कोण म्हणून म्हणतात”* (मत्तय. १६:१३). भिन्न उत्तरे प्राप्त केल्यावर, त्याने तोच प्रश्न त्यांना विचारला आणि म्हटले, *“पण तुम्ही मला कोण म्हणून म्हणता?”* (मत्तय. १६:१५).

**येशू आपल्या परिस्थितीपेक्षा आपले चरित्र बदलण्यात अधिक रूची ठेवतो.**

आपल्याला हे सांगितलेले नाही की तेथे प्रथम विचित्र शांतता पसरली होती, पण आपल्याला सांगितले आहे की पेत्राने उत्तर दिले, *“आपण ख्रिस्त, जिवंत देवाचे पुत्र आहात.”* (मत्तय. १६:१६).

या चर्चेच्या पुढे, बायबल आपल्याला सांगते की, *“तेव्हापासून येशू आपल्या शिष्यांना सांगू लागला की, ‘मी यरुशलेमेस जाऊन वडील, मुख्य याजक व शास्त्री ह्यांच्याकडून पुष्कळ दु:खे सोसावी, जिवे मारले जावे व तिसऱ्या दिवशी उठवले जावे ह्याचे अगत्य आहे”* (मत्तय. १६:२१). लक्षात घ्या पेत्र कसे त्यापेक्षा अधिक बोलतो.

*“तेव्हा पेत्र त्याला जवळ घेऊन त्याचा निषेध करून म्हणाला, ‘प्रभुजी, आपणावर दया असो, असे आपल्याला होणारच नाही.’ परंतु तो वळून पेत्राला म्हणाला, ‘अरे सैताना, माझ्यापुढून निघून जा! तू मला अडखळण आहेस; कारण देवाच्या गोष्टींकडे तुझे लक्ष नाही, माणसांच्या गोष्टींकडे आहे”* (मत्तय. १६:२२-२३). आपण किती आभारी राहू शकतो की देवाचे वचन येशूच्या शिष्यांच्या जीवनातील असे आकर्षक नसलेले क्षणही नोंदवते, जेणेकरून आपल्याला आपल्या स्वतःच्या अशक्तपणाचे स्मरण होऊ शकते आणि सार्वकालिक मूल्याचे धडे शिकू शकतो.

## जेव्हा आपण प्रभूला काय करायचे ते सांगतो

पेत्राने नेतृत्व करण्याच्या परिणामांमधील एक हे होते : कोण वास्तवात नियंत्रण ठेवून आहे हे त्याला समजले नव्हते. आपण कितीतरी वेळा येशूला *“प्रभू”* म्हणून संबोधतो आणि मग काय करावे हे त्याला सांगतो? जीवन हे जसे असण्याची आवश्यकता आहे त्यापेक्षा किती अधिक गोंधळात पडते जेव्हा आपण येशूला *“प्रभू”* म्हणतो आणि मग पुढील पावलांसाठी त्याला आदेश देतो. हेच नेमके मार्थाने केले जेव्हा तिने येशूला *“प्रभू”* म्हटले आणि पुढील वाक्यात काय करावे हे त्याला सांगितले, *“प्रभुजी, माझ्या बहिणीने माझ्या एकटीवर कामाचा भार टाकला आहे, ह्याची आपल्याला पर्वा नाही काय? मला साहाय्य करायला तिला सांगा”* (लूक. १०:४०).

आज तुम्हांला आणि मला येशूचे बोलावणे हे सरळ आणि स्पष्ट आहे : *“माझ्या मागे या.”* आपण त्याच्या निर्देशाला प्रश्न करू नये किंवा त्याच्या अधिकाराशी संघर्ष करू नये. आपण त्याचे अनुसरण करावे.

## जेव्हा आपल्याला वधस्तंभा अगोदर मुकुट हवा असतो

पेत्र ज्या क्षणी विचार करू लागला की त्याला अधिकार दिला गेला आहे त्या क्षणापासून तो चूक करू लागला. ख्रिस्ताने त्यांना सांगितलेल्या त्याच्या अवश्य दु:खसहन आणि मृत्युच्या संभाषणात, पेत्र आणि इतर शिष्य ख्रिस्ताने त्याच्या पुनरूत्थानाचे केलेले स्पष्ट भाकीत समजण्यास चुकले होते. वास्तवात, ख्रिस्ताचे त्याच्या वधस्तंभी खिळल्यानंतर तो मृत्यूतून उठणार ह्या भविष्याला फक्त त्या लोकांनीच स्मरणात ठेवले होते ज्यांनी त्याला वधस्तंभी खिळले होते (मत्तय. २७:६३). देवाला आपल्या जीवनातून जे गौरव प्रकट करण्याची इच्छा असते त्याला गमावणे सोपे आहे कारण त्या गौरवाच्या सामर्थ्यपूर्ण प्रदर्शनाकडे नेणाऱ्या प्रवासात चालण्यास आपण तयार नसतो. पेत्राला वधस्तंभ टाळायचा होता आणि थेट मुकुट हवा होता. त्याने अद्याप हे समजले नव्हते की वधस्तंभाशिवाय मुकुट नाही. वधस्तंभाला सोसल्यावाचून मुकुटावर दृष्टी ठेवण्यात तुम्ही कुठे मोहात पडला आहात?

**कितीतरी वेळा आपण येशूला “प्रभू” म्हणून संबोधतो आणि मग काय करावे हे त्याला सांगतो?**

जेव्हा लाजर आजारी होता आणि मरण पावणार होता, येशूने त्या ऐकणाऱ्यांना म्हटले, *“हा आजार मरणासाठी नव्हे तर देवाच्या गौरवार्थ, म्हणजे त्याच्या योगे देवाच्या पुत्राचे गौरव व्हावे ह्यासाठी आहे”* (लूक. ११:४). थोडे थांबा. लाजर मरण पावला का? केवळ अर्ध्या अध्यायानंतर, होय. तर मग का, येशूने असे म्हटले “हा आजार मरणासाठी नव्हे?’ त्याच प्रकारे सुपरमार्केट जाणे हे ट्राफिक लाईट किंवा थांबा चिन्हांकडे नेत नाही. सुपरमार्केटसाठी मार्ग हा आपण तेथे पोहोचण्यापर्यंत असंख्य दिवे आणि चिन्हे ओलांडून जाऊ शकतो. तथापि, प्रवास हा ह्या गोष्टींकडे नेत नाही- केवळ ह्या गोष्टींना ओलांडून. त्याच प्रकारे, तुमचा वधस्तंभ उचलणे आणि ख्रिस्ताचे त्याच्या गौरवी, सार्वकालिक राज्याकडे अनुसरण करण्याचा प्रवास अनेक संकटे आणि परीक्षांमधून जाईल, परंतु ते त्यांच्याकडे घेऊन जाणार नाही. जीवन, मृत्यू नाही, हा आपल्या सांसारिक यात्रेचा शेवट आहे.

जेव्हा येशू *“त्याचे अनुसरण”* करण्याचा इशारा देतो, तेव्हा तो स्पष्ट शब्दात सांगत आहे की दु:ख येईलच. त्याने त्याला अवश्य होणारे दु:ख व वधस्तंभी खिळण्याबद्दल त्याच्या शिष्यांना सांगितले आणि मग त्यांचा वधस्तंभ उचलणे आणि त्याचे अनुसरण करण्याचे आमंत्रण दिले. आपल्यासाठी देखील तसेच आहे. आपण अनुसरण करतो जेथे त्याने मार्गदर्शन केले आहे, हे जाणून की शेवटचा धडा हा आपले पुनरुत्थान आणि त्याच्या उपस्थितीत सार्वकालिक आनंदाबद्दल आहे.

## जेव्हा आपण नेतृत्व करण्याचा प्रयत्न करतो

नेतृत्व करण्याच्या प्रयत्नाचा हा तिसरा नकारात्मक परिणाम आहे.

जेव्हा पेत्राने येशूने वधस्तंभाला टाळावे असा प्रयत्न केला, तेव्हा येशूने स्पष्टपणे म्हटले, *"अरे, सैताना माझ्यापासून निघून जा"* (मत्तय. १६:२३). पेत्राला असे म्हणण्याने, येशू पेत्राला ही कल्पना कोठून आली हे दाखवत होता. सैतानाला आपल्या विचारातून वधस्तंभ काढून टाकायचा आहे. *"सैतान"* म्हणजे *"शत्रू"*. येशूचे अनुसरण करण्याऐवजी, पेत्र नेतृत्व करण्याचा प्रयत्न करत होता, आणि वधस्तंभाचा नकार करण्याने, तो तारणाऱ्याचा सक्रीय शत्रू झाला होता. पौलाने फिलीप्पिया येथील मंडळीला ह्याबद्दल इशारा दिला. *"कारण मी तुम्हांला पुष्कळ वेळा सांगितले व आताही रडत सांगतो की, पुष्कळ जण असे चालतात की ते ख्रिस्ताच्या वधस्तंभाचे वैरी आहेत. नाश हा त्यांचा शेवट, पोट हे त्यांचे दैवत, आणि निर्लज्जपणा हे त्यांचे भूषण आहे; त्यांचे चित्त ऐहिक गोष्टींत असते"* (फिलिप्पै. ३:१८-१९). जेव्हा आपले मन सांसारिक संपत्ती, सावधानी, प्रतिष्ठा आणि पदावर स्थिर होते, तेव्हा आपण परमेश्वराकडे पाहणे गमावतो ज्याचे अनुसरण आपण करत आहोत आणि आपण इतरांनाही त्याला पाहण्यापासून व्यत्यय आणतो, जे आपल्याला ख्रिस्ताच्या वधस्तंभाचे वैरी बनवते.

मंडळीला ही एक गंभीर ताकीद आहे. आज आपल्या मंडळीमध्ये पुष्कळ शत्रू फिरत आहेत, आणि ते कसे ख्रिस्ताचा दावा करतात पण वधस्तंभाला टाळण्याचा प्रयत्न करतात या द्वारे आपण त्यांना ओळखू शकतो. हे शत्रू शिष्यांसारखे वेशभूषा परिधान करतात आणि योग्य उत्तर देण्यासाठी त्वरित असतात, तरीही प्रभू येशू जेथे मार्गदर्शन करत आहे तेथे त्याचे अनुसरण करण्यासाठी अनिच्छुक असतात.

पेत्राची समस्या ख्रिस्ताने ओळखली : *"कारण देवाच्या गोष्टींकडे तुझे लक्ष नाही, माणसांच्या गोष्टींकडे आहे"* (मत्तय. १६:२३). नंतर, पवित्र आत्म्याने येशूच्या ह्या वाक्याला आणखी स्पष्ट केले : *"म्हणून तुम्ही ख्रिस्ताबरोबर उठवले गेला आहात, तर ख्रिस्त देवाच्या उजवीकडे जेथे बसला आहे, तेथल्या वरील गोष्टी मिळवण्याचा यत्न करा. वरील गोष्टींकडे मन लावा. पृथ्वीवरील गोष्टींकडे लावू नका. कारण तुम्ही मृत झाला आहात आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे. आपले जीवन जो ख्रिस्त तो प्रकट केला जाईल तेव्हा तुम्हीही त्याच्याबरोबर गौरवात प्रकट केले जाल"* (कलस्सै. ३:१-४).

आपल्याला ख्रिस्ताचे अनुसरण करायचे आहे का, परंतु आपल्या स्वतःच्या अटींवर? आपण आपली नाराजी, आपल्या चिंता, आपला भूतकाळ-आपले पाप यावरच विचार

करत आहोत का? ख्रिस्ताबरोबर घनिष्टतेत चालण्यास आपल्याला अडथळा करू शकेल अशा कोणत्याही गोष्टीला आपण चिकटून आहोत का?

भारावून जाऊ नका. तुम्हांला दंड नाही ह्या अवस्थेला एक विश्वासू म्हणून स्मरणात ठेवा : *“म्हणून ख्रिस्त येशूमध्ये असलेल्यांना दंडाज्ञा नाहीच. [ते देहाप्रमाणे नाही तर आत्म्याप्रमाणे चालतात.]”* (रोम. ८:१). ख्रिस्ताचे बोलावणे हे परिपूर्ण होण्यासाठी कठीण प्रयास करण्याबद्दल नाही. तुम्ही आधीच त्याच्या धार्मिकतेमध्ये परिपूर्ण आहात. प्रभू येशू सरळपणे तुम्हांला त्याचे अनुसरण करण्यास सांगत आहे, जसे तुम्ही त्याच्या अद्भुत प्रीतीच्या सांत्वनाचा आनंद घेता आणि त्याच्या पवित्र आत्म्याच्या विश्वासू दोषसिद्धी मध्ये वाढतात.

**आपल्याला ख्रिस्ताचे अनुसरण करायचे आहे का, परंतु आपल्या स्वतःच्या अटींवर?**

लक्षात ठेवा, शत्रू आपल्याला कठोरपणे दोष देतो, परंतु पवित्र आत्मा सौम्यपणे दोषसिद्धी करतो *“जोपर्यंत तुमच्यामध्ये ख्रिस्ताचे स्वरूप निर्माण होत नाही”* (गलती. ४:१९).

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. तुमच्या जीवनाच्या कोणत्या क्षेत्रात तुम्ही ख्रिस्ताच्या शत्रूसारखे जगत असाल? (स्वार्थी जीवनशैली, आज्ञाधारकपणाऐवजी आरामदायकपणाची निवड करणे इत्यादी.)

२. तुमच्या जीवनातील कोणत्या गोष्टी आहेत ज्या तुमच्या कुटुंबाला, मित्रांना आणि सहकाऱ्यांना येशू ख्रिस्ताच्या मार्गापासून दूर नेण्यासाठी इशारा करू शकतात?

३. तुमचे जीवन कोणत्या प्रकारे लोकांना ख्रिस्ताकडे इशारा करू शकते?

४. सर्व कारणे न समजता प्रभू तुम्हांला विश्वासाने त्याचे पालन करण्यास कसे सांगत आहे?

५. आतापर्यंतच्या तुमच्या जीवनाच्या वाटचालीचा विचार करा. जर यांपैकी काही गोष्टी तुम्हांला आधीच माहित असत्या, तर त्यांना टाळण्यासाठी तुम्ही काय केले असते? आणि यामुळे ख्रिस्ताबरोबर तुमची घनिष्ठता कशी प्रभावित झाली असती?

# २६

# ज्याची आवश्यकता आहे ते तुमच्याजवळ नाही

मला वाटते जेव्हा ख्रिस्ताचे अनुयायी होण्यासाठी मोजावी लागणारी किंमत विचारात घेताना आपण अनेकदा चुकीच्या दिशेने विचार करतो. ह्या पुस्तकाच्या पानांमध्ये, आपण एक वचन आपल्या मनात कोरलेले आहे : *"माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे"* (मत्तय. १६:२४). येशूचे शब्द आपल्याला आपल्या संकल्पाचे विश्लेषण करण्यास आणि त्याचे अनुसरण करण्यासाठी आपण कोणत्या गोष्टी सोडल्या पाहिजेत याचा हिशेब करण्यास सांगतात असे गृहीत धरणे सोपे होईल. परंतु चला आपण स्पष्ट राहू या.

ज्याची आवश्यकता आहे ते तुमच्याजवळ नाही. ज्याची आवश्यकता आहे ते माझ्याजवळही नाही. एवढेच सत्य आहे.

लूक. १४:३३ मध्ये येशू म्हणाला, *"म्हणून त्याचप्रमाणे तुमच्यापैकी जो कोणी आपल्या सर्वस्वाचा त्याग करत नाही त्याला माझा शिष्य होता येत नाही."* येशूने असे म्हटले नाही, *"ज्याच्याजवळ जे काही आहे त्याचा त्याग करण्यास जो कोणी तयार आहे,"* किंवा त्याने असेही म्हटले नाही, *"तुमच्यापैकी ज्याच्याजवळ जे काही आहे त्याचा जो त्याग करत नाही तो एक चांगला शिष्य होऊ शकत नाही."* नाही. ख्रिस्ताचे हे वाक्य पूर्ण शरणागतीची मागणी करते.

जेव्हा ख्रिस्ताने घोषित केले, *"तुमच्यापैकी ज्याच्याजवळ जे काही आहे त्याचा जो त्याग करत नाही तो माझा शिष्य होऊ शकत नाही,"* तो हे बोलत नाही की एखादा जो सर्वकाही

त्याग करण्यात चुकतो त्याला त्याचे शिष्य होऊ देण्यास परवानगी नाही. हे परवानगीबद्दल नव्हते. हे शक्यतेबद्दल होते. येशू बोलत होता, जर तुम्ही सर्वकाही त्याग करत नाही, तर तुम्ही माझे शिष्य होऊ शकत नाही-हे सरळपणे शक्य नाही.

मला हे स्पष्ट करू द्या.

जर एखाद्या मित्राने मला अत्यंत लहान लेकरांचे टी-शर्ट बक्षीस म्हणून दिले, तर त्याला हे म्हणणे पूर्णपणे योग्य असेल, *"तू हे टी-शर्ट घालू शकत नाही."* त्याचा परवानगीशी काहीही संबंध नाही; तो मला टाईट-फिटिंग टी-शर्ट घालण्यापासून प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करत नाही. विषयाची वस्तुस्थिती ही आहे की ६फुट २ इंच मोठा माणूस ज्याला रुंद खांदा आहे त्याला असे वस्त्र शक्यतो फिट बसू शकत नाही. हे शारीरिकदृष्ट्या शक्य नाही. तसेच हे येशू ख्रिस्ताच्या बोलवण्याबाबतही आहे.

तुम्ही अजूनही निराश आहात का? होऊ नका.

इतके अद्भुत, सर्वस्व पणाला लावणारे आणि पूर्णता देणारे बोलावणे हे मानवी शक्तीने किंवा जगाचे भार घेऊन आपल्यासोबत ओढत पूर्ण केले जाऊ शकत नाही. अशा प्रकारे, ख्रिस्त आपल्याला त्याच्या जीवनात आमंत्रित करतो. त्याच्या मृत्यूत. त्याच्या पुनरुत्थानात. *"आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे. आपले जीवन जो ख्रिस्त तो प्रकट केला जाईल तेव्हा तुम्हीही त्याच्याबरोबर गौरवात प्रकट केले जाल"* (कलस्सै. ३:३-४). यात काही आश्चर्य नाही की इब्री लोकांस पत्राचा लेखक आपल्याला सांगत आहे की शर्यतीत धावण्याआधी *"आपणही सर्व भार व सहज गुंतवणारे पाप टाकून, आपल्याला नेमून दिलेल्या धावेवरून धीराने धावावे"* (इब्री. १२:१).

जर तुम्ही माझ्यासारखे आहात, तर पाठपुरावा करणे हे निराशाजनक असू शकते. तेच पाप मलाही रोखते. मला योग्य करण्याचे माहित आहे, पण मी स्वतःला अडखळत असताना पाहतो. सततच्या अपयशाने अस्वस्थ होत, मी विचार करतो, *"मुद्दा काय आहे?"* परंतु माझा आदर्श चुकीचा आहे. पापांची क्षमा आणि देवासमोर माझी स्वीकृती हे माझ्या स्वतःच्या कर्मांमुळे येत नाही, परंतु येशू ख्रिस्ताच्या पूर्ण केलेल्या कार्यावर विश्वासा द्वारे येते. ख्रिस्ताचे अनुसरण करण्यास आपली निराशजनक असमर्थता ही स्वतःसाठी मरण्यात अपयशी ठरल्यामुळे उद्भवते. आपण पापावर प्रभुत्व मिळवण्याचा आणि जीवनात उद्देश प्राप्त करण्याचा प्रयत्न करत राहतो, जणू काही आपण स्वतःला अधिक कष्ट दिल्यास

अखेरीस यशस्वी होऊ. परंतु योदाने योग्यच म्हटले आहे, *"करा किंवा करू नका. येथे काही प्रयत्न नाही."*[६०]

म्हणून आपल्या पेचप्रसंगासाठी उत्तर काय आहे?

उपाय हा ख्रिस्ताच्या शिकवणीतून सुंदरपणे जुळवलेला आणि वारंवार पुनरुच्चारित केलेला आहे. तो आपल्याला मदर टेरेसा होण्यासाठी बोलत नाही. तो आपल्याला स्वयं ला मरायला सांगत आहे-दररोज बोलावत आहे. जसे लूक ख्रिस्ताच्या शब्दाची नोंद करतो, *"जर कोणी माझ्यामागे येऊ पाहतो तर त्याने आत्मत्याग करावा व दररोज स्वतःचा वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे"* (लूक. ९:२३). पौलाच्या शब्दात, *"मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वतःला माझ्याकरता दिले"* (गलती. २:२०).

**येशू ख्रिस्ताला तुमच्या जीवनाचा केवळ एक हिस्सा व्हायचे नाही. त्याला तुमचे संपूर्ण जीवन हवे आहे.**

आपण *"येशूला प्रभू बनवू"* शकत नाही-तर तो प्रभू आहे. फक्त प्रश्न हा आहे, *"आपण आता निवडीने त्याला शरण जाणार आहोत का किंवा नंतर दबावाने? "शरण जाणे" हे सरळपणे त्याच्या अधिकाराच्या अधीन होणे आहे व या प्रकरणात, अधिकाराला. एके दिवशी* " देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे" (फिलिप्पै. २:११).

येशू ख्रिस्ताला तुमच्या जीवनाचा केवळ एक हिस्सा व्हायचे नाही. त्याला तुमचे संपूर्ण जीवन हवे आहे. तो तुमच्या जीवनाचा हिस्सा मागत नाही (स्वतःचा त्याग); तो पूर्ण नियंत्रणाची इच्छा करतो (स्वतःचा नकार). त्याला सर्वस्व पाहिजे. सर्वकाही. बस एवढेच.

आपण ख्रिस्ताला आपल्या आधीच आखलेल्या योजना आणि स्वप्नांमध्ये सामील करत आहोत का, किंवा आपण त्याला आपली कथा लिहू देण्यासाठी नियंत्रण सोडून देत आहोत?

लहानपणी माझे टीव्ही पाहणे फारच कमी होते. ठीक आहे, खर तर ते जवळजवळ अस्तित्वातच नव्हते. आमच्याकडे एक सुपर ८ सिनेमा प्रोजेक्टर होता ( ज्याचे मोटेल चेनशी काहीही संबंध नव्हता), परंतु मी दहा वर्षांचा होईपर्यंत माझ्या कुटुंबाने एक नऊ इंचाचा टीव्ही आणि वीसीआर कॉम्बो विकत घेण्याचा विचार केला, तेव्हा एका नातेवाईकाने तो बक्षीस म्हणून दिला. पुढे, पश्चिम आफ्रिका, सेनेगलमध्ये मी लहानाचा मोठा झालो, अमेरिका टीव्ही

कार्यक्रमांपासून—जे तरुण आणि वृद्ध दोघांच्याही मनावर प्रभाव टाकतात—त्यापासून मी खूप दूर होतो.

हे म्हटल्यावर, तेथे काही कार्यक्रम होते ज्यांनी कसेतरी आमच्या घरात वीएचएस टेप द्वारे प्रवेश केला होता. (जर तुम्हांला वीएचएस टेप माहित नसेल, तर ज्यांना तुम्ही वृद्ध समजता त्यांना विचारा). त्यापैकी एक लेकरांचा आर्थर कार्यक्रम होता. (कोणीतरी पीबीएस साठी मोठ्याने आवाज देऊ शकतो का?) आज आर्थर पेक्षा अधिक आकर्षित कार्यक्रम सापडेल की नाही याची मला खात्री नाही, परंतु अधिक बारकाईने विचार केल्यावर, या लेकरांच्या कार्यक्रमाच्या शीर्षक गीतामध्ये देखील जगाची मानसिकता दिसून येते. ती आकर्षित धून आठवते ना? [६१] संदेश अगदी साधा आहे, आणि तो मनापासून दिल्यासारखा वाटतो, ‘स्वतःवर विश्वास ठेवा, आणि तेच सुरुवात करण्याचे ठिकाण आहे!” *मी असे सुचवेन की* “स्वतःवर विश्वास ठेवणे” हे सुरुवात करण्याचे नव्हे, तर नाशा कडे नेणारे ठिकाण आहे. माझ्यावर विश्वास ठेवा, मी आर्थरच्या विरोधात नाही. तो एक चांगला कार्यक्रम आहे, परंतु त्या लक्षात राहणाऱ्या लहान कार्यक्रमात जी मानसिकता रुजलेली आहे ती समाजात शिरकाव करते. असे विचार आपल्याला शिकवतात की देवाच्या वचनाला आपल्या स्वतःच्या भावना आणि कल्पनेच्या अधीन ठेवावे.

देव आपल्या विश्वासांनुसार सत्य बदलणार नाही, किंवा त्याच्यावर आणि पवित्र शास्त्रात त्याने जे प्रकट केले आहे त्यावर विश्वास ठेवण्यास तो आपल्यावर जबरदस्ती करणार नाही.

या प्रवासात, आपण येशू ख्रिस्ताचे व्यक्तिमत्व आणि त्याच्यासारखे होणे म्हणजे काय, आपले लौकिक अस्तित्व आणि इच्छांचा त्याग करणे आणि जेणेकरून आपल्या स्वतःला सार्वकालिक, गौरवी संशोधनासाठी समर्पित करावे यावर नव्याने विचार करत आहोत.

या पुस्तकाचे अध्ययन करताना, कशावर विश्वास ठेवावा हे तुम्हांला सांगणे माझे ध्येय नव्हते. माझा उद्देश हा येशूने काय म्हटले आहे ते ऐकणे आणि स्वतःला विचारावे हा होता :

काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

आणि जर तो जे बोलला त्याचा तोच अर्थ होता, तर ते आपल्या जीवनात कसे दिसेल?

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. तुमच्या ख्रिस्ती शर्यतीत या जगाचे कोणते ‘‘भार’ तुमचा वेग कमी करत आहेत?

२. तुमच्या स्वतःच्या शक्तीने ख्रिस्ताचे अनुसरण करण्याच्या प्रयत्नात कोणते धोके आहेत? त्याऐवजी तुम्ही काय केले पाहिजे?

३. येशूला खरोखर पूर्ण नियंत्रण हवे असताना तुम्ही त्याला तुमच्या जीवनाचा भाग बनवण्याचा तुम्ही कोठे प्रयत्न केला आहे ?

# २७

# पश्चातापावाचून जीवन

हे वचन वाचणाऱ्यांपैकी अनेक जण जीवनात अत्यंत यशस्वी असतील यात मला शंका नाही. वर्गात यश. प्रमाणित परीक्षेत यश. क्रॉसफिटमध्ये यश. तुमच्या काल्पनिक फुटबॉल संघात यश. सामाजिक माध्यम प्रसिद्धीत यश. विरुद्ध लिंग व्यक्तीसोबत यश. गुंतवणुकीत यश. अगदी चर्च ज्याची प्रशंसा करते त्या गोष्टींमध्ये देखील यश. तुम्हांला कल्पना आली असेल.

तुम्ही विजेते आहात.

किंवा तुम्ही खरोखर आहात का?

**विजय कोठे मिळतो : स्वार्थी शोधात किंवा निस्वार्थी त्यागात?**

काय होईल जर जवळजवळ सर्वगोष्टींमध्ये जिंकणे शक्य असेल आणि तरीही शेवटी पराजित व्हावे लागेल? होय, तुम्ही बरोबर ऐकले. पराजित.

येशूने त्यांना त्यांचे वधस्तंभ उचलण्यासाठी बोलावल्यानंतर लगेचच, तो आपल्या शिष्यांना चेतावणी देतो, *"कारण जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो तो आपल्या जीवाला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरता आपल्या जीवाला मुकेल त्याला तो मिळेल"* (मत्तय. १६:२५). ते आश्वासन आहे-विरुद्ध टोकांसह.

जगाची सामान्य मानसिकता ही, पौल *"बियर"* ब्रायंट, २५ वर्षे अलाबामा क्रीम्सन टीडेचा कॉलेज फुटबॉल प्रशिक्षक यासारखी आहे, ज्याने म्हटले, *"जर तुम्ही स्वतःवर विश्वास ठेवता आणि समर्पण आणि घमंड आहे आणि कधीही धीर सोडत नाही, तर तुम्ही विजेते व्हाल."* जग अशा प्रकाराच्या प्रेरणेच्या बळावर चालते, पण त्याचा शेवट

काय? हे अशा सत्यतेसाठीच तुम्हांला निर्माण केले आहे का? तात्पुरते, अयोग्य विजय मिळवण्यासाठी? खेळांची प्रशस्तीपत्रके मिळवण्यासाठी, पोकेमोनच्या प्रत्येक पातळीवर विजय मिळवण्यासाठी, बनवलेल्या प्रत्येक मौल्यवान क्षणांचा संग्रह करण्यासाठी, चिनीमातीच्या प्राचीन वस्तूंनी भरलेली दोन कपाटे मिळवण्यासाठी किंवा निरुपयोगी प्रचंड ज्ञान साठवण्यासाठी? मग काय?

मृत्यू.

तुम्हांला यापेक्षा अधिकसाठी निर्माण केले आहे- म्हणजेच यापेक्षा अधिक.

## एक विजेता जो पराजित झाला

पवित्र शास्त्रात एका माणसाचे उदाहरण आहे ज्याने अगदी हेच केले -जगाच्या दृष्टीत यशस्वी अस्तित्व जगला परंतु सार्वकालिकतेच्या दृष्टीने त्याच्या जीवनाला अतिशय वाया घालवले.

देमास.

त्याने चांगली सुरुवात केली. प्रत्यक्षात, खूपच चांगली. फिलेमोन वचन २४ मध्ये, प्रेषित पौलाचा सहकारी म्हणून नमूद केलेला आहे. पुन्हा कलस्सै. ४:१४ मध्ये, पौलाने देमास आणि त्याच्याबरोबर त्याच्या उपस्थितीचा उल्लेख केला आहे. पौल त्यावेळी कुठे होता? जास्त शक्यता आहे, तो रोम मध्ये तुरुंगात होता. दुसऱ्या शब्दात, देमास एक तरुण व्यक्ती होता आणि पौल साखळदंडात असताना देखील त्याच्याबरोबर राहण्यास तयार होता.

परंतु त्याच्या जीवनाविषयी आणखी एक वचन भाष्य करते.

जेव्हा पौलाचा सांसारिक प्रवास शेवटाला आला होता, त्याने विश्वासातील त्याचा पुत्र, तीमथ्य याला लिहिले. त्या पत्रात, पौलाने एक बाजूला नोट लिहिली जी म्हणते, *"कारण देमासला ऐहिक सुख प्रिय असल्यामुळे तो मला सोडून थेस्सलनीकास गेला"* (२ तीमथ्य. ४:१०). दु:खद. गंभीर.

पौल, देमास थेस्सलनीकास गेल्याचा उल्लेख करतो, एक शहर ज्याचे नाव दोन ग्रीक शब्दांनी बनलेले आहे, थेस्सलॉस आणि नाईक.

आपण त्या कंपनीशी परिचित आहोत जिला ‘नाईक” *म्हणतात जे जगभरातील पायांना सजवते. परंतु तुम्हांला माहित आहे का कंपनीचे नाव* “नाईक” हे विजयाच्या ग्रीक देवतावरून दिले गेले आहे? तोच वास्तवात नाईकचा अर्थ आहे : विजय.[६२]

नाईक हे विजयाचे प्रतिक होते. थेस्सलॉस हा शब्द, तथापि, वेगळी कथा प्रकट करतो. या शब्दाचा अर्थ, ‘खोटे, अयोग्य किंवा रिकामी” *आहे. ह्या सत्यतेला चुकवू नका. थेस्सलनीका म्हणजे अक्षरशः,* “विजयाचे रिकामी स्थान” *होते. देमासने* “एक विजेता” होण्यासाठी पौलाला सोडले. परंतु येथे एक समस्या होती. त्याचे विजय हे शेवटी अयोग्य ठरले.

## राखून ठेवले नाही, माघार नाही, खेद नाही

कैरो शहराच्या अगदी मध्यभागी एक अस्पष्ट आणि बहुतेक विसरलेली स्मशानभूमी आहे. उंच भिंती, तारा लावलेला दरवाजा, आणि उंची वाढलेल्या जंगली झाडांमध्ये असलेली ही प्राचीन स्मशानभूमी ‘द सिक्रेट गार्डन अस अ चाईल्ड’ [The Secret Garden as a Child] हा चित्रपट पाहत असल्याची आठवण करून देते. असे ऐकले होते की त्या स्मशानभूमीत १८००पासून एक अस्पष्ट व्यक्तीची कबर आहे ज्यामध्ये मला विशेष रुची होती, एक मित्र आणि मी त्याला पुरलेल्या जागेला शोधण्यासाठी गेलो.

**यशाचे कोणते उत्तम मोजमाप आहे : दीर्घायुष्य किंवा एक विश्वासू जीवन?**

आमच्या साहसाचे महत्व, तथापि, हे त्या प्राचीन स्मशानभूमीच्या दगडाच्या भिंतीच्या आत जे पुरलेले आहे त्यात आढळले नाही. ह्या कथेचे सामर्थ्य त्या भिंतींमध्ये आणि त्या कबरेत जे सामावून घेऊ शकले नाही त्यात ते होते.

कबरेकडे जाण्यासाठी, आम्हांला प्रथम त्या भागातील एका माणसाला शोधायचे होते ज्याला तेथील किल्ली दिली गेली होती. बराच वेळ शोधल्यानंतर, आम्हांला द्वारपाल सापडला, किल्ली ज्याच्याजवळ होती तो वृद्ध माणूस होता. करकर वाजणारा, लोखंडी चौकटीचा लाकडी दरवाजा उघडत, त्याने आम्हांला आमचा शोध घेण्यासाठी परवानगी दिली. तुटलेल्या कबरेवरून चालत आणि कबरेसारख्या ढिगाऱ्यावरून जात आणि कबरे मागून कबरांवरून मोडतोड, फांद्या, आणि कचरा स्वच्छ करीत गेलो, आम्हांला शेवटी कबरेचा एक दगड मिळाला ज्याचा आम्ही शोध घेत होतो. त्याला पुसून आणि वर्षांची साचलेली घाण आणि पक्ष्यांची विष्ठा स्वच्छ केल्यावर, दगडावर कोरलेले शब्द स्पष्ट झाले :

विल्यम व्हायटिंग बोर्डेन
१८८७-१९१३
राखून ठेवले नाही.
माघार नाही.
खेद नाही.

अमेरिकत एका श्रीमंत कुटुंबात १८८७ मध्ये जन्मलेले, आणि लाखो डॉलरचे वारसदार, बोर्डेन यांना जे दिले होते ते त्यांच्या काळातील एक प्रसिद्ध उच्च माध्यमिक शाळेच्या पदवीदानानिमित्त एक अनोखे बक्षीस देण्यात आले : विश्वभर भ्रमण करण्यासाठी आर्थिक साहाय्य. विल्यम यांनी प्रवास करताना आपल्या विश्वभरात सर्वत्र अत्यंत दुःख पाहिले. त्यांचे जीवन अशा आवश्यक गोष्टीत गुंतवणूक केली पाहिजे जे सार्वकालिकतेसाठी कायम राहील हे त्यांनी ओळखले. त्यांच्या घरी पालकांना पाठवलेल्या पत्रात, विल्यम यांनी लिहिले, *"मी माझे जीवन मिशन क्षेत्र तयार करण्यासाठी* देत *आहे."* आणि त्यांनी तसेच केले. मित्रांनी त्यांना तसे न करण्यास निरुत्साहित केले, त्यांना हे म्हणत की असा निर्णय करून, तो स्वतःला नष्ट करत आहे." त्याला उत्तर म्हणून, त्यांनी त्यांच्या बायबलच्या मुख पृष्ठावर हे लिहिले :

*"राखून ठेवले नाही."*

त्यांनी याले आणि प्रिन्स्टन येथे अध्ययन केले. तेथे असताना, त्यांनी दारुडे, दरिद्री लोकांसाठी याले आशा मिशन सुरू केले आणि यालेच्या जवळजवळ ७० टक्के विद्यार्थ्यी संघटनेला लहान गटात बायबल अध्ययनात व्यस्त ठेवले. मोठ्या वेतनाची नोकरी, आरामाचे जीवन आणि जवळच राहा असे सांगणारे मित्र- हे सर्व त्यांनी नाकारले, बोर्डेन यांनी पूर्वीच्या शब्दांमध्ये आणखी दोन शब्द जोडले :

*"माघार नाही."*

ह्या जगाच्या गोष्टींनी विचलित होण्यास नकार देत, बोर्डेन डिसेंबर १९१२ मध्ये चीनच्या प्रवासाला जहाजातून निघाले, अरबी भाषा शिकण्यासाठी मिसर मध्ये थांबले. कैरो येथे पोहचल्यावर, बोर्डेन पुस्तके वाचू लागले, परंतु थोड्याच अवधीत त्यानंतर पाठीचा मेंदूज्वर आजाराने त्रस्त केले. आजारी पडल्यावर अवघ्या एकाच महिन्यात, एप्रिल ९, १९१३ ला, वयाच्या २५व्या वर्षी त्यांचे निधन झाले आणि ते त्या येशू कडे गेले ज्याला ते प्रेम करत होते आणि सेवा केली होती.

बोर्डेन यांच्या निधनाची वार्ता अमेरिकेच्या जवळजवळ प्रत्येक वर्तमानपत्रात होती. एका स्त्रीने लिहिले, *“बोर्डेन यांनी केवळ त्यांची संपत्ती दिली नाही, परंतु स्वतःलाही दिले, इतक्या आनंददायी आणि स्वाभाविक पद्धतीने की तो त्याग नसून विशेषाधिकार वाटत होता.”*[६३] त्यांचे जीवन वाया गेले होते का? त्यांचा अकाली मृत्यू झाला होता का? देवाच्या अर्थव्यवस्थेत तसे नव्हते. येशूने म्हटले, *“मी तुम्हांला खचित खचित सांगतो, गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेला नाही तर तो एकटाच राहतो, आणि मेला तर पुष्कळ पीक देतो”* (योहान. १२:२४).

यशाचे कोणते उत्तम मोजमाप आहे : दीर्घायुष्य किंवा एक विश्वासू जीवन? कोण जिंकतो : एखादा जो खूप संपत्ती जमा करतो किंवा एखादा ज्याला तारणाऱ्यासाठी आणि आत्म्यांसाठी मोठी प्रीती असते? विजय कोठे मिळतो : स्वार्थी शोधात किंवा निस्वार्थी त्यागात?

जेव्हा बोर्डेन यांच्या वस्तू त्यांची आई आणि बहिणीला सापडल्या, तेव्हा त्यांना एका सुयोग्य गुंतवलेल्या जीवनाचा खजिना सापडला. मृत्यूपूर्वी त्यांचे डोळे बंद करण्यापूर्वी, बोर्डेन यांनी त्यांच्या बायबलच्या मुख पृष्ठावर आणखी दोन अंतिम शब्द लिहिले. ‘राखून ठेवले नाही’ आणि ‘माघार नाही’ च्या खाली, विल्यम यांनी जोडले,

*“खेद नाही.”*

*“खेद नाही”* असे आपण म्हणू शकणार का जेव्हा आपल्या जीवनाची धाव आपण संपवलेली असेन आणि आपण प्रभू येशू ख्रिस्तासमोर उभे असू?

**येशूने जे म्हटले त्याचा तोच अर्थ होता यावर तुम्ही विश्वास ठेवता का? खरेच?**

अनेकांच्या दृष्टीत, देमास हा एक विजेता होता. आणि बोर्डेन पराजित. परंतु एक दिवस येणार आहे जेव्हा मनुष्यांचे विश्लेषण आणि *“विजय”* यांचा काहीही अर्थ नसेल. एक दिवस येणार आहे जेव्हा प्रत्येक विश्वासू ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर (बेमा आसन) उभा राहील, की देहाने जी कार्ये केली आहेत त्याचा हिशेब द्यावा, मग ती मूल्यवान किंवा अयोग्य असोत (२ करिंथ. ५:१०; १ करिंथ. ३:११-१५). या विशेष न्यायामुळे त्या व्यक्तीचे तारण झाले होते किंवा तो हरवला होता यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होणार नाही. हा मुकुट देण्याचा प्रकार, पुरस्कार समारोह असेल जेव्हा प्रभू त्याच्या तारलेल्या लोकांचा सन्मान करेल व पुरस्कार देईल ज्यांनी, या जीवनात, शुद्ध हेतूच्या हृदयाने, त्याच्यावर विश्वासुपणे प्रेम केले आणि सेवा केली -त्याच्या गौरवाकरता.

येशूने त्याचे अनुसरण करण्यास, स्वतःचा नकार करण्यास आणि आपला वधस्तंभ उचलण्यास बोलावल्या नंतर, त्याने पुढे म्हटले :

*"कारण जो कोणी आपला **जीव** वाचवू पाहतो तो आपल्या जीवाला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरता आपल्या **जीवा**ला मुकेल त्याला तो मिळेल. मनुष्याने सर्व जग मिळवले आणि आपला **जीव** गमावला तर त्याला काय लाभ? अथवा मनुष्य आपल्या **जीवा**बद्दल काय मोबदला देणार?"* (मत्तय. १६:२५-२६).

वचन २६ मध्ये *"जीव' या शब्दाचे भाषांतर वचन २५ मध्ये शब्द* "जीव" असेच आहे. ख्रिस्ताचे बोलावणे की स्वतःचा नकार करा हे एक जीवन जगण्यास आमंत्रण आहे ज्याचा परिणाम सार्वकालिक विजयात होतो. परंतु जे स्वतःच्या मार्गांनी जीवन जगण्याची निवड करतात, त्याचा परिणाम हा सार्वकालिक नुकसान असे होईल.

येशूने जे म्हटले त्याचा तोच अर्थ होता यावर तुम्ही विश्वास ठेवता का?

खरोखर?

## त्या दिवसासाठी तयार होणे

मार्टिन लुथर यांनी त्यांच्या कैलेंडरवर दोन दिवस चिन्हित केले होते : *"आज"* आणि *"त्या दिवशी"*. *"त्या दिवशी"* हे ख्रिस्ताच्या न्यायाच्या दिवसाला संबोधते. त्यांनी त्यांचे *"आज"* सार्वकालिकतेच्या प्रकाशात जगले. जोनाथन एडवर्ड आणि लिओनार्ड रावेनहील जे दररोज अशी प्रार्थना करत असत, *"प्रभू, सार्वकालिकतेला माझ्या डोळ्याच्या बुबुळावर छापून टाक."* वेस्ली बंधू आणि जॉर्ज व्हाईटफिल्ड प्रभू साठी पवित्र जीवन व्यतीत करण्यास स्मरण देण्यासाठी त्यांना खूप प्रश्न होते जे स्वतःला सतत विचारत असत.[६४] आणि प्रेषित पौलाने संक्षिप्तमध्ये लिहिले : *"म्हणून आम्ही गृहवासी असलो किंवा दूर आलेले असलो, तरी त्याला संतुष्ट करण्याची आम्हांला हौस आहे. कारण आपणा सर्वांना ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर खऱ्या स्वरूपाने प्रकट झाले पाहिजे"* (२ करिंथ. ५:९-१०अ).

पौलाचे शब्द, *"तरी त्याला संतुष्ट करण्याची आम्हांला हौस आहे"*, हे हेतुपुरस्सरतेबद्दल बोलते. त्याचे विधान हे प्रभू येशू ख्रिस्ताच्या उपस्थितीच्या जाणीवेत सतत जीवन जगण्याचे बोलावणे आहे, ज्याच्यासमोर आपण सर्व जण एक दिवस उभे राहणार आहोत. तुमची त्याच्याबरोबर भेट होणार आहे. आणि तसेच माझीही.

आपण जीवनाच्या अधिपतीसोबत सार्वकालिक भेटीबद्दल विचार करण्याऐवजी उद्या एखाद्या मित्रासोबत किंवा सहकाऱ्यासोबत दुपारच्या भोजनाच्या भेटीविषयी विचार करतो का? आपण आपल्या लग्नाच्या दिवशी आपल्या सांसारिक जोडीदारासमोर उभे राहणाऱ्या दिवसाबद्दलच्या क्षणापेक्षा आपल्या सार्वकालिक नवऱ्यासमोर ज्या दिवशी उभे राहणार आहोत त्याच्याबद्दल अधिक काटेकोरपणे नियोजन करण्याचे धाडस करावे? आपण ख्रिस्ताच्या न्याय करण्याच्या दिवशी जे सार्वकालिक लाभांश उत्पन्न करेल त्यापेक्षा आपण निवृत्त झाल्यानंतर आराम, प्रवास, गोल्फ खेळणे किंवा समुद्रकिनारी शिंपले गोळा करण्याच्या विचारात गुंतवणूक करत आहोत का? आपण नियमितपणे आपल्या जीवनाचे परीक्षण करतो का, आपल्या गुंतवणूक करण्याबद्दल कठीण प्रश्न विचारतो का, आणि *“तो दिवस”* येत आहे हे पाहून सार्वकालिक गोष्टींवर लक्ष देत आहोत का? आपण त्याला खूप प्रसन्न करण्याचे आपले ध्येय केले आहे का?

माझ्या मित्रांनो, मला तुमची नजर त्यावर केंद्रित करण्यास आणि त्या दिवसाच्या प्रकाशात जगावे जेव्हा तुम्ही प्रभू येशू ख्रिस्तासमोर उभे राहाल याबद्दल तुम्हांला आव्हान देऊ द्या. त्याचे शेवटचे शब्द आपल्यासाठी हे आहे :

*“होय, मी त्वरेने येतो.”*

तुमचे हृदय आक्रोश करते का :

*“आमेन. ये, प्रभू येशू ये.”* (प्रकटीकरण २२:२०)?

सी. एस. स्टड, १८व्या शतकातील एक इंग्लिश क्रिकेट खेळाडू ज्यांनी आपली प्रसिद्धी आणि भविष्य त्यागले की त्यांचे जीवन देवाचे वचन आणि आत्म्यांसाठी गुंतवणूक केली, ते अशा प्रकारे लिहितात :

फक्त एकच जीवन, होय एकच जीवन,
लवकरच याचे क्षणभंगुर तास संपतील;
मग, ‘त्या दिवशी’ माझ्या प्रभूला भेटेल,
आणि त्याच्या न्यायासनासमोर उभा राहील;
फक्त एकच जीवन, हे लवकरच संपेल,
फक्त ख्रिस्तासाठी जे केले आहे तेच टिकेल.

फक्त एकच जीवन, तो शांत हळुवार आवाज,
सौम्यपणे उत्तम निवडीसाठी विनंती करतो
मला स्वार्थी ध्येय सोडण्यास आग्रह करतो,

आणि देवाच्या पवित्र इच्छेला बिलगण्यास सांगतो;
फक्त एकच जीवन, हे लवकरच संपेल,
फक्त ख्रिस्तासाठी जे केले आहे तेच टिकेल.

फक्त एकच जीवन, काही थोडी वर्षे,
प्रत्येक त्याचे ओझे, आशा आणि भितीसह;
प्रत्येक त्याच्या मातीसह मी पूर्ण केले पाहिजे,
स्वतःसाठी जगावे किंवा त्याच्या इच्छेसाठी;
फक्त एकच जीवन, हे लवकरच संपेल,
फक्त ख्रिस्तासाठी जे केले आहे तेच टिकेल.

जेव्हा प्रकाशमय जग मला खूप मोह घालेल.
जेव्हा सैतान विजयाचा मोह घालेल;
जेव्हा आपला मार्ग शोधण्याचा प्रयत्न करील,
तेव्हा आनंदाने बोलण्यास मला साहाय्य कर प्रभू ,
फक्त एकच जीवन, हे लवकरच संपेल,
फक्त ख्रिस्तासाठी जे केले आहे तेच टिकेल.

ओह, माझे प्रेम उत्साहाने प्रज्वलित राहू दे,
आणि जगापासून आता मला मागे वळू दे;
फक्त तुझ्यासाठी आणि केवळ तुझ्यासाठीच जगेन,
तुझ्या राजसानाजवळ तुला प्रसन्न करेन,
फक्त एकच जीवन, हे लवकरच संपेल,
फक्त ख्रिस्तासाठी जे केले आहे तेच टिकेल.

फक्त एकच जीवन, होय फक्त एकच,
आता मला सांगू द्या, ***"तुझी इच्छा पूर्ण होवो"***;
आणि जेव्हा शेवटी मी तुझे बोलावणे ऐकेन,
मला ठाऊक आहे मी म्हणेन, ***"हे सर्वात योग्य होते"***,
फक्त एकच जीवन, हे लवकरच संपेल,
फक्त ख्रिस्तासाठी जे केले आहे तेच टिकेल.

फक्त एकच जीवन, हे लवकरच संपेल,
फक्त ख्रिस्तासाठी जे केले आहे तेच टिकेल.
आणि मी मरणाच्या जवळ असेन, तेव्हा किती आनंदी असेन,
जर माझ्या जीवनाचा दिवा तुझ्यासाठी जळून गेला असेल.

मी तुम्हांला सोडून जात आहे, माझ्या सहकारी शिष्यांनो, आपल्या तारणाऱ्याच्या या आमंत्रणासह :

*“माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वतःस नाकारावे व आपला वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे” (मत्तय. १६:२४).*

काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

## मनन करा आणि प्रतिसाद द्या

१. जेव्हा सांसारिक जीवनाचा शेवट होतो, तेव्हा कोणते सार्वकालिक गुंतवणूक कायम राहतील?

२. जगिक यश किंवा सार्वकालिक यशासाठी काय केले जाते यावर तुमचे दैनंदिन निर्णय केंद्रित आहे का?

३. येशू ख्रिस्तासमोर उभे राहण्यासाठी तुम्ही सक्रीय राहून कशी तयारी करत आहात?

४. काय होईल जर येशू जे बोलला त्याचा तोच अर्थ होता?

# स्पष्टीकरणार्थ असलेल्या टीपा

## धडा १

१ इसहाक वाट्स यांनी ७५०पेक्षा अधिक गीते लिहिली आहेत, परंतु पुष्कळ जण *“व्हेन आय सर्वे द वंडरस क्रॉस”* यास त्यांचे सर्वात सुंदर काम म्हणून प्रशंसा करतात. चार्ल्स वेस्ली, ज्यांनी स्वतः ६०००पेक्षा अधिक गीते लिहिली आहेत, त्यांनी सुद्धा असे म्हटले आहे की त्यांनी हे गीत लिहिण्यासाठी त्यांची सर्व गीते सोडून दिली असती. हे गीत १७०७ मध्ये वाट्स यांच्या ‘हिम्स एंड स्पिरिचुअल सॉग्स’ मध्ये प्रथम प्रकाशित केले होते.

२ विल्यम मॅकडोनाल्ड, ट्रू डीसायपलशिप, पान १५. यात काहीही शंका नाही, की या प्रकाशनाने पवित्र शास्त्र सोडून इतर कोणत्याही पुस्तकापेक्षा माझ्या जीवनाला अधिक परिवर्तीत केले आहे.

३ सोरेन किर्केगार्ड प्रोवोकेशन मध्ये : स्पिरिचुअल रायटिंग्स ऑफ किर्केगार्ड (न्युयॉर्क : प्लो, २०१४), पाने १९७-१९९.

४ मत्तय. १६:२४ चे सर्व संदर्भ बायबल सोसायटी ऑफ इंडिया, संस्करण पुन्हा संपादित २०२१ मधून आहे.

## धडा २

५ २००३ मध्ये, ब्लाऊक्रांस ब्रीज बंजी जंप ही अधिकृतरित्या जगाची सर्वात मोठी व्यवसायिक बंजी जंप २१६ मीटरची म्हणून ओळखली जाते. १९९७ पासून फेस अड्रेनालाईनद्वारे तिला व्यवसायिकरित्या चालू ठेवलेले असून, त्यात कोणतीही जीवित हानी झालेली नाही. www. Faceadrenaline.com. वर अधिक माहिति प्राप्त करा.

६ देवाच्या योजनेच्या मोठ्या दृश्याची योजना पाहायची असेल-सृष्टी निर्माण पासून ते ख्रिस्त जो नवीन सृष्टी? तर रॉक इंटरनॅशनलचे किंग ऑफ ग्लोरी चित्रपटाचे १५-भाग पाहा. हा चित्रपट (पुस्तक म्हणून देखील उपलब्ध आहे) देवाचे गौरव आणि संदेश अशा प्रकारे प्रकट करतो जो समजला जातो. सर्व वय आणि संस्कृतीच्या लोकांसाठी. अनेक भाषांमध्ये उपलब्ध. www.king-of-glory.com.

## धडा ३

७ सी. एस. लुईस 'मियर ख्रिस्चियानीटी' मध्ये, आशेवर त्याच्या अध्यायात.

८ *द न्यू ऑक्सफोर्ड अमेरिकन डिक्शनरी, २००१.*

९ थॉमस चाल्मर्स, एक स्कॉटिश प्रचारक, यांनी हा संदेश दिला ज्याचे शीर्षक, 'द एकस्पल्सीव पॉवर ऑफ अ न्यू अफेक्शन. तुम्हांला संपूर्ण संदेश येथे मिळेल -https://www.monergism.com/thethreshold/sdg/Chalmers,%20 Thomas%20-%20The%20Expulsive%20Power%20of%20a%20 New%20Af.pdf

१० ऑगस्टीन. कन्फेशन्स. रेक्स वार्नर कडून भाषांतरित. न्युयॉर्क : मेंटर, १९६०.

११ जॉन पायपर यांनी *"डिजायरिंग गॉड"* मध्ये आढळणाऱ्या लेखात ही टिप्पणी केली आहे. ती येथे उपलब्ध आहे-http://www/deisringgod.org/articles/god-s-plan-for-martyrs

## धडा ४

१२ *द न्यू ऑक्सफोर्ड अमेरिकन डिक्शनरी, २००१. "नकार" हा शब्द प्रत्यक्ष दोन लॅटीन शब्दांपासून येतो, डे म्हणजे "औपचारिकरित्या" आणि नेगारे म्हणजे "नाही म्हणा". अशा प्रकारे, "नकार करणे" हे औपचारिकरित्या कशाला किंवा कोणाला नाही म्हणणे आहे.*

१३ *द न्यू ऑक्सफोर्ड अमेरिकन डिक्शनरी, २००१.*

## धडा ७

१४ हे लेकरांचे लोकप्रिय गीत अॅन ओम्ली यांनी १९४८ मध्ये लिहिले.

१५ *"द हायडिंग प्लेस"* हा चित्रपट, १९७५ मध्ये प्रदर्शित झाला आणि कॉरी टेन बूम यांच्या आत्मकथेवरील पुस्तकावर आधारित होता त्याचेही तेच नाव होते. या चित्रपटाचे दिग्दर्शन जेम्स कॉलीयर यांनी केले होते आणि त्यास गोल्डन ग्लोब नामांकन मिळाले होते.

## धडा ९

१६ ही आकडेवारी आणि अधिक माहिती ही *"द ट्रावलिंग टीम"* ने संकलित केले, हे एक सेवाकार्य आहे जे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना ख्रिस्ताचे पाचारण की *"संपूर्ण जगात जा"* (मार्क १६:१५) यास उत्तर देण्यासाठी प्रेरित करते. ही माहिती येथे मिळवू शकता-http://www.thetravelingteam.org.

१७ द *न्यू ऑक्सफोर्ड अमेरिकन डिक्शनरी, २००१।*

## धडा १०

१८ रीच मुलिंस यांनी हे गीत १९८७ मध्ये लिहिले आणि रेकॉर्ड केले. त्यांचे अल्बम *"पिक्चर्स इन द स्काय"* मध्ये हे प्रथम प्रकाशित झाले.

१९ चार्ल्स वेस्ली यांनी हे शब्द आणि अधिक ह्या गीतामध्ये लिहिले, *"व्हेर शाल माय वंडरिंग सोल बिगीन"*. हे गीत 'हिम्स एंड सैक्रेड पोएम्स' मध्ये १९३९ मध्ये प्रथम प्रकाशित केले.

## धडा ११

२० ह्या धड्यातील आकडेवारी केवळ या विषयावर वरवर आढावा देते. ही माहिती आणि वित्त आणि देवाचे विश्वभरातील मिशनवर बरेचकाही येथे प्राप्त करू शकता-http://www.thetravelingteam.org.

२१ मला आनंद आहे तुम्ही ही माहिती वाचत आहात. अतिशयोक्ती न करता, मी मागील दहा वर्षांमधील आतंकवादाने सर्वात जास्त मृत्यूची नोंद केली आहे त्यासोबत आंतकवादाची उदारमतवादी व्याख्या केली आहे (त्यामध्ये आत्मघाती हल्ल्यापेक्षा जास्त आहे) जेणेकरून याची खात्री करावी की ही आकडेवारीची अतिशयोक्ती होऊ नये. ही आकडेवारी अशा एका पोर्टलवरून घेतली आहे जे हजारो स्त्रोत एकत्र आणते. त्यानुसार, आतंकवादाने सर्वात जास्त मृत्यू (ज्यावेळेस मी लिहित आहे) मागील दहा वर्षांमध्ये २०१५ मध्ये जेथे ३२,७६३ मृत्यूंची नोंद केलेली आहे. ही माहिती येथून प्राप्त करू शकता-https"//www.statista.com/statistics/202871/number-of-fatalities-by-terrorist-attacks-worldwide. उपासमारीने झालेल्या लेकरांच्या मृत्युच्या बाबतीत, पुन्हा, मला अतिशयोक्तीपासून दूरच राहायचे आहे. अधिकतर आकडेवारी जी संस्थांकडून

मिळते जशी वर्ल्ड फूड प्रोग्राम (अमेरिका) किंवा OXFAM सांगतात की उपासमारीने झालेल्या मृत्यूंची संख्या दिवसाला २१,००० आहे (ज्यामध्ये पाच वर्षांच्या आतील लेकरांची संख्या ८,००० च्या वर आहे). हा अंदाज जरी वीस टक्क्याने कमी केला तरी, आतंकवादाने वर्षाला मरणाऱ्या लोकांच्या संख्येपेक्षा दोन दिवसात उपासमारीने मरणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे.

२२ रॉबर्ट एच. गंड्री यांचे मत्तय मधून : अ कॉमेंटरी ऑन हिस हैन्डबुक फॉर अ मिक्स्ड चर्च अंडर पर्सिक्यूशन (दुसरी आवृत्ती). ग्रैंड रैपिड्स द्वारे १९९४ मध्ये प्रकाशित केले आहे : येर्डमन्स. हा संदर्भ पान ३८८ मधून घेतले आहे.

२३ कॉरी टेन बूम द्वारे *"ट्रम्प फॉर द लॉर्ड : द स्टोरी दयाट बिगिन्स व्हेर द हायडिंग प्लेस एन्ड्स."* जरी मुळात १९७४ मध्ये प्रकाशित केले होते, तरी हा संदर्भ २०११ च्या संस्कारणातून आहे जो सीएलसी पब्लिकेशनने प्रकाशित केला आहे (फोर्ट वाशिंग्टन, पीए), पान ९२.

२४ विल्यम मॅकडोनाल्ड यांनी दैनंदिन भक्तीवर उत्कृष्ट पुस्तक लिहिले ज्याचे शीर्षक, *"वन डे ऍट टाईम."* एवरीडे पब्लिकेशनने १९९६ मध्ये प्रकाशित केले आहे, हा संदर्भ मे २९ वरील मननावरून घेतला आहे.

२५ अंथोनी नॉरिस ग्रोव्स (१७९५-१८५३) हे ख्रिस्ताचे अनुयायी होते आणि *"फादर ऑफ फेथ मिशन्स"* स्थापले होते, जे त्यांच्या कुटुंबासोबत जीवन जगले आणि अरबी-भाषा बोलणाऱ्या मुस्लीम लोकांना सुवार्ता सांगितली, प्रथम बगदाद मध्ये, आणि नंतर दक्षिणीय भारतात. तसेच, प्लायमाऊथ ब्रदरन चळवळीचे ते प्रारंभीचे नेते होते, वयाच्या ३०व्या वर्षी त्यांनी एक सामर्थ्यशाली आणि लहान पुस्तक लिहिले, ज्याचे शीर्षक, *"ख्रिस्चीयन डीवोटेडनेस"* ज्यातून हा संदर्भ घेतला आहे. या पुस्तकाने अनेक लोकांच्या जीवनाला प्रभावित केले आहे जसे जॉर्ज मूलर, विल्यम मॅकडोनाल्ड, जॉर्ज वेर्वर, वाचमन नी आणि इतर. संपूर्ण पुस्तक 'प्रोजेक्ट गटेनबर्ग' वर मोफत उपलब्ध आहे : http://www.gutenberg.org/files/24293/24293-h/24293-h.htm

२६ डेविड लिविंगस्टन, १८०० शतकातील आफ्रिकेसाठी एक प्रसिद्ध संशोधक आणि मिशनरी, ते अनेक वर्षांच्या साहित्याचा ठेवा ठेवून गेले आहेत. हा भाग त्यांचे 'प्रायवेट जर्नल्स' १८५१-१८५३ मधील आहे जो प्रकाशित केला आहे बर्क्ले द्वारे : युनिवर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस, १९६०.

## धडा १२

२७ पीटर एल. जॅक्सन द्वारे दिग्दर्शित, हा प्राचीन संदर्भ २००१ च्या चित्रपटातून आहे, *“द फेलोशिप ऑफ द रिंग”*. ‘द लॉर्ड ऑफ द रिंग्स” या जे. आर. आर. टॉलकिन्स यांच्या तीन शोकांतिकेवर आधारित आहे, या चित्रपटाला ऑस्करसाठी तीन नामांकन आणि इतर अनेक पुरस्कार मिळाले.

## धडा १३

२८ द *न्यू ऑक्सफोर्ड अमेरिकन डिक्शनरी, २००१ ।*

२९ विल्यम बार्क्ले यांचे डेली स्टडी बायबल हे मार्च १, १९७६ मध्ये प्रथम प्रकाशित झाल्यापासून बायबलचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक मौल्यवान स्त्रोत ठरले आहे. हा भाग त्यांचे फिलिप्पै. ४:८ वरील लिखाणातून घेतला आहे.

३० काटे विल्किनसन यांनी लिहिले, या गीताचे शीर्षक, *“मे द माइंड ऑफ ख्राईस्ट, माय सेवियर”* हे गोल्डन बेल्स यांनी प्रकाशित केले (लंडन : चिल्ड्रन्स स्पेशल सर्विस मिशन, १९२५).

## धडा १४

३१ लेविस स्मेड्स यांनी त्याचे पुस्तक ‘फर्गिव एंड फरगेट’ मध्ये ही टिप्पणी केली आहे (हार्पर कॉलिन्स, १९९६), पान. १३३.

३२ सेंट ऑगस्टीन ऑफ हिप्पो यांचा हा संदर्भ ‘नायसीन एंड पोस्ट-नायसिन फादर्स’ मधून घेतला आहे, प्रथम श्रुखला, संच ६. आर. जी. मॅकमुलन यांनी भाषांतरित केले. फिलीप स्चाफ यांनी संपादन केली. (बफेलो, न्युयॉर्क :ख्रिस्चीयन लिटरेचर पब्लिशिंग कंपनी., १८८८)

३३ एमी कार्मायकल, भारतात अनाथ लोकांसाठी एक मिशनरी. यांनी हा समर्थ लेख ज्याचे शीर्षक ‘जर” *आहे हे लिहिले. ह्या लेखाची पार्श्वभूमी त्यांनी सांगितली :* “एका संध्याकाळी एका सहकाऱ्याने प्रीतीचा मार्ग चुकलेल्या एका तरुणाची समस्या मला सांगितली. ह्यामुळे मी रात्रभर विचार करत होते, अशा समयासाठी वचन हे नेहमीच, ‘प्रभू , मी तो आहे का?’ मी तिला कोठेतरी चुकवले आहे का? मला कालवरीच्या प्रीतीबद्दल काय माहित आहे? आणि मग वाक्यामागून वाक्यानंतर *“जर’ आले. जसे काही माझ्या कानात मोठ्याने बोलले आहे.”* ह्या

लेखाच्या अनेक आवृत्त्या ऑनलाईन मोफत उपलब्ध आहेत. त्यात हे पण आहे : http://steppinginthlight.com/wp-content/uploads/2013/03/if-amy-carmichael.pdf.

## धडा १५

३४ जॉन हंट, थॉमस जैगर आणि जेम्स काल्वर्ट यांच्या कथेचा हा भाग सायमन गिलेबौड्स यांचे पुस्तक, *"मोर दयान कॉकरर्स"* मधून घेतला आहे : अ कॉल टू रैडीकल डीसायपलशिप (लंडन, यु के : मोनार्क बुक्स), २०११. पान. ४७.

३५ फिलीप हेन्री यांचे जीवनचरित्र त्यांचा मुलगा मॅथ्यू यांनी लिहिलेल्या पुस्तकात आहे, ज्याचे शीर्षक, *"द मिसलेनियस वर्क्स ऑफ द रेव. मॅथ्यू हेन्री"*, १८३३ मध्ये प्रकाशित (जरी मूळ जीवनचरित्र हे १६९९ मध्ये प्रकाशित केले होते), हा संदर्भ पान ३५ वर आहे. २०० वर्षांनतर, जीम ऐलीओट, इक्वाडोर येथे सेवा केलेले प्रसिद्ध मिशनरी आणि हुतात्मे यांनी या वाक्याची थोड्याशा वेगळी आवृत्तीची नोंद केली आहे, *"तो मूर्ख नाही जो जे गमावू शकत नाही ते मिळवण्यासाठी जे राखून ठेवू शकत नाही ते देऊन टाकतो."*

## धडा १६

३६ द *न्यू ऑक्सफोर्ड अमेरिकन डिक्शनरी, २००१।*

## धडा १८

३७ फ़्लाविअस जोसेफस, *"ऑफ द वार"* : बुक ५. अध्याय ११. विल्यम यांनी भाषांतरित केले.

## धडा १९

३८ जॉन जी. एलीओट यांनी *"व्हेन गॉड इस प्रेस्ड"* या अल्बम मध्ये १९९२ मध्ये *"एम्ब्रेस द क्रॉस"* हे गीत प्रकाशित केले.

३९ रेमंड इ. ब्राऊन. *"द डेथ ऑफ द मसीहा"*. पान ९६३.

४० जेम्स हैस्टिंग. *"अ डिक्शनरी ऑफ ख्राईस्ट एंड द गॉस्पल्स"*. पान ७३२.

४१ एलिझाबेथ क्लीफने यांनी १८६८ मध्ये लिहिलेले, हे गीत त्यांच्या मृत्युच्या नंतर तीन वर्षांनी १९८७ मध्ये *"ब्रीथिंग ऑन द बॉर्डर"* या शीर्षकाअंतर्गत प्रथम प्रकाशित केले. आज, हे सामान्यपणे 'बिनीथ द क्रॉस ऑफ जीजस' या नावाने ओळखले जाते.

४२ २००० पेक्षा जास्त गीतांच्या पुस्तकांमध्ये प्रकाशित केले गेले आहे, ऑगस्टस टोप्लाडी यांचे १७७६चे उत्कृष्ट साहित्य, *"रॉक ऑफ एजेस"*, आताही पुष्कळ आत्म्यांना स्पर्श करत आहे.

## धडा २०

४३ स्टैन्ली जोन्स. 'द ख्राईस्ट ऑफ द इंडियन रोड'. द अबिंग्डन प्रेस (न्युयॉर्क, एनवाय), १९२५.. हा संदर्भ पान ११८ वरून घेतला आहे.

४४ शेवटी, नियमशास्त्राने मानवजातीच्या देवाच्या धार्मिकतेच्या मानकास (परिपूर्णतेस) पूर्ण करण्याच्या असमर्थतेस उघड केले, स्वयं धर्मी लोकांना गप्प केले, आणि देवाच्या अंतिम उपायाकडे इशारा दिला- येशू ख्रिस्ता द्वारे न्यायीकरण होणे. ज्याप्रमाणे आरसा चुकीच्या लावलेल्या मेकप, अन्नाचे कण किंवा एखादा स्पष्ट मुरळ, यांना दाखवतो, त्याप्रमाणे नियमशास्त्र आपल्या पापाला प्रकट करते. ज्याप्रमाणे आरसा तोंडाला पुसू शकत नाही, तसेच नियमशास्त्र हृदयाला शुद्ध करू शकत नाही.

४५ विल्यम टेम्प्लेटन. 'अंडरस्टैडिंग ऐक्ट्स'. खंड एक. (झुलॉन प्रेस, २०१२). पान. ३२०.

## धडा २१

४६ सॅम्युअल झ्वेमर यांनी संदर्भ दिला आहे, *"द ग्लोरी ऑफ द इम्पोसिबल इन पर्स्पेक्टिव ऑन द वर्ल्ड ख्रिस्चीयन मूवमेंट"*, ज्याचे संपादक राल्फ विंटर आणि स्टीफन हावथोर्ने आहेत. (पासादेना : विल्यम कैरी लायब्ररी). पान २५९.

४७ चार्ल्स अल्बर्ट टीन्डले यांनी १९०५ मध्ये हे गीत लिहिले. जेव्हा ते त्यांच्या कार्यालयात काम करत होते तेव्हा त्यांना ही प्रेरणा झाली. वाऱ्याच्या झुळूकमुळे काही कागदे उडून आली आणि ते काम करत होते तेथे पसरली होती. एक विचार त्यांच्या मनात आला, *"माझ्या कामाच्या मध्ये काही अडथळा नको."*

ह्या विचारातून, गीताचा जन्म झाला, माझा आत्मा आणि माझ्या तारणाऱ्याच्या मध्ये काहीही अडथळा नको. आज, हे गीत ९० पेक्षा जास्त गीतांच्या पुस्तकातून प्रकाशित केलेले आहे.

४८ सी. एस. लुईस, ‘द लास्ट बैटल’ (हार्पर कॉलीन्स : न्युयॉर्क, १९५६), पान २२८.

४९ फॅनी क्रॉस्बी यांनी त्यांच्या आयुष्यात ८,०००पेक्षा जास्त गीते लिहिली. ह्या गीताशिवाय इतर कोणत्याही गीताने माझ्या आत्म्याला वेळी वेळी इतका स्पर्श केला नसेल. हे गीत गरजेच्या वेळी देवाच्या पुरवठ्याची साक्ष देते. पाच डॉलरची अत्यंत गरज असताना, फॅनी यांनी यांनी नेहमीप्रमाणे प्रार्थना केली. प्रार्थना संपताच दारावर थाप ऐकू आली. ह्या आश्चर्यचकित पाहुण्याजवळ क्रॉस्बीसाठी एक भेट होती. पाच डॉलर. त्या पुरवठ्याच्या अनुभवातून त्यांनी हे गीत लिहिले. माझा तारणारा मला सर्व मार्गात मार्गदर्शन करतो.

## धडा २२

५० एलिझाबेथ प्रेन्टीस यांनी जरी हे गीत १८५०च्या मध्याला लिहिले होते, तरी ते पुस्तकी स्वरूपात १८६९ पर्यंत प्रकाशित झाले नव्हते आणि शेवटी, १८७० मध्ये, *“सॉंग ऑफ डीवोशन फॉर ख्रिस्चीयन असोसिएशन”* या गीताच्या पुस्तकात पहिल्यांदाच प्रकाशित झाले.

५१ जेरी रैन्कीन एंड एनोख ब्रिजेस. ‘लाइव्हस गीवन, नॉट टेकन’ : २१स्ट सेंचुरी साऊथर्न बैप्टीस्ट मार्टिर्स. (इंटरनॅशनल मिशन बोर्ड, आयएमबी). २००५.

५२ *डिसायपल्स मेकिंग डिसायपल्स. ट्रेनर्स गाईड वर्जन २.२ पीडीएफ. येथे मिळू शकते-http://moredisciples.com/wp-content/uploads/2015/09/DISCIPLES-MAKING-DISCIPLES-2.2-TRAINERS-GUIDE.pdf*

५३ एस्तेर केर रुस्तोई, फिल केर यांची बहिण ज्यांनी ‘म्युसिक इन इवैन्जेलीजम’ हे पुस्तक लिहिले, या लेखिका, कवयित्री आणि सुवार्तिक होत्या. सतत बिघडणाऱ्या आरोग्यामुळे त्यांचे वयाच्या ५३ व्या वर्षी निधन झाले.  अशा प्रकारे, त्यांच्या गीताचे सुरुवातीचे शब्द, *“हे सर्वकाही योग्य होईल”* प्रोत्साहन देणारे वाटत होते जे त्यांच्या स्वतःच्या हृदयासाठी लिहिले होते. *“काही काम नसताना दिवस फारच मोठा वाटत असे, आपली संकटे असहनीय होत असत, आपल्याला तक्रार करण्याचा मोह होत असे, कुरकुर आणि निराशा; परंतु ख्रिस्त लवकरच प्रकट*

*होईल की त्याच्या वधूला घेऊन जावे, आणि देवाच्या सार्वकालिक दिवशी सर्व अश्रू कायमचे नाहीसे होतील."*

५४ कॅरोलीन ब्रिग्स. हायर ग्राउंड : *"अ मेमोयर ऑफ साल्वेशन फाउंड एंड लॉस्ट"*. रॉमन एंड लिटलफिल्ड पब्लिशर्स, २०११. पान २५१.

५५ थिलेमन वान ब्राग्ट यांनी लिहिले आणि जोसेफ एफ. सोहम यांनी भाषांतरित केले, *"मार्टीर्स मिरर : द स्टोरी ऑफ सेवंटीन सेंचुरी ऑफ ख्रिस्चीयन मार्टीरडम फ्राम द टाईम ऑफ ख्राईस्ट टू इसविसन १६००"* हे हेराल्ड प्रेस हे १९३८ मध्ये प्रकाशित केले.

५६ टरटूलियन. 'द प्रिस्क्रिप्शन अगेन्स्ट हेरेटिक्स'. पीटर होल्म्स यांनी भाषांतरित केले. अध्याय ३६. येथे उपलब्ध आहे-http://www.tertullian.org/anf/anf03/anf03-24.htm

## धडा २३

५७ *फिडलर ऑन द रुफ हा कार्यक्रम सर्वात प्रथम सप्टेंबर २२, १९६४ मध्ये सादर केला गेला. जोसेफ स्टेन यांनी लिहिलेले, जेरी बॉक यांचे संगीत आणि शेल्डन हर्निक यांची शब्दरचना, हॉलीवूड मध्ये, ब्रॉडवेवर आणि जगभरातील स्टेजवर हे संगीत अत्यंत यशस्वी ठरले.*

५८ स्टीव ग्रीन आणि डग्लस मॅककेल्वी यांनी मिळून लिहिले, *"मी जाईन"* हे गीत २००२ मध्ये बर्डविंग म्युसिक या लेबल अंतर्गत रेकॉर्ड केले गेले. पूर्ण गीत यथे उपलब्ध आहे-http://stevegreenministries.org/product/i-will-go/-

५९ या गीतामधील पहिल्या दोन ओळी तितक्याच समृद्ध आहेत जे फ्रेडरिक एम. लेहमन यांनी लिहिले. ते येथे उपलब्ध आहे -http://library.timelsstruths.org/music/The-Love-of-God.

## धडा २६

६० हा संदर्भ स्टार वार्स : एपिसोड पाच-'द एम्पायर स्टाईक्स बैक' येथून मिळतो. इर्विन किर्शनर द्वारे दिग्दर्शित, हा एपिसोड स्टार वार्स सागा द्वारे १९८० मध्ये प्रकाशित झाला.

६१ ब्रिटनी स्पियर्स यांनी तिच्या अल्बम मध्ये या गीताला रेकॉर्ड केले आहे ज्याचे शीर्षक *"ब्रिटनी इन २००१"* असे आहे. रामी आणि मैक्स मार्टिन सह डीडो कडून योगदान मिळून लिहिले आणि निर्मित करण्यात आले आहे.

## धडा २७

६२ पूर्ण कथेसाठी, फिल नाईट्स यांचे पुस्तक, 'शू डॉग : अ मेमोयर बाय द क्रीयेटर ऑफ नाईल' मध्ये शोध घ्या. (स्क्रीब्ननर, २०१६)

६३ येथे व इतर ठिकाणी आढळणाऱ्या माहितीसाठी मिसेस हॉवर्ड टेलर यांचे "मिसेस हॉवर्ड टेलर्स, बोर्डेन ऑफ याले. (बेथानी हाउस पब्लिशर्स, १९८८) येथे तपासा.

६४ वेस्ली बंधू (जॉन आणि चार्ल्स वेस्ली) आणि जॉर्ज व्हाईटफिल्ड यांनी मिळून भक्तिमान जीवन जगावे या हेतूने १७२९ला प्रभूला पूर्णपणे समर्पित, एक शिस्तबद्ध जीवन जगण्यासाठी एका गटाची स्थापना केली. बाहेरील जगाने टीका करत त्यांच्या गटाला, *"पवित्र क्लब"* (Holy Club) असे नाव दिले. पुढे या गटातून मेथोडिस्ट चळवळीचा विकास झाला. दररोजच्या वैयक्तिक भक्तीमध्ये ते स्वतःला सुमारे २२ प्रश्न विचारत असत की *"मी जाणीवपूर्वक किंवा नकळत अशी छाप पाडत आहे का की मी जो खरेच आहे त्यापेक्षा उत्तम आहे?"* पासून ते *"कोणी आहे का ज्याला मी घाबरतो, पसंद करत नाही, त्यागले आहे, टीका करतो, त्याच्या प्रति संताप किंवा उपेक्षा करत आहे?"* जर तसे आहे, तर मी त्याबद्दल काय करत आहे?" या प्रवासावर अधिक माहिती साठी, वेस्ली बंधूंची जीवनचरित्रे वाचावीत.

# विशेष वैशिष्ट्ये : पवित्र शास्त्रात रमणे

नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे;
त्यात जे काही लिहिले आहे ते तू काळजीपूर्वक पाळ
आणि रात्रंदिवस त्याचे मनन कर;
म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होईल
व तुला यश:प्राप्ती घडेल.

(यहोशवा १:८))

पवित्र शास्त्रात, *"धन्यवादित मनुष्य"* हा तो मनुष्य आहे जो देवाच्या वचनावर मनन करतो. *"जो पुरुष दुर्जनांच्या मसलतीने चालत नाही; पापी जनांच्या मार्गात उभा राहत नाही आणि निंदकांच्या बैठकीत बसत नाही, तर परमेश्वराच्या नियमशास्त्रात रमतो, त्याच्या नियमशास्त्राचे रात्रंदिवस मनन करतो, तो धन्य. जे झाड पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेले असते, जे आपल्या हंगामात फळ देते, ज्याची पाने कोमेजत नाहीत, अशा झाडासारखा तो आहे; आणि जे काही तो हाती घेतो ते सिद्धीस जाते."* (स्तोत्र. १:१-३)

## मनन काय आहे?

*"मनन"* साठी इब्री शब्द जो वापरला आहे तो 'हागाह' आहे ज्याचे भाषांतर विलाप करणे, विचार करणे किंवा कल्पना करणे असे केले जाऊ शकते. यशया ३१:४ मध्ये, हे तरुण सिंहाचे त्याच्या भक्ष्यावर गुरगुरण्याबद्दल (हागाह) बोलते. ही कल्पना ही सखोल मनन करणे आहे. पवित्र शास्त्रानुसार मनन करण्याची व्याख्या ही जगाच्या दृष्टीकोनाच्या अगदी विरुद्ध आहे.

जग म्हणते, *"मनन कर!"* तुझे मन रिकामी कर.

**देव म्हणतो, "मनन कर." तुझे मन माझ्या वचनाने भर.**

जग म्हणते *"तुझ्या मनाला आराम दे."*

**देवाचे वचन म्हणते, "तुझे मन सार्वकालिक गोष्टींवर केंद्रित कर."**

## आपला हर्ष कोठे आहे?

स्तोत्रकर्ता म्हणतो की धन्यवादीत मनुष्य अशा विचारांमध्ये हर्ष करतो.

आपण आपला हर्ष कशामध्ये प्राप्त करतो? आपला हर्ष कोठे आहे? आपण ज्या गोष्टींमध्ये हर्ष करतो त्यावरच मनन करणार आहोत. आपला आवेश मनन करण्याच्या आपल्या जीवनावर नियंत्रण करेल आणि आपली मनन करण्याची निवड आपल्या आवेशाला आकार देईल. आपले मनन करणे हे दिवसाच्या एखाद्या वेळेसाठी मर्यादित आहे का किंवा ते निरंतर आहे? पहिल्या स्त्रोतातील हा धन्यवादीत मनुष्य रात्रंदिवस ते करतो. देवाच्या वचनावर मनन करणे हे आपल्या दिवसभरात केवळ एक घटना नसावी, परंतु आपण जीवन जसे जगतो तो मार्ग असावा. माझे विचार कुठे रुजले जातात? माझे मन आणि जीवनात अवचेतनपणे काय होत असते ज्याच्याबद्दल मला काहीही माहिती नसते?

आपण कोणत्या झऱ्याच्या किनाऱ्यावर लावलेले आहोत? रोवले जाणे हे केवळ उपस्थित असण्यापेक्षा अधिक आहे. तो आपला निवास आहे. जर आपल्या जीवनाचे मूळ हे देवाच्या झऱ्याशी जुळलेले असतील तर मग आपल्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांनी धर्मी समृद्धी उत्पन्न केली पाहिजे (जगिक संपत्तीपेक्षा वेगळी). कोणते फळ आपण उत्पन्न करत आहोत? बाह्य फळ कमी आहे असे जेव्हा आपण विचार करतो त्याद्वारे आपण निराश झालो आहोत का जेव्हा कदाचित देव आपल्यामध्ये कार्यरत आहे, आपल्याला अधिक फळ देण्यासाठी तयार करत आहे? जो आत्मा देवाच्या ज्ञानापासून (१:२) सतत पोषण घेतो, त्याची तुलना मनुष्याच्या शब्दांच्या अयोग्य झऱ्याशी केली आहे (१:१). देवाच्या वचनाला आपल्या जीवनात कोणते स्थान आहे? *"धन्यवादीत"* ही आपली व्याख्या देवाच्या विचारांशी जुळत आहे का?

## देवाच्या वचनावर व्यवहारिक मनन

मार्गदर्शिका जी मी आता तुम्हांला सांगणार आहे तो एक मार्ग आहे की देवाच्या वचनात वेळ व्यतीत करणे. मागील वर्षांमध्ये, मी अनेक तंत्र आणि शैलींचा वापर केला आहे, परंतु ही पद्धत अत्यंत व्यवहारिक वाटते. ती परिपूर्ण नाही. किंवा ती उताऱ्याच्या पूर्ण संदर्भावर सखोल कार्य करत आहे किंवा एखाद्या विषयाबद्दल देवाचे वचन काय सांगत आहे त्याचे व्यापक चित्र देत आहे असेही नाही. परंतु देवाच्या वचनावर मनन करण्याचा हा एक व्यवहारिक मार्ग आहे.

मी तिला **२०-१०-५-१**, असे म्हणत आहे.

## पद्धत : २०-२०-५-१

जेव्हा जेव्हा तुम्ही देवाचे वचन उघडता, ते प्रार्थनापूर्वक, संयमपूर्वक, सातत्याने, आणि उद्देशपूर्वक करावे.

या पद्धतीचे चार घटक पुढीलप्रमाणे आहेत :

**वीस** हे निरीक्षणासाठी आहे.
**दहा** हे चौकशीसाठी आहे.
**पाच** हे खोल विचार करण्यासाठी आहे.
**एक** हे लागूकरणासाठी आहे.

## उताऱ्यावरून निरीक्षण (२०)

देवाच्या वचनावर प्रार्थनापूर्वक विचार केल्यावर आणि उतारा मोठ्याने वाचून, त्या वचनात निरीक्षणासाठी पाहा. जेव्हा मी म्हणतो निरक्षण करा, हे मग काही सखोल आध्यात्मिक अर्थ शोधण्यास सांगणे नाही किंवा मूळ इब्री भाषेची पडताळणी करणे नाही. त्याऐवजी हे एक वचन किंवा लहान उताऱ्यावर वीस निरीक्षणे पाहणे असा आहे.

उदाहरणाने स्पष्ट करताना, जर मी तुमच्यासमोर बसलेलो आहे, तर तुम्ही हे निरीक्षण करू शकता की मी कसा आहे (१) मी माझ्या डाव्या हातात कडा घातला आहे, (२) मी अनवाणी आहे, (३) मी सोया लाटे जूस पीत आहे , (४) मी मॅकबुक एयर वर काम करत आहे, (५) मी टक्कल पडलेला आहे, (६) मी हॉटेलच्या खोलीत बसलो आहे, आणि (७) मी एक पुस्तक लिहित आहे. यादी अशीच पुढे सुरू राहील.

स्तोत्र १:२-३ मध्ये, मी हे निरीक्षण केले आहे की धन्यवादीत मनुष्य (१) मनन करण्याचा **आवेश** बाळगतो ("त्याचा आनंद प्रभूच्या नियमशास्त्रात आहे"), (२) त्याचे **प्राधान्य** हे मनन करणे आहे ("रात्रंदिवस"), (३) देवाच्या वचनाचे मनन करण्यास तो आधीपासून **व्यस्त** आहे ("त्याच्या नियमशास्त्रावर"), (४) त्याचे **चित्रण** झाडासारखे केले आहे ("पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेले झाड"), (५) त्याला मनन करण्याचे **स्थान** आहे जे लोकांकडून दिसते (लक्ष द्या : एक झाडाचे पोषण मुळापासून येते), (६) त्याला **उत्पादन** आहे जे इतरांसाठी उपयोगी आहे त्याच्या मनन करण्यामुळे ("त्याच्या हंगामात फळ देते"), (७) ते **टिकते** ("त्याची पाने कोमेजत नाहीत"). उघडच आहे, ही यादी अशीच पुढ चालू राहील.

सरळ मुद्दा हा आहे की निरीक्षण करणे सामान्य वाटू शकते, जेव्हा तुम्ही उताऱ्यात खोलवर जाता (एक किंवा दोन निरीक्षणानंतर थांबत नाही), तेव्हा तुम्ही दृश्यावर खोलवर विचार करू लागाल जो स्थापित केलेला आहे आणि पवित्र आत्मा जो विचार करत आहे त्यासाठी तुमचे मन उघडण्यास सुरुवात करेल. थोड्या मननानंतर थांबण्याच्या मोहाला बळी पडू नका. प्रत्येक वचनात कमीत कमी वीस निरीक्षणे करा. अशक्य वाटते? तसे नाही. काही मित्र आणि मी मिळून ख्रिस्ताचे वधस्तंभावरील शब्द, *"मला तहान लागली आहे"* (योहान. १९:२८) यातून आम्ही वीस पेक्षा जास्त निरीक्षणे केली आहेत.

निरीक्षण करण्याच्या ह्या प्रक्रियेत, उतारा १०-१५ वेळा वाचण्याची तयारी ठेवा. अडकले असे वाटेल? पुन्हा वाचा. आणि पुन्हा.

तुमच्या निरीक्षणासाठी नोंदवही ठेवा आणि लवकरच तुमच्याकडे स्वतःचा एक भाष्यग्रंथ तयार होईल! असे वीस निरक्षण केल्यानंतर, तुम्हांला एखादा संदेश ऐकावा असे वाटेल किंवा त्या उताऱ्यावर भाष्यग्रंथ वाचावा असे वाटेल-आणि वीस आणखी तुम्हांला मिळतील. तरीही उत्तम, एखाद्या मित्राला तुमच्याबरोबर त्या उताऱ्यावर मनन करण्यास बोलवा, आणि यादीमध्ये सतत भर घालत राहा.

## उताऱ्याची चौकशी (१०)

तुमची निरीक्षणे पूर्ण झाल्यावर, उताऱ्याची चौकशी करा. जरी ध्येय हे दहा प्रश्नांवर स्थिर केले असले, तरी मला सामान्यपणे हे फारच थोडे वाटते. उताऱ्याबद्दल प्रश्न विचारल्यावर पुढील अभ्यासासाठी गोष्टी उघड होतील, मूळ उतारा पवित्र शास्त्रातील इतर उताऱ्याशी जोडला जातो आणि असे विचार प्रकाशात येतात ज्यांचा तुम्ही कधी विचारही केला नसेल. अपराध दृश्य चौकशी करणाऱ्यासारखे व्हा किंवा अपराधी मन, मानसशास्त्र किंवा सीएसआय सारख्या दृष्टीकोनातून विचार करा. चौकशी करण्याचे मुलभूत प्रश्न विचारा : कोण? काय? का? कोठे? केव्हा?

(१) धन्यवादीत मनुष्याला एक झाड म्हणून का चित्रित केले आहे आणि इतर कोणत्याही गोष्टीप्रमाणे का नाही? (२) त्यास नदीच्या पाण्याजवळ का लावलेले आहे? (३) ते हे दर्शवते का त्याला जाणीवपूर्वक तेथे लावले आहे? (४) त्याला कोणी लावले? (५) त्याला का लावले? (६) असा काही हंगाम आहे का ज्यामध्ये तो फळ देत नाही? (७) फळ कोण खातात? इत्यादी.

आणखी एक म्हणणे, माझे अधिकतर संदेश हे उताऱ्यावर अशी चौकशी केल्याने जन्मले आहेत.

## उताऱ्यावर खोलवर विचार करणे (५)

तुम्ही निरीक्षण व चौकशी केल्यानंतर पूर्ण शांततेत पाच मिनिटे व्यतीत करावी असे मी तुम्हांला प्रोत्साहन देत आहे. ही वेळ शांतपणे झोपणे किंवा घड्याळ्याचे ३०० वेळा ठोके वाजण्याची वाट पाहण्यासाठी नाही. तुम्ही निरीक्षण केलेले आणि प्रश्न जे तुम्ही लिहिले आहेत त्यावर मनन करण्याची वेळ आहे. तुम्ही जे मनन केले आहे त्यामध्ये खोलवर जाण्याची ही संधी आहे आणि पुढे काय करावे यासाठी प्रभूवर विश्वास ठेवा आणि त्याला तुम्हाला मार्गदर्शन करू द्या.

सुवार्ता. खरोखरच तो देईल.

## तुमच्या जीवनासाठी लागूकरण (१)

मग मी वीस तरुणांच्या गटात किंवा एकटाच असो, व्यक्तीमागे एक लागूकरणाची आवश्यकता आहे. याकोब १:२२-२५ मध्ये देवाच्या वचनाची तुलना आरशाशी केली आहे. मी माझे तोंड किंवा शरीर स्वच्छ करण्यासाठी आरशाचा उपयोग करत नाही, किंवा दुसऱ्यांची तपासणी करण्यासाठी देखील मी त्याचा उपयोग करत नाही. त्याचा उद्देश हा माझ्या स्वतःच्या चेहऱ्याचे प्रतिबिंब दाखवणे हा आहे, जेणेकरून मी त्यानुसार उत्तर देऊ शकावे.

त्याचप्रमाणे, जेव्हा मी प्रभूच्या नियमशास्त्रात पाहतो (देवाचे माझ्यासाठी प्रेमपत्र), तेव्हा दयाळूपणे ते माझ्या जीवनात काय उघड करते हे पाहण्याची संधी मिळते -म्हणजे मी येशू ख्रिस्ताच्या प्रतिमेशी अधिक समरूप व्हावे. दिवसभर स्वतःला विचारण्यासाठी एक चांगला प्रश्न असा आहे : हा दिवस वेगळा कसा ठरला आहे आणि देवाच्या वचनात रममाण झाल्यामुळे माझ्यात कोणते परिवर्तन झाले आहे?

## एक लाभांश

मी हे लिहिताना थोडा बिचकत आहे, कारण तुम्ही स्वतःहून त्याचा शोध घेण्याच्या आनंदापासून तुम्हांला मी वंचित करू इच्छित नाही, पण तुमच्यापैकी काहींना अतिरिक्त प्रेरणा हवी असेल म्हणून ते येथे आहे.

मला असे आढळले आहे की अशा प्रकारे देवाच्या वचनाचा अभ्यास केल्याने एक अद्भुत परिणाम होतो. देवाच्या वचनावर मनन आणि चिंतन करून तुम्हांला केवळ अगणित आशीर्वाद मिळत नाहीत, तर कोणत्याही प्रयत्नावाचून, तुम्ही ते चांगले स्मरण करता. मी शेकडो वचनांचा संदर्भ देत असताना, त्यापैकी सर्वात जास्त ज्यांनी माझे मन आणि हृदयावर गहन छाप सोडली आहे ही तीच वचने आहेत ज्यांचे मी जाणीवपूर्वक स्मरण केले आहे. देवाच्या वचनावर खोलवर मनन केल्यामुळे आणि त्यास माझ्या हृदयात खोलवर लपवून ठेवल्यामुळे मला माहित असलेली अनेक वचने माझ्या स्मरणात कायमची कोरली गेली आहे.

माझ्या मित्रा, *"२०-१०-५-१"* हे कदाचित बरेच साधे वाटत असेल, परंतु नम्रपणे आणि प्रार्थनापूर्वक दृष्टीकोनाने पवित्र शास्त्रावर गहन विचार करण्यास मी तुम्हांला आमंत्रित करत आहे.

आणि, जसे तुम्ही पवित्र शास्त्रावर मनन करता, हे लक्षात ठेवा :

प्रभू जे बोलतो त्याचा तोच अर्थ असतो.

# रॉक इंटरनॅशनल तर्फे आणखी एक सत्य शिष्यत्व संसाधन

## समृद्ध व्हा : देवासोबत घनिष्टतेचा आनंद घ्या-पुस्तक

कर्करोगाशी झुंजत असताना लिहिलेले, लेखक नाटे, वाचकांना स्तोत्र. १:२-३ द्वारे प्रवासात घेऊन जात आहे जे धन्यवादीत जीवनाच्या एकतीस-पैलुंद्वारे परीक्षण करते. हे पुस्तक हृदयस्पर्शी प्रश्न उपस्थित करते आणि ख्रिस्ताच्या अनुयायांना त्याच्यासोबत घनिष्ट आनंद घेण्यापासून रोखणाऱ्या मूळ कारणांचा शोध घेते.

देव आपल्याला खरोखर समृद्ध होण्यास आमंत्रित करत असताना आपण आध्यात्मिक दारिद्र्याच्या स्थितीत जगत आहोत का?

देवाविषयी जाणण्यापासून ते देवाला ओळखण्याचा आणि त्याचा आनंद घेण्यापर्यंतचा प्रवास सुरू करा.




**एका झाडाची शक्ती त्या भागात असते ज्यास कोणी पाहत नाही.**

WWW.ROCKINTL.ORG/
DISCIPLESHIP-FOCUSED-TOOLS

# रॉक इंटरनॅशनल तर्फे कालक्रमानुसार सुवार्ता संसाधने

**उत्पत्ती ते प्रकटीकरण-स्पष्ट सुवार्ता साधने ११५ पेक्षा अधिक भाषेत.**

## गौरवाचा प्रभू-चित्रपट/डीव्हीडी




बायबलला मोठ्याने वाचण्यासाठी जवळजवळ ७० तास लागतात. हा सखोल १५-एपिसोडचा चित्रपट त्याची मुख्य कथा आणि संदेश २२२ मिनिटांमध्ये अनुभव करून देतो. गौरवाचा राजा सचित्र पुस्तकाचे शब्दशः चित्रित प्रदर्शन.




## गौरवाचा राजा-सचित्र पुस्तक

पवित्र शास्त्रानुसार अचूक वचन आणि चित्रांसह, जगातील सर्वाधिक खप असलेल्या पुस्तकाला समजण्याची कथा आणि संदेश ७० दृश्यांमध्ये स्पष्ट करते. चित्रपटासारखे, हे सर्व वयोगटातील आणि संस्कृतीच्या लोकांसाठी आहे.

## गौरवाचा राजा सचित्र अभ्यास मार्गदर्शन




चित्रपट आणि सचित्र पुस्तकासाठी हे आश्चर्यकारक सहयोगी साधन १५ किंवा ७० धड्यांची (निवड तुमची) प्रयोगवही/पाठ्यक्रम आहे जे बायबलचा पाया आणि चौकटीला नव्याने स्पष्ट करते. सर्व नियोजित कार्यक्रम, वयोगट आणि संदर्भांसाठी अनुकलनीय. हे देखील उपलब्ध आहे : **गौरवाचा राजा** रंग भरण्याचे पुस्तक.

WWW.KING-OF-GLORY.COM

## एकच देव एकच संदेश-पुस्तक




वास्तविक जीवनातील कथा आणि संशयवादी लोकांच्या ईमेल एकत्र करून, संदेष्ट्यांच्या शास्त्रवचनांमधून हा तीन-टप्प्यांचा, कालक्रमानुसारचा प्रवास सत्य शोधणाऱ्यांना त्यांच्या अडथळ्यांवर मात करण्यास मदत करतो आणि जीवनातील सर्वात मोठ्या प्रश्नांचा पुनर्विचार करण्यासाठी एक चौकट प्रदान करतो. संशयवादी लोकांकडून मिळालेले ईमेल उतारे विरोधात्मक स्पष्टता देतात.

ROCKINTL.ORG/ROCK-DOCUMENT/ONE-GOD-ONE-MESSAGE-HINDI

ROCKINTL.ORG-RESOURCE-LIBRARY-HINDI

## धार्मिकतेचा मार्ग -रेडिओ कार्यक्रम




या बायबल मालिकेत १०० परस्पर जोडलेले १५-मिनिटांचे रेडीओ कार्यक्रम आहेत. पश्चिम आफ्रिका, सेनेगल येथील मुस्लीम लोकांसाठी सर्वात प्रथम हे वोलोफ भाषेत निर्माण केले होते.

**पाहा, ऐका आणि वाचा, डाऊनलोड करा आणि इतरांना सांगा**
**ही सर्व बहु-भाषीय संसाधने मोफत आहेत**

Relief Opportunity & Care for Kids — ROCK INTERNATIONAL — Resources Of Crucial Knowledge

WWW.ROCKINTL.ORG/RESOURCE-LIBRARY